ज्ञानदीप लावू जगी

# पुणे नगर वाचन मंदिर

स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८

email : pnvm1848@gmail.com
www.punenagarvachan.org

पुस्तकाचे नाव : सखारामबापू चरित्र

लेखक : यशवंत गोपाल कानेटकर

प्रकाशक : चित्रशाळा प्रेस, पुणे

प्रकाशन वर्ष : १९३५

मूळ ग्रंथ प्रत : शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे


पुणे नगर वाचन मंदिर

अंकेक्षण (डिजीटायझेशन) प्रकल्प

अंकेक्षण रूपांतर - २०२१

954.74

# सखारामबापू चरित्र.



954.74
Kan

D.V.POTDAR LIBRARY
S P COLLEGE
D00948

# सखारामबापूचें चरित्र.


लेखक

श्रीयुत यशवंत गोपाळ कानेटकर, एम्. ए.

शिक्षक, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीज् हायस्कूल, पुणें,

माजी सहकारी संपादक महाराष्ट्रीय-ज्ञानकोश.

व

" श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांचें चरित्र, "

" अरविंद घोष यांचें चरित्र, " ' ज्ञानेश्वरीची शब्दसृष्टी '

इत्यादि पुस्तकांचे कर्ते.




कै. म. म. द. वा. पोतदार,

ग्रंथ संग्रह


किंमत १ रु.

— मुद्रक व प्रकाशक —
शंकर नरहर जोशी, चित्रशाळा प्रेस, १०२६
सदाशिव पेठ पुणें.

M|92६४



सखारामबापूचें हस्ताक्षर.

# अनुक्रमणिका.


| | | |
|---|---|---|
| | प्रस्तावना - - - - | १–३ |
| | आत्मनिवेदन - - - - | ४–७ |
| प्रकरण १ लें | कुलवृत्तांत - - - - | १ |
| ,, २ रें | बाल्य व तारुण्याचा प्रारंभ - - | १० |
| ,, ३ रें | सखारामबापू व उत्तराहिंद - - | १८ |
| ,, ४ थें | निजामाशीं युद्ध - - - - | ४२ |
| ,, ५ वें | कर्नाटकांतील स्वाऱ्या - - - | ७२ |
| ,, ६ वें | बापूचा अधिकारन्यास - - - | ८७ |
| ,, ७ वें | नारायणरावाचा खून - - - | १०१ |
| ,, ८ वें | बारभाईचें कारस्थान - - - | ११२ |
| ,, ९ वें | सर्वाधिकारी सखारामबापू - - | |
| | १ बारभाई व राघोबाचा पाठलाग - | १२२ |
| | २ साष्टीचा वेढा व इंग्रज–मराठे युद्ध | १४२ |
| ,, १० वें | सर्वाधिकारी सखारामबापू १ पुरंदरचा तह | |
| | २ इंग्रजांचें लपंडाव ३ अंतस्थ भानगडी | १५५ |
| ,, ११ वें | मोरोबाचें कारस्थान व इंग्रज–मराठे युद्ध | १७५ |
| ,, १२ वें | सखारामबापूंची कैद, अखेरचे दिवस व मृत्यू | २०९ |
| ,, १३ वें | संकीर्ण माहिती - - - - | २१८ |
| | परिशिष्ट - - - - - | २५४ |


—

## पुस्तकांत वापरलेले कांहीं संक्षेप.

पा. सं. नं—पारसनीस संग्रहांतील अप्रकाशितपत्रें नंबर.

पे. द—पेशवे दप्तर.

म. रु—मराठी रुमाल. ( भावे )

प. कॅ—पर्शियन कॅलेंडर्स.

खरे—खरे यांचा ऐतिहासिक लेखसंग्रह.

पु. द—पुरंदरे दप्तर.

# प्रस्तावना.

सखारामबापूचें चरित्र लिहिण्याचा प्रयत्न आजपर्यंत कोणी केला नव्हता तो रा. कानेटकर यांनीं केला; याचें कारण पूर्वीं या चरित्रास उपयोगी पडणारे कागद फारसे उपलब्ध नव्हते आणि आतां मात्र भरपूर कागद सापडले असें समजण्याचें कारण नाहीं. पेशवे दप्तराच्या भागांनीं व पुरंदरे दप्तराच्या खंडांनीं बापूसंबंधी कांहीं अधिक माहिती प्रकाशित झाली व सातारा येथील कागदानीं एकदोन बाबींचा उलगडा होण्यास मदत झाली हें खरें असलें तरी सखारामबापूचें सांगोपांग चरित्र लिहिण्यास अद्याप बऱ्याच ठिकाणीं कागदपत्रांची उणीव भासते, ही गोष्ट रा. कानेटकरांनींच नमूद केली आहे. त्याअर्थीं दहावीस नवे कागद हातीं आलें ते समाविष्ट करण्यासाठीं हा चरित्रग्रंथ लिहिला गेला कीं काय अशी कोणास शंका येण्याचा संभव आहे. पण हा ग्रंथ वाचून पाहणाऱ्यास वरील शंका अस्थानीं आहे व हें चरित्र लिहिण्यानें सखारामबापूची माहिती तर एकत्रित केली गेलीच पण त्याहीपेक्षां महत्त्वाची गोष्ट ही आहे कीं ऐतिहासिक पुरुषाच्या चरित्रलेखनाविषयींच्या रूढ कल्पनाच या ग्रंथानें कांहीं बाबतींत बदलाव्या लागतील असें दिसतें.

गेल्या पन्नास वर्षांत जीं ऐतिहासिक चरित्रें मराठींत लिहिलीं गेलीं त्यांचें विहंगमदृष्ट्या अवलोकन केल्यास एक गोष्ट निदर्शनास येते ती ही कीं, जे लोक "जवानमर्द" होते किंवा ज्यांनीं "खूप शर्तिनें राज्य राखिलें" अशांचीच चरित्रें लिहिलीं गेलीं. अर्थात् आमच्या पूर्वजांत शूर व मुत्सद्दी पुरुष होऊन गेले याची आठवण देण्यासाठीं चरित्रें लिहिण्याचा खटाटोप करावयाचा असतो असा समज रूढ आहे. याचाच अर्थ असा कीं पूर्वजांची स्तुतिस्तोत्रें गाऊन आजच्या पिढीला स्फुरण आणण्यास किंवा तिला मार्गदर्शन करण्यास जीं चरित्रें उपयोगी पडण्याजोगीं असतील तेवढ्यांचीच निवड केली गेली आणि निवड केल्यावर देखील चरित्राची मांडणी उठावदार होण्यासाठीं चरित्रनायकाचे गुण खुलवून सांगणें आणि त्याच्या प्रतिस्पर्ध्याचें चित्र हिणवून काढणें चरित्रलेखकाला अवश्यकच भासत असे. यामुळें या तुलनेच्या पद्धतीनें 'नाना व महादजी यांत अधिक योग्यता कोणाची' अशासारखे प्रश्न चरित्रलेखनाच्या रूढ पद्धतीनें उत्पन्न होत असतात. तो प्रकार रा.

कानेटकर यांच्या पद्धतींत होत नाहीं. सखारामबापूचीं बहुतेक कृत्यें समर्थनीय होती असें गृहीत धरून त्याचें चरित्र सजविण्याचा प्रयत्न या चरित्रांत केलेला नसून सत्यसंशोधनाच्या दृष्टीनें बापूच्या कोणत्या कृत्याशीं काय हेतु होता व कोणत्या कृत्याचे काय परिणाम झाले याची स्वतंत्रपणें मीमांसा करण्याचा प्रयत्न रा. कानेटकर यांना केला आहे. हेंच या ग्रंथातील लेखनपद्धतीचें वैशिष्ट्य होय. सखाराम बापूनें चाळीस वर्षें राजकारणांत भाग घेतला व किती तरी उलाढालींत आपल्या अंगावर जबाबदारी घेऊन त्यानें कामें केलीं. तेव्हां या सर्वच उलाढालींत त्याला यश येणें अशक्य होतें. कांहीं ठिकाणीं त्याचा अंदाज बरोबर ठरला तर कांहीं ठिकाणीं तो फसला. हें उघड असल्यामुळें सखारामबापूचें करणें सर्वच ठिकाणीं शहाणपणाचें होतें अगर त्याच्या सर्वच कृत्यांतून केवळ स्वार्थ अगर दुटप्पीपणा होता असले पूर्वग्रह बाजूस ठेवून बापूच्या प्रत्येक कृत्याचा विचार स्वतंत्रपणें करून तेवढ्या बाबतींत परिणाम काय झाला हें सांगण्याचा प्रयत्न या पुस्तकांत केलेला आहे.

प्रस्तुत ग्रंथाच्या लेखनपद्धतींतील हें वैशिष्ट्य लक्षांत घेतलें असतां या पुस्तकाच्या वाचनानें 'नाना श्रेष्ठ कीं सखारामबापू श्रेष्ठ' असा प्रश्न वाचकापुढें उभा राहाणार नाहीं हें उघड आहे. कारण दोघांच्याहि चरित्रांत कांहीं यशाचे तर कांहीं अपयशाचे प्रसंग आले व इतरांची बुद्धि कुंठीत करणारे प्रसंग उद्भवले असतां त्यांतून आपल्या बुद्धिबलानें मराठी राज्याचें तारूं सुरक्षित ठेवण्याचें काम या दोघांनींहि निरनिराळ्या वेळीं पार पाडलें आहे, यामुळें दोघांचीहि गणना कर्तृत्वशाली राजकारणी पुरुषांत करणें इतिहासज्ञांस भाग आहे. आणि चरित्रलेखकानें देखील चरित्रनायकाच्या स्तुतिपाठकाचीच भूमिका घेण्याचें कारण नाहीं, त्यालाहि इतिहासकाराची निःपक्षपातीपणाची वृत्ति स्वीकारण्यास व सत्यसंशोधनाची भूमिका ठेवण्यास हरकत नाहीं, हें मान्य केल्यास प्रत्येक चरित्रलेखनांत नमूद केलेला प्रत्येक तपशील पारखून घेतलेला पाहिजे असें म्हणणें ओघानेंच प्राप्त होतें आणि अशा प्रकारें तावूनसुलाखून घेतलेला तपशीलच नमूद करावयाचा म्हटल्यास भरपूर कागदपत्र व प्रत्येक प्रसंगावर स्वतंत्रपणें अभ्यास करून लिहिलेलें टांचण यांचें साहाय्य आधीं चरित्रकारास मिळालें पाहिजे. पण तसें प्रस्तुत चरित्रकारास मिळालें नसल्यामुळें कांहीं प्रसंगीं दंतकथावर विश्वासून त्यांनीं विधान केलें आहे तर कांहीं ठिकाणीं उपलब्ध सामग्रीचा बारीक अभ्यास न झाल्यामुळें

चुकीचें विधान * केलें गेलें आहे. तथापि अशा प्रकारच्या तपाशिलाच्या चुका पुढील आवृत्तींत सुधारतां येण्याजोग्या आहेत व मराठी वाचकांनीं या ग्रंथाचें योग्य प्रकारें स्वागत केल्यास हा ग्रंथ निर्दोष करण्याचें काम रा. कानेटकर हेंच पुढील आवृत्तींत करूं शकतील अशी आशा करून हा प्रस्ताव पुरा करतों.

द. वि. आपटे.

---

* उदाहरणार्थ पृ. ६१ वर मराठ्यांच्या सैन्यानें भागानगरचें पुरे जाळल्यानंतर रामचंद्र जाधवास कैद करण्यांत आलें असें वर्णिलें आहे. पण वस्तुस्थिती याच्या उलट होती. पृष्ठ ६४।६५ वर 'ईश्वराच्या घरीं सर्व ब्राह्मण, हिंदु, मुसलमान, महार, सर्व एकच ' वगैरे वाक्यें गोपाळरावाचीं आहेत असें म्हटलें आहे, पण तीं त्यांचीं नसून एका अज्ञात कारकुनाचीं आहेत अशी कै. खरे यानीं टीप दिली आहे. पृ. ५१ वर 'गोपाळराव आपल्या वडिलास लिहितो' असें आहे त्या जागीं 'गोविंद हरी आपल्या मुलास लिहितो ' असें पाहिजे. निजामाशी झालेल्या तहाचा तपशील पंधरा वर्षांपूर्वी माहीत नसल्यामुळें उद्भवणाऱ्या अशा ज्या शंकांचें दिग्दर्शन पृ. ४४ वर केलें आहे, तिचा परिहार होण्यास उपयोगी पडणारें पत्र पे. द. ३८ पृ. १११ वर छापलेलें आहे. या गोष्टीकडे ग्रंथकाराचें लक्ष गेलेलें दिसत नाहीं.

# आत्मनिवेदन.

१९३२ सालच्या जून महिन्यामध्यें सखारामबापूसंबंधीं एक चरित्रात्मक प्रबंध इंग्रजींत लिहून मी एम्. ए. च्या परीक्षेकरतां म्हणून मुंबई विद्यापीठाकडे पाठवला व त्यावर मजला एम्. ए. ची पदवी त्याचसालीं मिळाली. त्यानंतर हा प्रबंध छापून प्रसिद्ध करावा अशी सूचना ब-याच मंडळींनीं त्यावेळीं केली. इतिहासप्रेमी श्रीमंत बाळासाहेब औंधकर यांची एकदा भेट होण्याचा योग आला असतां त्यानींही अशीच सूचना केली होती. परंतु त्यावेळीं प्रतिकूल परिस्थितीमुळें तें काम मजकडून होऊं शकले नाहीं. शिवाय तो प्रबंध केवळ परीक्षेच्या दृष्टीनें लिहिला असल्यामुळें प्रसिद्ध करावयाचा म्हटल्यास अगदीं निराळ्या दृष्टीनें लिहिणें अगत्याचें होतें; आणि पेशवे दप्तराचे सर्व भागांचें प्रकाशन त्यावेळीं झाले नसल्यामुळें माहितीहि अपुरी वाटत होती.

दोन सालें अशीच गेलीं. त्यानंतर, केसरींतील 'पेशवाईतील सबंध शहाण्याबद्दलचे जे लेखांक प्रसिद्ध झाले त्यामुळें सखारामबापूचें चरित्र आपण छापून प्रसिद्ध करावें अशी मनानें उचल घेतली. पण इंग्रजींत छापावें कां मराठींत ? हा प्रश्न पुढें होताच. प्रो. ओतूरकर यांची एकदां भेट झाली असतां त्यांनीं चरित्र मराठींत छापण्याबद्दल सूचना केली. त्यामुळें मराठींत चरित्र लिहून काढून प्रसिद्ध करण्याचा संकल्प केला. आणि १९३५ च्या मे महिन्यांत चरित्रलेखनाचें काम सुरू केलें. सातारच्या पारसनीस म्युझियममध्यें बापूचीं बरींच अप्रकाशित पत्रें आहेत असें कळल्यावरून साता-यास जाऊन तीं पत्रें नकलून घेतली. या कामीं तेथील क्यूरेटर मि० डी० बी० डिस्कळकर एम. ए. यांनीं आस्थापूर्वक मदत केली याबद्दल त्यांचे आभार या ठिकाणीं मानणें जरूर आहे. जुळवाजुळव झाल्यानंतर प्रत्यक्ष चरित्रलेखनाचें काम आटपण्यास जवळ जवळ दीड महिना लागला.

प्रस्तुत चरित्रनायक सखाराम भगवंत बोकील हे पेशवाईतलि अत्यंत हुषार कारकून व शहाणे मुत्सद्दी म्हणून त्यांची ख्याति आहे. पेशवाईमध्यें 'सख्या देवा विठ्ठला' ही त्रयी शहाणपणा व मुत्सद्दीपणाबद्दल प्रसिद्ध आहे. सखाराम भगवंत बोकील, दिवाकर पुरुषोत्तम चोरघोडे व विठ्ठल सुंदर परशरामी हे तीन सबंध शहाणे व नाना फडणवीस अर्धे[1] शहाणे मिळून

---

१ नाना फडणवीस नुसताच लेखणीबहाद्दर होता. युद्धकलेचें ज्ञान त्यास नव्हतें, म्हणून त्यास अर्धा शहाणा समजत असत.

त्याकाळीं साडेतीन शहाणे होऊन गेले असें म्हणतात.[२] ही गोष्ट मराठ्यांच्या इतिहासांत महशूर आहे.

' नाना प्रकारच्या कारस्थानांनीं एकाचा डाव दुसऱ्यानें मोडून काढावा, एकमेकांकडील बातम्या आचारी, पुजारी, मोलकरणी वगैरेच्या द्वारें काढून शहास प्रतिशह लढवावा; अंतर्गत राज्यकारभारांत बुद्धिमत्तेनें आपलें वर्चस्व स्थापून आपल्याशिवाय तरणोपाय नाहीं अशी धन्याची भावना करून द्यावी " असें या तीन शहाण्यांचें सामान्यतः धोरण असे म्हणून रा. खरे या शहाण्यांना **दीड शहाणे** म्हणजे फाजील शहाणे म्हणतात व या सर्व शहाण्यांना अर्धा शहाणा नाना फडणवीस या अखेरीस जिंकिले या उपरोधिक अर्थानें ' पेशवाईतील साडेतीन शहाणे ' हा वाक्यप्रचार रूढ आहे.

अठराव्या शतकांतील या साडेतीन शहाण्यामध्यें सखारामबापू बोकील यास त्या कालच्या लोकमतानें प्रथमपदीं स्थापण्यांत येतें. सखारामबापू संबंधानें **' तुम्ही दौलतींत तो शहाणे येक आहा '** असा गौरवपूर्ण उल्लेख आनंदीबाईच्या एका पत्रांत आढळतो. यावरून बापूच्या योग्यतेविषयीं तत्कालीन मान्यता दिसून येणार आहे. पहिल्या बाजीरावापासून तो सवाई माधवरावापर्यंत सर्व पेशवाई पाहिलेला इतकेंच नव्हे तर अंतर्गत व परराष्ट्रीय राजकारणांत व इतर राजकीय उलाढालींत प्रामुख्यानें वावरत असलेला असा हा एकच मुत्सद्दी सांपडतो. मराठ्यांच्या उत्तरेकडील मोहिमांत भाग घेतल्यामुळें युद्धकला व लष्करी डावपेंच यांचें पुष्कळ ज्ञान व अनुभव बापूस मिळाला. यामुळेच संपूर्ण शहाणा मुत्सद्दी म्हणून सखारामबापूचें नांव सर्व महाराष्ट्रांत आबालवृद्धांचें तोंडीं झालें होतें.

सखारामबापूसारख्या प्रमुख मुत्सद्याचें विस्तृत चरित्र आतांपर्यंत लिहिलें गेलें नाहीं, ही खेदाची गोष्ट आहे. परंतु याचीं कारणें मात्र बरींच आहेत. बापूच्या वंशजापैकीं कोणासही मोठ्या जागिरी नाहींत ( नाहीं म्हणावयास **भोरचे पंत**

---

२ या संबंधानें कांहीं निरनिराळ्या नांवांचें उल्लेख मिळतात. उदाहरणार्थ ' देव्या ' म्हणजे पेशव्याचे दिल्ली दरबारांतील वकील ' देवराव हिंगणे ' यांची गणना साडेतीन शहाण्यांत कांहीं जण करतात. वाडांच्या कैफियतींत अर्ध्या शहाण्याचें नांव ' नाना फडणवीस ' असें नसून आंग्र्यांच्या राज्यांतील प्रधान ' जिवाजीपंत ' हें नांव मिळतें ( पृ. १६२ ). परंतु वर दिलेलीं नांवेंच जास्त रूढ आहेत.

**सचिव** हे बापूच्या आप्तांपैकीं आहेत ) किंवा कोणी विशेष पुढें नांवारूपास आलेले नाहींत. त्यामुळें बापूचें चरित्र लिहिण्यास कोणासही प्रोत्साहन मिळूं शकलं नाहीं. दुसरी गोष्ट म्हणजे बापूसंबंधीं फारच तुटपुंजी माहिती. जी माहिती पूर्वी उपलब्ध होती तीहि पुष्कळ ठिकाणीं विखुरलेली. ती एकत्रित करून चरित्र सुसंगतवार लिहिण्याचें काम त्यामुळें समाधानकारकपणें होऊं शकलें नसतें. बापूस जेव्हां नानांनीं कैद केलें. तेव्हां त्यांच्या नोकरांनीं कागदपत्रांचा नाश केला असें सांगतात तें कितपत विश्वसनीय आहे हें सांगतां येत नाहीं. पण नानांचे जितके कागदपत्र मिळतात तितके बापूंचे मिळत नाहींत. त्यामुळें चरित्र-लेखनाच्या मार्गांत ही मोठीच धोंड होती व आहे.

सखारामबापू, मोरोबा वगैरे प्रतिस्पर्धी निर्माल्यवत् करून पेशवाईचे अखेरीस नानानें स्वतः राज्यकारभार मोठ्या कर्तबगारीनें व खूप शर्तीनें केल्यामुळें त्यांचेंच नांव सर्वतोमुखी होऊन बोलबाला फार झाला आणि तत्पूर्वी ज्यांनीं ( म्ह० बापू सारख्यांनीं ) मोठीच कर्तबगारी करून दाखविली त्याची कामगिरी पुढील पिढीच्या स्मृतिपटलावर फारशी चित्रित झाली नाहीं. बापूसारख्या धुरंधर मुत्स-द्याची आठवण फक्त पेशवाईंत साडेतीन शहाणे होऊन गेले त्यांपैकीं तो एक होता, एवढ्या दंतकथेपलिकडे जास्त नाहीं, हा केवळ प्रतिकूल कालाचा महिमा होय. या कारणांनीं बापूचें चरित्र लिहिण्याचा प्रयत्न झाला नाहीं.

सखारामबापूसंबंधीं पेशवे दप्तरांत फक्त ८० कागद ( तेही बापूच्या जमा-खर्चाचे उत्पन्नासंबंधीचे ) आहेत. हे कागद वाचून बापूसंबंधानें कांहीं टांचणें प्रो. भानूंनीं भा. इ. सं. मंडळाच्या त्रैमासिकांत छापिलेली आहेत. परंतु ती माहिती फारच थोडी आहे. १९१० सालच्या विविधज्ञानविस्तार मासिकांत श्रीयुत बा. ना. देव यांनीं बापूचें एक छोटें चरित्र रेखाटलें आहे. तें जरी जोरदार भाषेंत लिहिलें असलें तरी तें अपुरें व त्रोटक आहे. पुरंदरे दप्तराच्या पहिल्या भागांत बापूच्या प्रथमारंभींच्या आयुष्यासंबंधी बरीच माहिती मिळते. पण ती पुष्कळ पत्रांतून निवडून काढावी लागते. तिसऱ्या भागांत माधव-रावाच्या कारकीर्दीतील बापूची कामगिरी विशेषतः राक्षसभुवनापूर्वींचें कारस्थाना-संबंधी माहिती फारच उपयुक्त आहे. तसेंच पेशवे दप्तराचे १९, ३७ वगैरे भाग;चंद्रचूड दप्तर; ऐ. ले. सं. वगैरेमध्यें बापूच्या कामगिरीचा उल्लेख असणारीं पत्रें आढळतात. बारभाईचें कारस्थान, इंग्रज-मराठे युद्ध व मोरोबाचा कट यासं-बंधीं भरपूर कागदपत्र फॉरेस्ट. पर्शियन कॅलेंडर्स भाग ४,५ राजवाड्यांचीं साधनें

भाग १०, १२, १३; ऐ. ले. स; पे. द. भाग ५ या ग्रंथांतून पत्ररूपानें आलेली आहे ती अतिशय महत्त्वाची आहे.

ह्या सर्व संदर्भग्रंथाचा उपयोग करून हें चरित्र सुसंगतवार लिहिण्याचा उद्योग केला आहे. याशिवाय हे चरित्र लिहिण्याचे कामीं रा.कृ.वा.पुरंदरे यांनीं बापूच्या कुलवृत्तांतासंबंधी बरीच माहिती पुरविली. त्याचप्रमाणें प्रो. कृ. पां. कुळकर्णी एम्. ए. बी. टी. यांनीं नारायणराव पेशव्यांच्या कारकीर्दीतलि कांहीं माहिती व बापूचीं लक्ष्मणरावजीस लिहिलेलीं कांहीं अप्रकाशित पत्रें मला दिलीं याबद्दल या दोघांचे मजवर फारच उपकार झालेले आहेत. माझे बहुभाषाकोविद मित्र श्री० अ० ज० करंदीकर यांनीं स्प्रिजेल या जर्मन ग्रंथकारानें जो मराठ्यांचा इतिहास लिहिला आहे त्यांतून बापूच्या चारित्रास लागणारी उपयुक्त माहिती मला वेळांत वेळ काढून भाषांतर करून सांगितली व गुरुवर्य द. वा. पोतदार बी. ए. चिटणीस भारत इतिहास मंडळ यांनीं मंडळांतलि लायब्ररीचा उपयोग करण्यास परवानगी दिली याबद्दल प्रस्तुत लेखक त्यांचा फार आभारी आहे.

श्रीयुत दत्तोपंत आपटे यांनीं या पुस्तकास प्रस्तावना लिहिण्याचें काम पथ· करून मला कायमचे ऋणी करून ठेविलें आहे. आपल्यापेक्षां ज्ञानानें कमी असणाऱ्यांशीही प्रेमळपणानें वागण्याची त्यांची निगर्वी वृत्ति आमच्यासारख्या होतकरू लेखकांस उत्साह आणणारी असते. असो.

या चारित्रांत सखारामबापूनें कोणकोणत्या राजकीय घडामोडींत प्रामुख्यानें भाग घेतला, त्याचा उलगडा करण्याचा प्रयत्न केला आहे.त्यांत पुष्कळ उणीवा आहेत व ठिकठिकाणीं मतभेदास जागा आहे हें मी जाणून आहे. परंतु प्रकाशित व अप्रकाशित ऐतिहासिक कागदपत्रांची छाननी करून त्यांवरून निघालेला निष्कर्ष वाचकांपुढें मांडला आहे. या बाबतींत to call a spade a spade असेंच धोरण ठेविलें आहे. तें इतिहासप्रेमी वाचकांना पसंत पडेल अशी आशा आहे.

प्रस्तुत चरित्र लवकर छापून प्रकाशित केल्याबद्दल चित्रशाळेच्या मॅनेजरांचा मी आभारी आहे.

**य. गो. कानेटकर.**

कै. म. म. द. वा. पोतदार,
ग्रंथ संग्रह

# शुद्धिपत्र

| पृ | ओळ | चूक | बरोबर |
|---|---|---|---|
| १ | ६ | राष्ट्र तेथून कूंटा ... | राष्ट्रकूटानंतर |
| १३ | १५ | मागून महादाजीपंतापासून | महादजीपंतापासून मागून |
| २६ | १७ | बापूची या | तें कसेंही असलें तरी बापूची या |
| ४९ | प्यारा ३ | पुरंदरे | पुरंदरे व नारोशंकर |
| ५१ | — | घरबुड्या | घरबुडव्या |
| ५६ | ५ | दत्तक मुलगा | मुलगा |
| ६२ | १७ | फाल्गुन शु १५ | फाल्गुन शु १५ शके १६८४ |
| ६५ | ७ | लज्जास्पद | टीकास्पद |
| ६८ | — | १० सप्टेंबर | १० आगस्ट |
| ७० | २० | शिवदेव शिवदेव | विठ्ठल शिवदेव |
| ८८ | ५ | ८ वर्षें पर्यंत | बरीच वर्षेंपर्यंत |
| ९७ | ५ | असें | याबद्दल |
| १७४ | शेवट | इंग्रजांनीं | अशा परिस्थितींत इंग्रजांनीं |
| १९५ | १४ | दुणावल्यामुळें | दुभागल्यामुळें |
| २५२ | १६ | गत झाले | अकालीं गत झाले. |


खेड
चाकण
इंद्रायणी
आळंदी देवाची
तळेगांव ढमढेरे
तळेगांव दाभाडे
चिंचवड
मुळा नं.
पुणे
वानवडी
लोणी
दिवेघाट
खडकवासला
हिवरें
दिवे
सिंहगड
सासवड
पुरंधर
भाटघर तलाव

C.S.P. POONA. 2

# सखारामबापूचें चरित्र.

## प्रकरण १ लें.

दत्तो वामन पोतदार.
१८० [illegible] पेठ पुणे २.

## कुलवृत्तांत.

**कऱ्हेपठार**—पुण्यापासून १६।१७ मैलांवर जो कऱ्हेपठार नांवाचा प्रदेश लागतो त्यावर फार प्राचीन काळीं चालुक्य राजे राज्य करीत होते. चालुक्य व राष्ट्रकूटांचें शिलालेख या प्रदेशांत कांहीं कांहीं ठिकाणीं आढळतात. चालुक्य राजा बोपदेव याच्या नांवावरून एका खिंडीस बोपदेव—'बाबदेव खिंड' असें नांव पडलें आहे. चालुक्य—राष्ट्रकूटानंतर यादव घराण्याचा महाराष्ट्रावर अंमल सुरू झाला. तेथून अल्लाउद्दीनानें यादवांचें अधिराज्य उठविल्यापासून दुर्गादेवीच्या दुष्काळापर्यंतच्या काळाची या भागासंबंधीं माहिती फारशी उपलब्ध नाहीं. महाराष्ट्रांतील पुष्कळ लोकांचा दुष्काळरूपी अग्नीनें स्वाहाकार केला. ' आसपास बारा कोसांवर दिवा आढळत नाहीं ' असें एका इतिहासकारानें त्या प्रसंगाचें वर्णन करतांना म्हटलें आहे. कऱ्हेपठाराची तीच अवस्था होती. दुष्काळानंतर आसपासच्या प्रदेशांतील लोकांनीं कऱ्हेपठारांत येऊन वसाहत करण्यास आरंभ केला. गुरेंढोरें बाळगून, घरें बांधून जमिनीची लागवड सुरू केली. त्यांचें बस्तान नीट बसलेलें पाहून आसपासच्या प्रदेशांतील लोकांसही कऱ्हेपठारांत वस्ती करावीसी वाटूं लागली.

**हिवरे व बोकील**—इ० स० १४०० च्या सुमारास सातारा जिल्ह्यांत कोरेगांव कुमठे या भागांत राहाणाऱ्या लोकांपैकीं सिद्धे-

श्वरभट नांवाचे गृहस्थ चंदनवंदन येथील मराठे गृहस्थाबरोबर कऱ्हेपठारांत येऊन राहिले. ते इकडे कोणत्या कारणास्तव येऊन राहिले हें नीट कळण्यासारखें नाहीं. कदाचित् ते भटजी किंवा त्या गृहस्थाचे उपाध्याय म्हणून आले असावे. हे सिद्धेश्वरभट म्हणजे प्रस्तुत चरित्रनायक सखारामबापू बोकील यांचे मूळपुरुष होत. हे अश्वलायन शाखेचे ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण असून यांचें घराणें जमदग्नि कुलांतलें होतें. यांनीं सासवडजवळ हिवरें या गांवीं वस्ती केली, व उपाध्यायवृत्ति संभाळून शेती करण्यासही सुरवात केली. सिद्धेश्वरभट व त्याच्या पश्चात् त्याचा मुलगा रामचंद्रभट हे शेती व थोडीफार उपाध्यायाची वृत्ति संभाळून आपला उदरनिर्वाह करीत असत. रामचंद्रभटानें मौजे आंबळें व मौजे वडगांव या गांवीं कांहीं शेतीवाडी केली. रामचंद्रभटाचा पुत्र रंगोपंत यास मात्र हिवऱ्याचे जोशी—कुळकर्ण्याचें वतन मिळविण्याचा आकस्मिक योग आला. मौजे दिवें, सोनेरी व हिवरें या गांवीं बरीच जमीन असलेल्या एका जमीनदारानें काशीयात्रेस निघण्यापूर्वीं आपल्या वतनवाडीची जी व्यवस्था केली त्यांत हिवऱ्याचे कुळकर्णीपणाचें वतन मामुली पैका घेऊन रंगोपंतास खरेदी दिलें. अशा प्रकारें जमिनी व वतनें मिळाल्यामुळें एकाकाळीं उपाध्यायाची वृत्ति करणारे बोकील[1] आतां हिवऱ्यांत वतनदारीच्या दिमाखानें नांदूं लागले.

---

१ 'बोकील' या आडनांवाची व्युत्पत्ति समाधानकारक रीतीनें लावतां येत नाहीं. सामान्यतः एखाद्या गांवावरून जातीच्या गुणावगुणावरून, वृत्तीवरून किंवा अधिकाराच्या जागेवरून कोणाचें आडनांव पडतें. 'बोकील' हें आडनांव तसें असावें असें वाटत नाहीं. कदाचित् सं. वक्षस् (छाती)=प्रा. बोक्ख+इल=बोक्खिल ( निधड्या छातीचे लोक ) बोकील=म्हणजे धाडसी लोक. या गुणावरून त्यास 'बोकील' हे नामाभिधान प्राप्त झालें असावें अशी आमची कल्पना आहे.

यावेळीं पुरंदरे, बेलसरे, वाघिरे वगैरे मंडळींनींही कऱ्हेपठारांत जमिनी संपादिल्या असल्याचें दिसतें.

रंगोपंतास गोपिनाथ व यमाजी असे दोन मुलगे होते. यांपैकीं गोपिनाथपंत ( किंवा पुढें यांना ‘ पंताजी गोपिनाथ ’ असें म्हणत) हे विशेष प्रसिद्धीस आले. निजामशाहीचा पाडाव झाल्यानंतर पुणें प्रांतास मोंगल व विजापूरकर यांच्या सरहद्दीवर असल्यामुळें फार महत्त्व प्राप्त झालें. या प्रांतांतील कोंडाणा, पुरंदर, दौलतमंगल, सुपें इत्यादि स्थळांसी मजबुती होऊन त्यावर कर्त्या, विश्वासू लोकांची नेमणूक झाली. पुरंदरमुळें पायथ्याचें गांव सासवड व हिवरें या गांवास लष्करी दृष्टीनें महत्त्व चढलें. पंताजी गोपिनाथाचा भाऊ यमाजी यास यावेळीं सासवडचे सबनिशी व चिटणीसीची असामी मिळाली. हिवऱ्याचें वतन त्यांकडे होतेंच. पंताजी गोपिनाथास कांहीं दिवसांनीं शिरवळचा ठाणेदार न्याहारखान याची दिवाणगिरी मिळाली. पुढें शहाजीराजास पुणें–सुपें परगणा विजापूर सरकारकडून जहागीर मिळाला. त्यावेळीं सासवडचे नीलकंठराव सरनाईक यांनीं शिफारस केल्यामुळें पंताजीनें शहाजीराजांच्या पदरीं नोकरी पथकरिली.

शिवाजी व जिजाबाई यांना कर्नाटकांतून दादोजी कोंडदेवाबरोबर महाराष्ट्रांत शहाजीनें पाठवून दिलें. त्यांच्या बरोबरच्या माणसांच्या यादींत जरी पंताजी गोपिनाथाचें नांव आढळत नाहीं तरी कांहीं दिवसांनीं तो चिटणीसीचा दरख चालवितांना आढळतो. असें म्हणतात कीं शिवाजी व जिजाबाई यांच्याशीं तो सोंगट्या खेळत असे. शिवाजी महाराज यांनीं जेव्हां महाराष्ट्र धर्माच्या रक्षणाकरतां हातीं तलवार धरली, त्या प्रसंगीं

सल्लामसलतीच्या दृष्टीनें पंताजींचें बहुमोल सहाय्य शिवाजीस झालें असलें पाहिजे. पंताजीस आदिलशाही दरबारांतील पक्षोपपक्षांची व त्यांतील ठळक ठळक व्यक्तींची माहिती होती. सुप्रसिद्ध अफझुलखान हा न्याहारखानानंतर शिरवळ ठाण्याचा मुख्य अंमलदार होता व पंताजीनें त्याच्या हाताखालीं कांहीं दिवस नोकरी केली असल्यामुळें त्या उभयतांची चांगलीच ओळख होती. पुढें खानास बढती मिळून तो वाई प्रांताचा सुभेदार झाला. तरी पंताजीस तो ओळखत असे. या ओळखीचा उपयोग शिवाजीस खानाचा पाडाव करण्याचे कामीं चांगलाच झाला.

'शिवाजीचा पराभव करून त्याचा फडशा उडवावा व शिवाजीचे निसबतीचे लोकांस आश्रय न देतां ठार मारून दौलतीचें कल्याण इच्छावें' अशा अर्थाचे अली अदिलशहानें हिरडस मावळच्या जेधे देशमुखास फर्मान पाठविलें[१]! यावरून शिवाजी-वरच्या मोहिमेचा खानानें कोणत्या प्रकारें शेवट करावयाचा ठरविला हें स्पष्टपणें कळून येण्यासारखें आहे. अफझुलखान वाई प्रांतीं आल्यावर शिवाजीनें त्यांच्याशीं तहाचें बोलणें करण्याच्या कामीं पंताचीच योजना केली. पंताजीनें ही कामगिरी मोठ्या मुत्सद्देगिरीनें, चातुर्यानें, धोरणानें वागून पार पाडिली. अफझुलखानास शिवाजी तह करण्यास तयार आहे असें सांगून प्रतापगडीं भेटीचा कार्यक्रम मुक्रर केला. भेटींत शिवाजी व अफझुलखान यांची झटापट झाली व खान मृत्युमुखीं पडला ही गोष्ट महशूरच आहे. ग्रँटडफनें कृष्णाजी भास्कर हा शिवाजीचा वकील होता; पंताजी गोपिनाथ हा अफझुलखानाचा वकील असून शिवाजीनें त्यास गोड बोलून, पैशाची लालूच दाखवून वश करून घेतलें आणि त्या आमिषास

१ शि. प. संग्रह. ले. ७७४.

पंताजी भुलून त्यानें शिवाजीस खान व त्याचें सैन्य यासंबंधीं बित्तंबातमी दिली[1] अशी चुकीची माहिती दिली आहे. परंतु शिवदिग्विजय व शेडगांवकर बखरींमध्यें कृष्णाजी भास्कर देशपांडे हा अफझुलखानाचा वकील असल्याचें लिहिलें आहे तेंच खरें दिसतें. यावरून पंताजींची भूमिका स्वजनहितसाधक, सदभिमानद्योतक व प्रभावशाली अशीच दिसते. पंताजीस या कामाबद्दल भोळी व भादकी या गांवची कांहीं जमीन व शिरवळ गांवीं २ चाहूर जमीन शिवाजीनें इनाम दिली.[2] यानंतर शिवाजीनें त्यास आपला खासगी कारभारी नेमिलें. या पदावर पंताजी शिवाजीस राज्याभिषेक होईपर्यंत होता. त्याचवेळीं बहुधा पंताजीचें देहावसान झालें असावें असें वाटतें.

पंताजीस रामचंद्र, जगन्नाथ व श्रीनिवास असे तीन मुलगे होते. त्यांपैकीं जगन्नाथानें 'वडिलाचे कऱ्हाटकांतलें इनाम गांव पूर्वीप्रमाणें चालवणें' बद्दल शंभू राजे याजकडे अर्ज केला. परंतु त्यासंबंधीं निकाल काय करण्यांत आला यासंबधीं कांहींच उल्लेख मिळत नाहीं. वाईप्रांत व प्रांत कोरेगांव यांतील कांहीं जमिनी जगन्नाथास इनाम मिळाल्या असाव्या. परंतु त्याचा निश्चित काळ सांगतां येत नाहीं.[3]

पंताजीचा भाऊ यमाजी हा आपली वतनवाडी संभाळून सासवडास रहात होता. त्याजकडे शिरवळपैकीं ६ गांवें, वाईपैकीं ४ गांवें अशा १० गांवच्या जोशीकुलकर्ण्याची वृत्ति होती अशी

---

१ डफ १. १३१. २ वाडकृत सनदापत्रें १२१. हिवरें हा गांव पंताजीस कधींच इनाम मिळाला नाहीं. तो त्याच्या पुतण्या महादाजी यमाजी यास शाहूमहाराजांनीं इनाम करून दिला गॅंटडफनें १३२–१३३ वर दिलेली माहिती चुकीची आहे. ३ इ. सं. १०१.

हकीकत आढळते. सुरूळगांवच्या एका कुलकर्ण्याचें वतन जप्त करण्यांत आलें तेव्हां यमाजीनें खटपट करून तें त्यास परत देवविलें. यमाजीचा काल जाहला तेव्हां त्यास गंगोपंत व महादाजी असे दोन मुलगे होते.

महादाजी यमाजी हा शिवकालीं कारकुनाचे जागेवर काम करीत होता. आपल्या भावापेक्षां हाच जास्त कर्तृत्ववान् निघाला. त्याची कर्तृत्वशक्ति, बुद्धिमत्ता, प्रामाणिकपणा पाहून शिवाजीनें संभाजीस राज्यकारभारविषयक शिक्षण देण्याचे कामीं त्याची योजना केली. कांहीं दिवस संभाजीच्या वाकेनिसाचा मुतालिक म्हणून महादाजीची नेमणूक झाली. या जागेवर बरेच दिवस काम केल्यानंतर वऱ्हाडचे सुभेदार धारराव निंबाळकर यांच्या मुजुमदारीची जागा त्यास मिळाली. सुभेदारांचा कारभार मध्यवर्ति सत्तेच्या तंत्रानें चालण्यासाठीं त्यांचे फडणवीस व मुजुमदार हे दरख मध्यवर्ति सत्तेच्या विश्वासांतले असत. महादाजी यमाजीस या नोकरीबद्दल १०० पातशाही होन मिळत असून इतर सुभ्याचे मुजुमदाराप्रमाणें बारगीर, घोडे, दिवटीदार वगैरे सरंजाम देण्याबद्दल हुकूम होता.[१]

संभाजीमहाराजांच्या कारकीर्दींत महादाजी रायगडास परत आला असावा. कदाचित् संभाजीनें त्यास हुजुर कारभारांत ठेवून घेतलें असावें; परंतु त्यावेळचा त्याचा नक्की हुद्दा कोणता तें कळत नाहीं. संभाजी पकडला गेल्यानंतर रायगडास झुल्पिकारखानानें जो वेढा घातला त्यांत राजपत्नी येसूबाई, बालराजे शाहू महाराज यांच्या

१ रा. ८. २५ २ रा. ८. २५

बरोबरच महादाजी व त्याचा बंधु गंगोपंत हेहि मोगलाच्या हातांत सांपडले. उभयता बंधूंनीं शाहूबरोबर खडतर बंदिवास भोगला. औरंगजेबानें शाहूला जीवदान देण्याचें निश्चित ठरवल्यानंतर त्याची व्यवस्था ज्या मंडळीकडे सोपविली होती त्यांत महादाजीपंत होता. महादाजीनें आपल्या बालधन्याची शक्य ती सेवा करून आपली राजनिष्ठा व्यक्त केली. महादाजीची शाहूच्या आधीं एकदोन वर्षें सुटका झाली असावी; सुटून आल्यानंतर राजारामाची बायको ताराबाई इनें त्याचा योग्य परामर्ष घेऊन त्यास सासवडीं वाडा बांधण्यास जागा दिली.[१] गंगोपंताचा बहुधा तुरुंगांतच अंत झाला असावा.

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर शाहूमहाराजांची कैदेंतून सुटका झाली; तेव्हां धनाजी जाधव, प्रतिनिधि वगैरे मंडळींबरोबर महादाजी हाहि शाहूस मिळाला. पुढें शाहूचें साताऱ्यास आसन स्थिर झाल्यावर महादाजी व त्याचा पुतण्या भगवंत गंगाधर यास शाहूनें ·।· चावर जमीन सासवडगांवीं इनाम [२]दिली. कांहीं वर्षांनंतर हिवरें हा गांव महादाजीस वंशपरंपरा इनाम करून दिला. या गांवची सनद देतांना ' तुमचे उर्जित करून चालवावें हें स्वामीस अगत्य यास्तव नूतन इनाम मौजे हिवरें तुम्हासी... देण्यांत येत आहे असा उल्लेख शाहूनें केलेला आहे. या[३] वाक्यावरून महादाजीनें शाहूचा एकनिष्ठतेनें चाकरी बजाविली असली पाहिजे हें उघड आहे.

महादाजीवर शाहूची बरीच मेहेरनजर होती हें त्यानें महादाजीस

---

१ पु. द. १ लें. ३३. २ पु. द. १ लें. ३७. ३ इ. सं. १७१; पे. द. नं. ३१२८९.

राजमंडळांत 'सभासद' म्हणून दाखल करून घेतलें यावरून दिसून येईल. 'सभासद' ही जागा बरीच मानाची व प्रतिष्ठितपणाची असून त्या जागेचा सालीना तनखा १००० रु. च्या आंतबाहेर असावा. या जागीं असणाराचें काम काय, याची माहिती मिळूं शकत नाहीं. सभासद बखरीवरून असें म्हणतां येईल कीं कदाचित् हा हुजूरकचेरींतील मुलकी अधिकारी असावा. याशिवाय महादाजीस इतरांकडून कांहीं हक्क मिळाले. इ. स. १६३७ सालीं सेनापती मानसिंग मोरे यांनीं हिंवरें गांवावरील चौथाईचा हक्क महादाजीकडे दिला.[1] महाल टाकसाळ किल्ले पुरंदर येथेंही यांच्याबद्दल रक्कम खर्ची पडली आहे. पुरंदर किल्ला व सासवडचा टापू सचिवाकडून बाळाजी विश्वनाथाकडे आल्यावर त्यांनीं शके १६३६ च्या सुमारास त्या ठाण्याच्या जीर्णोद्धाराचें काम चालविलें. तेव्हां महादाजी यमाजी व भगवंत गंगाधर यांनीं 'कसबे सासवड का। मजकूर येथील ठाणियाची चिटणीशी व ठाणियाचे लोकाची सबनिसी हें वतन आपले पुरातन कारकीर्द दर कारकीर्दी पूर्वीपासून चालत आले तेणेप्रमाणें कै॥ थोरले राजे छत्रपती व राजश्री कै॥ आंबा स्वामी उभयेतांच्या राज्यांत चालिले........ दोनी हुद्दे आपलें वतन आपणास चालवावयाची आज्ञा केली पाहिजे' अशी विनंती केल्यावरून शाहू महाराजांनीं बाळाजी विश्वनाथ यास 'चिटणीसी व सबनिसी ठाणे मजकूर वतन पुरातन चालत आल्याप्रमाणें चालवणें. हरदू वतनाची सेवा घेत जाणें....वंशपरंपरा चालवणें' म्हणून हुकूम दिला[2] (इ. स. १७१७).

---

१ पु. द. १. लें. ५९. २ पु. द. १ पृ. ४२.

महादाजी बराच वयातीत होऊन इ. स. १७२७ सालीं मोपार गांवीं मृत्यु पावला. त्यास फक्त सखूबाई नांवाची एकच मुलगी असून ती बाबाजी लक्ष्मण नऱ्हेकर देशपांडे ता ॥ खेडेबारे यास दिलेली होती. चिमाजी अप्पांनीं जी टांकसाळ किल्ले पुरंदरीं घातली होती तिचा हवाला शके १६४९ ( इ. स. १७२७ ) मध्यें बाबाजीस सांगितला होता.[१] महादाजीचें शाहूमहाराजाजवळ मोठें वजन होतें. शाहूमहाराज त्यास नेहमीं 'काका' या नांवानें हाक मारीत असत. पुरंदरच्या पायथ्याशीं पूर गावीं एकवीरा देवीचें देवालय व त्याच्या समोरचें तीर्थकुंड महादाजीनीं बांधलें. महादजीचा भाऊ गंगोपंत यास भगवंत व मल्हार असे दोन मुलगे होते. त्यांपैकीं भगवंत मोंगलांच्या कैदेंत असावा. कारण शाहूनें सुटून येतांक्षणींच दिलेल्या इनामांत या दोघा चुलत्यापुतण्यांचीं नांवें आढळतात. भगवंतरावानें हिवरें गांवचें कुलकर्णीपण केलें असावें असें वाटतें; कारण गांवकीच्या कागदपत्रांत भगवंतराव बोकीलांचें नांव आढळतें.

पहिल्या बाजीरावाच्या स्वारींतिल जमाखर्चांतून भगवंतराव नांवाच्या शिलेदार कारकुनाचें नांव आढळतें, तोच हा भगवंतराव बोकील असल्यास बोकीलांनीं लष्करी पेशा पत्करल्याचा काळ आणखी एक पिढी मागें ढकलावा लागेल. भगवंतरावाच्या मृत्यूचा काळही कागदपत्राभावीं निश्चित करतां येत नाहीं. त्यास निंबाजी ऊर्फ खंडो, बाजी, व सखाराम असे तीन मुलगे होते. पंताजी गोपिनाथ व महादाजी यमाजी यांच्या वेळची स्थिति भगवंतरावाच्या

---

१ पु. द. १. ७०

वेळेस राहिली नाहीं. कोणत्याही कारणानें असो या घराण्यास गरीबीचे दिवस आलेले होते. महादाजी वारल्यानंतर त्याचें वतन खंडोभगवंताच्या नांवें होऊन तशीं कागदपत्रेंही झालीं. [1]निंबाजी कांहीं दिवस महाल टंकसाळ किल्ले पुरंदरची हवालदारी पत्करून होता. ही नोकरी सामान्य असून तिचें मासिक वेतन अवघे ४ रुपये होतें. निंबाजी कदाचित् अल्पायुषी झाला असावा. निंबाजीचे बंधू बाजीपंत व सखारामपंत (सुप्रसिद्ध **सखारामबापू**) व मल्हारपंताचे त्रिवर्ग चिरंजिव गिरमाजी, तिमाजी, हे पेशव्यांच्या अनेक राजकारणांतून चमकले. परंतु या सर्वांमध्यें निंबाजीचा धाकटा भाऊ सखारामपंत ऊर्फ सखारामबापूचें कर्तृत्व, मुत्सद्देगिरी, शौर्य, इत्यादि गुण विशेषेंकरून दिसून आले. एवंच बोकील घराण्याचा भाग्यरवि महादाजी यमाजीनंतर अस्तंगत होऊन त्याचा पुनः उदय सखारामबापूमुळें झाला.

## प्रकरण दुसरें.

## बाल्य व तारुण्याचा प्रारंभ.

सखारामबापूची जन्मतारीख व वर्ष कागदपत्राभावीं नक्की कळत नाहीं. रा. देव यांनीं विविधज्ञानविस्तारांत सखारामबापूसंबंधीं जो लेख लिहिला आहे त्यांत बापूचा जन्म १७०६ सालीं झाला

---

१ रा. १६४२; पु. द. १.५४.

असें मोघम म्हटलें आहे.[१] पटवर्धनी कागदपत्रांत बापूचा उल्लेख, " वृद्ध ", ' कपि ' अशा शब्दांनीं करण्यांत आला आहे. त्यावरून बापूचें वय सरासरी ७० किंवा त्यापुढचें असावें. बापूच्या मृत्यूचा काल इ. स. १७८१ हा निश्चित आहे. त्यावरून इ. स. १७०६ किंवा १७१० च्या सुमारचा असला पाहिजे असा रा० देव यांचा कयास आहे. सुप्रसिद्ध इतिहासकार गोविंद सखाराम सरदेसाई हे आपल्या रियासतींत इ० स० १७१६ हा बापूचा जन्मकाळ देतात.[२] परंतु हा सन कोठून दिला याचा उल्लेख त्यांनीं केलेला नाहीं. रा.वाड यांनीं प्रसिद्ध केलेल्या कैफियतींत सखाराम बापूच्या घराण्याची जी कैफियत प्रसिद्ध केली आहे त्यांत बापूस इ. स. १७३२ मध्यें पहिल्या बाजीरावांनीं आपल्या पदरीं कारकून म्हणून ठेवून घेतलें असा उल्लेख आहे. यावरून बापूचे वय पंधरा सोळा एवढेंच त्यावेळीं असावें असें वाटतें. सदाशिवरावभाऊ, नानासाहेब पेशवे व बापू हीं मंडळी चारदोन वर्षांच्या फरकानें समवयस्कच होतीं. नानासाहेब व सदाशिवरावभाऊ यांच्या जन्मकाळावरून पाहातां बापूचा जन्म इ. स. १७१६ मध्येंच झाला असावा ही रा. सरदेसायांची माहिती बरोबर व ग्राह्य दिसते.

बापूच्या बालपणची माहिती फारशी उपलब्ध नाहीं. लहानपणीं बापूचा शागीर्द पेशा होता असा एक प्रवाद आहे. राजवाड्यांच्या ६ व्या खंडांत ' बापू हे महादजीपंत पुरंदरे यांच्या घरचे शागीर्द. परंतु श्रीमंतांनीं त्यास लहानाचे मोठे केलें " असें वाक्य

---

१ वि. वि. १९१० वर्ष I, ४२; भा. इ. सं. त्रै. १८४२ वर्ष VIII १;२ २. रि. ४. २८४.

आहे.[1] बापूच्या वडिलांची स्थिति फारशी समाधानकारक नव्हती ही गोष्ट जरी खरी असली, तरी सखारामबापूचा चुलत आजा महादाजी यमाजी याजकडे चालत असलेला इनामी गांव बापूच्या थोरल्या बंधूच्या ( निंबाजीच्या ) नांवानें झाला. हे बंधु एकत्रच राहात असत. अशा स्थितींत सखारामबापू महादाजीपंत पुरंदऱ्याकडे शागीर्द ( पाणक्या ) म्हणून राहील हें शक्य दिसत नाहीं. बापूनें आपला पेशा नाना पुरंदऱ्यास लिहिलेल्या एका पत्रांत स्पष्ट केला आहे, " बाबा ( महादजी पुरंदरे ) आपल्यावरी कृपा न करीत तरी नानाची चाकरी सिलेदारी रीतीनें करून कांहीं न मागतां

१ रा. ६. ५११; अशाच प्रकारचा उल्लेख इ. स. १७७५ मध्यें मुंबई कौन्सिलांतील जो टेलर नांवाचा वकील कलकत्त्यास पाठवला होता, त्यानें आपल्या खालित्यांत केलेला आढळतो. Sakharam has always shown himself the determined enemy of the company... whether it was from the poverty of his parents or the duties of the menial employ he was brought up in.... etc. (Forrest Selections p. 267); म्हणजे बापूचे आईबाप गरीब होते. व त्याचा शागीर्दपेशा होता. स्प्रिजेल या जर्मन इतिहासकारानें मराठ्यांचा इतिहास १७९१ सालीं प्रसिद्ध केला. त्यांत "बापू हा ४ रुपये पगारावर राघोबाचा नोकर होता; पुढें कर्तबगारीनें कारभारी झाला " असें म्हटले आहे. Der zuerst bei ihn Bedienter mit einen monatlichen Gehalt Von vier Rupien gewefen War", 209 वर दिलेले सर्व आधार त्यावेळीं पिकलेल्या कंड्यावरून तत्कालीन लेखकांनीं आपल्या पुस्तकांत दिले असतील असा तर्क करण्यास बरीच जागा आहे. कदाचित् महादजी यमाजीचें उत्पन्न निंबाजीच्या नांवें होईतोंपर्यंत त्या त्रिवर्गबंधूंस वाईट दिवस आले असतील. कोणी सांगावें !

हजार दिल्हे, पाचसे दिल्हे— इ० [1] यावरून महादाजीपंत पुरंदऱ्यांच्या पदरीं बापू शिलेदार होता हें स्पष्ट होतें. बाजीराव पेशव्यानें कांहीं दिवसांनीं बापूची तरतरी, समयसूचकता वगैरे गुण पाहून आपणाकडेमागून घेतलें. या संबंधानें एक आख्यायिका आढळते. ती अशी-"पहिले बाजीराव पेशव्यांची स्वारी महादाजीपंत पुरंदऱ्याकडे एके दिवशीं जेवावयास आली. जेवणाचा थाट फारच मोठा होता. परंतु त्या दिवशीं बाजीरावाच्या आवडीची तिळाची चटणी करावयाची राहून गेली. सर्व मंडळी जेवावयास बसली असतां बाजीरावांनीं महादजीपंतास आवडीची तिळाची चटणी कां केली नाहीं, म्हणून विचारलें. महादाजीपंत गडबडून गेले. परंतु सखारामबापूंनीं आज रविवार असल्यानें तीळ, मधु, मांस व स्त्री हे चार पदार्थ वर्ज्य असल्याबद्दल वचन सांगून त्याकरतां आज तिळाची चटणी केली नाहीं असें पेशव्यास उत्तर दिलें. पेशवेही बापूचा हजरजबाबीपणा पाहून बहुत संतोषित झाले व भोजनानंतर 'हा माणूस मजला पाहिजे' म्हणून बापूस मागून महादजीपंतापासून घेतलें."

बापूस लष्करी व कारकुनी बाण्याचें शिक्षण नानासाहेब, सदाशिवरावभाऊ, राघोबा यांच्या बरोबरच मिळालें आणि पुढें इ. स. १७३२ मध्यें बाजीराव पेशव्यानें शनवारवाडा बांधण्याच्या कामावर सखारामबापूची कारकून म्हणून नेमणूक केली. [2] याच वर्षीं बापूचें लग्न झालें असावें. कारकुनीची नोकरी बहुशा १७३५ मध्यें सोडून महादाजीपंताच्या सल्ल्यानें बापू सरदाऱ्या करूं लागला व त्याबद्दल सालीना ३०० रुपये तनखाही त्यास मिळूं लागला. पहिल्या

१ भा. इ. सं. त्रै. १८४९.८.८८. २ वाड-कैफियत. १६२.

बाजीरावाचीं शेवटचीं वर्षें सखारामबापूनें पाहिलीं व महादाजीपंत पुरंदऱ्याबरोबर बाजीरावाच्या कामगिऱ्यांत यथाशक्ति भागहि घेतला. त्याबद्दल इ. स. १७४१ च्या सुमारास त्याचा तनखा ३७७ रुपये झाला.

शिलेदारी पत्करल्याबरोबर सखारामबापूनें मोठी तरवार गाजविली असें आढळून येत नाहीं. इ. स. १७४१ मध्यें नानासाहेब पेशव्यानें उत्तरेकडे माळव्यांत ज्या स्वाऱ्या बाजीरावाच्या मृत्यूनंतर केल्या त्यांत महादाजी पुरंदऱ्याबरोबर सखारामबापू व निंबाजी-भगवंत हेहि गेले होते व धोलपूर मुक्कामीं आनंदानें दिवस घालविल्याचा उल्लेख बापूच्या पत्रांत आढळतो.[1] सवाई जयसिंगामार्फत दिल्लीपतीशीं माळव्याच्या चौथाईबद्दल वाटाघाट होऊन, तो हक्क मिळाल्यानंतर पेशवे काशी, प्रयाग, मथुरा वगैरे ठिकाणीं यात्रा करून पुण्यास परत फिरले. बापूसही या निमित्तानें तीर्थयात्रा घडल्या; देश पहावयास मिळाला, पुष्कळांशीं संबंध आला व अनुभवाचे दृष्टीनें याचा उपयोग पुढील आयुष्यांत फार मोठ्या प्रकारचा झाला. इ. स. १७४४ च्या स्वारींतही पुन्हां बापू उत्तरेकडे गेला होता.

**पहिली कामगिरीः**—उत्तरेंतून परत आल्यानंतर कर्नाटकच्या स्वारीवर बापूस पाठविण्याचें नानासाहेब पेशव्यांनीं ठरविलें. कर्नाटकांत मराठ्यांच्या तंजावर व गुत्ती या जहागिरी होत्या. शिवाय नागपूरचे राजे रघोजी भोसले यांनींही कर्नाटकांत स्वाऱ्या करून मोठा दिग्विजय संपादन केला होता. अर्काटच्या नबाबाचें राज्य

---

१ पु. द. १. पृ. १००.

घेऊन मराठ्यांचे झेंडे पाँडिचेरीपर्यंत नेले होते. भोसल्यांचें वतीनें कृष्णा व तुंगभद्रा या दोन नद्यांमधील प्रदेशाची चौथाई व सरदेशमुखी वसूल करण्याचा मक्ता त्यावेळीं भोसल्यांचे स्नेही बाबूजी नाईक बारामतीकर यांनीं घेतला. या कामीं त्यांना बराच त्रास व विरोध झाला. कर्नाटकांत जिकडे तिकडे अव्यवस्था व बंडाळी माजली. या प्रसंगीं पेशव्यानें देऊं केलेलें सहाय्य नाइकानें नाकारलें. तेव्हां मराठ्यांचा आब राखण्यासाठीं नानासाहेब पेशव्यांनीं कर्नाटकांत फौज पाठविण्याचें ठरविलें. सदाशिवराव भाऊस सेनेचें आधिपत्य देऊन सखारामबापूस त्याचा कारभारी नेमिलें. यावेळीं केवळ १७ वर्षांचा असल्यामुळें स्वारीची सर्व जबाबदारी बापूवर पडली. ता. ५ डिसेंबर १७४६ रोजीं भाऊ व बापू पुण्याहून निघाले व जानेवारींत (१७४७) त्यांनीं आजरें व कित्तूर हीं ठाणीं घेतलीं व सावनुरास वेढा घातला. सावनूरच्या नबाबानें थोड्याशा चकमकीनंतर तहाचें बोलणें लाविलें व शिवाजीच्या स्वराज्यांतील ३६ परगणे मराठ्यांस दिले. यानंतर मराठी सैन्य पुढें चालले असतां निजामाचा मुलगा नासीरजंग यांची गांठ पडून महादेवपुराजवळ लढाई झाली तींत मराठ्यांस जय मिळाला.[१] यानंतर बहादूर भेंड्यास वेढा घालून भाऊनें तो किल्ला सर केला; यानंतर भाऊसाहेबांची स्वारी पुण्यास परतली. या स्वारींत सर्व कारभार, सैन्याच्या हालचाली व्यवस्थित रीतीनें करून अलोट संपत्ति आणून बापूनें शाहूचें कर्ज फेडिलें. त्यामुळें नानासाहेब पेशवे व शाहू यांचा

१. Diaries--Anand Ranga Pillai. Vol III p. 24 "The Maratha Chief Sadashivrao, Simnaji's Son, is marching against Nasirjung with 60000 horse."

बापूवर लोभ जडला व त्याच्या कर्तबगारीची कल्पना आली.[१] या-कारणामुळें स्वारीनंतर बापूचा तनखा २५०० रुपये करण्यांत आला.

इ. स. १७४८ मध्यें नेवाईच्या स्वारींत बापू व महादाजीपंत नानासाहेबास मागाहून जाऊन मिळाले. मल्हारराव होळकरानें दात्तियास मोर्चे लावून तें ठिकाण घेतलें. बापू यावेळीं होळकराच्या सैन्यांत होता. त्यावेळेस दिल्लींतील वजीर मनसूर अलीखान यांजकडील वकील येऊन त्याणीं 'दुराणीचा व आमचा हर्शामर्श लागला आहे. ये प्रसंगीं साहेता करणें उचीत आहे" असें मल्हाररावास कळवून त्यांची मदत मागितली.[२] बापूचाही सल्ला असाच पडला कीं "मनसुर अलीखानाकडील राजकारण राखावें" परंतु मल्हाररावांनीं पेशव्याची भेट घेऊन, मग या कार्यास प्रवर्तावें असा बेत केला. या कारस्थानांतूनच मराठ्यांचें उत्तरेचें राजकारण शिजलें व त्यांत सखारामबापूनें प्रामुख्यानें भाग घेतला.

नेवाईच्या स्वारीहून परत आल्यावर पेशव्यांनीं 'सखारामपंतास चांबलीचें शेत विहीर पानमलियासुद्धां दिल्हे व पालखीहि दिली'[३] यावरून 'अशक्त' सखारामबापूस मोठाच मान त्यावेळीं मिळाला. यावेळेस बापूची नेमणूकही वाढून ती सहा हजार रुपये झाली (१७४९). अशा प्रकारें इतमाम, ऐश्वर्य, राजकारणांत मानाचें स्थान बापूस प्राप्त झालें. या सालीं शाहूराजांचें देहावसान झाल्यामुळें राजकारणांत अनेक भानगडीचे

---

१ इ. स. १७४७ मध्यें सचीवांनीं बापूस १ गांव इनाम दिला. परंतु तो कोणत्या कारणास्तव दिला तें कळत नाहीं. २ पु. द. १. १५७ ३ पु. द. १. २२७.

प्रसंग उद्भवले. या प्रसंगीं महादाजीपंत पुरंदरे व नानासाहेब पेशवे यांचे संबंध ठीक राहिले नाहींत. पुरंदऱ्यांचा कल शाहूच्या किंबहुना ताराबाईच्या पक्षाकडे होता. याचवेळीं सदाशिवरावभाऊ रामचंद्र बाबाजी शेणवी यांच्या शिकवणुकीनें पेशव्यास सोडून कोल्हापुरास संभाजीकडे जाण्यास उद्युक्त झाला. तेव्हां हा दुहींचा प्रकार पेशव्यास बरा वाटेना. महादाजीपंत व सखारामबापू यांच्याबद्दल पेशवेही साशंक झाले. परंतु महादजीपंतानीं यावेळीं मनाचा थोरपणा दाखविला. त्यांनीं आपण होऊनच आपल्या जागेच्या राजीनामा पेशव्याकडे पाठवून ती जागा सदाशिवराव भाऊस देण्यास सांगितलें व आपण स्वतः धोंडा मल्हार व सखारामबापू यांच्यासह सासवडीं जाऊन राहिले.[१] पुढें नानासाहेबानें ताराबाईचें बंड मोडून सर्व स्थिरस्थावर केलें; व इ० स० १७५१ मध्यें सखारामबापूस बोलावून आणून त्यास रघुनाथरावाच्या स्वारी कारभाराचें काम देऊन गुजराथचा बंदोबस्त करण्यासाठीं सैन्यासह रघुनाथरावाबरोबर पाठविलें.[२]

---

१ प. या. ३५९; पु. द. १–६०

२ इ. स. १७४९ पासून: १७५१ पर्यंत बापू बहुधा सासवडींच राहिले असावेत असें यावरून वाटतें.

# प्रकरण ३ रें.

## सखाराम बापू व उत्तर हिंद.

मराठ्यांनीं महाराष्ट्राच्या उत्तरेस आपली दृष्टि वळविल्यापासून उत्तर हिंदच्या राजकीय क्षितिजावर जे कांहीं दैदीप्यमान् तारे उदयास येऊन स्वयंप्रकाशानें चमकत राहिले अशा ताऱ्यांमध्यें शुक्राप्रमाणें अत्यंत तेजस्वी, चकचकीत, अतिशय उठावदार व प्रभावशाली असा तारा म्हणजे सखारामबापू होय. नानासाहेब पेशव्यांच्या कारकीर्दींत उत्तर हिंदच्या राजकीय अंतरिक्षावर बापूची छाप सर्वत्र दिसून येतें. मराठ्यांच्या दृष्टीनें त्यापूर्वीं आकाशांत काळेकुट्ट ढग येऊन चोहोंकडे अंधःकारच होता. औरंगजेबासारख्या खंबीर, कर्दनकाळ बादशहाच्या मृत्यूनंतर मोगल बादशाहीचे लचके कोल्ह्याकुत्र्यांनीं तोडिले. त्यांतच जाट, शीख, मराठे व नादीरशहा यांच्या स्वारीची भर पडून तिच्या अंगांत मांस बिलकूल शिल्लक राहिलें नव्हतें. दिल्लीच्या दरबारांत त्यावेळीं अमर्याद स्वार्थ, चैनबाजी, नादानपणा, विषयासक्ति, आपापसांतील कलह, द्वेष वगैरेमुळें 'कोणी पुसेना कोणाला' अशी परिस्थिति निर्माण होऊन बादशहा सरदारांच्या हातचें केवळ बाहुलें बनला. त्यामुळें परचक्र निवारण्याचें कार्य बाजूलाच राहिलें व पक्षोपपक्ष बळावून एकमेकांनीं एकमेकांची खोड मोडण्यासाठीं परकीय शत्रूस पाचारण करावें व त्यानें येऊन गरीब प्रजेस लुटावें हाच देखावा सर्वत्र दिसत होता.

या पक्षोपपक्षापैकीं सफदरजंगच्या पक्षानें शिंदेहोळकरांची मदत मागितली, ती त्यांनीं ताबडतोब दिली. सफदरजंगाच्या विरुद्ध बाजूचे लोक बुंदेलखंडांत होते, तेव्हां शिंदेहोळकरांनीं तिकडे आपला मोर्चा फिरवून बुंदेलखंड काबीज केलें व दोआबमध्यें

पाऊल टाकलें. मराठ्यांनीं रोहिल्यावर चढाई करून फरुखाबाद येथें त्यांचा पूर्ण पराजय केला. माळवा प्रांतांत आपलें बस्तान नीट बसवून पातशाही मुलूख हळुहळू ताब्यांत घ्यावयाचा हें सामान्यतः मराठ्यांचें धोरण बाजीरावाच्या वेळेपासून होतें. शिंदेहोळकरांनीं रोहिल्यांचें पारिपत्य करून दिल्लीच्या रोखानें चढाई करतांच पातशाहानें शरण येऊन राजपुताना, पंजाब, माळवा, रोहिलखंड ह्या प्रांताची सनद मराठ्यांस बहाल केली. ह्या सनदेस इतिहासांत 'अहमदनामा' असें नांव आहे. ह्या सनदेमुळें मराठ्यांनीं फार मोठी जबाबदारी आपल्या अंगांवर आपण होऊन ओढवून घेतली. कारण पातशाहीचें सर्व शत्रूंपासून रक्षण करण्याची जी हमी त्यांनीं घेतली तीमुळें त्यांस मोठा फौजफांटा उत्तरेकडे ठेवणें भाग पडलें व याचा मोठा परिणाम म्हणजे पानिपतचें अरिष्ट मराठ्यांवर कोसळलें हा होय. ही राजकीय परिणति कसकसी होत गेली व तींत सखारामबापूनें कोणता भाग घेतला हें आतां पहावयाचें आहे.

**गुजराथची स्वारीः**—गुजराथप्रांत गायकवाडांनीं आपल्या ताब्यांत आणिला होता. परंतु शाहूच्या मृत्यूनंतर दमाजी गायकवाड पेशव्यापासून फटकून वागूं लागला. तेव्हां पेशव्यांनीं गुजराथेंत आपली सत्ता दृढमूल करण्यासाठीं राघोबा व सखारामबापू यांची रवानगी केली. रामचंद्र बाबाच्या मध्यस्थीनें राघोबांनीं दमाजी गायकवाडाकडे जें देणेंघेणें होतें त्याची वासलात लावली. दमाजीनें अर्धी गुजराथ व दहा हजार फौज पेशव्यांच्या मदतीस देण्याचें कबूल केलें व पेशव्यांनीं अहमदाबाद जिंकून गायकवाडांच्या हवालीं करण्याचें ठरविलें.

ह्या स्वारींत राघोबाचा मुख्य सल्लागार व कारभारी म्हणून सखारामबापूची नेमणूक नानासाहेब पेशव्यानें केली होती. मागें सदाशिवराव भाऊची दक्षिणेकडील मोहीम बापूनें यशस्वी करून

दाखविली होती; तेव्हां अशा अनुभवी माणसाची नेमणूक या स्वारीवर झाली ही गोष्ट चांगलीच झाली. गायकवाडास बरोबर घेऊन बापू व राघोबा यांनीं अहमदाबादच्या किल्ल्यास वेढा दिला. बरेच दिवसांनंतर किल्ला मराठ्यांच्या स्वाधीन झाला ( मार्च १७५३ ); त्यावर आपला स्नेही श्रीपतराव बापूजी याची सुभेदारीच्या जागेवर बापूनें नेमणूक केली. किल्ल्यांतील शिबंदीच्या खर्चाकरितां दरसाल ६ लक्ष रुपये देण्याचें दमाजीनें अभिवचन दिलें. यानंतर बापू व राघोबा यांनीं पुण्यास परत फिरण्याचा विचार केला होता. परंतु अंताजी माणकेश्वर ( उत्तरेकडील पेशव्यांचा सरदार ) यांचीं पेशव्यास पत्रें आल्यामुळें बापू व राघोबा यांना उत्तर हिंदुस्थानांत जाण्याबद्दल पेशव्यांकडून लिहून आले. यावेळीं दिल्लीवर अहमदशाहा अबदालीनें स्वारी केल्यामुळें बादशाहानें मराठ्यांची मदत मागितली होती व अंताजी माणकेश्वरानें अजमीर, अक्बराबाद व २२ सुभे यांचा बसूल घेण्याच्या अटीवर पातशहास मदत देण्याचें पेशव्यांतर्फे वचन दिलेंही होतें.

**दोआब काबीज**—सर्व तयारी झाल्यावर चिंतो विठ्ठल, महिपतराव चिटणीस, बाबूराव फडणीस, गोपाळराव गणेश, होळकर वगैरे सरदारांसह २४ मार्च १७५३ रोजीं बापू व राघोबा गुजराथेंतून निघून ३० आगस्ट पर्यंत थालनेरास आले. तेथून जयनगरास मुक्काम केला. या ठिकाणाहून अंताजी माणकेश्वरास मदत करण्याकरतां सखारामबापू व गंगाधर यशवंत चंद्रचूड यांची दोआबाकडे रवानगी करण्यांत आली. फरुखाबादेस आल्यानंतर अंतर्वेदींत शिरून सुमारें २०० ठाणीं मराठ्यांच्या फौजेनें हस्तगत केलीं. सखारामबापूनें बुंदेलखंडांतून रोहिल्यास हांकून देण्याचें ठरविलें. रोहिल्यांच्या

फौजेस अचानक गांठून बापूनें तिचा पराजय केला. अंताजी माणकेश्वरानें मीरत येथें नजीबखानाचा भाऊ व इतर नातेवाईक यांना वेढून टाकिलें. या सुमारास वजीर गाजीउद्दीन दिल्लीहून अंतर्वेदींत येऊन बापूस मिळाला. त्यानंतर बापू, गंगाधर यशवंत व विठ्ठल शिवदेव ही मंडळी एकत्र होऊन दिल्लीवर चालून गेली. पातशहा अहमदशहा याच्या सैन्याचा पराभव केला व त्याचे डोळे काढून त्यास पदच्युत केलें आणि अजीजुद्दीन नांवाचा एक शहाजादा गादीवर बसनला. गाजीउद्दीनाच्या मुलास ८२ लक्ष रुपये मराठ्यांस देण्याच्या करारावर पादशाहाची वजिरी दिली. पूर्वींचा सेनापती खान डौरान याच्या मुलास बक्षिगिरी दिली.[1] यावेळेस रघुनाथराव मल्हारराव होळकरासह कुंभेरीहून कूच करून दिल्लीस आला व तेथें सर्वांच्या भेटी होऊन बापूच्या मसलतीनेंच वरील क्रांति घडवून आणिली गेली. रघुनाथरावानें जेव्हां कुंभेरीस वेढा घातला होता यावेळेस बापूस कांहीं दिवस अंतर्वेदींतून बोलवून घेतलें होतें.

**कुंभेरीचा वेढा:**—जाटांचें पारिपत्य करण्याविषयीं खुद्द बादशाहा अहमदशहा यानें मराठ्यांस विनंति केली होती म्हणून सखारामबापूस अंतर्वेदींत पाठवून रघुनाथराव कूच करून कुंभेरीस येऊन दाखल झाले. हा किल्ला मातीचाच परंतु अत्यंत मजबूत; शिवाय किल्ल्यामध्यें साधनसामुग्री भरपूर असून सुरजमल्ल आपल्या सेनेसह लढण्यास सुसज्ज होता. मराठ्यांची त्या किल्यापुढें कांहीं मात्रा चालेना. किल्यावरील शिबंदीच्या माऱ्यानें मराठ्यांच्या असंख्य सैनिकांचा संहार होऊं लागला. मल्हारराव होळकराचा एकुलता एक पुत्र खंडेराव तोफेचा गोळा लागून ठार झाला.

---

१ पे. द. ७. ६८.

पुत्रशोकाच्या भरांत मल्हाररावानें किल्ला जमीनदोस्त करण्याची प्रतिज्ञा केली. तेव्हां सुरजमल जाटाचें धाबें दणाणलें. परंतु त्याचा कारभारी रुपराम कटारी यानें आपल्या मालकास धीर देऊन जयाप्पा शिंद्याशीं जाबसाल सुरू केले. याचें पर्यवसान जयाप्पा व सुरजमल पगडभाई होण्यांत झालें. त्यामुळें मल्हाररावाच्या तळपायाची आग मस्तकास गेली. ही गोष्ट त्यानें ताबडतोब रघुनाथरावाच्या कानावर घातली. रघुनाथरावास यावेळीं विलक्षण पेंच पडला. मल्हारराव म्हणजे बडें प्रस्थ. त्यांची कड न घ्यावी तर त्यांचा रोष होणार; बरें बाजू घेतली तर शिंद्यांनीं सुरजमलास पाठीशीं घातलेले! अशा स्थितींत राघोबानें सखारामबापूस बोलावून घेतलें. परंतु याच सुमारास तोफखान्यासह जाटाच्या पारिपत्यास येतो म्हणून पातशाहानें मराठ्यांस कळविलें होतें, त्याच्या विरुद्ध वर्तन केलें. 'खानखानानें तोफांसह जाटाचे साहित्यास्तव श्रीमंतासच शह दिला'.[1] तेव्हां राघोबानें बापूच्या सांगण्यावरून मल्हारावास पातशहावर रवाना करण्याचें ठरविलें. कुंभेरीच्या जाबसालाबद्दल बापूनें असें सांगितलें कीं शिंदे व होळकर हे दोघेही सारख्याच दर्जाचे सरदार; दोघांच्याही म्हणण्यास श्रीमंतांनीं सारखाच मान दिला पाहिजे. मल्हारराव जरी पुत्रशोकाच्या आवेगांत आहेत तरी जाबसालाचें महत्त्व ओळखलें पाहिजे. सर्व दृष्टीनें विचार करतां जाटाशीं तह करणेंच सयुक्तिक. अशा तऱ्हेनें इतक्या थरावर गोष्टी आल्यानंतर मल्हाररावानें आपण होऊन पडतें घेतले व लढाईचा आग्रह सोडला. 'यजमानही ( होळकर ) जरूर जाणोन जाटाचा फैसला तीस लाखांवर केला आणि तेथून कूच करून सडे फौजेनिशीं पातशहाशीं गांठ घातली व फौज उधळून लावली.[2] असें गंगाधर यशवंत लिहितो.

---

१ पे. द. ७. ६८. २ पे. द. ७. ६८.

कुंभेर प्रकरणांत बापू व रघुनाथराव पेशवे यांना शिंदे होळकरांपैकीं एकासही आपल्या म्हणण्याप्रमाणें भाग पाडण्याची ताकद नाहीं असें दिसून आलें. खुद्द सेनापती स्वारींत असतांना शिंदे उघडपणें शत्रूची कड घेतात यांत मराठी कारभाराच्या एकसूत्रीपणाचा बोजवारा उडाला. मल्हाररावाच्या मनांत शिंद्याविषयीं अढी राहिली. त्यामुळें उत्तरेच्या राजकारणास सुसंघटीत स्वरूप प्राप्त होण्याऐवजी वैयक्तिक द्वेषामुळें स्वार्थी स्वरूप प्राप्त झालें.[१] पुढें शिंद्यांनीं सवाई जयसिंगाचा मुलगा ईश्वरसिंग याचा पक्ष घेतला तेव्हां मल्हारराव विरुद्ध ( बाजूस ) म्हणजे माधोसिंगाच्या बाजूस मिळून दोघांनीं मराठ्यांच्या नीतीमत्तेचें एक खासें प्रदर्शनच जगास दाखविलें.

**दिल्लींतील कामें**—कुंभेरीचें काम आटोपून बापू व राघोबा दिल्लीस आले त्यावेळीं त्यांच्यापुढें जिंकलेल्या मुलुखांत स्थिरस्थावर करणें, काशी, प्रयाग इत्यादि पवित्र क्षेत्रें सोडविणें, मारवाडांत शांतता राखणें वगैरे कामें होतीं. दोआब, बुंदेलखंड या प्रांतांत सुरळित कारभार चालवण्यास बऱ्याच फौजेची आवश्यकता होती व एवढी फौज गुंतवून ठेवणें इष्ट नव्हतें. जिंकलेल्या प्रांतांत सुव्यवस्थित कारभार चालावा, तेथील लोकांचीं मनें आपल्याकडे आकर्षून घ्यावींत अशा तऱ्हेचा पद्धतशीर प्रयत्न मराठ्यांनीं केल्याचें दिसत नाहीं. केवळ पैसा ( ऐवज ) मिळविणें हेंच त्यांचें ध्येय होतें. यामुळें उत्तरेंतील जिंकलेलीं ठाणीं पुष्कळ वेळां त्यांचे हातून जात व पुन्हां ताब्यांत येत असा प्रकार चालला होता.

दुसरी गोष्ट पवित्र क्षेत्रें मुसलमानापासून घेण्याबाबतची. बापूनें

१ Life of Malharrao—Burvey p. 22.

अयोध्येचा वजीर सफदरजंग व त्याचा मुलगा सुजाउद्दौला याजकडे पवित्र क्षेत्रें मराठ्यांना मोबदला मुलुख घेऊन द्यावीत या संबंधीं बोलणें करण्याकरतां राघोपंतास पाठविलें. परंतु त्याचा कांहींही उपयोग झाला नाहीं. जानेवारी १७५५ पासून जून १७५५ पर्यंत बापू व राघोबा फौजेसह निरनिराळ्या क्षेत्रीं हिंडून आले. मुसलमानांच्या धाकानें लोक त्यांचें स्वागत करण्यास तयार नव्हते. कारण 'त्याना पुरता भरंवसा येत नव्हता कीं मराठ्यांचा अंमल शेवटपर्यंत येथें राहील.' सुजाउद्दौल्यानें प्रयाग वगैरे क्षेत्रें मराठ्यांच्या स्वाधीन करण्याचें साफ नाकारलें. तेव्हां मराठ्यांना तो प्रश्न तसाच सोडून द्यावा लागला.

मारवाडांत शिंदे होळकर एकमेकांविरुद्ध लढत होते. त्यांच्यावर नियंत्रण घालण्याचें काम बापूंना करतां आलें नाहीं. रजपुतांना असें वाटावयास लागलें कीं मुसलमानही आपल्याला लुटतात व मराठे–हिंदू तेही लुटतात; तेव्हां मराठेमुसलमानांत भेद तो काय? मराठ्यांच्या या वर्तनामुळें रजपुतांचे हें शत्रुत्व पुढें पानपतावर त्यांना नडले. असो. शिंदे होळकराचे मारवाडांतील राजकारणाचें पर्यवसान जयाप्पाचा खून होण्यांत झालें.[१] यासुमारास बापू होळकरांसह रेवाडीस यावयास निघाले होते. खुनाची बातमी कळतांच अंताजी माणकेश्वरास व विठ्ठल शिवदेवास त्यांनीं शिंद्याला मदत करण्यास सांगितलें. परंतु मदत येऊन पोहोंचण्यापूर्वीच जय्यापाचा भाऊ दत्ताजी व पुत्र जनकोजी यांनीं मोठ्या हिमतीनें लढून रजपुतांचा मोड केला होता.[२]

बापू व राघोबा पुण्याकडे परतले त्यावेळेस 'या क्षणीं श्रीमंतांनीं परतणें इष्ट नाहीं' असें गोविंदपंत, गणेश संभाजी, विठ्ठल शिवदेव वगैरे मंडळींनीं विनविलें असतांही राघोबानें तिकडे फारसें लक्ष दिले नाहीं.[३] श्रीमंत गेल्यावर उत्तरेंतील परिस्थिति किती बिकट

१ पे. द. २. ६९. २ पे. द. २. १३९. ३ पे. द. २. ६७.

झाली होती याचें चित्र गंगाधर यशवंतानें सखारामबापूकडे एका पत्रांत रेखाटलें तें असें:—“आम्ही दिल्ली प्रांतांतून नाट, नजीबखान वगैरे ज्याचे त्यापरी सारस्य राखोन दरमजल विजयादशमीस इंदुरीस आलो व मालवे प्रांतीं पागा वगैरे पाठवून श्रीमंतांच्या उद्देशाप्रमाणें भेटावयास येणार होतो परंतु मध्यंतरीं माधोसिंगानें बंड केले. इतर राजेरजवाडे हरामखोरी करतात. आम्हीहीं तिकडे आल्यास नजीब सुजा मागे उठावा करतील व नर्मदे पावेतों दाक्षिणचे मोंगल एक झाले म्हणजे फारच जड पडेल....असो मनसबा यथार्थ जाणोन दूरदेसीने विवेक असो द्यावा. पैक्यामुळें दिल्लीची हुजुरात सुद्धा हैराण आहे[1]. ”तात्पर्य बापू व राघोबा यांची पाठ फिरल्याबरोबर मराठ्यांच्या शत्रूंनीं उचल घेतली व मल्हारबाशिवाय दुसरा कर्तबगार माणूस नसल्यामुळें पुन्हां अंदाधुंदी माजावयास लागली. तेव्हां उत्तरेंतील सर्वच प्रकरणें अर्धवट ठेवून बापूंनीं दक्षिणेस जावयास नको होते असेंच कोणीही म्हणेल. नानासाहेब पेशव्यांकडून जरी परत येण्याबद्दल हुकूम मिळाला तरी वस्तुस्थितीची कल्पना त्याठिकाणच्या माणसास ( Man on the spot ) जेवढी बरोबर असूं शकेल तेवढी नानासाहेब पेशव्यासारख्या फार लांबवर असणाऱ्यास होणें अशक्य आहे. नानासाहेब पेशव्यास सर्व हकिकतीची-परिस्थितीची पूर्ण कल्पना देऊन एकंदर बंदोबस्त ठाकठीक केल्यानंतरच बापू–राघोबांनीं दक्षिणेंत जावयास हवे होते. त्यांतल्या त्यांत अंताजी माणकेश्वर, पुरुषोत्तमपंत हिंगणे, विठ्ठल शिवदेव यांची आपापसांतील चुरस, शिंदे होळकरांतील द्वेषाग्नि यामुळें राजकारणास धक्का पोंचेल ही गोष्ट बापूच्या लक्षांत येऊनही तिचें निराकरण

---

१ पे. द. २. ७९–८०.

त्यांचे हातून झालें नाहीं. शिवाय बापूंनीं दिल्लींत ज्याचा पक्ष आपल्या हाताशीं धरला तो मुळांतच कमजोर, नालायक, सर्वांस अप्रिय. गाजीउद्दीनास फारसें पाठबळ नसल्यामुळें स्वतःच्या कर्तबगारीवर तो बऱ्याचशा गोष्टी पार पाडील याची मुळींच आशा नव्हती. दक्षिणेंतून मराठी फौज आली कीं तेवढ्या पुरता गाजीउद्दीनाचा अंमल सुरू होई व ती फौज परत गेली कीं नजीबासारख्या महान् कारस्थानी, मुत्सद्दी, कपटनीतिनिपुण, धोरणी गृहस्थाची बाजी शेर होई. नजीब मराठ्यास मिळाला नाहीं म्हणून मराठ्यांनीं गाजीउद्दीन पकडला असें कोणी म्हणेल. परंतु नजीबासारख्यासच आपल्या बाजूकडे वळविणें ह्यातच बापू होळकर यांची मोठी मुत्सद्देगिरी दिसून आली असती. या स्वारींत त्यांनीं दोआब व बुंदेलखंड या प्रांतांत मराठी सत्ता स्थापणें व दिल्लींत मराठ्यांचें वर्चस्व बसवून उत्तरहिंदुस्थानांत सर्वत्र मराठ्यांचा दबाब वाढविणें एवढ्या गोष्टी जरी साधल्या असल्या, तरी जिंकलेल्या मुलुखांत सत्ता चिरस्थायी करण्याच्या दृष्टीनें महत्वाच्या कांहीं गोष्टी कमी पडल्या असें वाटतें.

बापूची या स्वारींतील कामगिरी फार मोठी व महत्त्वाची होती यांत तिलप्राय शंका नाहीं, व पेशव्यांनाही ती पसंत पडली. कारण स्वारीहून माघारीं आल्यानंतर नानासाहेब पेशव्यांनीं बापूची नेमणूक १९००० रुपये केली व त्यास चार गांवे इनाम दिली. [१] बापूंनीं नानासाहेबास सासवड मुक्कामीं मोठ्या थाटाची मेजवानी दिली. पेशव्यांनीं त्यावेळीं बापूस वस्त्राकरतां कापड, सोंगट्याचा पट, बापूच्या पत्नीस पैठण्या बक्षिस दिल्याचा उल्लेख पेशव्यांच्या डायरींत आढळतो. [२]

---

१ याखेरीज भोरच्या सचिवांनीं २ गांवें इनाम दिलीं.

२ आख ५१४॥≈ तिवटे। ३९५ जाफर खानी सेले । ११०॥ सेले

( पान २७ टीप पहा )

**दिल्लींतील कारस्थानें व अबदालीची स्वारी:**—मराठ्यांचें दिल्ली दरबारांत प्रस्थ वाढलें ही गोष्ट नजीबास व त्याच्या पक्षास आवडली नाहीं. त्यांनीं मराठ्यांस काढून लावण्यासाठीं अहमदशाहा अबदालीस पाचारण केलें. बादशहाची आजी मलकाजमानी ही या कारस्थानांत सामील होती. तसेंच माधोसिंग, बिजेसिंग यांचीही अबदालीस हिंदुस्थानांत येण्याबद्दल पत्रें गेलीं होतीं. अबदाली त्याबरहुकूम सैन्य घेऊन हिंदुस्थानांत आला. पंजाब प्रांत हस्तगत झाल्यानंतर दिल्ली ही त्याच्या स्वाधीन झाली. शहरांत त्यानें मोठी कत्तल करून पुष्कळ लूट जमा केली. मराठ्यांची उत्तरेकडे फारशी फौज नाहीं असें पाहून हिंदूंचें पवित्र क्षेत्र मथुरा शहर लुटलें व लाखों लोकांची कत्तल केली. मराठ्यांचें जें कांहीं सैन्य उत्तरेंत होतें. तें सर्व त्यापुढें पळत सुटलें. फक्त अंताजी माणकेश्वरानें त्याच्याशी टक्कर देण्याचा प्रयत्न केला; पण त्यासही मागें हटावें लागलें. वजीर गाजीउद्दीन त्यास शरण गेल्यामुळें वांचला. दोआबांतील मराठ्यांचीं ठाणीं अबदालीसाठीं जिंकून घेण्याची कामगिरी पथकरण्याचें कबूल केल्यामुळें त्यास पूर्ववत् वजिरी मिळाली. परत जातांना अबदालीनें नजिबास बक्षिगिरी दिली व आग्रा शहर घेऊन पंजाब प्रांतावर आपला मुलगा तैमूरशाहा यास सुभेदार नेमिलें.

अबदालीच्या स्वारीची हकीगत पेशव्यास कळल्यानंतर उत्तरेंत मराठ्यांची इभ्रत राखण्यासाठीं रघुनाथरावाचीच पुनः रवानगी कर-

---

खसखसी ।.६५ लुगडी पैठणी १ । ७० तपसीला पैठणी १ । १०० चिरे बादली २ । २५ चोलखण पैठणी ४. बापूचा पुतण्या संकराजी निबाजी यास गुजराथचे स्वारीस ५०० रुपये किंमतीचा चोघडा बक्षीस दिल्हा. (Extracts from Peshwa's Diaries-Sardesai p. 22)

ण्यांत आली. यावेळीं बापू व त्रिंबकराव पेठे यांना कारभारी नेमण्यांत आले. अंताजी माणकेश्वरांची राघोबास पत्रें आली कीं तातडीनें निघून अबदालीसी गांठ घालावी. कारण त्यामुळें मराठ्यांची सर्वत्र छाप पडेल. तो लिहितो, "आपण अबदालीचे मागे करनालेपर्यंत गेल्यानें हिंदुस्थानांत कीर्ति होईल. केवळ गढीयासी लागाल तरी अबदालीसाठीं धावोन आला ऐसे लोकास दिसणार नाहीं. रोहिले जाट याजवर इभ्रत राहणार नाहीं" [१] परंतु राघोबा ताबडतोब येऊं शकले नाहींत. अबदालींची गांठ घालण्याकरतां व त्याचा पाठलाग करण्याकरतां राघोबापासीं पुरेसी फौज जमली नव्हती. त्यामुळें जयनगर प्रांतीं येऊन सरदारांच्या फौजा येईतोंपर्यंत आसपाच्या गढ्या घेण्याचा उद्योग राघोबांनीं आरंभिला. बापू लिहितात "आमच्या जवळ फौजफाटा पुरेसा नसल्यामुळें आस्ते आस्ते जयनगराहून कूच करींत आहोंत. [२]" अबदाली निघून गेल्यानंतर फक्त शेपूट बडविण्याचेंच काम बापू व राघोबा यांना करावें लागलें. अबदालीशी लगट न करण्याचे धोरण जाणून बुजून स्वीकारले होते कीं काय असा येथें संशय आल्याशिवाय रहात नाहीं.

जयनगरहून सखारामबापू, गंगाधर यशवंत, विठ्ठल शिवदेव व अंताजी माणकेश्वर यांच्या बरोबर २५ हजार फौज देऊन राघोबानें त्यांना पूर्वीप्रमाणें अंतर्वेदींत पाठविलें. बुंदेलखंडांत आल्यानंतर बापूंनीं वेढा घालून 'दांतिया व मेडते सर' केली. त्यानंतर पाहाडसिंग बुंदेल्याच्या मुलुखाकडे मोर्चा फिरविला. मराठे बुंदेलखंडांत आले त्यावेळेस पहाडसिंग आणि गुमानसिंग व खुमानसिंग यांच्यामध्यें गादीबद्दल तंटा सुरू होता. जगत्राय ( प्रसिद्ध छत्रसालाचा मुलगा ) वारल्यानंतर पहाडसिंगानें गादी बळकाविली.

---

१ पे. द. २१. १६८. २ पे. द. २१. २७.

उधळपट्टीमुळें पहाडसिंगास पांच सात लाख रुपये कर्ज झालें होतें. प्रथम मराठ्यांनीं त्यास मान्यता दिली, परंतु पुढें त्यांनीं गुमानसिंग व खुमानसिंग यांचा पक्ष घेतला. बापूनें त्रिंबकपंत व चिंतामणराव या दोन वकीलांना पहाडसिंगाकडे पाठवून 'राज्याची मामलत आटोपून बसला आहेस........तरी मातबर पांच तुमच्या राज्यांतील असतील ते आम्ही बसोन तुम्हास सांगूं त्याप्रमाणें ऐकावें" असा निरोप पाठविला. परंतु त्यानें चढेलपणाचीं उत्तरें दिल्यावरून बापूनें त्याच्या राज्याचा सर्व मुलूख जप्त केला. त्याचा खास जमालपूर परगाणाही जप्त केला व राघोबास लिहिलें, "तेथेही साहित्ये गृहस्थांनीं बहुत केली. रुपया घेऊ न दिल्हा. गव्हार गर्दी जाहली. तशांत जप्ती राखून थोडा बहुत वसूल जेथवर हात पाविले तेथवर केला."[1] या कामी बापूस जयाजी मोरे याची फार मदत जाहली. तसेंच गोपाळ गोविंद यानें सेमोनी पेलाणीचे व राठेचे ठाणें हल्ला करून घेतलें. प्रथमतः गोपाळरावास त्यांत अपयश आलें. परंतु बापूनें हुसेनखान नांवाच्या सरदारास मदतीस पाठवून विजयश्री संपादन केली. यानंतर बापूनें कीरतसिंगाचा मुलगा गुमानसिंग यास गादीवर बसविलें. यांत केवळ पैका उकळण्याचाच उद्देश होता हें उघड दिसतें. राघोबाची बापूस या प्रकारचीच आज्ञा होती. "नजराण्याचा ऐवज मातबर ठरोन रोख ये आणि साहास न लागतां सरकारकाम होऊन ये ऐसे धोरण असावे." तरीही बापूनें राघोबाच्या आज्ञेविरुद्ध वर्तन करून एकपक्ष धरला असें कांहीं लोकांनीं राघोबास समजाविलें. परंतु बापूनें राघोबास स्पष्टोक्तीचें पत्र लिहून शेवटीं 'खावंदाचे वितरीगत सेवक धरणार नाही, दुसरे बोलत असतील त्यांचे न ऐकणें,' म्हणून विनंती केली.

१ पे. द. २७. १७९.

याप्रमाणें या प्रकरणाचा निकाल लागल्यानंतर बापूनें बुंदेलखंडांतील इतर राजांपासून खंडण्या घेऊन अंतर्वेदींत प्रवेश केला.

**पुनः दोआब**—अंतर्वेदींतील परिस्थिति पुष्कळच बिकट होती. वजीरानें अबदालीच्या वतीनें मराठ्यांचीं ठाणीं जिंकून घेऊन तेथील मराठ्यांचा अंमल संपुष्टांत आणला होता. सखारामबापू अंतर्वेदींत आले त्यावेळीं त्याची छावणी फरुखाबादेस होती. रोहिल्याशीं त्यानें संधान बांधलेंच होतें. त्यांचे पुढारी हाफिज, दुंदेखान वगैरे नकलाबादेस होते. वजीर व रोहिले एक झाल्यास अयोध्येचा वजीर सुजाउदौल्यास एक मोठें संकटच होतें. म्हणून त्यानेंही फौजेची जमवाजमव चालविली होती. मराठ्यांची फौज अंतर्वेदींत आल्यावर रोहिल्यांनीं मराठ्यांचीं ठाणीं मोकळीं करून दिलीं. तेव्हां मराठी फौजांनीं सहाना परगणा, शहापूर, नारसिजा, हैदरनगर, जलेसर, जोखेरा, खानपूर, सेधूगुजर, गडमुक्तेश्वर वगैरे ३०० ठिकाणें व्यापिलीं. बाबू नरसिहानें सांरगपूर जिंकिलें. देवजी ताकपीरानें शहाडादियाजवळ राजघाटाची नाकेबंदी केली. मराठे अंतर्वेदींत आले या आवईनेंच वजीर बहुत जलदी करून दहा बारा कोसांच्या मजली करून इटावियाचे रस्त्यानें जाजमऊच्या घाटानें गंगापार गेला. कासीचा बलवंतसिंग याजकडून मातबर पैका घ्यावयाचा त्याचा विचार होता.[1] हीं सर्व ठिकाणें ताब्यांत आल्यावर मराठ्यांचा अंमल सुरू झाल्याबद्दल अधिकृत सनद पाठवा म्हणून जनार्दन रामनें बापूस विनंति केली. अंतर्वेदींतल्या सर्व मोहिमांचीं सूत्रें सखारामबापू चाळवीत होते व पुष्कळसे सरदार त्यांस मदत करीत होते. अंतर्वेद प्रांतांतलीं ठाणीं ताब्यांत आलीं तरी रोहिल्याचा निकाल अजून लागावयाचा होता. ते तर

१ पे. द. २७. २०७.

मराठ्यांचे कट्टे दुष्मन. शिवाय वजीरही फौजबंद होताच. राहता राहिला सुजा. परंतु त्याजबद्दल निश्चित कांहींच कळण्यासारखें नव्हतें. त्याचें व रोहिल्यांचें जरी वांकडें होतें तरी मराठ्यांना हाकून देण्याबद्दल रोहिल्यांचा पुढारी हाफीज यानें सुजा व वजीर यांच्याशीं कारस्थानें सुरूं केलीं होतीं.

सुजास मराठे दोआबांत आले हें ऐकून हायसें वाटलें. कारण वजिराची फौज व रोहिले यांचें मेतकूट जमल्यास आपली चटणी व्हावयास वेळ लागणार नाहीं, हें तो जाणून होता. परंतु मराठ्यांना मदतीस बोलवावें तर ते पवित्र क्षेत्रें मागणार! आणि तें तर त्यास नको होतें. इकडे मराठ्यांनाहि सुजा, वजीर व रोहिले या त्रिकुटांची भीति होती. वजीर गाजीउद्दीन व शहाजादा हे गंभीरानदीजवळ तळ देऊन राहिले. सुजाने कासावेसंदी येथें ठाणें दिलें. 'दोघांमध्यें तफावत फक्त आठ कोसांची' अशी परिस्थिति होती. वजीर फरुखाबादेस आला त्यावेळीं सुजा बिलग्रामेस होता. दोघांच्या हालचाली व हिकमती काय काय चालल्या आहेत याची माहिती नारो केशव बापूस लिहीत होता.[१] रोहिल्यांचे सरदारही फरुखाबादेजवळ होते. त्रिंबक शिवदेवानें बापूस लिहिलें कीं मराठ्यांचे घोडदळ या वेळेस फरुखाबादेस आल्यास रोहिल्यास पायबंद बसेल नाहींतर प्रसंग मोठा कठीण आहे. 'रोहिले व वजीर यांचा मिलाफ झाला तर त्यांचा पराभव करणें मुष्किल आहे' असें धोंडो दत्तात्रयानें बापूस कळविलें. या तिघांच्या कोंडींतून सुटून यशाचें लेण पोचविणें ही मोठीच कर्तबगारीची गोष्ट होती. परंतु सखारामबापूनें मोठ्या हिकमतीनें व धोरणानें या परिस्थितींतून मार्ग काढिला. प्रथम रात्रो लक्ष्मणास सुजाकडे पाठवून मराठ्यांशीं

१ पे. द. २७. १४८–९.

सख्य करण्याबद्दल त्याच्याशीं जाबसाल सुरू केला. सुजाचें व गाजिउद्दिनाचें झुंज लागलें होतें;[१] तेव्हां मराठ्यांची मदत घेऊन रोहिल्यांचें व गाजीउद्दिनाचें परिपत्य करावें ही गोष्ट त्याच्या मनांत होतीच.[२] परंतु त्यास मराठ्यांचा भरंवसा नव्हता आणि ही गोष्ट त्यानें मराठ्यांच्या वकीलाजवळ बोलूनही दाखविली. परंतु बापूस तरी सुजाबद्दल कोठें विश्वास होता! बापूनें सुजास कळविलें कीं मराठ्यांच्या फौजेस तिकडे यावयास आठचार दिवस लागतील. तेवढ्या अवधींत तुमची व वजिराची लढाई होऊन चुकली किंवा तुमचा व रोहिल्यांचा सलूख झाला तर? अर्थात् मग मराठी फौजेची चटणी व्हावयास काय उशीर! बापू ही सर्व धोरणें ओळखून होते. शेवटीं सुजानेंच बापूस कळविलें कीं 'तुमचा भरंवसा पुरता असेल तर मजला इतराशीं सलूख करणें नाहीं. केवळ रदबदलीवर घालूं.' परंतु सुजा कपटी विश्वासघातकी असल्यामुळें आयत्यावेळीं दगा देईल ही बापूची खात्री होती. त्याचा मराठ्यांशीं सलोखा केवळ वरपांगीं होता. कारण वजिराशीही त्याचवेळीं त्याचें बोलणें सुरू होतें.[३] तेव्हां सुजास 'जाबसालावरी गोवून' बापूस पुढें वाट काढावयाची होती. शिवाय सुजाजवळ १० हजार कवायती फौज असून तोफखाना उत्तम होता. तेव्हां त्याच्याशीं शत्रुत्व करून मराठ्यांस भागण्यासारखें नव्हतें. बापूनें राघो लक्ष्मण यास सुजाकडे पाठविलें होतें; परंतु त्यास जाबसाल यथास्थित जमेना तेव्हां त्यास परत बोलावून गोपाळ गणेशास 'गाजिउद्दीन व सुजा यांचा सलूख करून देण्यासाठीं पाठविले.' याचवेळीं त्रिंबकपंतास वजिराकडे पाठवून ऐवजाबद्दल बोलणीं सुरू केलीं. सुजानें आपली मदत

१ पे.द. २७. १५०. २ पे.द. २७. १५४. ३ पे.द. २७. १४७.

फेटाळल्यास वजिरास हाताशीं धरावें हा बापूचा मानस. परंतु बापूनें याचवेळीं नारो केशवाकडे बरीचशी फौज रवाना करून रोहिल्याशीं एकदम गांठ घालण्याबद्दल त्यास सुचविलें. बापू व गंगाधर यशवंत यांनीं यावेळीं मथुरेपासून गंभीर नदीनजीक सिकंदरा येथें वजिराचा दिल्लीस जाण्याचा मार्ग रोखून धरल्यामुळें वजीरास मराठ्यांना मिळणें फायद्याचें वाटलें व त्यानें अबदालीच्या पलटणास हांकून लाविलें. इकडे नारो केशवानें रोहिल्यांवर चढाई करून त्यास गंगापार हुसकून लाविलें. तेव्हां त्यांनीं तहाचें बोलणें लाविलें व उभयपक्षीं तात्पुरता तह झाला.[१] तात्पर्य बापूनें सर्वांस झुलवून यश मिळविलें.

अशाप्रकारें अंतर्वेदप्रांत पुनः जिंकून घेण्यांत बापूची मुत्सद्देगिरी, समयसूचकता, चांगलींच दिसोन आली. परंतु बापूनें सुजाशीं जें संधान बांधलें तें राघोबास फारसें पसंत पडलें नाहीं. त्यांनीं बापूस १२ जुलै १७५७ रोजीं खरमरीत पत्र लिहिलें. त्यांत ‘ रुपये न घेतां सुजाचे मदतीस जावें यांत किफायत कोणती ? ........जिकडे रुपये मिळेल तिकडे जावें. हरतऱ्हेनें रुपया मेलवावा यात तुमचे स्वरुप आहे..... तुम्हास यात्रेस पाठविले नाहीं तीर्थास पाठविले नाही ’[२] वगैरे मजकूर लिहिला. यावरून मराठ्यांचें राजकारण कोणत्या स्वरूपाचें होतें याची चांगली कल्पना येते. रघुनाथराव यावेळीं दिल्लीनजीक होता. विठ्ठल शिवदेवानें दिल्ली काबीज करून नजीबखानास पकडलें होतें. पुढें नंतर राघोबांनीं दिल्लीस जाऊन अलमशहास गादीवर बसविलें व त्याची वजिरी गाजीउद्दीनास दिली. इतक्या गोष्टी घडल्या-नंतर १० आगष्ट १७५७ रोजीं सखाराम बापूही दिल्लीस आले.

---

१ पे. द. २७. १९२–९३. २ पे. द. २७. १५७.

आतां फक्त अबदालीचें सैन्य व त्याचे हस्तक यांचा निःपात करणें हें मुख्य काम त्याजपुढें होतें. नानासाहेब पेशव्यांची राघोबास पत्रें आलीं त्यांत नजीबास नाहींसा करणें, जाटाशीं मैत्री करणें व पाटणाच्या बाजूकडे मोहिम करून बंगालपासून चौथाई वसूल करणें वगैरे कामें रघुनाथरावास करावयास सांगितली होतीं. नजीबास नाहींसा करण्याची गोष्ट बाजूसच राहिली; उलट मल्हारराव होळकरानें मध्यें पडून त्याची सुटका केली, मायावी नजीबानेंही मराठ्यांशीं गोड बोलून वेळ मारून न्यावयाचा उपक्रम आरंभिला. दिल्लीच्या आसपासचा मुलुख हवालीं करून अहमदशहा अबदाली व मराठे यांचा सलूख करून देण्याचें त्यानें बोलणें लाविलें, त्यासाठीं मराठ्यांनीं त्याचा मुलगा झाबेताखान यास १० हजार स्वारांची मनसब द्यावी असें त्याचें म्हणणें होतें. बापूनें नजीबाच्या बोलण्याकडे फारसें लक्ष दिलें नाहीं. तरी अबदालीच्या लोकांस हाकून देण्याचें काम वजिराच्या सांगण्यावरून मात्र पतकरलें. मराठे चढाई करून येताहेत असें पाहून अबदालीचा मुलगा तैमूरशहा व त्याचा दुय्यम जहानखान हे कंदाहारकडे जीव घेऊन पळाले. अबदुल समंदखान वगैरे दुराणी सरदार लढाईस उभे राहिले; परंतु मानाजी पायगुडे, गंगाधर बाजीराव, गोपाळराव गणेश यांच्या मदतीनें बापूनें त्यांचा सरहिंद येथें पराजय करून त्यांना शरण यावयास लाविलें.[१] आणि मराठी सैन्यानें बापू व राघोबा यांच्यासह मोठ्या विजयोत्साहांत लाहूर शहरांत प्रवेश केला.[२] दुराण्यांचा अटकेपावेतों पाठलाग करण्यांत आला; भीमथडीचीं तट्टें अटकेचें पाणी प्याली व मराठी

१ Seiur Mutagherin Vol. III, p. 377

२ " फेडून नवस माहोरास गेले लाहोरास जिंकित शेंडे । अरे त्यांनीं अटकेंत पाव घटकेंत लाविले झेंडे ॥ "— प्रभाकर ८१-८२.

राज्य उत्कर्षाच्या कळसास पोचलें असें सुप्रसिद्ध इतिहासकार व्हिन्सेंट स्मिथ यानें म्हटले आहे. बापूंनीं नानासाहेबांस पत्र लिहून या विजयाची हकिगत कळविली, " आम्ही अंतर्वेद प्रांतीं आलों. मुलुखाची जप्ती केली. नजीब काढून दिला. अबदालीच्या जागीं आमचे लोक नेमिले. पुढील तहनामेचा करार ठरला. त्यांत बावीस सुभ्यांचा तपशील दक्षण माळवा .... आपणाकडे आहेत. अयोध्या बंगाला पटणे हे राहिले त्यांत दिलीखाले एक करोडेचा मुलुख .... यांपैकीं निमे महाल ४०।४५ पावेतो दोचौ दिवसांत येतील. बंगाल्याचे पातशहास ५४ लक्ष येतात.आपले सलाबतीने जे साधतील ते साधावे "[१] अशा प्रकारें फार मोठी कामगिरी करून 'पृथ्वीवलयांकित यश' बापू व राघोबा यांनीं संपादिलें. याबद्दल राजा केशवराव यानें पेशव्यास कळविलें कीं " ईश्वरें खैर केली.वजीर पातशहा नरमायिले. अखिल हिंदुस्थानचें अधिराज्य तुम्हास दिलें."[२] अशा रीतीनें बापू व राघोबा यांची कामगिरी मोठ्या दर्जाची होती याबद्दल शंका नाहीं. इतिहासांत ती सुवर्णक्षरांनींच लिहून ठेवण्यासारखी आहे.

पंजाब प्रांत मराठ्यांनीं घेतल्याचें ऐकून अबदालीनें आपला वकील याकूबअलीखान यास मराठ्याकडे पाठवून त्याशीं सलोखा करण्याची इच्छा दर्शविली. सखारामबापूनें या वकीलाची गाठ घेऊन त्याशीं बोलणें केलें. परंतु वाटाघाटींत कांहींच निष्पन्न झालें नाहीं. इराणकडील राजघराण्यांतील एक व्यक्ति अबदालीनें आपली गादी घेतली ती परत मिळवून द्यावी यासाठीं पेशव्याचें सहाय्य मागण्यासाठी राघोबाकडे आली होती. त्या व्यक्तीची भेट घेण्या-

१ पे. द. २१. १००. २ रा. ६. ३८५; १. १३२.

साठी बापूनें राघोबास ' आपण पालखींत बसून सत्वर यावें ' म्हणून चिठी पाठविली, आणि इराणच्या राजघराण्यांतील मनुष्य आपणाकडे येतो ' ही फारच महत्वाची गोष्ट ' आहे असा एका पत्रांत उल्लेख राघोबानें केला आहे. यावरून मराठ्यांची कीर्ति कोठपर्यंत गेली होती हें कळून येतें.

एवढया कामगिरीनंतर एकाएकीं नानासाहेब पेशव्यांच्या तांतडीच्या निरोपामुळें लाहूर प्रांतींचा तूर्तातूर्त बंदोबस्त करून बापू व राघोबा जयनगरकडे असलेल्या जनकोजीस दिल्लीस जाण्यास सांगून दरमजल दक्षिणेस परतले ते १८५८ च्या आक्टोबर महिन्यांत पुण्यास येऊन पोंचले. [१] दिल्लीचे वजीर, पेशव्याचे इतर सरदार उत्तरेकडील बंदोबस्त बरोबर झाला नाहीं सबब रघुनाथरावांनीं इतक्यांत परत जाऊं नये अशा मताचे होते [२] परंतु नानासाहेबांनीं परत बोलाविलें म्हणून बापू रघुनाथराव यांस जाणें भाग पडलें. पुण्यास आल्यावर नानासाहेबाकडून बापूच्या स्वारींतील कामगिरीबद्दल त्याचा तनखा ६० हजार नख्त रुपये करण्यांत आला. [३]

बापूनें अंतर्वेद प्रांत जिंकिला व तेथें आपला अंमल बसविला आणि त्यांनंतर लाहोर प्रांतीं स्वारी केली. परंतु या सर्व व्यवहारांत उत्पन्न बिल्कूल झालें नाहीं. स्वारींत ऐवज न मिळतां उलटे ८० लाख रुपये कर्ज मात्र झालें. नानासाहेब पेशव्यांनीं याबद्दल विचारलें असतां ' रघुनाथराव धनी ते जे करतील ते प्रमाण. मी चाकर हुकुमाचा ताबेदार ' असें उत्तर देऊन बापूनें आपल्यावरील

१ पे. द. २. १७८; इ. स. १४८. २ पे. द. ४५. १०; एकूण नेमणूक रु. ६५६७९।।≈ शिवाय ४०० कापड आख. ३ पे. द. २. ८८; ९९; का. सं. १६२.

जबाबदारी टाळण्याचा प्रयत्न केला असा उल्लेख खरे यांच्या ऐतिहासिक लेखसंग्रहांत आढळतो.[१] त्यास इतरत्र कोठेंही दुजोरा मिळत नसला तरी तो विचारांत घेण्यासारखा आहे. कारण कर्ज झालें ही कांहीं खोटी गोष्ट नाहीं. मराठ्यांच्या मोहिमा या मुलुखगिरीच्या उद्देशानेंच होत असत. या दृष्टीनें या स्वारीकडे पाहातां कर्ज करून परत येणें हें चमत्कारिक दिसतें. आणि सदाशिवराव भाऊंनीं राघोबास मुलुखागिरीहून यावयाचें तें कर्ज करून यावें हा धंदा कोठला ? असा जो सवाल केला त्यांतलें इंगित हेंच दिसतें. अर्थात् आर्थिक दृष्ट्या हा व्यवहार आंतबट्ट्याचाच झाला व याची जबाबदारी सखारामबापू व राघोबा या दोघांवर सारखीच पडते. राजकीय दृष्ट्या विचार केला तर अबदालीचें लोक जरी काढून लाविले तरी नजीबासारखा शत्रू त्यांनीं तसाच राहूं दिला. म्हणजे फक्त फांद्या तोडल्या मूळ तसेंच शिल्लक ठेविलें. यामुळें या शत्रुपक्षीय मुळास आस्ते आस्ते अंकूर फुटत जाऊन थोड्या अवधींत त्याचा मोठा वृक्ष तयार झाला. पंजाब प्रांत जिंकल्यामुळें मराठ्यांची दिगंत किर्ति झाली खरी; परंतु त्याबरोबर फार मोठ्या प्रदेशाची जबाबदारी त्यांच्या शिरावर येऊन पडली. पेशव्यास या शिवाय दक्षिणेकडे मनसुबे होते त्या करतां बऱ्याच सैन्याची जरूर होतीच. तेव्हां मराठ्यांची शक्ति अशा प्रकारें दुभागली जाऊन शत्रूंची संख्या मात्र वाढत चालली. रजपूत, जाट, रोहिले यांच्या मुलुखावर खंडण्या बसविल्यामुळें ते तर मराठ्यांचे शत्रु होतेच. त्यांत मुसलमान विरुद्ध हिंदू अशा लढ्याचें स्वरुप या प्रश्नांस आल्यामुळें मराठ्यांच्या विरुद्ध बाजूचा संघ फारच बळावला. रजपुतांस मराठ्यांनीं दुखवल्यामुळें त्यांनीं तटस्थपणाचें धोरण स्वीकारलें. आणि या सर्व

१ खरे १. ७७.

राजकारणाचीं सूत्रें जेथून हालवयाचीं तें पुणें शहर फारच दूर अंतरावर. उत्तरेंतील राजकारणाचे प्रमुख आधारस्तंभ शिंदे होळकर त्यांच्यांत वैमनस्य. शिवाय पेशव्यांचा त्यांच्यामध्यें फूट कशी पडेल हा प्रयत्न. अशा प्रकारें दुही माजवून फायदाच होतो असें मात्र नाहीं. पुष्कळ वेळेस डाव अंगावर येतो. त्याप्रमाणेंच गोष्टी घडून आल्या. परस्परांत वैमनस्यें वाढवून त्यांच्यावर आपली सत्ता दृढमूल करण्याचें पेशव्यांचें जें धोरण होतें त्यास पानपतावर जोराची थप्पड बसून पेशव्यांचे फार मोठें नुकसान झालें. याशिवाय अंताजी माणकेश्वर, गोविंदपंत, विठ्ठल शिवदेव, हिंगणे वगैरे जहागीरदार, सरदार वसुलीचा पैका नाना सबबीवर दडपून ठेवीत ही गोष्ट निराळीच. स्वारीचा कारभारी असतांना बापूनें वसुलीच्या कामांत फारच ढिलाई दाखविल्यामुळें एकंदर कारभार विस्कळित झाला. पुढें या कामीं सदाशिवराव भाऊस पानिपताकडे जातांना विशेष मन घालून फार कडक उपाय योजिणें भाग पडले.

या सर्व गोष्टींचा विचार करतांना सखाराम बापूनें पंजाब प्रांत अबदालीपासून घेण्यांत फार धिसाडघाई केली व पानिपतचें संकट लवकर ओढवून घेतलें असें सकृद्दर्शनी वाटतें. सुप्रसिद्ध इतिहासाचार्य राजवाडे यांनीं पानिपतच्या संकटपरंपरेचें खापर सखाराम बापूच्या माथीं फोडलें आहे. ते लिहितात. " सखारामाचीं कारस्थानें भूल पाडणारीं असत........बाळाजी बाजीराव याचा त्यावर पूर्ण विश्वास होता तो किती अस्थानीं होता हें गोविंदपंत, गणेश संभाजी, मल्हारराव, नारोशंकर वगैरेंना त्यानें फितूर करून ऐनवेळीं

( भाऊसाहेबास ) पानपतास दगा दिला हें नंतर कळून आलें.[१] परंतु गणेश संभाजी, गोविंदपंत वगैरे सरदार फितूर होऊन त्यांनीं पानपतावर कुचराई केली कीं त्यांच्यावर सोपविलेली कामगिरी त्यांच्या आंवाक्याबाहेरची होती याचा चांगलासा निर्णय अजून इतिहासज्ञांना देतां येत नाहीं. ज्याप्रमाणें गेल्या महायुद्धांत गॅलिपोलीजवळ हजारों शिपाई इंग्रजांनीं इरेस घातले त्याप्रमाणें भाऊसाहेबांस या सरदारांना केवळ बळीं द्यावयाचें होतें कीं काय ? आणि ती वेळ बरोबर साधली नाहीं ह्मणून कुचराईचा, फितुरीचा आरोप त्याजवरती करणें हें कितपत योग्य ठरेल ? या प्रश्नासंबंधीं सांगोपांग विचार अजून व्हावयास पाहिजे. शिवाय बापूनें हे सर्व सरदार फितविले होते, याबद्दल भरपूर पुरावा रा० राजवाड्यांनीं कोठें दिलेला आहे? हुशार मनुष्य इतरांना आपल्या लगामीं लावून ठेवण्याचा प्रयत्न करील हें खरें धरलें व बापूनें उत्तरेकडील अधिकाऱ्यांना आपल्या मुठींत ठेवण्याचा प्रयत्न केला ही टीकाकाराची भूमिका कबूल केली तरीसुद्धां सखारामबापू सदाशिवरावभाऊस पानपतावर दगा द्यावा असें अंताजी माणकेश्वर, नारोशंकर इत्यादि मंडळीस सांगेल हें म्हणणें पटत नाहीं. कारण सदाशिवरावभाऊ व सखारामबापू यांचे संबंध फारच सलोख्याचे होते. सदाशिवरावभाऊ वेळोवेळीं सखाराम बापूबद्दल विचारपूस करतांना आढळतो.[२] भाऊंनीं पानपतावर निघण्यापूर्वीं सखारामबापूस कारभारी द्यावा म्हणून नानासाहेब पेशव्याजवळ मागणी केली होती. कारण धूर्तता, लेखनचातुर्य, मुत्सद्देगिरी, एकंदर परिस्थिती ओळखून बिनचूक अनुमान

१ रा. प्र. १००; खरे १०२ " उत्तरप्रांत लयास जावयास कारण सखारामच." २ पु.द. १.१३३.

काढण्याची सखारामबापूची हातोटी वगैरेंबद्दल भाऊसाहेबांची खात्री पटली होती. परंतु राघोबानेंच सखारामबापूस राहवून घेतलें त्यामुळें बळवंतराव मेहेंदळे व नाना फडणीस यांस भाऊसाहेबानें आपल्या बरोबर नेलें, ही गोष्ट वेगळी.सारांश राजवड्यांची टीका हल्लीच्या नवीन माहितीच्या दृष्टीनें एकांगी वाटतें.

याखेरीज रा. राजवाडे यांनीं बापू अंताजी माणकेश्वराची नेहमींच तरफदारी करतो असा त्याजवर दुसरा आरोप केला आहे. हिंगणे माणकेश्वर वादांत बापूनें माणकेश्वराची बाजू घेतली; कारण हिंगण्यांच्या संपत्तीची बापूस अभिलाषा होती असें सांगण्यांत येते. अंताजीपंत व बापू हे व्याहीः तेव्हां आपल्या नातेवाईकाची बाजू शक्य तोंवर संभाळून धरणाचा बापूनें प्रयत्न केला असल्यास तें मनुष्यस्वभावास धरूनच आहे. परंतु या गोष्टीमुळें राजकारणाचा विचका झाला किंवा काय हेंच फक्त पहाणें आहे. आणि तशा तऱ्हेचा परिणाम झाल्याचें कांहीं आढळून येत नाहीं. एकंदरीनें पाहतां उत्तरेच्या राजकारणांत बापूची मुत्सद्देगिरी, कर्तृत्व वगैरे गुण चांगलें दिसून आले. "बापु तुम्हीं यशस्वी", "आपणही मातबर आपलें कामही मातबर, " वगैरे गौरवपर उल्लेख तत्कालीन कागदपत्रांतून बापूंसंबधीं ठिकठिकाणीं आढळतात. [१] यावरून बापूनें सर्वस्वी कार्यनाश केला हें रा. राजवाड्यांचें म्हणणें खरें वाटत नाहीं. पानपतच्या पराभवाबद्दल दोषच द्यावयाचा असल्यास त्याचा वाटा सर्वांना थोडा थोडा दिला पाहिजे.

उदगीरच्या लढाईत बापू व त्याचें पथक हजर होतें; परंतु त्या लढाईत त्यानें विशेष भाग घेतल्याचें दिसत नाहीं. ह्या लढाईनंतर

१ पे. द. २, २१. २७ हें भाग पहा.

भाऊसाहेब पानपतावर गेले. बापू त्यावेळीं दक्षिणेंत असल्यामुळें पानपतसंबंधी हकिकत येथें विस्तारानें देण्याची जरुरी नाहीं. अबदालीशी गांठ घालण्यास जात असतां भाऊसाहेबानीं महालो-महालींचा वसूल कमावीसदारापासून कडक रीतीनें अंमलबजावणी करून घ्यावयास सुरवात केली तेव्हां बापूनें नानासाहेबांस " अशा रीतीनें भाऊसाहेब वागतील तर ते स्वतंत्र होतील. तेव्हां निमे ऐवज इकडे मागावा, " असा कानमंत्र दिल्याचा उल्लेख पटवर्धनी दप्तरांत आढळतो. उत्तरादाखल भाऊसाहेबांनीं त्यावेळीं पेशव्यांस पत्र लिहिलें कीं, लढाईचा प्रसंग समीप झाल्यास माणसास राजी ठेविलें पाहिजे. कमावीसदार पैसे देत नाहींत. ते पाहातात कीं मसलत शेवटास झाल्यास पैसा द्यावा. अशा समईं निमे रसद इकडे देणे व निमे तिकडे देणें असें कळवल्यास कोणासही पैका देणार नाहींत. "[1] तेव्हां पेशव्यांनीं आपला आग्रह सोडला. पेशव्यास असा सल्ला देण्यांत बापूचा धोरणी स्वभावच व्यक्त होतो, असें आम्हांस वाटतें. इंग्रजींत अशी म्हण आहे कीं शहाण्यानें सर्व गोष्टींचा प्रथम संशय घ्यावा. A wise man should doubt every thing. त्यांतून चांगली गोष्ट निष्पन्न झाली तर विश्वास ठेवावा. सदाशिवराव भाऊ कदाचित् स्वतंत्र होतील अशी पेशव्यांचे मनांत शंका उद्भवणें स्वाभाविक होतें. याच दृष्टीनें बापूची शंका अगदीच अस्थानीं नव्हती. त्यांतून नानासाहेब हे सूत्रचालक तेव्हां ' मुख्य सूत्र हातीं घ्यावे, करणे ते लोकाकरवी करवावे ' अशा रोखानें ते वागले. सारांश नानासाहेब पेशव्यांनीं सावधगिरी बाळगली ती राज्याच्या हितार्थच होती; बापूस त्यांनीं सल्ला विचारतां तसा

१ पे. द. २७, २५५.

त्यानें दिला असेल तर नानासाहेबांच्या हिताच्या दृष्टीनेंच दिला असावा मग बापूवर कुत्सितपणाचा आरोप कां ? असो.

भाऊंच्या स्वारीचा शेवट म्हणजे पानपत येथें मराठी सैन्याचा पराभव झाल्यानें रणभूमीवरून पळापळ व मोठी कत्तल.[1] हा पळ म्हणजे सुप्रसिद्ध नेपोलियनचा रशियांतील पळाप्रमाणें होय. पानपतच्या पराभवानें नानासाहेब पेशव्यास धक्का बसून "भाऊवांचून दुनिया व्यर्थ आहे" असें म्हणत म्हणत त्यांचें पर्वतीवर प्राणोत्क्रमण झालें. नानासाहेब पेशव्यांच्या मृत्यूबरोबर सखारामबापूच्या आयुष्यांतील एक हप्ता समाप्त झाला आणि येथून निराळ्या आयुष्यक्रमांत—वातावरणांत बापूला दिवस काढावे लागले. येथपर्यंतचें त्याचें आयुष्य केवळ मोहिमा करण्यांत गेलें व त्यांत त्यानें चांगली कीर्ति संपादन केली.

## प्रकरण चवथें.

# निजामाशीं युद्ध.

श्रीमंत नानासाहेब पेशवे यांनी मृत्युसमयीं राघोबा, सखारामबापू, नीळकंठ महादेव यांस जवळ बोलाविलें व आपला पुत्र माधव-

१ प्रो. रॉलिन्सननीं आपल्या 'पानिपत' या पुस्तकांत भाऊसाहेबांने गनिमी काव्याच्या पद्धतीचा अवलंब न करतां समोरासमोर लढाई उत्तम तोफखाना असल्यामुळें दिली ही गोष्ट बरोबर केली असें मत दिलें आहे. आधुनिक युद्ध शास्त्राच्या दृष्टीनें तोफखाना भाऊसाहेबांनीं डाव्या बाजूस ठेवला ही घोडचूक आहे. तो आघाडीसच असावयास पाहिजे होता अडचणींत असतां प्रबळ शीखांची मदत भाऊसाहेबांनीं कां घेण्याचा प्रयत्न केला नाहीं? कां तेही मराठ्यांना रजपुताप्रमाणें शत्रु समजत होते ?

राव त्यांचे हवालीं करून एकमेकांचे हातांत हात घालून राज्य राखा, म्हणून सांगितलें. राघोबास पालनकर्ता म्हणून नेमून सखारामबापूनें कारभार करावा अशी व्यवस्था मुक्रर झाली. यानंतर थोड्याच दिवसांनीं नानासाहेबांचें देहावसान झालें.

नानासाहेबांची उत्तरक्रिया आटोपल्यावर राघोबा, सखारामबापू आबा पुरंदरे वगैरे मंडळी माधवरावासह २० जुलै १७६१ रोजीं साताऱ्यास आली. तेथें माधवरावाचे नांवानें पेशवाईचीं वस्त्रें घेतलीं. राघोबास पालक नेमण्यांत येऊन सखारामबापूस कारभारी पदाचीं व आबा पुरंदरे यांस दिवाणपदाचीं वस्त्रें देण्यांत आलीं. हा समारंभ आटोपल्यानंतर सर्व मंडळी पुण्यास परतली.

कारभारी पदाचा मान मिळाल्यानंतर बापूस निजामाशीं तोंड देण्याचें पहिलें काम करावें लागलें. निजामास उदगीर येथें भाऊसाहेबांनीं हतबल केल्यामुळें पानपतावर मराठ्यांचा काय सोक्षमोक्ष होतो आणि उदगीरच्या लढाईत गेलेला मुलूख आपण केव्हां मिळवितो याची डोळ्यांत तेल घालून तो वाट पहात बसला होता.[१] पानपतावर अडचणींत सांपडल्याचीं भाऊसाहेबांची पत्रें आल्यावरून नानासाहेब पेशवे भाऊस मदत करण्यासाठीं पुण्याहून निघाले. त्यावेळीं २५ हजार फौज देऊन सखाराम बापू व राघोबा यास निजामास मदतीसाठीं बोलावण्याकरतां म्हणून पाठविलें. त्यांत अंतस्थ हेतू असा होता कीं निजामानें पेशव्याविरुद्ध कांहीं हालचाल करूं नये. वस्तुतः निजामाचे मुराररराव घोरपडे व उदाजी चव्हाण यांचेकडे सूत्र होतेच. आणि या सर्वांना करवीरकर छत्रपती, जंजिऱ्याचे आंगरे व हैदर

१ पु. द. १. पृ. ३००–३०१ "जर अबदालची बाजी शेर झाली तरी खामखा दक्षणेंत अंमल बसवावा."

हे मदत करण्यास एका पायावर तयार होते. राघोबा लिहितो, " येकाची वाट येक पाहतात. जर आम्ही हिंदुस्थानांत स्वामीबरोबर येतो तरी मागें निजामअल्ली वगैरे सारे मोंगल हगामा करावयास न चुकते. जबरदस्तीमुळें सारे नमतात. सारांश कोणासही स्वामीचें सुख पहावत नाहीं. "[१]

पानपतास मराठ्यांचा पराभव झाल्यानंतर व राघोबा, सखारामबापू मेदकावरील स्वारीहून पुण्यास आल्यावर निजामानें या संधीचा फायदा घेऊन लाला ब्रिजदास याच्या हाताखालीं मोठें सैन्य पेशव्यांचा मुलुख लुटण्यास पाठविलें. त्यानें आळंद, गुंजोटी वगैरे ठिकाणें काबीज करून बोरगांवापासून ४० हजार रुपये घेतले. निजामही फौजेंत येऊन सामील झाला. नंतर त्यांनीं अक्कलकोटच्या शहाजी भोसल्यांचा पाडाव केला व पुण्याचें रोखें चाल केली. वाटेंत टोकें, प्रवरासंगम, कायगांव वगैरे पवित्र क्षेत्रांत लुटालूट केली. बापू व राघोबा यांनीं गोपाळराव पटवर्धनास निजामावर पाठविले व आपणही मागाहून निघाले. गोपाळरावानें निजामाचा भाऊ मीर मोंगल यास फोडिले. इतक्यांत बापू व राघोबा यांनीं गोपाळरावाच्या फौजेस मिळून निजामास श्रीगोंदें येथें चोहोबाजूनीं कोंडिलें तेव्हां त्यास तह करणें भाग पडलें. ( जानेवारी १७६२ )

पेशवे व निजाम यांचे मध्यें श्रीगोंदे मुक्कामीं तह झाला त्यांत बापूनें २७ लक्षांचा मुलूख निजामास देऊन त्याच्याशीं स्नेह जोडला अशी माहिती ग्रँट डफ देतो.[२] तहांतील कलमासंबधानें बापू व राघोबा यांजविरुद्ध जोराची टीका करण्यांत येते. माधवराव हा स्वतंत्र बुद्धीचा असल्यामुळें पुढें मागें आपणांस त्रास

१ पु. द. १. (ले ३९८) २ डफ १. ५३६.

भोगावा लागेल, तेव्हां निजामाचें एक बुजगावणें आपल्या लगामी असाव एवढ्यासाठीं त्यास मुलूख देऊन अंतस्थरीतीनें राघोबा व माधवराव यांच्यांत कांहीं तंटा उपस्थित झाल्यास निजामानें राघोबास मदत करावी अशा अर्थाचें वचन बापूनें निजामाकडून घेतलें, अशा तऱ्हेचा आरोप खऱ्यांनीं बापूवर केलेला आहे.[१] म्हणजे बापूनें राज्यांत बेकीचें किंवा बखेड्याचें मूळ पेरलें असा त्यांच्या म्हणण्याचा इत्यर्थ आहे. चंद्रचूड दप्तराच्या प्रस्तावनेंत रा. आपटे म्हणतात कीं "सखारामबापू व राघोबा यांनीं बेकीचा प्रश्न उपस्थित केला असून निजामास २७ लक्षांचा मुलूख देऊन गुप्त तह केला असण्याचा संभव आहे."[२] म्हणजे बेकी करावयाची हें अगोदरच ठरवून बापूनें त्याप्रमाणें पुढील योजनेची तरतूदही करून ठेवली असा रा. आपटे यांच्या म्हणण्याचा रोख आहे. बापूनें खरोखरच कांहीं मुलूख निजामाच्या हवालीं केला असल्यास त्याबद्दल सर्वांची एकवाक्यता असावयास पाहिजे. परंतु खुद्द तहासंबंधीं पहातां निरनिराळे उल्लेख आढळतात. नारो शंकर एका पत्रांत असें लिहितो कीं तहामध्यें एकमेकानीं एकमेकांचा जिंकलेला मुलूख परत द्यावा. जादा कोणी कोणास कांहीं देऊं नये.[३] 'जाधवरावाची ४० लाखांची जहागीर निजामानें पेशव्यास देऊन त्यांच्याशीं तडजोड केली' असें माधवराव एका पत्रांत म्हणतो.[४] "कासी-रामेश्वर समुद्रतीर स्वामिचें नांव....भाऊसाहेब नानासाहेब यांचे मागें चांगला बंदोबस्त केला म्हणून कीर्ति होईल. अल्पस्वल्प मुलूख निजामासी देऊन सलूख केलिया बदनक्षी" असा उल्लेख

१ ऐ. ले. सं. पृ. ७०. २ चं. द. प्र. ७. ३ भारतवर्ष.
४ रा. १०.२; चं. द. ले १३९.

पेशवे दप्तरांत या तहासंबंधीं केलेला आढळतो.[१] यावरून ग्रँड डफ [illegible] सेयूर-अल-मुताखरीनचा कर्ता गुलाम मोहिद्दीन यांच्या म्हणण्यावर [२] फारसा विश्वास ठेवतां येणार नाहीं. पटवर्धनांचे व सखारामबापूचें हाडवैर असल्यामुळें त्यांच्या पत्रांतून बापूसंबंधीं विकृत बाजूच आढळणें स्वाभाविक आहे. तेव्हां त्याशिवाय बाकीचा जो पुरावा पुढें आलेला आहे त्यावरून नक्की अनुमान कांहींच काढतां येत नाहीं. रा० आपटे यांच्या म्हणण्याप्रमाणें जर असा गुप्त तह झाला असला तर पुढेंमागें बापूच्या समकालीन मुत्सद्यांनीं त्याविरुद्ध जोराचें काहूर माजवावयास पाहिजे होतें, निदान तसा उल्लेख तरी सांपडावयास हवा होता. कारण केव्हांतरी ही गुप्त गोष्ट बाहेर फुटली असली पाहिजे. तसा उल्लेख ज्याअर्थीं मिळत नाहीं त्याअर्थीं रा. आपटे यांचा कयास केवळ कल्पनासृष्टींतच असल्यामुळें निराधार ठरवावा लागतो.

शिवाय ज्या सखारामबापूनें उत्तर व दक्षिण हिंदुस्थानांत एवढा नांवलौकिक मिळविला तो निजामास आपल्या काबूंत आणल्यानंतर त्यास सोडून देऊन उलट पेशव्याकडून मुलूख देववील हें संभवनीय वाटत नाहीं. बापूनें निजामास अनुकूल असा तह केला हें क्षणभर जरी गृहीत धरलें, तर कोणत्या परिस्थितींत तो केला असला पाहिजे हें पहाणें जरूर आहे. पटवर्धनी दप्तरांत बापूसंबंधानें केलेला उल्लेख पूर्वग्रहदूषित म्हणून सोडून देऊं. राज्याची परिस्थिति पाहतां हैदरअल्लीनें कर्नाटकांत उठावा केला होता. पानपतावर मराठ्यांची

---

१ पे. द. ३८. २८.

२ Seiur Mutagherin Vol. III p. 398.

शक्ति क्षीण झालेली होती. खर्चाची फार ओढ होती. हीच स्थिति रघुनाथरावानें नानापुरंदऱ्यास शके १६८३ शु.४ च्या पत्रांत वर्णन केली आहे, "या दिवसांत खर्चाची बहुत वोढ झाली. घरचे सोनें रुपें मोडून नाणें करून खर्च केले. कर्जवाम मेलवून आज पावेतों बेगमी झाली .... तरी कोठे हस्ते परहस्ते कर्ज मेलवून पाठवावे त्याची सोय न पडे तरी तुमचे खासगत वरचे सोने रुपीयाचे दागिने जे असतील त्यांतून....वीसपंचवीस हजार भरती करून पाठवावें."[1] तेव्हां अशा स्थितींत निजाम व हैदर या दोघांशीं एकदम झुंजण्याइतकी ताकद पेशवाईत नव्हती. हैदराचा पुंडावा जास्त वाढल्यास त्याचें पारिपत्य करण्यासाठीं निजामानें पेशव्यास मदत करावी व त्याकरतां २७ लक्षांचा मुलूख पेशव्यानें निजामास द्यावा असा तह ठरला असेल. अशाच प्रकारचा बापूचा मनसबा असल्याचें नाना पुरंदरे एका पत्रांत लिहितो.[2] पानपतमध्यें झालेले नुकसान भरून काढण्यास मराठ्यांस शांततेची जरूर होती; त्यामुळें बापूनें मुलूख देऊन तह केला असल्यास संरक्षक धोरणाच्या दृष्टीनें तें त्यानें योग्यच केलें असें म्हणावें लागतं. सारांश निजामाशी तह करण्यांत बापूचा कपट भाव होता हा आक्षेप फोल ठरतो.

माधवरावास पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं त्यावेळीं तो अवघा १७ वर्षांचा होता; राज्यकारभाराचा अनुभव, माणसांची परीक्षा, मुत्सद्देगिरी वगैरेचें शिक्षण अजून त्यास मिळावयाचें होतें. राजा अल्पवयी असला कीं दरबारी लोकांस कारस्थान करण्यास चांगलीच संधि मिळते या नेपोलियनच्या उक्तीप्रमाणें पुणें दरबारामध्यें कारस्थानाचें भूत पिंगा घालूं लागलें. माधवरावाची आई गोपिकाबाई

१ पु. द. ३. २ पु. द. ३.

ही राघोबाचा द्वेष करीत असें तेव्हां राघोबासही आपल्या हातीं राज्याचा हिस्सा असावा असें वाटूं लागलें. याचा परिणाम दरबारांत पक्षोपपक्ष पडण्यांत झाला. प्रमुख सरदार व मुत्सद्दी यांच्या मनांत संशयपिशाच्च थैमान घालूं लागले. बापूजी नाईक बारामतीकरानें सखारामबापू व राघोबा कारभारांत असतील तर आपण चाकरी करीत नाहीं असें जाहीर केलें.[१] गोपाळराव पटवर्धनानें सरकार चाकरीकरतां जी फौज ठेविली तिचें देणें चुकते करण्याबद्दल बापूकडे तगादा लाविला. माधवरावानें गोपिकाबाईच्या सांगण्यावरून श्रीगोंद्याचा तह नापसंत असल्याचें व आपण लवकरच राज्यकारभार हातांत घेणार असल्याचें जाहीर केलें. माधवरावाची राज्यकारभारासंबंधाची मागणी रास्तच होती; ती राघोबास नाकबूल करून चालण्यासारखें नव्हतें. परंतु आपल्या हातांतून कारभार जाऊन आपणांस निर्माल्यवत् रहावें लागणार ही गोष्ट बापू व राघोबा यास कशी रुचावी ? आपण कारभार सोडल्यास माधवरावास ती गोष्ट जड जाईल असें समजून बापूनें कारभारी पदाचा राजीनामा दिला. परंतु बापूची ती समजूत चुकीची ठरली; कदाचित् आपल्या विरुद्ध पुष्कळ लोक आहेत हें पाहूनही बापूनें राजीनामा दिला असल्याचा संभव आहे.[२] माधवरावानें बापूस राजीनामा न देण्याबद्दल पुष्कळ सांगून पाहिलें. आपण वयांत येई तों पर्यंत निदान दोन तीन वर्षें पर्यंत कारभार करावा अशी मनीषा प्रगट केली. परंतु बापूनें ही गोष्ट कबूल केली नाहीं. " सखारामबापू म्हणजे आवडती बटीक राख. तिला धन्याचा संसार नीट करावा, सोयरीक आप्त याजवर कृपा करावी हें अगत्य नाहीं. तिला फक्त सुख मिळालें कीं काम

१ खरे १. ५३. २ पे. द. १९.७.

भागलें. "[1] ही त्रिंबकरावमामाची बापूबद्दल वात्रटपणाची टीका व गोविंदहरीचें "बापू दोन्ही धन्यास बुडवील" हें विधान हीं केवळ आकसानें द्वेषबुद्धीनें केलेलीं असल्यामुळें अतएव त्याज्य आहेत.

वस्तुतः गोपिकाबाईच्या मनांत त्रिंबकरावमामा व बाबूराव फडणीस यांच्या हातीं राज्यकारभार असावा असें होतें. त्याकरतां बापूचा कारभार नीट चालत नाहीं म्हणून त्यास कामावरून दूर करण्यांत आलें आहे असें सर्वांस समजाविण्याचा गोपिकाबाईनें प्रयत्न चालविला. बापू घरीं बसल्यावर राघोबा कारभारांत उदासीन राहूं लागला. तरी त्रिंबकराव व बाबूराव यांनीं उत्साहानें कारभार करण्यास कंबर कसली. 'दोघे कारभारी त्रिंबकराव व बाबूराव हे उद्योगी, हुषार परंतु भरवशाचे नव्हत' असें राघोबाचें त्यांच्याबद्दल मत होतें. राघोबाच्या मदतीशिवाय आपणास कारभार करतां येत नाहीं असें दोघांस कांहीं दिवसांनीं दिसून आलें. तेव्हां त्यांनीं राघोबास उदासीन वृत्ति टाकून देऊन अंगमेहेनतीनें कारभार करावा म्हणून विनविलें. माधवरावानेंही चुलत्याचीं आर्जवें केल्यानंतर राघोबानें कारभार नीट करण्याचें कबूल केलें. परंतु सखारामबापू व आबा पुरंदरे यांच्या सरंजामांत जहागिरींत कोणत्याही तऱ्हेची ढवळाढवळ करूं नये चालवावे' ही अट पेशव्यापासून राघोबानें कबूल करून घेतली.[2]

चारपांच महिने कारभार सुरळीत चालल्यानंतर पुनः बखेडा उपस्थित झाला. नारायणरावाच्या मुंजीकरतां बापू, विठ्ठल शिवदेव, गंगोबा तात्या, पुरंदरे वगैरे 'सासवडकर पंचायतन' पुण्यास जमले त्याच वेळीं १० लक्षांची जहागीर व ५ किल्ले यांची मागणी करण्याबद्दल राघोबाच्या मनांत त्यांनीं भरवून दिलें.[3] माधवराव,

१ खरे ७७. २ इच. ले. ६६. ३ इच. ले. ६६.

गोपिकाबाई, त्रिंबकराव यांनीं राज्य आपलेंच आहे त्यांत वाटणी कसली करावयाची वगैरे सांगून राघोबास या मार्गापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. यामुळें घरफूट होतें असें त्रिंबकरावानें म्हणतांच ' काय करूं चौघे कुतर्क सांगून निघावे म्हणतात "[1] असें राघोबानें उत्तर दिलें. यावरून राघोबास बाहेर काढण्याचा बापूचा उद्देश होता हें स्पष्ट दिसतें. राघोबा धार्मिक कृत्यें करण्याच्या उद्देशानें बाहेर पडले ते वडगांवास गेले. आतां गोपिकाबाईस सखारामबापूची आठवण झाली. त्यास बोलावून आणून दादास बोध करण्यासाठीं पाठविलें. अर्थात् बापू ही गोष्ट मनापासून करणें शक्य नव्हतें. ' बापू केवळ कृत्रिमें करून रघुनाथरावाची समजावणी करण्याचा प्रयत्न करतो' असा गोविंद हरीचा त्याजवरती जो आक्षेप आहे तो खरा दिसतो. परंतु बापूनें बेकी उत्पन्न केली असा त्याजवर आरोप करणारांनीं नानासाहेब पेशव्यानें सखारामबापूस व राघोबास माधवरावाची काळजी घ्या व राज्य राखा म्हणून सांगितले असतां गोपिकाबाईनें पटवर्धनांच्या नादास लागून सखारामबापूस कारभारावरून काढणें बरोबर नव्हतें, ही गोष्ट लक्षांत घ्यावयास पाहिजे. बापू अधिकारभ्रष्ट झाल्यानंतर त्यानें स्वस्थ बसावें अशी इतरांनीं कां अपेक्षा करावी ? आणि बुद्धिमत्तेच्या जोरावर त्यानें कारस्थान घडवून आणिलें तर त्यास नांवें कां ठेवावीं ?

गोविंद हरी व गोपाळराव पटवर्धन यावेळीं बापूवर फारच चिडलेले होते असें त्यांच्या पत्रांवरून दिसतें. बापूस या पूर्वीच अटकेंत ठेवावयास पाहिजे होते म्हणजे राघोबाचा पक्ष कमजोर झाला असतां

१ इच. ले. ६६.

व इतके खेळ झाले नसते असा त्यांच्या म्हणण्याचा इत्यर्थ आहे. गोपाळराव आपल्या वडिलांस लिहितो, "सखारामाचे मतें कोकणस्थ ज्ञाति लयास न्यावी. शकुनि आहे, मल्हाररावास त्यानें आपलासा केला. त्यास ठिकाणीं ठेवण्याची बुद्धी कोणास झाली नाहीं. रात्रीच्या शेदोनशे माणसांनीं उचलून किल्ल्यावर नेऊन घालावा. एखाद्या राजकारणास म्हणून बाहेर काढून कोस दोन कोस नेऊन तेथून उडवावा. माधवरावानें उगाच त्याची गय केली"[१]. यावरून या दोघा पितापुत्रांचें बापूबद्दलचें मत कशा प्रकारचें होतें हें कळण्यासारखें आहे. एकदां एक मनुष्य वाईट ठरला म्हणजे त्याच्या चांगल्या गोष्टीचेंही विकृत स्वरूप इतरांना दिसावयास लागतें. हा मनुष्य स्वभाव आहे. बापूच्या कोणत्याही कृत्याबद्दल पटवर्धनाचें केव्हांच चांगलें मत दिसून येत नाहीं. गोविंद हरीच्या पत्रांतून बापूला—त्या सकारनामक सोद्याला—'पाजी,' 'खाटीक,' 'चांडाल,' 'शकुनि,' 'दुष्ट,' 'नीच,' 'कळलाव्या,' 'घरबुड्या,' 'कपि,' 'जांबुवंत' वगैरे शेलक्याशेलक्या शब्दांची लाखोली वाहिलेली आहे.

सखारामबापू हा शहाणा, महत्त्वाकांक्षी असल्याकारणानें त्यानें आपलें गेलेलें वर्चस्व परत मिळण्याचा प्रयत्न करावा यांत कांहींच वावगें नाहीं. कोणाही मनुष्याची अशा प्रकारची आयुष्यांत धडपड असते. यांत प्रत्येकजण आपआपल्या बुद्धीच्या मगदुराप्रमाणें निरनिराळ्या मार्गांचा अवलंब करूं शकतो. आपआपसांत भांडणें लावून नंतर दोन्ही पक्षांसही कानपिचक्या देऊन आपलें वर्चस्व स्थापणें हा एक मार्ग झाला. आपल्या बुद्धिमत्तेच्या किंवा लष्करी सामर्थ्याच्या जोरावर इतरांचा पाडाव करून आपण सत्ताधारी होणें हा दुसरा

१ खरे. ६५.

मार्ग; या प्रकारांपैकीं चाणक्य, नेपोलियन, हिटलर यांचीं उदाहरणें सर्वांच्या पुढें आहेतच. तिसरा मार्ग म्हणजे तिऱ्हाइतास मदतीस बोलावून त्याच्या सहाय्यानें वरचढ होणें आणि हीही गोष्ट शक्य नसेल तर अनुकूल परिस्थितीची वाट पाहून योग्य वेळीं सर्व सूत्रें हातांत घेणें हा शेवटचा मार्ग. सखारामबापूनें राघोबास हाताशीं धरून म्हणजे आपापसांत फूट पाडून व कांहीं कांहीं प्रसंगीं तिऱ्हाइतांची मदत घेऊन राजकारणाच्या आखाड्यांत आपलें प्रभुत्व स्थापण्याचा प्रयत्न केला ही गोष्ट खरी मानिली तर त्यास असें करण्यास भाग पाडणाराकडे दोष येतो. माधवरावासारख्या शहाण्या मनुष्यानें हे ओळखून पुढें बापूच्या गुणांचा राज्ययंत्र सुव्यवस्थित, सुसंघटित करण्याकडे उपयोग करून घेतला. परंतु इतरांनीं मात्र त्यास विरोध करून त्याच्या कर्तृत्वाचा ओघ भलत्या कामीं वळवण्याचें श्रेय घेतलें. बापूनें आपापसांत फूट पाडण्याचे प्रयत्न केले नाहींत असें आमचें म्हणणें नाहीं. परंतु जर त्याच्या चतुराईच्या राजकारणाचे सर्वच डाव पेशव्यांच्या शत्रूचा निःपात करण्याकडे वळले असते तर त्याच्या नांवलौकिकास जोड नव्हती. परंतु दुर्दैव त्या पेशवाईचे! कीं अशा शहाण्या मनुष्याचें शहाणपण आपापसांतील द्वंद्वयुद्धांत खर्ची पडावे! असे विचार मनांत आल्याशिवाय रहात नाहींत. सारांश राज्ययंत्र चालवण्याच्या कामीं योजक स्तत्र दुर्लभः हेंच खरें दिसून येते.

राघोबा वडगांवाहून आनंदवल्लीस गेला[१] व तेथून औरंगाबाद शहरीं निजामाचा सरदार व तो एकत्र मिळून पुढील मसलती घाटूं लागल्या. [२] सखारामबापूनें विठ्ठल शिवदेव विंचूरकरास फौज उभी

१ ग्रँटडफ 'गंगेच्या कांठचे गुलशनाबाद 'असें नांव देतो. पृ. २०९.
२ पे. द. १९. १३.

करण्यास अगोदरच सांगितलें होतें. राघोबानेंही हळूहळू सैन्य जमा करण्यास सुरवात केली. नारो शंकर, विंचूरकर यांचीं पथकेंही त्यास येऊन मिळालीं. आबापुरंदरे व बापू यांच्या प्रयत्नामुळें मल्हारराव होळकरही त्यास सामील झाला. निजाम व भोंसले यांनींहि मदत देण्याचीं आश्वासनें दिलीं. माधवरावास रास्तेबंधु व पटवर्धन सरदार यांखेरीज कोणाचीहि मदत नव्हती. पटवर्धनांनीं युद्धाची कडेकोट तयारी चालविली; परंतु सखारामबापूनें त्यांच्या फौजेंत फितूर पेरून ठेविला होता. दोन्ही फौजांची गांठ घोडनदी-जवळ आलेगांव येथें पडून ७।११।१७६२ रोजीं लढाई झाली तींत माधवरावाचा पराभव होऊन तो राघोबास शरण गेला. लढाई होण्यापूर्वीं माधवरावानें सखारामबापूस आपणाकडे वळवून घेण्याचा यत्न केला. परंतु बापूनें मोठ्या गोड शब्दांनीं, धोरणी बोलांनीं ह्या सूचनेस नकार दर्शविला. त्यानें माधवरावास मोठें मुत्सद्दीपणाचें पत्र लिहिलें तें असें. "विनंती सेवक सखाराम भगवंत कृ. सा. न. वि. येथील वर्तमान छ १९ रबिलाखर पावेतों स्वामीचे कृपावलोकने करून येथास्थित आसे. विशेष स्वामीनीं कृपा-शब्द वाचिता भक्तीनें आनंदाश्रु आले. चित्तास अति आनंद जाहला तो कोठवरी ल्याहावा ? स्वामीचें कल्याण असावें त्यांत आम्हास सर्व प्राप्त आहे. गड किल्ले द्रव्य सर्व स्वामीची कृपा आहे. त्यापेक्षां अधिकोत्तर वाटत नाहीं. **माझे मनांत स्वामींनीं व याणीं एकविचार असावें.** सर्वांचे संगोपन करावे हेच चित्तांत आहे. लघु मनुष्यें नानाप्रकारचे पेच कारितात हें फार वाईट वाटते. सारांश स्वामी सर्वज्ञ आहेत बहुत दूरंदेशी जाणतात हे जाणणार जाणतात. निदर्शनास येते तेव्हां मूर्खास कळते. असो माझे स्वरूप राखणें व

अशक्तपणीं सांभाल करणे हे स्वामीस अगाध नाहीं. मोंगला-कडील राजकारणें बहुत सांभालून करावी. या दिवसांत हैदराचा शह आहे हे आपण जाणतच आहेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. उदासीनपणें न धरतां मनसब करणे म्हणोन आज्ञा केली येशास प्राण गेला तरी सेवाधर्माविसी उदासीन राहाणार नाही. अशक्त-पणें मात्र काय उणें पडेल ते पडो. ये विसींचे संशये किमपि नसावे हे विज्ञापना."[1] या ठिकाणीं बापू माधवरावास दादासाहेबांचे विचारे वागावे असें सुचवितो. गड किल्ले वगैरे माधवरावानें देऊं केलें तरी दादासाहेबांचा पक्ष सोडण्यास तो तयार नाहीं. परंतु माधव-रावानें अगदींच नाखूष होऊं नये म्हणून 'सेवाधर्माविषयीं उदासीन राहाणार नाहीं' असें शर्करावगुंठित वचन त्यास देतो ! मुत्सद्दी वरपांगी गोड गोड वचनें देतात ती अशी !

घोडनदीच्या लढाईमध्यें सखारामबापू हजर नव्हता. तो सासवडास कांहीं कामासाठीं गेला असावा. लढाई आटोपल्यानंतर पटवर्धन मिरजेकडे निघून गेले व माधवरावास मात्र 'स्त्रीबुद्धीनें काज सहसाही न पावे' हें चांगलें कळून आलें. माधवरावानें या प्रसंगीं चुलत्यास शरण जाऊन पडतें घेण्यांत फार शहाण-पणा व चातुर्य (a tactical surrender) दाखविलें. त्रिंबकराव मामा, पटवर्धन सरदार व सखारामबापू ही मंडळी इरेस पेटल्या-मुळें आपसांतील घरफुटीचा देखावा जगास दिसला. या भाऊबंद-कीच्या वादाचें मूळ कारण म्हणजे राघोबाची राज्याच्या वांटणीबद्दल मागणी हें होय असें सांगण्यांत येतें. इतिहासांत राज्याचें वाटप-मागितल्याचीं उदाहरणें हवीं तेवढी देतां येतील. परंतु अशा माग-

१ पा. सं. नं. ९० (अप्रकाशित)

ण्यांची वासलात कशी लावावयाची हीच शहाणपणाची गोष्ट ठरते. सामोपचारानें, हलक्या हातानें किंवा प्रसंगविशेषीं दंडनीतीनें सर्व मार्गावर येतात अशी इतिहासाची या बाबतींत शिकवण आहे. राघोबाची समजूत काढण्याचें काम माधवरावाच्या बाजूच्या लोकांस करतां आलें नाहीं. सखारामबापूसारख्या खंद्या मुत्सद्यास कारभारावरून दूर करण्यांत अदूरदर्शीपणा दिसून आला. या सर्व गोष्टीमुळें प्रकरण हातघाईवर आलें.

घोडनदीच्या लढाईनंतर स्वपक्षीयांना बक्षिसें वाटणें व शत्रुपक्षीयांचें पारिपत्य करणें या दोन गोष्टी करण्याचें राघोबानें ठरविलें. मदत केल्याबद्दल निजामाला ६० लक्षांचा मुलूख व अशीरगडचा किल्ला दिला.[१] अधिकाराच्या जागेवरून माधवरावाचीं माणसें काढून त्याठिकाणीं आपलीं माणसें नेमिलीं. सखारामबापूला मुख्य कारभारी नेमून त्यास सिंहगडचा किल्ला व ९ लक्षांचा सरंजाम दिला.[२] साताऱ्च्या छत्रपतीच्या पदरचीं फडणवीसीच्या दरकाची व्यवस्था पाहाण्याचा अधिकारही बापूस मिळाला.[३] बाबूरावास काढून चिंतो विठ्ठल यास पेशव्यांची फडणवीसी व लोहगडचा किल्ला दिला. पुरंदर नीलकंठ महादेवास, दौलताबाद मुरादखानास, अहमदनगर निंबाळकरास, पिराजी नाईकास नेवासें, याप्रमाणें स्वपक्षीयास राघोबाबांनीं बक्षिसें वाटलीं.[४] विठ्ठल शिवदेवास मागतील तितका मुलूख दिला.[५] बापूनें जाहीरनामा काढून राघोबाविरुद्ध ज्या

---

१ खरे ५१ लक्षांचा मुलूख दिला असें म्हणतात पृ. ९५.

२ पे. द. ४५. १० मध्यें गुजराथचे १ लक्षाचें उत्पन्न; शिवाय खानदेश व इतर गांवें मिळून ६ लक्षांचा सरंजाम होता असा उल्लेख आहे.

३ खरे १०३; १०४. ४ खरे १५७. ५ खरे पृ. ३००

सामान्य लोकांनीं लढाईत भाग घेतला त्यास माफी दिली. तरी ३ हजार शिपाई पाठवून त्रिंबकराव मामा व बाबूराव फडणीस यांना बारामतीहून पकडून आणण्याकरतां पाठविले. बाबूजी नाईकानें त्यांना स्वाधीन करण्याचें नाकारलें ही गोष्ट अलाहिदा. औंधच्या प्रतिनिधींची जहागीर जप्त करून ती राघोबाचा दत्तक मुलगा भास्कर-राव यास दिली व नारो शंकरास त्याचा मुतालीक नेमिले. सर्वांत प्रमुख जे पटवर्धन सरदार त्यांचा चांगलाच सूड घेण्याचें सखाराम-बापूनें ठरविलें. यावेळीं बापूनें पटवर्धनाशीं सलोख्याचें धोरण ठेविलें असतें तर पुढील कटकटी टळल्या असत्या.

ता. ६ डिसेंबर १७६२ रोजीं माधवराव, राघोबा यांनीं मिरजेस जाऊन तेथील किल्यास वेढा दिला. सखाराम बापूनें गोविंद हरीस पत्र पाठवून सरंजाम, किल्ले, वगैरे वस्तभाव राघोबाचे हवालीं करून त्यांच्या म्हणण्याप्रमाणें वागण्यास तयार व्हावें असें सुचविलें. पटवर्धनास आतां ईश्वराशिवाय आपला वाली कोणी नाहीं ही गोष्ट कळून चुकली. गोविंद हरीच्या मतें या सर्व परिस्थितीस कारण म्हणजे सखारामबापू. तो 'एक हस्तगत झाला की गुंज मोडली.' परंतु राघोबा त्याच्या पूर्णपणें स्वाधीन होते. रास्तेही त्यास अनुकूल झाले. यामुळें गोविंद हरी त्रासून लिहितो, "ज्याचें नांव सखाराम त्याचें काम क्षय करणें, परंतु 'सर्वांचा नाश केल्यावर तो तरी कसा जगेल. आतां ईश्वरेच्छाच तशी असेल. तर तैसें होईल.'"[1] तडजोडीचे प्रयत्न अयशस्वी ठरल्यानंतर किल्ला झुंजविल्या-शिवाय गत्यंतर नाहीं असें पाहून गोविंद हरीनें कंबर बांधली. त्याचा आत्मविश्वास जबर व ध्येयनिष्ठा अप्रतिम. आपली

१ खरे पृ. १०७, १९९.

बायकामुळें कर्नाटकांत बंकापूर येथें पाठवून त्यानें राघोबास व सखारामबापूस तितक्याच जोरदार भाषेंत उत्तर दिलें. चुलते-पुतण्यामध्यें सलोखा झाला असल्याकारणानें पटवर्धनासही सलो-ख्याच्या नात्यानें वागविणें जरूर आहे. सरकारी कामाकरतां फौज उभारली तिचा खर्च देण्यास जर कारभारी व श्रीमंत तयार असतील तर मिरजेचा किल्ला स्वाधीन करण्यास तयार आहों असें गोविंद हरीनें बापूस व राघोबास कळविलें. बापू व राघोबा यांनीं या सूचनांचा धिक्कार केला व गोविंद हरी नमतें घेत नाहीं असें पाहून वेढ्याचें काम जोरांत चालविलें. पटवर्धनास त्यावेळीं आसपास राघोबाचे भयानें कोणीही मदत करण्यास धजेना. गोपाळरावानें बाहेरून किल्ल्यांत मदत पाठविण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यांत त्याला यश आलें नाहीं. गोपाळरावाच्या सैन्यास जमखिंडीजवळ गांठून आबा पुरंदऱ्यानें त्याचा पूर्ण पराभव केला व त्याची फौज उधळून लाविली. तेव्हां गोपाळराव पळून निजामाकडे गेला. राघोबानें इकडे किल्ल्यावर तोफांचा भडिमार सुरू केला. तरी कांहीं महिने टिकाव धरून शेवटीं निरुपायानें व निराशेनें गोविंद हरीनें किल्ला नीलकंठ महादेवाच्या मार्फत राघोबाच्या हवालीं केला व तो मंगळवेढ्याकडे निघून गेला. बापूकडून नारो कोन्हेर यास मिरजेस किल्लेदार नेमण्यांत आलें.

इकडे निजामानें गोपाळरावाचें स्वागत करून त्यास मदत करण्याचें आश्वासन दिलें. प्रतिनिधी पदभ्रष्ट झाल्यामुळें त्यांचा मुतालीक गमाजी यमाजी हाहि निजामाकडे आला. निजामाचा दिवाण विठ्ठल सुंदर याचे व गमाजीचें कांहीं नातें होतें. विठ्ठल सुंदर हा अतिशय हुशार, शूर व महत्त्वाकांक्षी मनुष्य होता. पेशवाईंतील साडेतीन शहाण्यांमध्यें याचा तिसरा नंबर लागतो. ह्याचें मूळ गांव नगर

जिल्ह्यांतील संगमनेर. नानासाहेब पेशव्यांचे पदरी प्रथम हा नोकरीस होता. परंतु एके प्रसंगीं पेशव्यांनीं त्यास 'माध्यंदिना बुद्धिहीना' म्हणून हिणविले असतां अपमान सहन न होऊन बाणेदारपणानें नोकरी सोडून निजामाच्या दरबारीं रामदासपंत म्हणून सरदार होते त्यांच्या पदरीं कारकुनीची नोकरी यानें पत्करिली. सलाबतजंग हा निजाम असतांना त्याचा भाऊ निजामअली हा स्वस्थ चैनींत राहात होता. अशा प्रकारचे आयुष्य कंठण्यापेक्षां कांहींतरी कर्तबगारी करून दाखवावी असें विठ्ठल सुंदरानें एके दिवशीं निजामअलीस म्हटलें. त्यावर 'काय करूं' असें निजामअलीनें विचारतांच 'राज्य मिळवा' असें विठ्ठल सुंदरनें उत्तर दिलें. निजामअलीनें त्याजवर विश्वास टाकतांच विठ्ठलसुंदरनें कारस्थानें करून सलाबतजंगास बंदिवान् केलें व निजाम अलीस हैदराबादची गादी मिळवून दिली. अर्थात् निजाम अलीनें दिवाणगिरीचें पद विठ्ठल सुंदरास दिलें. आतां मराठ्यांकडील सरदार आपल्याकडे आलेले पाहून त्याचा हर्ष आतां गगनांत मावेना. पेशव्यांचा सूड घेऊन पेशवाईस मूठमाती देण्यास ही संधि चांगली आहे व याचा फायदा अवश्य घ्यावा असें त्यानें निजामाच्या मनांत भरवून दिलें. गमाजीनें निजामास साताराचा किल्ला, छत्रपती व २० लाख रुपये मिळवून देतो म्हणून आश्वासन दिलें. तव्हां विठ्ठल सुंदरनें पेशवाई घशांत घालण्यासाठीं एक प्रचंड कारस्थान उभारलें. गमाजी बावानें वऱ्हाडचे राजे जानोजी भोसले याजकडे त्याचा दिवाण दिवाकरपंत चोरघोडे यांच्यामार्फत संदर्भ लाविला.

दिवाकरपंत हाहि त्या वेळच्या साडेतीन शहाण्यांमध्यें दुसऱ्या स्थानीं गणला गेलेला आहे. त्याच्याप्रमाणें 'कारस्थानी कोठेंही पाहा-

ण्यांत न आला' असें त्यासंबंधीं उल्लेख आढळतात. प्रारंभीं हा भोसल्यांचे कारभारी कोनेरराम कोल्हटकर यांच्या पदरीं शागीर्द (पाणक्या) होता. परंतु बुद्धिमत्तेमुळें हळूहळू त्याचा उदय झाला. कोल्हटकराच्या मार्फतच भोसल्यांच्या दरबारांत याचा प्रवेश होऊन रघूजी भोसल्यांच्या मृत्यूनंतर त्याच्या मुलांत गादीसंबंधीं तंटे लागले असतां जानोजीस हाताशीं धरून त्यास सेनासाहेब सुभ्याचें पद यानें मिळवून दिलें. अशा स्थितींतही जानोजी व मुधोजी यांमधील कलहाग्नि तसाच जळत ठेवून आपल्याशिवाय पानही हालूं नये अशी याची राजकारणें चालू होतीं. 'दौलतींत अपायकर्ते माणूस देवाजीपंत' अशी रघूजी करांड्याची खात्री होती. नानासाहेब पेशव्यांच्या मध्यस्तीनें भोसले बंधू मधील वाद तोडला गेला. तरी दिवाकर पंडितानें जानोजीला सातारच्या छत्रपतीची जागा मिळवून देण्याचा उद्योग आरंभिला. नागपूरचे भोसले हे छत्रपतीच्या भाऊबंदापैकीं असल्यामुळें सातारच्या गादीवर शाहूच्या पश्चात् जानोजीच येणार होता; परंतु त्यावेळीं तो व्यूह ढांसळला. त्या कल्पनेस गमाजी व विठ्ठल सुंदर यांनीं आतां फुंकर घातली व देवाजीपंतांनीं त्यांना मिळविण्याचें आश्वासन जानोजीकडून देवविलें.

पेशवाई विरुद्ध भोसले व निजाम यांमध्यें जो तह झाला त्यास "साठचाळिशीचा तह' असें म्हणतात. यांत जी जी मिळकत होईल, मग तो मुलूख असो वा लूट असो त्याची वांटणी ६० व ४० या प्रमाणांत व्हावी. नवीन काढिलेल्या कर्जांतही हेंच प्रमाण रहावयाचे होतें. निजाम, भोसले व पेशवे यांच्यांमध्यें जो संग्राम पांचसहा महिने झाला त्यास राक्षसभुवनची मोहीम, हें नांव इतिहासांत आढळतें.

निजाम व भोंसले आपल्या मुलुखावर चाल करून येणार तेव्हां

त्यांस कशा तऱ्हेनें तोंड द्यावयाचें याची योजना सखारामबापूनें करून ठेविली होती. गोपिकाबाईस मिरजेहून लिहिलेल्या पत्रांत बापूनें अगामी संकटाचें स्वरूप व त्यावरची उपाययोजना कोणती हें स्पष्ट केलें आहे " सांप्रतांचे वर्तमान भोसल्याचे (आम्ही) कांहीं वाईट न करतां गोपाळराव व गमाजीबाबा याणी उत्पाद करून नेले व तेही गेले ! असो चिंता काय आहे ! आपले पुण्य आहे तरी उत्तमच होईल सारांश बाकी मोंगलानें बिघडले तेव्हां मुद्दे नानाप्रकारचे घालितो. 'भिवरेपासून मुलूख द्यावा, किल्ले द्यावे, भोसल्यास मुलूख द्यावा, कारभार करणें तो आमचे विद्यमाने करावा ' असे म्हणतो ! तेव्हां सर्वस्व घेतो असें यांत आहे. यास्तव सर्वांचे विचारे हेच की आपली गनिमीची रीत आहे ते करावी. जो पावेतो होईल तो करावे. नच होईल तर शेवटी किले कोट आहेतच ! जसें बनेल तसें करावें· पुढें ईश्वरानें नेमिले असेल तसें होईल. परंतु पन्नास हजार फौज असता उगीच त्याचे हवाली (दौलत) करावी हे न करावे. असें केल्यानें कांहींच रहात नाहीं. इतके (मोंगलानें) करावयास कारण यंदा मराठी फौज त्याजकडे फार आहे. केवळ जवळ राहून झुंजू म्हटल्यास रातबिरात दगा करतील. यास्तव हा प्रकार योजिला आहे. सांप्रत खडे होऊन मल्हारबाकडे जावे. त्यास मेळवून घेऊन मग जे करणे ते करावे. मलारबास आणावयास विठ्ठल शिवदेव गेले. औरंगाबादेचे सुमारे त्यास घेऊन येतील. आपण सावध असावे "[१] गनिमी काव्याची लढाई देऊन निजाम व जानोजी भोसले यांचा मुलूख मारावयाचा. अर्थात् त्यांना मराठ्यांच्या पाठीमागें येणें भाग

१ खरे १७५.

पडेल म्हणजे लढाई होतां होईतों शत्रूच्या मुलुखांतच करावयाची; आपला मुलूख शाबूत राखावयाचा अशी बापूची योजना होती. ही योजना वाईट होती असें वाटत नाहीं. गेल्या महायुद्धांतही जर्मनांनीं बेल्जमवर स्वारी करून युद्धाचें क्षेत्र शत्रूच्या मुलुखांत राहील असें धोरण आंखलें होतें. जर्मन देश हा या धोरणामुळें शत्रूच्या तोफाबंदुकांच्या माऱ्यांत सांपडला नाहीं. फ्रान्स ज्याप्रमाणें भाजून निघाला त्याच्या एक शतांशही झळ जर्मनीला लागली नाहीं हें सुप्रसिद्धच आहे. यावरून गनिमी काव्याच्या लढाईनें बापू बुडवितो ही पटवर्धनांची टीका अवास्तव, द्वेषमूलक म्हटली पाहिजे. गनिमी काव्याच्या युद्धांत मल्हारराव होळकर हा अग्रगण्य समजला जात असल्यामुळें त्यास आपल्या बाजूस आणण्यासाठीं बापूनें विठ्ठल शिवदेवास पाठविलें होतें.

यावेळचा मनसबा फारच भारी होता. कारण मोगलाकडे 'मराठी फौज फार' होती. पेशव्यांच्या खाचाखोचा, लुटीस योग्य शहरें, वगैरेची इत्थंभूत माहिती गोपाळरावासारखे सरदार, गमाजी यमाजी, मालोजी निंबाळकर सारखीं जाणतीं माणसें यांनीं मोंगलास दिली असल्यामुळें त्यांचें पारडें जड होतें.

इकडे राघोबानें माधवराव, सखारामबापू यांच्यासह सैन्य घेऊन मोंगलाईत प्रवेश केला व पुष्कळ शहरांपासून खंडण्या घेतल्या. पेशव्यांचें सैन्य खुद्द भागानगराजवळ येऊन ठेपलें व हल्ला करून त्यांनीं बाहेरचे पुरे जाळले. शहरापासून २ लक्ष रुपये घेतल्यानंतर वऱ्हाडांत शिरण्याचा त्यांचा उद्देश होता. परंतु यावेळीं पेशव्याकडे असलेला रामचंद्रराव जाधव ( निजामाकडून फुटून आलेला ) याचे फितुरी–प्रकरण उघडकीस आलें. बापूच्या सांगण्या-

कै. म. म. द. वा. पोतदार

वरून आबा पुरंदरे यांनीं त्याचा गोट लुटला व त्यास कैद केलें. इतक्या गोष्टी झाल्या तरी मल्हाररावाचा पत्ता नव्हता. विठ्ठल शिवदेवाच्या हातून काम झालें नाहीं तेव्हां स्वतः माधवराव व सखारामबापू त्यास आणावयास गेले. मल्हाररावानें या वेळेस बापूस पत्र लिहून 'गंगाधरपंत पाठविले आहेत त्याची व तुमची भेट होईल हे सर्व वृत्त विदित करतील' असा गंगोबाबर हवाला दिला व शेवटीं "सर्व प्रकारें भरंवसा तुमचा आहे मनसुबियाच्या कार्यास त्वरेचे मोल आहे[१]" असें कळविले. अर्थात् मल्हाररावासी प्रसन्न करून घेण्यासाठीं त्यास कांहीं तरी नैवेद्य दाखवावयास पाहिजे होता. शेवटी चांदवड जवळची दहा लक्षांची जहागीर देण्याचें कबूल करून त्यास बरोबर घेतले व मलकापुराजवळ सखारामबापू लष्करास मिळाले.

इकडे निजामानें पेशव्यांच्या मुलुखांत शिरून भीमानदीच्या कांठाचें पुणें सातारा गांठण्याचें ठरविलें. आघाडीस जानोजी भोंसले यांनीं २० हजार फौजेनिशीं जावें; त्याचें मागें विनायकदासानें चलावे; व बाकीच्या फौजेनिशीं खाशा निजामानें जावें असा बेत ठरला. फाल्गुन शु। १५ रोजीं त्यांचा मुक्काम पंढरपुराजवळ होता त्या ठिकाणाहून गमाजी सांगोल्यावरून सातार्‍याकडे गेला व बाकीची फौज पुण्याच्या रोखानें चालली. निजामास असें वाटलें कीं पेशवे आपल्या मुलुखाच्या संरक्षणार्थ आपल्यामागें धावत येतील. परंतु पेशव्यानीं राजधानीवर हल्ला करून मुलूख लुटला असें कळल्यानंतर निजाम ताबडतोब आपल्या मुलुखाचें संरक्षण करण्यासाठीं

१ चं. द. ले. १४३.

निघाला तो पैठणास आला. यावेळीं गमाजीनें सातारा प्रांतांतील प्रतिनिधींच्या ताब्यांतील बहुतेक ठाणीं जिंकिलीं होतीं.

निजाम पेशव्यांच्या पाठीवर निघाला परंतु पेशव्यांनीं लढाईचा प्रसंगच आणूं दिला नाहीं. असा हा शिवाशिवीचा खेळ बरेच दिवस चालला होता. तरी मराठ्यांकडून तहाचें बोलणें येईना तेव्हां जानोजीच्या सल्यावरून निजामानें आपल्या सैन्याच्या दोन टोळ्या केल्या. एकीनें पेशव्यांच्या मुलुखांत शिरून लुटालूट करावयाची व दुसरीनें मराठ्यांच्या मुख्य सैन्यास शक्य तर आडवून धरावयाचें. परंतु शेवटीं सर्वच सैन्य तीन तुकड्यांनीं पेशव्यांच्या मुलुखांत शिरलें. विठ्ठलसुंदरच्या तुकडीनें पुरंदर व शिरवळ यांच्या आसपासचा मुलूख जाळून फस्त केला व हिवरें व सासवड येथील सखारामबापूच्या वाड्यास आगी लावून दिल्या.[1] दुसऱ्या तुकडीनें पुण्याजवळ तळ देऊन शहर जाळण्याचा धाक घातला. मोंगलाकडे गेलेला गोपाळराव पटवर्धन यानें गोपिकाबाईला मोंगली सैन्य पुण्यावर आणीत नाहीं अशी हमी दिली होती. परंतु आयत्यावेळीं याचें त्यास विस्मरण पडलें असावें ! पुणें शहराचा कोतवाल नारो अप्पाजी यानें त्यावेळीं मोठा भूर्दंड भरून सरकारी व इतर वाडे बचाविले; परंतु सर्व चीजवस्त मोगलांनीं लुटून नेली. जे लोक आवईनें शहराबाहेर पडले होते तेहि नागवले गेले. नानाफडणवीस एका वस्त्रानिशीं लोहगडास पळून गेला. अशाप्रकारें चोहोंकडे हाहाःकार उडाला. " सखारामबापूचीं व पुरंदऱ्यांचीं मुलें माणसें पुरंदरास खुशाल आहेत. किल्ले मिळाले आहेत त्याजवर बापू बसला म्हणजे त्या अक्षयपद पर्वतारूढ होऊन आपण करावें तें मग करतील. होळक-

१ खरे पृ. ४४५–६.

राच्या मनांत पेशवे व मोंगल यांचा समेट करून द्यावा; पण बापूच्या मनास तें येत नाहीं,"[१] असें गोविंद हरी म्हणतो. परंतु वस्तुतः तशी गोष्ट नव्हती. सखारामबापूचेंहि बरेच नुकसान झालेलें होतें.

पेशव्यांच्या सैन्यांत पुणें प्रांताच्या लुटालुटीची व जाळपोळी संबंधाची बातमी पसरली तेव्हां सर्वांचे डोळे उघडले. सर्व सरदार, मुत्सद्दी, दादासाहेब एक झाले. मोंगलांची स्वारी म्हणजे मराठी राज्यावर आणीबाणीचा प्रसंग आहे हें सर्वांनीं जाणलें. अशा-प्रसंगीं एकोप्यानें न वागल्यास दौलत सांवरणार नाहीं, असें सर्व-त्रांस वाटावयास लागलें. यावेळीं सर्वांनीं मोंगलांचा पाडाव करूव दौलत राखावयाच्या शपथा घेतल्या. सखारामबापू सर्व मसलतींत प्रमुख होता व त्याचे शिंदे होळकरापासून लहानसहान पथक्यांपर्यंत सर्वांवर पराकाष्ठेचें वजन होतें. प्रथमतः निजामाकडे गेलेले लोक हरतऱ्हेनें परत आणण्याचें काम सखारामबापूकडे सोंपविण्यांत आलें. त्यासंबंधीं बापूचें सर्वांनीं ऐकावें असें ठरलें.

मराठे सरदार निजामास जाऊन मिळाले हा त्यांनीं राष्ट्राच्या-मराठी दौलतीच्या दृष्टीनें फार मोठा गुन्हा केला यांत संशय नाहीं. गोपाळराव पटवर्धनासारखे दौलतीचे आधारस्तंभ शत्रूस जाऊन मिळाले ही गोष्ट अत्यंत वाईट होती. 'त्यांनीं असें करावयास नको होतें' असें माधवरावाचें मत होतें. घोडनदीच्या लढाईनंतर माधवरावानें योग्य कालीं तुम्हास बोलावीन तोंपर्यंत तुम्ही वाट फुटेल तिकडे जावें असें गोपाळरावास सांगितलें होतें असें बखरकार म्हणतात. तें खरें धरलें तरी त्यामुळें शत्रूकडे जाणें हें केव्हांही गर्ह्यच. त्यांतून गोपाळराव जेव्हां आपण केलेल्या गोष्टीचें समर्थन "पेशव्यांचें हित

१ खरे पृ. ३९३,–३९९.

केल्यानें हे मोक्षास नेतात, मोगलांचे हित केल्यास मोक्ष नाही ऐसा पदार्थ नाहीं. कोणाची तरी नोकरीच करावयाची. ईश्वराच्या घरीं ब्राह्मण, हिंदु, मुसलमान, म्हार, सर्व एकच. परंतु जी बाजू धरली ती तडीस न्यावी,"[1] वगैरे शब्दांनीं करूं लागतो तेव्हां, ' A Devil can cite Scriptures for his own purpose' या इंग्रजी म्हणीची आठवण होते. गमाजी यमाजी, मालोजी निंबाळकर, यांचीही वर्तणूक या बाबतींत लज्जास्पद अशीच होती. सारांश स्वार्थान्धतेपुढें राज्यहितादि उच्च कल्पना फोल !

सखारामबापू व पेशवे यांनीं जे लोक आपखुषीनें मराठ्यांच्या बाजूला येऊं इच्छितील त्यांच्या मार्गांत कसलाही अडथळा आणावयाचा नाहीं असें ठरविलें. निजामाकडे गेलेल्या सरदारांमध्यें भोंसल्यास फोडणें फार कठीण काम होतें. परंतु बापूनें मल्हारराव होळकराच्या मार्फत जानोजीस असें समजाविलें कीं, निजामाच्या मनांत छत्रपतीचें पद त्यास ( जानोजीस ) न देतां कोल्हापूरच्या राजास द्यावयाचें आहे. तेव्हां जानोजी उदासीन झाला. दिवाकर पंडिताच्या मार्फतीनें बापू जानोजीशीं बोलणें करण्याकरतां गेला.[2] ३० लक्ष रुपये व आशिरगडचा किल्ला द्याल तर मोंगलास सोडून मी तुम्हांस येऊन मिळतो. ह्या तीस लक्षांपैकीं निम्मा मुलूख, रेवा व मुकुंदपूर हे परगणे व बाकीचा निम्मा वऱ्हाडच्या आसपासचा असावा असें जानोजीचें म्हणणें पडलें.[3] बापूनें पेशव्यांच्या वतीनें ही गोष्ट मान्य केली व रामाजी बल्लाळास त्याप्रमाणें खलिता दिला.

---

१ खरे १९३; रा. सरदेसाई "यजमानानें बाहेर घालविलें. उभे रहाण्यास स्थान नाहीं" ( खरे पृ. १०२ ) या गोविंद हरीच्या वचनाचा आधार घेऊन गोपाळरावांचें समर्थन करतात. २ पे.द. ३७१५. ३ खरे पृ. ५४५; ग्रँट डफ अशीरगडचें नांव देत नाहीं. मुलुखाची बेरीज ३२ लक्ष देतो.

तसेंच गोपाळराव पटवर्धनाच्या बहुतेक सर्व मागण्या कबूल केल्या. तेव्हां गोपाळराव, पिराजी नाईक वगैरे सरदार पावसाळ्याचें निमित्त करून निजामास सोडून घरीं आले. भोंसले मोहिमेच्या कामांत उदासीनवृत्ति धारण करून कुचराई व टंगळमंगळ करूं लागले.

राघोबानें या पूर्वींच निजामाशीं लढाई देऊन त्याचा उच्छेद करीन अशी प्रतिज्ञा केली होती. " नाचण्या वऱ्याची भाकर खाऊं परंतु मोंगलास दमास आणूं" अशी शपथ घेऊन निजामाशीं गांठ घालण्याबद्दल तो फारच उतावीळ झाला होता. परंतु भोसले वगैरेंचें सैन्य निजामाकडे असल्यानें त्यांचा पराभव करणें हं काम तितकेसें सोपें नव्हतें. बापू व होळकर यांनीं राघोबास 'सबूर करावें' म्हणून सांगतांच त्यांनीं बापू व होळकरांना सपाटून शिव्या दिल्या. बापूस म्हणाले " तूं गबर झाला आहेस म्हणून मला पळावयाचा सल्ला देत आलास पण मी कांहीं आतां स्वस्थ बसणार नाहीं. मरून गेलों तरी बेहेत्तर पण मोंगलाशीं लढाई करणारच."[१] शेवटीं दादाच्या मर्जींतल्या देव्या नांवाच्या शागीर्दाचीं आर्जवें करून बापूनें दादाचा हा निश्चय फिरविला. इतक्या थरास गोष्टी आल्या तरी गोविंद हरीस बापूबद्दल खात्री वाटत नव्हती. आपला पुत्र गोपाळराव निजामाकडे गेला असतांना त्यास बापू दगा करील, तोंडघशीं पाडील, सबब सावध रहावें, अशी तो वरचेवर त्याजला सूचना देतो.[२] कारण तो लिहितो कीं मनांत एक व लौकिकांत एक अशी बापूची नीति. ' परित्राणाय साधूनां दुष्टानां निग्रहाय च ' हें गीतेंतील वाक्य, परंतु भगवंतानीं प्रतिज्ञा केली त्याच्या उलट सखारामानें प्रतिज्ञा केली व

---

१ म. उ. ३०. २ खरे पृ. २२६.

र्ती सिद्धीस नेली.[१] गोविंद हरीच्या मतें कोट्यावधि रयत धुळीस मिळाली या साऱ्या अपेशाचें खापर साडेतीन शहाण्यांत वरिष्ठ गणलेल्या सखाराम बापूच्याच माथीं फोडणें न्याय्य आहे. यास कारण म्हणजे बापूचा लोभी स्वभाव. आतां केलेलें कर्म निस्तरावें व त्यायोगें पेशवे व गोपिकाबाई यांची मर्जी सुप्रसन्न करावी हा त्याचा हेतू आहे.[२] पटवर्धन बापूच्या शत्रुस्थानीं असल्यामुळें त्यांचें पारिपत्य करण्याचा, त्यांना नमविण्याचा बापूचा हेतू होताच; म्हणून गोपाळराव निजामाकडे गेला असतां 'विठ्ठल सुंदर याची शागीर्दी करीन परंतु आपले मनोरथ सिद्धीस नेईन' असें बापू बोलला असेल.[३] परंतु त्याचा अर्थ असा नव्हे कीं स्वारी करण्यास बापूनेंच निजामास फूस दिली. निजामाची स्वारी अनपेक्षित झाल्यामुळें बापू व राघोबा यांची निजामाशीं टक्कर देण्याइतकी तयारी नव्हती. त्यामुळें मराठी राज्यावर संकट ओढवलें. घोडनदीनंतर पटवर्धनांच्या हातांत सत्ता आली असती तर त्यांनींही सखारामबापूचें पारिपत्यच केलें असतें. या बाबतींत बिलकुल दयामाया दाखविली नसती. नानासाहेब पेशव्यांचे कारकीर्दींत दमाजी गायकवाड विरुद्ध पक्षास सामील झाला असतां नानासाहेब पेशव्यांनीं त्याचें पारिपत्यच केलें, गय केली नाहीं. तेव्हां हीं उदाहरणें लक्षांत घेतां आमच्या व राज्याच्या सर्व अपेशास कारण बापू हें गोविंदहरीचें मत एकतर्फीच ध्यावें लागतें.

वास्तविक पाहातां गोपाळराव प्रभृति सरदारांना परत आणण्यामध्यें सखाराबापूनें फार मोठी कामगिरी केली आहे; त्यांत त्याच्या मनाचा मोठेपणा, राजकारणपटुत्व, व दूरदृष्टि दिसून येते. भोसल्यांचा दिवाण दिवाकरपंडीत यानें विठ्ठल सुंदरास सारे मराठे सरदार पेश-

१ खरे पृ. ३९३. २ म. उ. ३१. ३ खरे पृ. ३९४.

त्याकडे जाऊं पहात आहेत ही गोष्ट कळविली असल्याचें गोविंदहरीस कळतांच त्यानें गोपाळरावास ' तुम्ही आपला प्रकार सकारनामक व उभयतां मध्यस्त यांचेखेरीज फुटों नये ' असा सल्ला दिला आहे. यावरून बापूनें पटवर्धनाबद्दलचा खाजगी द्वेष बाजूस ठेऊन दौलतीच्या हितासाठींच त्यांना आपल्या बाजूस आणण्याचें धोरण स्वीकारलें होतें हें स्पष्ट दिसतें. 'जे आपल्या विरुद्ध असतील त्याचा अभिमान राजकारणें झाडावा; परंतु त्यांना ' मागुती पुनः मेळवून घ्यावें ' या रामदासोक्तीप्रमाणें सखारामबापूनें आपले कट्टे शत्रू जे पटवर्धन त्यांचा अभिमान झाडून पुनः त्यांचा संग्रहच केला; कीं शेवटीं गोविंद हरिसही बापूसंबंधानें "त्याचें संग्रहीं द्रव्य आहे. कर्तेपण आहे. सारा राजमंडळाचा कारभार स्वाधीन आहे. त्याची तपश्चर्या भारी. त्याप्रमाणें कोणाचेही संकल्प सिद्धीस जाणार नाहींत " वगैरे कांहीं चांगले उद्गार काढणें भाग पडलें. असो.

**राक्षसभुवन**—भोसले कांहीं एकाएकीं पेशव्यास मिळाले नाहींत. दिवाकर पंडितानें आपले धन्यास लिहिलें कीं तुम्ही पेशव्यांचे भेटीस जाऊं नये नाहींतर जाधवरावाप्रमाणें गती होईल. यामुळें जानोजी पुन्हां भ्रमांत पडला. परंतु त्याच्या औदासिन्याचा फायदा घेऊन मराठ्यांनीं निजामास विलग करून पावसाळ्यांत **राक्षसभुवन** जवळ गांठिले. १० सप्टेंबर १७६३ बुधवारीं मोंगल फौजेस गंगा उतरत असतांना गांठून तिजवर निकराचा हल्ला मराठ्यांनीं चढविला. लढाईच्या गर्दींत दादासाहेबांचा हत्ती विठ्ठल सुंदरनें वळवून नेला, परंतु माधवरावानें ऐन वेळीं मदत करून दादांचा हत्ती सोडवून आणिला. परंतु या गर्दींत विठ्ठल सुंदर गोळी लागून ठार झाला व

श्रीमंताची फत्ते झाली.[१] माधवरावानें या लढाईत केलेला पराक्रम सखारामबापूस फारसा महत्त्वाचा वाटत नसल्याबद्दल पेशवेदप्तरांत माहिती आढळते[२].असो. राक्षसभुवनाच्या लढाईंत जय झाल्यानंतर सखारामबापू जानोजी भोसले यांच्यासह ससैन्य पेशव्यांच्या लष्करांत आले.[३] नंतर तहाच्या वाटाघाटी सुरूं झाल्या. तहांतील शर्ती ठरविण्याचे कामांत बापू व होळकाचा दिवाण गंगाधर यशवंत हे प्रमुख होते. निजामानें ८२ लक्षांचा मुलूख पेशव्यांस द्यावा असें ठरलें. राक्षसभुवनावर निजामास एवढी जरब बसली कीं खर्ड्यांच्या लढाईपर्यंत ( इ. स. १७९५ ) तो मराठ्यांच्या वाटेस गेला नाहीं. हा या युद्धाचा महत्त्वाचा परिणाम होय.

तह आटोपल्यानंतर महत्त्वाचें काम म्हणजे जे सरदार पेशव्यांकडे आले त्यांना कबूल केलेल्या अटीप्रमाणें मुलूख देणें व बक्षिसें वाटणें हें होतें. मिरज गोपाळराव पटवर्धनाच्या हवालीं करण्यांत आली. प्रतिनिधीपदावर असलेला राघोबाचा मुलगा भास्करराव हा या सुमारास मृत्यू पावल्यामुळें प्रतिनिधीपद पुनरपि भवानरावाकडे देण्यांत आलें.बाबूराव फडणविसाकडे पूर्ववत् फडणविसीचा दरक सोंपविण्यांत आला. या बाबतींत सखारामबापूचें असें म्हणणें होतें कीं बाबूरावांनीं दरसाल १ लक्ष रुपये घेऊन फडणीसी करावी, जास्त उत्पन्न येईल तें सरकारांत घ्यावें. परंतु या प्रसंगीं माधवरावानें आग्रह धरल्यामुळें बापूनें आपला हेका सोडला. त्याचप्रमाणें मुजुमदारीचा दरक ( जो दादानें नारायणराव निलकंठ यांच्या घराण्यांतून काढून सखाराम हरीचा भाऊ बाबूराव हरी याजकडे दिला होता तो )

---

१ रा. १० ले. २१. २ पे. द. भाग ३८. ३ पे. द. ३८.१०५.

पूर्वीच्या घराण्याकडेच देण्याविषयीं माधवराव पेशव्यानें बापूस सांगितलें. बापूच्या मनांतही पूर्वीच्या घराण्याकडेसच मुजुमदारी चालवावी असें होतें. परंतु दादासाहेबांपुढें त्याचा आग्रह चालेना. राघोबास ही गोष्ट बिलकूल मान्य नव्हती. तेव्हां गोपाळरावास मध्यस्थी घालून त्याकरवीं 'श्रीमंतांजवळ भांडण काढून, पूर्वीच्या मुजुमदारांस तो दरक मिळवून दिला' परंतु माधवरावास दादासाहेबांना राग येईल ही भीति वाटत होती. तेव्हां वस्त्रें देण्याचें तहकूब केलें. पहिल्या मुजुमदाराकडून दीडलक्ष रुपये नजराणा घेऊन त्यास तो दरक दिला. जानोजी भोसल्यास कराराप्रमाणें ३० लक्ष रुपयांचा मुलूख मिळाला. ही सर्व बक्षिसें देण्यामध्यें पेशव्यांचा १ कोटी रुपये उत्पन्नाचा मुलूख गेला. सखारामबापूसही फौजेच्या संरजामाकरतां बरेच गांव इनाम मिळाले. इ. स. १७६४ मध्यें त्याचें उत्पन्न २० लक्ष रुपये होतें[1].

अशा प्रकारें बराचसा मुलूख वांटण्यांत गेल्यामुळें सरकारी उत्पन्नांत जी तूट येऊं लागली ती भरून काढण्यासाठीं बापूनें असें सुचविलें कीं होळकर, विंचूरकर, नारोशंकर यांस दिलेल्या जहागिरीपैकीं चौथाई सरकारांत परत घ्यावी. पेशव्यास व दादासाहेबांस ही मसलत इष्ट वाटली. परंतु ही गोष्ट काढतांच होळकर बिथरून तळ हालवून जाऊं लागला. नारो शंकर, शिवदेव शिवदेव व पटवर्धन यांना सुद्धां ही गोष्ट जिकीरीची वाटत होती, कारण त्यांनाही फौज ठेवावी लागल्यामुळें कर्ज झालें होतें. या विषयांवर पुष्कळ वादविवाद होऊन शेवटीं सहा दिवसानंतर होळकरांनीं बापूच्या म्हणण्यास कबूली दिली. पुढें नारोशंकर व विंचूर-

१ पे. द. नं १२३८९; परिशिष्ट पहा.

कर हेही कबूल झाले.[1] बापूनें हुजुरातही कमी करावी अशी दुसरी सूचना काटकसरीच्या निमित्तानें केली. परंतु माधवरावानें यास जोराचा विरोध केल्यामुळें या सूचनेची विल्हेवाट लागली, व हुजुरातीची संख्या पूर्वींचीच कायम करण्यांत आली.

निजामाशीं युद्ध सुरूं झाल्यानंतर महाराष्ट्रावर जो आणीबाणीचा प्रसंग आला त्यांतून दौलतीचें तारूं सुखरूपपणें यशाच्या पैलतीराकडे नेण्याचें सर्व श्रेय सखारामबापूस आहे. त्याच्या सारखा कर्णधार मिळाला नसता तर पेशवाई रहाती का बुडती अशी परिस्थिति निर्माण झाली होती. विरुद्धपक्षाकडेहि विठ्ठल सुंदर, दिवाकर पंडित यांसारखे दोन शहाणे, कसलेले, खंदे मुत्सद्दी होते. परंतु त्यांच्या कारस्थानावरही सखारामबापूनें मात केली हें पाहून त्याच्या कर्तबगारीबद्दल कौतुक वाटतें. माधवररावासारख्या अत्यंत कडक शिस्तीच्या पेशव्यानें देखील सखारामबापूनें " मोठमोठे पेंच पडलें असतां दौलत पुरी राखिली" हें जाणलेलें होतें.[2] म्हणूनच पुढें बापूवर इतराजी झाली असतांही माधवरावाचें त्याचें उत्पन्न चालविलें, व त्यास उपद्रवही फारसा दिला नाहीं. माधवरावाच्या शौर्य, धूर्तता, व्यवस्थितपणा इत्यादि गुणांमुळें सखारामबापूही यापुढें त्याची कृपा व विश्वास संपादन करण्यासाठीं अधिकाअधिक झटूं लागला व माधवरावाच्या कर्नाटकाच्या स्वारींत बापूनें स्वारी कामगिरी फारच उत्कृष्टरीतीनें पार पाडली.

---

१ खरे ३०१. २ पे. द. ३९. ६१.

## प्रकरण ५ वें

# कर्नाटकांतील स्वाऱ्या.

माधवरावास पेशवाईचीं वस्त्रें मिळाल्याबरोबरच त्यास बरोबर घेऊन रघुनाथरावानें कर्नाटकांत स्वारी करण्याचा विचार केला होता. सखारामबापू त्यावेळीं सासवडासच होते.[1] लष्करास जाण्याचा त्याचा विचार नव्हता. शेषोनारायण नांवाच्या माणसानें राघोबादादाकडे 'करवीर कारभार करारानुरूप विले लावून देण्याबद्दल बापूस आज्ञा करावी' म्हणून पत्र पाठविलें होतें.[2] एवढेंच काम बापूनें केल्याचें दिसतें. त्यानंतर निजामाशीं युद्धप्रसंग सुरू झाल्यामुळें कर्नाटकाकडे लक्ष देण्यास पेशव्यांस फावलें नाहीं. निजामाचें पारिपत्य केल्यानंतर माधवरावानें हैदराकडे दृष्टि वळविली. मराठे निजामाशीं लढण्यांत गुंतले आहेत ही संधि पाहून हैदरानें नानासाहेब पेशव्यांच्या कारकीर्दींत कर्नाटकांतलीं जीं ठाणीं मराठ्यांनी जिंकलीं होतीं तीं सर्व घेतलीं, व पटवर्धनाच्या मुलुखास उपद्रव देण्यास सुरवात केली.

हैदरअल्ली हा अत्यंत धूर्त, कपटी, साहसी, शूर, व प्रसंगावधानी होता. केवळ बुद्धिमत्तेच्या, कर्तबगारीच्या जोरावर प्रतिकूल परिस्थितींतून राजपद प्राप्त झालेलीं हैदरासारखीं माणसें इतिहासांत विरळा. सैन्याच्या रचनेची शिस्त ठरविण्यांत, जमाबंदीची व्यवस्था करण्यांत, शिपायांवर कदर राखण्यांत, माणसाची पारख करण्यांत, हैदराचा अगदीं हातखंडा होता. त्याची स्मरणशक्ति अजब व आश्चर्यकारक होती. इंग्रजांशीं लढतांना तो गनिमी काव्यानें त्यांस बेजार करी व मराठ्यांशीं लढतांना तो इंग्रजांच्या पायदळी पद्धतीचा अंगीकार

१ पे. द. ३७. ९ २ पे. द. ३७. १३.

करी. 'हैदर नाईक व निजाम हे शत्रू फार मोठे ' असें रघुनाथराव एका पत्रांत लिहितो[१] माधवरावानें हैदरावर स्वारी करण्याचीं तात्कालिक कारणें म्हणजे हैदरानें पेशव्यांचा स्नेही सावनूरचा नबाब याचा पराभव करून त्याजपासून खंडणी घेतली, धारवाडजवळ हरिपंत आणि पटवर्धन सरदार यांचा पराभव केला, मुरारराव घोरपड्याच्या फौजेची बाळापूर येथें बरीच खराबी केली हीं होत. [२]या कारणामुळें कडेकोट तयारी करून माधवराव हैदरावर चालून गेला.

**सखारामबापूस** माधवरावानें आपला **कारभारी** म्हणून स्वारी बरोबर घेतलें. बापूस कर्नाटकांतील प्रदेशाची संपूर्ण माहिती होती. पूर्वी सदाशिवराव भाऊंची कर्नाटकांतील स्वारी उत्तम सल्लामसलत देऊन व यथायोग्य व्यवस्था राखून बापूनें यशस्वी करून दाखविली होती. बापूइतका अनुभवी व केलेला सवरलेला मुत्सद्दी आतां कोणी राहिला नव्हता. तेव्हां त्याच्या अनुभवाचा फायदा घेण्याचें माधवरावानें ठरविलें. या स्वारीवरती मुख्य अधिकार आपणास असावा असें दादासाहेबास वाटत होतें. परंतु सखारामबापूनें सांगितलें कीं मुख्य अधिकार रावसाहेब पेशव्यासच असावा. शेवटीं नाहीं होय करतां करतां दादासाहेबांनीं आपणांस स्वास्थ्य पाहिजे म्हणून नाशकास रहावयाचें ठरविलें.[३]

माधवराव व सखारामबापू यांनीं कर्नाटकांत जाऊन हैदराशीं गांठ घातली व त्यास रेटीत रेटीत रेटहळ्ळीपर्यंत नेलें. हैदर बिदनूरचे झाडींत होता. पेशव्यांची खासा स्वारी हवेरीची पेठ मारून

---

१ पे. द. ३७-९. २ पे. द. ३७-७. ३ सिंप्रजेल म्हणतो कीं राघोबाच्या इच्छेविरुद्ध सखारामबापूनें शिंद्याच्या जहागिरीचा प्रश्न सोडविला; त्यामुळें नाराज होऊन राघोबा नाशकास जाऊन राहिला पृ. २१०)

साडे तीन कोस आली, हें वर्तमान हैदर नाइकास कळतांच बिदनूरचे रोखें कूच करून त्यानें रेटहाळीचा मुक्काम केला. पेशव्यांची थोडी फौज पाहून हैदर नाईक त्यावर चालून आला. दोप्रहरा गांठ पडली. दीडप्रहर उभयपक्षीं तोफांचा मारा होऊन हैदराचा पराभव झाला. या लढाईची सर्व सूत्रें सखारामबापू हालवीत होता. विठ्ठल शिवदेव व गोपाळराव पटवर्धन यांनीं या लढाईंत फार पराक्रम गाजविला. हैदर पुनः झाडींत शिरला. त्याची अशी कल्पना होती कीं, मराठे पावसाळ्यांत देशीं निघून जातील. परंतु पावसाळ्यामध्यें कर्नाटकांतच छावणी करण्याचें सर्वानुमतें ठरल्यामुळें बापूनें नानाफडणविसास पत्र लिहून ' यैवजाची वोढ तेव्हां रसद पाठविण्याची त्वरा करावी' म्हणून सुचविलें.[१] बरसातीच्या वेळीं हैदरानें सावनुरास उपद्रव देऊं नये एवढी काळजी घेण्याचें काम करावयाचें होतें. त्या कामीं कोणाची योजना करावी याबद्दल वाटाघाट झाली. सखारामबापूनें गोपाळराव पटवर्धनाचें नांव सुचविलें व गोपाळरावानेंही ही गोष्ट कबूल केली. परंतु गोविंद हरीस मात्र बापूचा कांहींतरी यांत डाव असावा अशी शंका आली. " पर्जन्यकाळीं श्रम कोण घेतो. आपले पक्षीय पाठवावे तरी त्यांची खराबी होईल अथवा एखादा दगादुगा झाला तरी आपलें बळ उणें पडेल यास्तव आपले पक्षीय रक्षून तुम्हांस पाठवावे. कबूल न करावे तरी हे कांकूं करतात. ऐसे श्रीमंताचे नजरेस आणावे. "[२] परंतु खरोखर पाहिलें असतां गोपाळरावाचें नांव सुचविण्यांत आलें त्याचें कारण त्यासही कर्नाटकच्या स्वारीचा अनुभव असल्यामुळें व दक्षिणेकडील म्हैसूरचीं राजकारणें त्यानें केलीं असल्यामुळें त्याच्याशिवाय या कामास दुसरा लायक मनुष्यच

---

१ पे. द. ३७-३५. २ खरे पृ. ८४०; ८४४.

नव्हता. गोविंदहरीच्या या तक्रारीवरून मराठ्यांत लष्करी शिस्तीचा अभाव किंवा वरिष्ठांचे हुकूम बिनतक्रार पाळण्याची शिस्त त्यांमध्यें नव्हती, असें म्हणावें लागतें. वरिष्ठाचा हुकूम मग तो चुकीचा असला तरी तो बिनतक्रार पाळण्यामध्यें युरोपियन सैन्यांत जी एक शिस्त दिसून येते तीं मराठ्यांमध्यें नव्हती, असें या पत्राधारें म्हणावें लागतें. गोपाळरावानें सावनुरास जाण्याची गोष्ट कबूल केली हें ठीकच झाले. परंतु गोविंदहरीचा सखारामबापूबद्दल संशय व कर्तव्याकर्तव्यसंबंधीं त्याच्या कल्पना ह्या गोष्टी विचार करण्यासारख्या आहेत.

दुसऱ्या मनुष्यास १५ दिवसानंतर तें काम सोपवावे या अटीवर गोपाळराव सावनुराकडे गेला. जाण्यापूर्वी नबाबानें गोपाळरावाच्या सैन्याचा खर्च द्यावा ही हमी माधवरावापासून त्यानें घेतली. या अटी कबूल करून घेण्याचें कारण असें दिसतें कीं पटवर्धनाजवळ यावेळीं पैसा नव्हता. परंतु ‘ सरदारी मोठी. खर्चभारी यास्तव खर्च मागावा लागला.’[1]

गोपाळरावास सावनुरास पाठविण्याबद्दल बापूनें आग्रह धरला याचें कारण असें सांगतात कीं पुरंदरास कोळ्यांनीं दंगा करून आबा पुरंदऱ्याच्या लोकांस तेथून घालवून दिलें. ह्या मसलतींत पटवर्धनांचे किंवा माधवरावाचे अंग असावें असा बापूस संशय आला. नानाफडणवीसानें रामचंद्र गोरे यांस पाठविलेल्या पत्रांत माधवरावाचें अंग असावें ही गोष्ट स्पष्ट दिसतें. “ पुरंधर जुन्या लोकांनीं दंगा करून घेतला. हवालदार वगैरे बरेच मारले गेले. रा. धोंडोबा आप्पाकडील कारकून विसाजीपंत म्हणून आहे. तो कबिलेसुद्धां वरता गेला. मग आम्हांस चिठ्ठी पाठविली कीं **श्रीमंतांचे आज्ञेवरून घेतला.**

१ पे. द. ३७-३७.

तेव्हां उगीच गडबड कशास करावी यामुळें स्वस्थ होतो." [१] परंतु माधवरावानें चिंतो विठ्ठल यांस " पुरंधरचे जुने लोकांनीं आमचे नांव करून दग्यानें किल्ला घेतला म्हणोन परस्परे वर्तमान विदित झाले. त्यास हे गोष्ट आम्हास किमपि ठाऊक नसतां मधी लबाडी करून कम कल. त्याचे पारिपत्याविशी तीर्थस्वरूपास लिहिणें "[२] अशा अर्थाचें पत्र लिहितो. म्हणजे पुरंधरची गोष्ट आपल्या गांवीही नाहीं असें भासवितो. खुद्द राघोबा पुढें एके प्रसंगीं या प्रकरणाचा उल्लेख पुढील शब्दानें करतो. " आमचा पुस्तपुन्हां आहेसा कोणास कळों न देतां जसे चिरंजीवांनीं पुरंदरचे आंत येक व बाहेर जाहिराणा येक दर्शविला होता तसें करावें. " [३] यावरून माधवरावाच्या आज्ञेनेंच विसाजी केशव साने यानें पुरंदर व रुद्रमाळ हस्तगत केले हें उघड आहे. माधवरावाचा लपंडाव या प्रसंगीं स्पष्ट दिसून येतो. या गोष्टीमुळें आबा पुरंदरे खवळून देशीं जावयास निघाला. राघोबादादाही नाराज झाला. बापूनें धूर्तपणानें या सर्व गोष्टी जाणलेल्या होत्या. परंतु त्यानें या गोष्टीची ओळख माधवरावास स्वारींत असतांही दिली नाहीं.

माधवरावानें हवेरीजवळ हैदराच्या सैन्याचा पराभव करून धारवाडास वेढा घातला.[४] बापूनें नानास पत्र लिहून " धारवाडास मोर्चे लावल्याची व श्रीकृपेनें लवकर कार्यसिद्धी होऊन तदोत्तर दुसरा मनसबा होणे तो होईल " वगैरे

१ पु. द. ३. २ रा. १२-६०. ३ पे. द. १९-५२.
४ पे. द. ३७-४४; ४८.

हकीकत कळविली.[१] तसेंच "रसदाचा ऐवज जमा करण्याबद्दल व सर्व कारभार आपले हाते घ्यावा. येणे करून सरकार किफायत आहे. दादकडील महालकराच्या त्यांचे कमाविसदारांच्या पाठी थोपटून सरकार केले" वगैरे राज्यकारभारासंबंधीं मजकूर नानास कळविला.[२]

धारवाड शहर हातीं आल्यानंतर हैदराच्या सैन्याची गांठ अनवड्डी जवळ पडून मोठी लढाई झाली. ह्या लढाईंतील सैन्याच्या हालचालीवर सखारामबापूची देखरेख होती व मोठ्या कौशल्यानें त्यानें जय मिळविला याची हकीकत किंकेड पुढीलप्रमाणें देतात. एक माऱ्याची टेकडी शोधून, तीवर तोफा चढवून त्याची मारागिरी हैदराच्या सैन्यावर बापूनें चालू केली. हें काम त्यानें मुरारराव घोरपड्याकडे दिलें. परंतु याच सुमारास हैदरानेंही आपला तोफखाना आणवून मुराररावाचा चांगलाच समाचार घेतला. पटवर्धन, विठ्ठल शिवदेव मदतीस आले तरी त्यांचें कांहीं चाललें नाहीं. शेवटी हुजुरातीनीं घोडे घालवून हैदराच्या तोफा बंद पाडिल्या. ही शिलकी फौज (हुजुरात) जर बापूनें वेळेवर वेळेवर पाठविली नसती तर मराठी सैन्याची मोठीच कत्तल झाली असती. असो.

माधवरावानें यावेळीं इंग्रजांकडे तोफा, दारुगोळा यांची मदत मागितली. परंतु इंग्रजांनीं हैदरासच कांहीं दारुगोळा पुरवला. माधवरावानें धुळप, आंग्रे यांना जलमार्गानें, मलबार किनाऱ्यावर येऊन हैदराची बंदरें घेण्याचें काम सांगितलें व त्यास इंग्रजांनीं मित्रत्वाच्या नात्यानें मदत करावी अशी पत्रें इंग्रजाकडे रवाना केली.[३] परंतु इंग्रजांनीं

---

१ पे.द.३७.४४. २ पे.द.३७.४३. 3 Public Dept. Diary p. 594 (1764)

तशा प्रकारची मदत मराठ्यांना केल्याचें दिसत नाहीं. उलटपक्षा हैदरानें मात्र इंग्रजांकडे सैन्याची–दारुगोळा पुरविण्याबद्दल–मदत मागितली होती. त्यासंबंधी इंग्रजांनीं सहानुभूतीचें धोरण स्वीकारले होते. हैदर, इंग्रज व निजाम यांनीं एकत्र होऊन मराठयांशीं लढावयाचे व त्यासाठीं इंग्रजांनां मराठयांचा जिंकलेला मुलूख द्यावयाची अशी ही योजना होती.[१] परंतु माधवराच्या दक्षतेमुळें ती यशस्वी झाली नाहीं.

माधवरावानें यावेळीं असंतुष्ट दादासाहेबास बोलावून आणून मोहिमेचें यश घ्यावे अशी विनंति केली. लहान अनर्थ पत्करून मोठा अनर्थ टाळला ही शहाणपणाची गोष्ट केली अशी डफ माधवरावाची तारीफ करतो.[२] पेशव्यांचें सैन्य बिदनूर मुक्कामीं आल्यानंतर हैदरनें तहाचें बोलणें करण्यासाठीं अप्पाजीराम नांवाच्या वकिलास पाठविलें. सखारामबापू व आप्पाजी राम यांच्यांमध्यें तहाबद्दल बरीच चर्चा व वाटाघाट होऊन शेवटीं तह ठरला. तो असा:–१ मुराररराव घोरपडे व सावनूरचा नबाब यांच्यांपासून जिंकलेला मुलूख हैदरानें परत द्यावा. २ हैदरानें बंकापूर व तुंगभद्रेच्या उत्तरेकडील मुलुखावरील हक्क सोडावा. ३ पेशव्यास तीस लक्ष रुपये खंडणीदाखल द्यावें आणि ते मिळाल्यानंतर पेशव्यांनीं आपली फौज काढून न्यावी.[३]

हा तह माधवरावास कांहीं फारसा पसंत पडला नाहीं. दादांनीं मात्र या तहास पूर्णपणें मान्यता दिली. इतकेंच नव्हे तर बंकापूर व बसवापट्टण हीं हैदरास देण्याचा दादासाहेबांचा इरादा होता.

१ Public Dept. Diary p. 292/4. २ Duff vol. II p. 546
३ Duff vol II, p. 547; खरे १००६.

परंतु दादास एकदां मुख्याधिकार दिल्यानंतर त्यांच्या कामांत फारशी ढवळाढवळ करावयाची नाहीं हें माधवरावानें ठरविलें होतें. माधवरावाचा तहाचे बाबतींत प्रतिकूल रोख पाहून सखारामबापूनें तडजोड सुचविली कीं हैदरापासून बंकापूर घ्यावें, बसवापट्टण त्याजकडेच ठेवावें. अखेर दादासाहेबांनीं फारसे आढेवेढे न घेतां ही गोष्ट मान्य केली.[१] अशा प्रकारें हैदरास पुरते नामोहरम करण्याची संधि आली असतां दादासाहेबांनीं ती वायां दवडली. तह झाल्यानंतर बापू माधवराव राघोबा वगैरे सैन्यासह १७६५ च्या जून महिन्यांत पुण्यास परतले. स्वारीहून परतल्यानंतर दादा आनंदवल्लीस जाणार होते, परंतु कारभारी सखारामबापू यांनीं बोलून चालून मर्जी राखून पुण्यास राहवून घेतले.[२] माधवरावही बापूवर 'यंदा छावणीची चाकरी केली म्हणून बहुत उपकारी झाले' व 'याजला सोडूं नये. असें चित्तापासून त्याजला वाटावयास लागले.'[३]

पुरंदर प्रकरण झाल्यानंतर व दादा कर्नाटकांत येण्यापूर्वी दादांचा व बापूचा त्यासंबधीं कांहीं पत्रव्यवहार झाला असावा असें वाटतें. कारण बापूनें आपला उपाध्याय विठ्ठलभट यांस लिहिलेल्या पत्रांत " आमचे त्यांचे ( दादाचे ) कागद पत्रही पुरंधरामुळें कळले. आपले कांहीं कोठे जात नाहीं. " असा उल्लेख आढळतो. माधवराव यापुढें आपल्याशीं कसें काय वागेल हेंही बापू त्यास लिहितो " या मुलापासून आमच्या जीवास आबरूस भय होणार नाहीं. इतकें तर बलकट आहे. वरकड आमचे थोडेबहुत चालवावें असेही आहे. यद्यपि घरीं राहिले तरी कांहीं राऊत ठेवितील. जातीस पोटास देतात ते चालवितील असें माझें बुद्धीनें वाटते."[४]

---

१ म. उ. १०४. २ खरे पृ. १०२४. ३ पे. द. ३९-६१.
४ पे. द. ३९-६१.

बापूच्यां कामगिरीबद्दल खरोखरी खूष होऊन माधवरावानें मौजे पिंपळें, चांबळी वगैरे कऱ्हेपठारांतील ४ गांवांत मिळून १/४ चावर जमीन सखाराम बापूस ' हे राज्यांतील पुरातन सेवक स्वामीसेवा एकनिष्ठपणें बहुत दिवस केली यास्तव यांचे चालवणें ' म्हणून बक्षीस दिली. याच वेळीं बापूस सचिवाकडून २ हजार रुपये उत्पन्नाचे मौजे कांबरें वगैरे गांव ' हे पुरातन पदरचे व राजश्री माधवराव पंडित यांचे दरबारीं दौलतीविशी मोठमोठे पेंच पडिलें असतां दौलत रक्षावयासी बहुत कामकाजासी आले. दौलत राखिली याजवरून ' कृपाळु होऊन देण्यांत आलें.[1] मुराररराव घोरपड्याकडून बाळापूर, वडेगीर वगैरे सवा गांवची २० हजारांची जहागिर व निजामअल्लीकडून राजदेहेर येथील २० हजाराची जहागिर[2], रघूजी आंग्र्याकडून बेलवण, तळवदे चिखली वगैरे गांवचे २ हजारांचें इनाम इतकी जहागिर सखारामबापूस निरनिराळ्या वेळच्या कामगिरीबद्दल प्रत्येकांकडून देण्यांत आली.

हैदराशीं तह करून माधवराव पुण्याकडे परततो न परततो तोंच हैदरानें खंडणी देण्याचें नाकारिलें. तेव्हां माधवरावास त्याजवरती पुन्हां दुसरी स्वारी करणें भाग पडलें. ता. २५ आक्टोबर १७६६ रोजीं माधवराव पुण्याहून डेरेदाखल झाला. सखारामबापू त्यावेळीं सासवडास होता. यावेळीं बापूच्या मनांत स्वारीबरोबर जावयाचें नव्हतें. कारभाराबद्दल ते थोडेसे उदासीनच होते; याचें कारण असें दिसतें कीं, ' पुरंदरचे राजकारण बिघडलें ' त्यामुळें सखारामबापूस मोठा पेंच पडला होता. याच वेळेस दादासाहेबांनीं

---

१ भा. इ. त्रै. Vol III २. २ पे. द. ४५-१०. ही जहागीर कोणत्या कारणास्तव बापूस दिली हें समजत नाहीं.

उत्तरेकडे स्वारी करण्याची योजना केली व आबा पुरंदरे यांनाही त्यांच्याबरोबर जाणें भाग पडलें. बापू लिहितात, 'आबा न जाय तरी आबाचें सर्वस्व जातें. कांहीं रहात नाहीं हा मोठा पेंच आहे. तथापि आमचे वस्तु जेथवरी राखवेल तेथवरी राखतों.'[१] सखाराम-बापूनें साताऱ्याजवळ महादेव येथें लष्करास येऊन मिळावें म्हणून माधवराव पेशव्यांची आज्ञा झाली.[२] त्यामुळें बापूस आग्रहास्तव जाणें भाग पडलें. बापूकडून बहुधा कारभारीपद माधवरावानें १७६४ चे अखेरीस काढिलें असावें असें वाटतें. या स्वारींत बापूस दुय्यम कारभारी म्हणून पुढें नेमण्यांत आलें.

हैदरावर स्वारीस जातेवेळीं बाबूजी नाईकाचें प्रकरण उपस्थित झालें. सोलापूरचा किल्ला नाईकाच्या ताब्यांत होता, त्यानें माधवराव व दादासाहेब यांच्यामधील तंट्याचा फायदा घेऊन आपली सत्ता वाढविण्याचा प्रयत्न सुरू केला. पेशव्यांच्या बाजूनें राक्षसभुवनच्या लढाईत त्यानें चांगलाच पराक्रम गाजविला होता. परंतु त्यापुढें पेशव्याशीं तो मोठ्या कुर्यानें वागूं लागला. त्यामुळें त्यास धास्त बसवण्यासाठीं पेशव्यानें रामचंद्र गणेशास त्याजवर रवाना केलें. रामचंद्र गणेशानें या प्रकरणाचा निकाल लावण्यासाठीं दोन उपाय सुचविले.[३] सरकारनें बाबूजी नाईकाचा सरंजाम ( १८५००० रुपयांचा ) जो जप्त केला आहे तो परत द्यावा. दुसरी गोष्ट म्हणजे नाईकानें सोलापुरचा किल्ला सरकारांत देऊन मुलेंमाणसेंसुद्धां सरकारांतून जावें व जहागीर संभाळून स्वस्थ रहावें. नाईक या गोष्टींस प्रथम कबूल नव्हता; परंतु रामचंद्र गणेशानें त्यास कोंडल्यानंतर तो वरील अटींस कबूल झाला. गोविंद शिवराम खाजगीवाल्यानें सखारामबापूस वळवून या अटीनुरूप नाईकानें वर्तावें असा उभयपक्षीं करार घडवून आणला.

१ पे. द. ३९. ६१ २ खरे पृ. ११०३. ३ खरे ११०६.

सोलापूर प्रकरण आटोपून माधवरावानें हैदराकडे परत मोर्चा फिरविला. सखारामबापू शिरे येथें लष्करास येऊन मिळाले. आजारीपणाच्या वगैरे नाना सबबी सांगून मोहिमेस येण्याचें ते टाळीत होते. परंतु पुढील वर्षीं त्यास मोकळीक मिळेल असें माधवरावानें आश्वासन दिल्यामुळें स्वारीचा कारभार करण्याचें बापूनें कबूल केलें. शिऱ्याच्या वेढ्यांत हैदराचा मेहुणा मिररेझा हा पेशव्यास शरण आला. तेव्हां त्यास माधवरावानें अभयवचन दिलें. पुढें चित्रदुर्गाकडे मराठ्यांच्या ढाला फिरल्या. मुरारराव घोरपडे व मिररेझा हे दळणवळणाच्या साधनाभावीं मागें राहिले. दोघे एकमेकांचे शत्रू.तेव्हां संधी साधून मुराररावाच्या लोकांनीं मिर रेझाचा गोट लुटला व सर्व सामानसुमान पळविलें. ही गोष्ट माधवरावास कळतांच त्यास पराकाष्ठेचा संताप आला. ज्या सैनिकांनीं हें कृत्य केलें त्यांचे हात तोडण्याचा माधवरावानें हुकूम दिला. मुराररावही या कृत्यांत सामिल आहे असें कळल्यावरून हुजुरातीस मुराररावास शिक्षा करण्यास आज्ञा केली. परंतु बापूनें मध्यस्थी करून विनंती केली कीं 'एक झालें म्हणून दुसरें आतां केलें तर वाईट' हें समजून कृपा करावी म्हणून मागून घेतलें. त्याचप्रमाणें मुरार-रावास शिक्षा केल्यास याचे परिणाम भयंकर होतील, हैदरास मराठ्यांत भांडणें लावण्याचें एक साधन निर्माण होईल यासंबंधीं योग्य कल्पना माधवरावास दिली. तेव्हां बापूचे शब्दास मान देऊन माधवरावानें आपला हेका सोडला,व गोपाळराव पटवर्धनास पाठवून मीररेझाचें समाधान केलें. बापूनें मुराररावास तात्पुरतें गुत्तीस जाण्यास सांगितलें आणि हें प्रकरण विझविलें. यादरून बापूनें माधवरावावर केवढा वचक ठेवला होता याची कल्पना येते.

मराठी सैन्यानें या प्रकरणानंतर श्रीरंगपट्टणावर चालून जाण्याचें ठरविलें. त्यामुळें हैदरानें तहाचें बोलणें लावलें. हैदरचा वकील अप्पाजीराम यानें मुराररावाचीं ठाणीं परत देण्याचें व रायदुर्ग व चित्रदुर्ग वगैरे संस्थानांस उपद्रव न देण्याचें हैदरातर्फे कबूल केलें. तसेंच ३२ लक्ष रुपये खंडणीच्या स्वरूपांत देऊन मराठ्यांनीं हैदराचा जिंकलेला मुलूख परत द्यावा, व त्याबद्दल हैदरानें पेशव्यास अर्काटचा नवाब महंमदअली व मद्रासचे इंग्रज यांच्यावर स्वारी करण्यांत मदत करण्याचें आश्वासन देऊं केलें. या अटी घालण्यामध्यें मराठ्यांस जाळ्यांत अडकविण्याचा हैदरचा विचार होता. बापूनें यामध्यें हैदराचा काय डाव आहे तो ओळखला. इंग्रजांविरुद्ध मराठ्यांची मदत मिळविण्याचा त्याचा डाव होता; म्हणजे मराठ्यांनींच इंग्रजांशीं युद्ध सुरू करावें आणि जर यदा कदाचित् त्यांचा पराभव झाला तर मराठ्यांना सहजच: आपल्या मुलुखांतून हांकून लावतां येऊन त्यांना दिलेला मुलूख परत घेतां यावा. मराठे यशस्वी झाल्यास हैदराचा जिंकलेला मुलुख परत देण्याची अट तहामध्यें आहेच.[1]

गोपाळराव पटवर्धनाची अशी इच्छा होती कीं हैदराच्या ह्या मागण्या पेशव्यांनीं मान्य कराव्यात; परंतु बापूनें खोल विचार करून या मागण्या नाकारण्याबद्दल व श्रीरंगपट्टणकडे कूच करण्याबद्दल माधवरावास सल्ला दिला. वस्तुतः या सर्व हैदराच्या लबाड्या होत्या. इंग्रज आणि मराठे यांमध्यें लढा लावून देऊन त्यांपैकीं एकाचा जरी पराजय झाला तरी हैदराचा फायदाच होता. दूरदर्शीपणानें या सर्व गोष्टी ओळखून माधवरावानें इतकी मोठी जबाबदारी अंगावर

१ खरे ले. ७०१.

घेतली नाहीं ही शहाणपणाची गोष्ट झाली; कारण अंतस्थ रीतीनें हैदरास इंग्रजांनीं थोडीशी मदत केलीच होती. मराठ्यांस अजून उत्तरेकडे कामें उरकावयाचीं होतींच; तसेंच राघोबा कोणत्या वेळीं काय करील याचा नेम नव्हताच; शिवाय निजाम व हैदर एक होतील ही भीति मराठ्यांस होतीच. म्हणून तेवढ्यापुरतें राजकारण संभाळणें त्यांना जरूर होतें. हैदरास फार प्रबळ होऊं न देणें, आपलीं कर्नाटकांतील ठाणीं सुरक्षित ठेवणें एवढेंच काम त्यांना करावयाचें होतें. तेव्हां राजकारणांतील बापूच्या या दूरदार्शित्वाबद्दल व धोरणीपणाबद्दल कोणीही त्याची वाखाणणीच करील.

माधवरावानें हैदराचें म्हणणें अमान्य केल्यावर हैदरानें अप्पाजी-राम यांस पाठवून पुन्हां पेशव्याशीं बोलणें सुरू केलें. बापूनें व पेशव्यांनीं त्यास चक्क सांगितलें कीं आम्हीं स्थळें घेतलीं तीं घेतलीं. तीं परत देतां येणार नाहींतच; परंतु सरकार तालुक्यापैकीं बाकी राहिलीं असतील तींही हैदरानें सोडावीं. हैदरानें निखालस वर्णूतक केल्यास या सरकारांतून किमपि उपद्रव होणार नाहीं अशीही खात्री केली.[1] शेवटीं बऱ्याच वाटाघाटीप्रमाणें तह ठरला. माधवराव रामशास्त्री यास लिहितात, "३३ लक्ष रु. खंडणी हैदराकडून मिळाली. चौदा लक्ष रु. निजामाचे घेतले. चिकबाळापूर तालुका व कोल्हार हीं ठाणीं त्यास दिलीं. मदगिरी, चेना, रायदुर्ग हे दोन पहाडी किल्ले व थोरले बाळापूर व होस्कोटे येथे पेसजी सरकारचें जें ठाणें होतें तें सरकारांत ठेविलें.[2] यावेळीं बापूनें व माधवरावानें गेल्या सालच्या दुप्पट खंडणी हैदरापासून घेतली व त्यास चांगलीच जरब बसविली.

१ खरे पृ. १२१७. २ खरे पृ. १२३५.

माधवरावाच्या हैदरावरील दोन्ही स्वाऱ्या यशस्वी करून दाखविल्याचें श्रेय सखारामबापू व गोपाळराव पटवर्धन यास आहे. गोपाळरावानें पेशव्यांचा शत्रू जो निजाम यास मिळण्याचें जें पातक केलें होतें ते हैदरावरील स्वाऱ्यांत जिवापाड मेहनत, कष्ट व दगदग सोसून साफ धुवून टाकलें आणि माधवराव पेशव्याचा लोभ संपादन केला. माधवरावांचा तेजस्वीपणा, बुद्धिमत्ता, कामाचा उरक, कडक शिस्त, वगैरे गुणांची या स्वाऱ्यांत चांगलीच कसोटी लागली. माधवरावाबरोबर खोटेपणा, दुट्टपीपणा, धकणार नाहीं. वेळेनुसार उलटून गळफांस पडावयाचा हें बापूसही समजून आलें. या दोन स्वाऱ्यांमध्यें बापूचें राजकीय वर्तन सरळ, राज्यहित साधणारें व कर्तेपणाचें होतें. मंत्रीपदाचें काम बापूनें उत्तम प्रकारें केलें. गुणज्ञ माधवरावानें वेळींप्रसंगीं पड खाऊन, त्याच्या शब्दास मान देऊन त्याजकडून तें करवून घेतलें.

माधवरावानें यानंतर इ. स. १७६९ व इ. स. १७७२ मध्यें अशा दोन स्वाऱ्या हैदरावर केल्या. मराठ्यांची पाठ फिरली न फिरली तोंच हैदरानें मराठ्यांच्या मुलुखास उपद्रव देण्यास सुरवात करावी. अशी स्थिति निर्माण होई; तेव्हां त्याचा बंदोबस्त करणें भाग पडे. या दोन्ही स्वाऱ्यांत सखारामबापू स्वारीवर कारभारी नव्हता. भोसल्यांच्या प्रकरणामुळें व राघोबाच्या मागण्यांमुळें बापूचा यांत कांहीं तरी हात–संबंध असावा असें वाटून माधवराव त्याजवरती नाखूष झालेला होता. इ. स. १७६९ मध्यें माधवरावानें मोरोबादादास कारभारीपद देऊन महादजीपंत गुरुजीस त्याचा मदतनीस नेमिलें होतें. त्यामुळें ही मंडळी स्वारीबरोबर होती. बापू त्यावेळीं सासवडींच होते. गोपाळरावानें माधवरावास " सखा-

रामबापू पुण्यांतही नाहींत व लष्करांतही नाहींत. उगाच बसणारे नव्हत " अशा अर्थाचें पत्र लिहिलें व माधवरावाचाही बापूबद्दल तोच ग्रह झालेला होता. तेव्हां ११ मार्च १७७० च्या सुमारास बापूनें आपल्याविरुद्ध कारस्थानें करूं नये म्हणून त्यास नंदिगड मुक्कामीं पेशव्यानें बोलावून घेतलें. परंतु पेशव्याचा दम्याचा विकार बळावल्यामुळें पेशवे व बापू पुणें मुक्कामीं लागलींच परत आले. इ. स. १७७२ च्या स्वारींत बापूस कर्नाटकांत जाण्याचें कारणच पडलें नाहीं. ती स्वारी त्रिंबकराव मामानें उरकली.

एकंदरीनें पाहतां हैदर व राघोबा या पानिपतानंतर मराठी साम्राज्यांस लागलेल्या जळवा होत. त्यांनीं शिरकाव मिळेल तेथें मराठी साम्राज्याचें रक्तशोषण केलें. हैदराचा पाडाव करण्यांतच व राघोबाची समजूत पटविण्यांतच माधवरावाचें सैन्यबल, संपत्तिबल व बुद्धिबल खर्च झालें. त्यामुळें इतर मनसुबे हातांत घेण्यास त्यास उशीर झाला. माधवरावाच्या पहिल्या स्वारींत सखारामबापूनें उत्तम व वाखाणण्याजोगा कारभार केला; परंतु पुरंदरच्या दंग्यापासून त्याचें मन द्विधा झालें. ही त्याची वृत्ति ओळखून प्रसंगीं सल्लामसलत विचारून, त्यास मोठेपणा देऊन, तो सर्वस्वी विरुद्ध जाणार नाहीं एवढें धोरण माधवरावानें ठेविलें. या व इतर अनेक बाबतींत माधवरावाचें बापूशीं वर्तन 'गरज सरो व वैद्य मरो' अशा स्वरूपाचें होतें, याबद्दल रा. पुरंदरे यांना वाईट वाटतें.[१] परंतु वाजवीपेक्षां जास्त महत्त्व कोणासही मिळाल्यास त्याचें पारडें जड होऊन जातें ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. तेव्हां राजकारणांतील पुढारी माणसानें तंबूप्रमाणें सर्व ठिकाणीं सारखे तणावे दिले पाहिजेत; तरच राजकारण उभें राहूं शकतें. तेव्हां बापूस वेळप्रसंग ओळखूनच

१ पु. द. भाग ३ 'प्रस्तावना' पहा,

माधवरावानें मोठेपणा, मान दिला व त्याजकडून मोठमोठालीं कामें करून घेतलीं व कांहीं वेळीं त्यास स्वस्थ विश्रांति घ्यावयास लाविलें. यावरून माधवरावाचें शहाणपण, व धूर्तता ही बापूसारख्या पट्टीच्या शहाण्यापेक्षांही कांकणभर जास्त होती हें स्पष्ट कळून येतें.

## प्रकरण ६ वें.

## बापूचा अधिकारन्यास.

माधवरावाची धारणाशक्ति, विषयाकलनसामर्थ्य, राज्यव्यवस्था उत्तम ठेवण्याची हौस, दक्षता ही असाधारण होती; परंतु बापूच्या अंतःकरणाचा ठाव त्यास घेतां येईना. कोठल्याही कामास बापू माधवरावास संमति देई; परंतु त्यांत अशी मेख मारून ठेवी कीं, पेशव्यांची मसलत निःसत्व होऊन जाई. अशा स्थितींत काय करावें हें एकान्तांत बापूस माधवरावानें विचारलें असतां बापूनें मोकळ्या मनानें त्यांतलें इंगित सांगितलें. " मला घरीं बसवून आपण कारभार करावा म्हणजे आपला बस चांगला बसेल. मी कामावर आहे तों-पर्यंत हें साधणार नाहीं, असें सांगतांच माधवरावानें त्यास घरीं बसवून मोरोबास कारभारी नेमिलें." अशी आख्यायिका सांगण्यांत येते. बापूस माधवरावानें घरीं बसविलें तरी सल्लामसलत विचारण्या-साठीं माधवराव त्यास मुद्दाम बोलावीत असे. बापूही ती यथायोग्य रीतीनें सांगण्यास कुचराई करीत नसे. परंतु दादाशीं त्याचें संधान असेच. माधवरावाचें गुप्त बातम्या काढणारें खातें एवढें मोठें विलक्षण

होतें कीं कोठें हूं का चूं झालें कीं त्याची बित्तंबातमी पेशव्यास लागे. बापूचीं एकदां दादास मोलकरणीच्या द्वारें गेलेलीं पत्रें पकडलीं गेलीं. अशाच प्रकारच्या किरकोळ पुष्कळ गोष्टी घडून आल्या. यावरून अधिकारभ्रष्ट असल्यामुळें बापूच्या अनेक प्रकारच्या खटपटी चालू होत्या असें म्हणावें लागतें; कर्नाटकाच्या स्वारीनंतर ८ वर्षेंपर्यंत बापूस घरीं बसावें लागलें. या अवधींत माधवराव व राघोबा यांचें बिनसल्यामुळें मध्यस्थी करण्याचें काम बापूनें केलें.

**चुलते पुतण्यांमधील बेबनावः**—माधवरावानें कर्नाटकांत दुसरी स्वारी केली त्याचवेळीं राघोबानें उत्तर हिंदुस्थानांत मोहिमेस जाण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें माळव्यांत उतरून गोहदेस वेढा दिला. बरेच दिवस झाले तरी किल्ला हातीं येण्याचें चिन्ह दिसेना; तेव्हां दादासाहेबांनीं पेशव्यास कुमक पाठवा म्हणून लिहिलें. परंतु कर्नाटकांत बरीचशी फौज गुंतली असल्याकारणानें पेशव्यास कुमक पोचवितां आली नाहीं. दादांचा वेढा चालविण्याबद्दल हट्ट कायमच होता. या बाबतींत महादजी शिंद्याचें व दादाचें बिनसलें. महादजी गोहदेकरास फितूर आहे असा संशय दादास आला. शेवटीं राणा जेव्हां दाद देईना तेव्हां नाइलाजानें १५ लक्षांचा करार करून दादास वेढा उठवावा लागला. या प्रसंगीं जी मानहानि झाली ती पेशव्यानें कुमक न पाठविल्या कारणानें झाली अशी दादांची समजूत झाली. आणि तें शल्य त्यांच्या मनांत राहिलें. शिवाय स्वारींत कर्ज झालें तें निराळेंच. स्वारीवरून दादासाहेब माघारा दक्षिणेंत आले. व त्रिंबकेश्वरीं मुक्काम करून हरिहरतीर्थास पोचले. त्या ठिकाणीं राहाण्यासाठीं तेथील किल्ला किल्लेदाराजवळ मागितला परंतु त्या अधिकाऱ्यानें नाना फडणवीसाच्या हुकुमाखेरीज किल्ला मोकळा करून देण्याचें नाकारलें. तेव्हां

दादासाहेबास संताप आला. अगोदरच झालेल्या मानहानींत हें अपमानरूपी तेल ओतलें गेलें. तेव्हां तेथून तसेंच परत फिरून दादा आनंदवल्लीस येऊन राहिले. आपण जपानुष्ठान करीत राहाणार, संन्यास घेणार, काशीस जाऊन राहाणार वगैरे भूमका पसरविल्या. ह्या गोष्टी माधवरावास कळतांच त्यानें कर्नाटकाची स्वारी लवकर आटोपण्याचें ठरविलें. दादासाहेबांनीं इकडे आनंदवल्लीस राहून गुप्तपणानें आपल्या हितचिंतकास पेशव्यांचा हुकूम न मानण्याबद्दल पत्रें लिहिलीं. त्याचप्रमाणें जानोजी भोंसल्याशीं संधान बांधिलें. इंग्रजांचा वकील चार्लस ब्रोम हा या सुमारास मुंबईकर इंग्रजांच्या सांगण्यावरून राघोबास भेटला असतां राघोबानें त्याचेजवळ इंग्रज सैन्याच्या मदतीची मागणी केली व त्याबद्दल खर्च देऊं म्हणून सांगितलें. परंतु ब्रोमनें राघोबास नक्की कांहींच आश्वासन दिलें नाहीं.[1] माधवरावास या सर्व गोष्टी जेव्हां कळल्या तेव्हां सखारामबापूस दादासाहेबांची समजूत काढण्यासाठीं आनंदवल्लीस जाण्यास सांगितलें. परंतु बापूनें ही जबाबदारी आपण घेऊं इच्छित नाहीं कारण त्यामुळें दोघांचाही (राघोबा आणि

१ इंग्रजांनीं यावेळीं राघोबाशीं संधान बांधून मराठ्यांच्या राजकारणांत आपल्यास कितपत हात घालतां येईल याची संधी ते चुलत्यापुतण्याच्या भांडणामध्यें पाहात होते. मुंबईचा प्रेसिडेंट कलकत्याच्या प्रेसिडेंटास १४ जून १७६८ मध्यें लिहितो कीं—"Though in hopes of profiting by this rupture, we have not tol l Raghoba in so direct terms about our help but shall endeavour to amuse him until what turn affairs are likely to take, as we understood both parties have actually taken the field." इंग्रजांच्या या लुडबुडीबद्दल माधवराव पुढील वर्षीं हैदरास मिळून इंग्रजास शह देणार होता. Forrest P. 153.

पेशवे ) रोष आपल्यावर होईल असें माधवरावास उत्तर दिलें. यावेळीं माधवरावानें बापूचा बिलकूल मुलाहिजा ठेविला नाहीं; एकदम त्यास राजीनामा देण्यास भाग पाडिलें, आणि मोरोबा फडणीसास कारभार सांगितला; पुण्यास आल्यानंतर स्वतः कारभार करावयाचें ठरविलें. 'रावसाहेबांची नजर करडी. स्वतः कारभार करावा. कोणाचें चालत नाहीं. बापूदेखील रंग जोगावून आहेत. '[१] यावेळीं सखारामबापू सासवडी जाऊन राहिले होतेच. यासंबंधीं एका पत्रांत "सखाराम बापू घरीं आहेत बोलाविल्यास दो चौ रोजा दरबारास जातात. विशेषा-स्कारें कारभारास मोरोबा फडणीस आहेत "[२] असा उल्लेख सांपडतो. ( ५-७-१७६७ ) दादासाहेबांनीं आपल्यास राज्याचा वांटा पाहिजे म्हणून बोलणें लाविलें. कधीं कधीं त्रिंबकेश्वराचे आसपासचे किल्ले द्यावे असें म्हणत असत.[३] प्रथम गोविंद शिवराम यांच्या मार्फत माधवराव व राघोबा यांच्यामध्यें बोलणीं होऊं लागलीं, परंतु राघोबानें आपल्यास राज्याचा वांटा पाहिजे असें कळविलें. सखारामबापूनें यावेळीं आपण होऊन दोघांत मध्यस्थी करण्याची खटपट सुरूं केली व माधवरावानेंही त्यास योग्य मान दिला. 'हाली सर्व बोलण्यांत बापू, त्या मागून गोविंदराव तात्या.' पहिल्या प्रथम राघोबाची समजूत काढण्याचें बापूनें नाकारलें असतां पुनः तेंच काम बापूनें कसे पत्करलें याबद्दल समाधानकारक पुरावा मिळत नाहीं. दादासाहेबांस वाटे कीं, बापू मजला बुडविणार नाहीं. तो रावसाहेबांचें मन वळवूं शकेल. परंतु ही आशा निष्फळ ठरली. बऱ्याच बोलाचालीनंतर चुलत्यापुतण्यानीं केवळ ५० स्वारांनिशीं

१ पे. द. १९-७२. २ पे. द. १९-९७. ३ पे. द. १९-८१.

भेटी घ्याव्या, असें ठरलें. गोविंद हरीनें यावेळीं माधवरावास पूर्वींसारखें फसूं नये म्हणून इशारत दिली[1].

सर्व प्रकरणाचा एकदम सोक्षमोक्ष करण्याचें ठरवून माधवरावानें मोठे सैन्यासह आनंदवल्लीस जाऊन राघोबाची गांठ घेतली व त्यांच्या मागण्या काय आहेत हें स्पष्टपणें त्यास समक्ष विचारलें. राघोबानें उत्तरेच्या स्वारींत झालेले २५ लक्षांचे कर्ज द्या म्हणजे माझें कांहीं म्हणणें नाहीं असें माधवरावास उत्तर दिलें. माधवरावानें ही गोष्ट तात्काळ कबूल केली व आपल्या चुलत्यास स्वस्थ रहाण्याबद्दल सांगितलें. वास्तविक पहातां माधवरावानें हें कर्ज पत्करणें मोठें जबाबदारीचें काम होतें. खजिन्यांत त्यावेळीं पैसा नव्हता. हैदराच्या स्वारीवर पुष्कळ खर्च झाला होता. तरीसुद्धां कोणीकडून तरी राघोबाशीं मिळतें घेण्याचा त्याचा विचार होता. परंतु राघोबाच्या बोलण्यांत बोल नव्हता. त्यानें आपली मागणी फिरवून पुनः तो अर्धे राज्य मागूं लागला. अखेर पुष्कळ वाटाघाटी होऊन सखारामबापूच्या मध्यस्थीनें पुढील अटी ठरल्या. ( १ ) दहा लक्षांची जहागीर व त्रिंबक, घोडप, मुल्हेर व अशेर हे किल्ले राघोबास द्यावे; वरकड सर्व हिंदुस्थान, गुजराथ यांचा बंदोबस्त रावसाहेबीं करावा. ( २ ) माधवरावानें दादासाहेबांचें २५ लक्षांचें कर्ज तीन महिन्यांत फेडावें. ( ३ ) मागील अन्याय चित्तांत आणून कोणाचें पारिपत्य करूं नये. ( ४ ) प्रत्येक सरदारानें रघुनाथरावास भेटून त्यास वडीलकीचा मान द्यावा. ( ५ ) सातारा, शिवनेर, नगर वगैरे किल्ले राघोबाच्या

---

[1] खरे पृ. १२८१; पटवर्धनांच्या फौजेस निरोप द्यावा म्हणून श्रीमंतांनीं कारभारी याचे सांगण्यावरून आज्ञा केली होती. परंतु गोपाळरावानें माधवरावास एकांतीं गांठून फौज ठेवून घेतली.

लोकांनीं रावसाहेबांच्या स्वाधीन करावें व सर्व कारभार माधवरावानें पाहावा.[१]

ही कलमांची याद सखारामबापू, गोविंद शिवराम, चिंतो विठ्ठल, व गोपाळ गोविंद यांनीं पहाटेपर्यंत बसून लिहिली. माधवरावानें मोरोबास बोलावून ४ किल्ल्यांच्या सनदा राघोबाच्या स्वाधीन करावयास सांगितलें ( १–११–१७६७ ). सखारामबापूनें या वाटाघाटींत नारदाचें काम न करतां अंगदशिष्टाई केली व राघोबास सर्वप्रकारें माधवरावाशीं भांडण्यांत नुकसान होईल हें सांगितलें. शेवटीं राघोबानें कांहीं अंशीं ही गोष्ट कबूल केली. परंतु पुष्कळ सरदारांना वाटलें कीं हा करार फार दिवस टिकणार नाहीं. कारण राघोबास पैशाची जरूर लागली किंवा इतर कांहीं भानगडी उपस्थित झाल्या, कीं राघोबा हा करार झुगारून देईल. माधवरावासही ही कल्पना होतीच. म्हणून तोही सावधच होता. करारावर सह्या वगैरे झाल्यानंतर माधवराव गंगापुरास गोपिकाबाईस भेटण्यास गेला व सखारामबापूही त्रिंबकेश्वरीं गेले. परंतु तीन दिवसांनीं राघोबानें सखारामबापूस बोलावणें पाठविल्यावरून ते आनंदवल्लीस गेले. राघोबास माधवरावाशीं झालेला करार नापसंत वाटला, तेव्हां चिंतो विठ्ठल, सखाराम हरी, आबा पुरंदरे यांनीं त्यास करारनामा न पाळण्याबद्दल भर दिली. या सर्वांच्या वाटाघाटी सुरू झाल्या. बापू त्यावेळीं आनंदवल्लीस असल्याकारणानें तो यापासून सर्वस्वी अलिप्त होता असें म्हणतां यावयाचें नाहीं. राघोबाजवळ यावेळीं सैन्य होतेंच शिवाय जानोजीची मदत त्यास येऊन पोचणार होती. परंतु ह्या सर्व गोष्टी पूर्ण

१ पे. द. १९. पृ. १०३

होण्यापूर्वींच माधवरावानें त्यास घोडप मुक्कामीं गांठलें,व त्या ठिकाणीं थोडीशीं चकमक होऊन राघोबा माधवरावाच्या हातीं सांपडले यासंबंधी बजाबा पुरंदऱ्याचें पुढील पत्र महत्त्वाचें आहे.

" सवधारी नाम संवत्सरे ज्येष्ठ वद्य तृतीया शुक्रवार मिति शके १६९० ते दिवशी श्रीमंत राजश्री दादासाहेब व श्रीमंत राजश्री माधवराव पंतप्रधान नजीक घोडप किला येथें तिकडून दादासाहेब जमी येत सुधा आले व इकडून पुण्याहून जमाव सुधा फौज वीस पर्यंत होती. सरदार गोपाळराव, नारोशंकर, रास्ते व महादजी शिंदे खेरीज खासगीचे लोक ऐसे मिलोन जुझाचा दिवस जेस्ट वद्य तृतीया शुक्रवारी पूर्व प्रहरीं लढाईचा मजकूर फौजेनें निकाल काढून मग दादासाहेब धोडप किलयावर गेला वडिलाच्या मनांत ममता उपजोन खालते भेटीस आले प्रथम केदारजी शिंद्यास रायापासून सोडविला सारांश जेस्ट वद्य पंचमी रविवारीं उभयतांच्या भेटी होऊन दादा-कडील दिवाण कारभार चिंतो विठ्ठल करीत होता त्याने थोडेसे लढाईचे प्रसंगास फौजेसह वर्तमान लागू झाला तो धरला गेला जखमही लागली त्याचा भाऊ मोरो विठ्ठल विल्हे लागला गंगोबा होलकराचा यास अहमदनगरचे किलयावर ठेवून मजल दरमजल फिरोन पुण्यास दाखल जाला. ज्येष्ठ (आषाढ) शुध आस्टमी बुधवारी सा घटका रातीस खासा आपण श्रीमंत दादासाहेबाचे उजवे बाजूस येका अंबारींत बैसोन बहुत आनंदमये घरास पोचले आवध्या मुदसदेसह वर्तमान पोचले. आागदी तोफाचे बार जाले नले चाद्रजोती गणती आागल्या आसे पर्वतीपासून च्यार घटका गुजरोन सुमुहूर्ते सावे घटकेस दाखल जाले आसेत. श्रीमंत रावसाहेबांची फते जाहली ...." (अपूर्ण) [१]

१ पु. द. ३ पृ. १०७.

दादासाहेब माधवरावाच्या स्वाधीन झाल्यावर त्यास पुण्यास आणून शनवारवाड्यांत नजर कैदेंत ठेविलें. या मसलतींत जे जे लोक होते त्यांचा माधवरावानें खरपूस समाचार घेतला. सखारामबापूचे सातारच्या छत्रपतीकडे जे फडणवीसी हक्क होते ते काढून मोरोबा फडणविसास दिले. तसेच सिंहगड, रुद्रमाळ वगैरे किल्ले सरकारांत घेतले. बापूच्या फौजेचा सरंजामही कमी करण्यांत आला. फक्त त्याचें उत्पन्न मात्र चालविलें. बापूनें म्हातारपणीं आतां स्नानसंध्या करून घरीं स्वस्थ बसावें व विचारल्यास सल्लामसलत द्यावी ही अट त्याजकडून कबूल करून घेतली व त्याचें 'स्वरूप' राखलें. माधवरावानें होळकराचा दिवाण गंगाधर यशवंत यास कैदेंत टाकून त्याची चांदवडची जहागीर जप्त केली. त्याच्या मुलानें ३२ लक्ष रुपये एवढा मोठा भूर्दंड भरल्यानंतर त्याची सुटका केली. तसेंच आबा पुरंदऱ्याचा ४ लक्षाचा सरंजामही सरकारजमा करण्यांत आला. बापूस अशा प्रकारची कडक शिक्षा माधवरावानें केली नाहीं ही लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे.

घोडपनंतरही सखारामबापू सासवडींच होते. माधवरावानें पुढील वर्षी भोंसल्यावर स्वारी केली व जानोजी भोसल्याचा पराभव केला. भोसल्याचा दिवाण दिवाकर पंडीत हा बोलाचाली करण्यास आला असतां माधवरावानें त्यास कैद केलें. तरी कैदेंतून त्यानें जानोजीशीं संधान बांधून पेशव्यांच्या मुलुखावर स्वारी करण्याचा त्यास सल्ला दिला. माधवराव, गोपाळराव पटवर्धन यांच्या दक्षतेपुढें या काव्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं व जानोजीस तह करणें भाग पडलें. कनकापूरच्या तहानंतर माधवरावानें जानोजीस भेटून दिवा-

कर पंडिताचीं कारस्थानें कशाप्रकारें चालतात याची जानोजीस इत्थंभूत माहिती दिली. या स्वारीचे सुमारास बापूची एक आख्यायिका सांगतात कीं भोसल्याचे वकील पेशव्यांचेकडे भेटीस आले असतां पेशव्यानें त्यांच्याकरवीं जानोजीस पुण्यास बोलाविलें. पुढें ते वकील बापूस भेटावयास गेले असतां त्यावेळीं बापू बुद्धिबळें खेळत होते. माधवरावाच्या कारकुनासमक्ष "तुमचा राजा एक घर मागें न्यावा आणि प्यादी एक घर पुढें द्यावी" अशा अर्थाची खेळांतली परंतु गर्भित सूचना त्यांनीं केली. भोसल्यांचे वकिलानें तेवढें ध्यानांत ठेवून जानोजीस पेशव्यांचे भेटीस न येण्याबद्दल व फौज पुढें पाठवण्याबद्दल लिहिलें. ही गोष्ट माधवरावास कळतांच त्यास एकदम सर्व प्रकाश पडला. अर्थात् भोसल्यांच्या वकिलाची त्यानें चांगलीच कानउघाडणी केली. ही आख्यायिका बापूच्या बुद्धिमत्तेची व त्याचीं कारस्थानें कशाप्रकारें चालत याचें उदाहरण म्हणून सांगतां येईल. माधवरावानें उत्तर-हिंदुस्थानच्या स्वारीस विसाजी कृष्ण बिनीवाले, वगैरे सरदारास पाठविलें परंतु त्याचा बापूच्या चरित्राशीं फारसा संबंध येत नसल्यामुळें त्यासंबंधाची माहिती येथें देण्याची जरूरी नाहीं. पानिपतानंतर मराठ्यांचें उत्तरेंत पुन्हां वर्चस्व स्थापण्याएवढी महत्त्वाची कामगिरी विसाजी कृष्णानें केली.

कर्नाटकच्या ३ ऱ्या स्वारीहून परत आल्यावर माधवराव दम्याचे विकारानें अजारी पडला. तेव्हां थेऊर मुक्कामीं सर्व मंडळी जाऊन राहिली. शके १६९४ ज्येष्ठ महिन्यापासून माधवरावानें सखाराम-बापूस बोलावून आणून **कारभारी** नेमिलें व आपले धाकटे बंधु नारायण त्यांचे हातीं दिले. 'नारायणरावांनीं सखारामपंताचे विचारें करावें'

असें सांगितलें. ह्या कारभाराच्या कामावर बापू माधवरावाचे मृत्यूपर्यंत होता. आजारीपणांत माधवरावाच्या जवळ बसून त्याची शुश्रूषा करून औषधपाणी देण्याचें काम बापू स्वतः करीत असे असा उल्लेख पुरंदरे दप्तरांत आढळतो.[१] माधवरावानें यावेळीं राघोबासही कैदेंतून सोडिलें व बापूच्या समक्ष दोघांच्या फितुरीचे कागद जाळून टाकिले,[२] अशी एक आख्यायिका सांगतात. ती कितपत विश्वसनीय आहे हें सांगवत नाहीं. आजारांत वेदना असह्य झाल्यामुळें माधवराव बापूस खंजीर मागे. हेतु हा कीं या यातनांतून सुटावें परंतु बापू त्यास या मार्गापासून परावृत्त करी. माधवरावानें बापू व नाना यास एक नऊ कलमी याद करून दिली. त्यावरती बापूनें 'नऊ कलमें सदरहू लिहिलें अन्वयें श्रीगणपतीची शपथपूर्वक करूं " असें लिहून दिलें. या यादींत दौलतीचें कर्ज वारावें, काशी प्रयाग वगैरे क्षेत्रें घ्यावींत, राघोबास ५ लक्षापर्यंत जहागीर द्यावी वगैरे कलमें होतीं.[३] त्यानंतर कांहीं दिवसांनीं म्ह० १८ नोव्हेंबर १७७२ मध्यें माधवरावाचें देहावसान झालें. मरणसमयीं माधवरावानें सखारामबापूकडून " माझ्या जीवांत जीव आहे तोंपर्यंत नारायणरावाचें रक्षण करीन " अशी शपथ घेतली होती.

माधवराव पेशवा न्यायी, गरिबांचा कनवाळू, कर्तबगार, धोरणी व कडक शिस्तीचा मनुष्य होता. लबाडी, लांच खाणें वगैरे गोष्टी

---

१. पु. द. ३. ले. १०७–८. २ रा. ६-५१०–१. एके दिवशीं माधवराव पुष्कळशीं पत्रें जाळीत बसले असतां सखारामबापू तेथें आले. त्यांनीं हें काय म्हणून विचारतांच 'कोणाचें नुकसान होऊं नये म्हणून हे फितुरीचे कागद जाळतों' असें माधवरावानें सांगितलें. असे कागद रक्षावे असें बापूनें म्हणतांच त्यांच्या फितुरीचे कागद त्यांचेपुढें टाकिले, तेव्हां बापू सर्द जाहले. माधवरावांनीं त्यांचेही कागद जाळून टाकिले. ३ ऐ. स्फु. ले. ३-२३

त्यास बिलकूल खपत नसत. पानिपतानंतर विस्कळीत झालेली मराठी राज्याची घडी नीट बसविण्याचा त्यानें प्रयत्न केला, त्यामुळें सर्व पेशव्यांमध्यें त्यास पहिल्या प्रतीचा मान मिळतो. ग्रँट डफही माधवरावाच्या मृत्यूमुळें मराठी साम्राज्याची इमारत ढासळण्यास सुरवात झाली, असें दुःखोद्गार काढितो. केंब्रिज हिस्टरीमध्यें माधवरावाबद्दल पुढील उल्लेख चिंतनीय आहे. " He was a man of unusually fine character, an invariable supporter of the weak against the strong, of the poor against the rich. He stood for justice & equity in all things, fought vigorously if with but little result against the rampant corruption of his days. His death swept away the only barrier which restrained the floods of political intrigue and they now rushed forward what was left of the foundations of Maratha ascendancy laid by the Great Shivajee." **Cambridge History of India**. Vol 5–p. 253

माधवरावानें आपल्या कारकीर्दीच्या अखेरीस बापूस पुनः लोभांत घेतले होते व त्याजबद्दल आपुलकीची भावना प्रगट केली होती व बापूचाही माधवरावाबद्दल तितकाच जिव्हाळा निदर्शनास आला. राजकार्यधुरंधर बापूची कर्तबगारी माधवराव ओळखीत असल्यामुळें त्याच्या व राघोबाच्या हातांत अल्पवयी नारायणरावास दिले व सर्व विसरा म्हणून सांगितलें ही गोष्ट राज्याच्या हिताचीच झाली. वादास वाव उरूं नये अशी व्यवस्था करण्यांत माधवरावाचा दूरदर्शिपणा जो दिसून आला त्याबद्दल व त्याच्या इतर कामगिरींमुळें सर्व पेशव्यांमध्यें त्यास श्रेष्ठ स्थान मिळते.

**बापूच्या कारभाराचें समालोचनः**—माधवराव व नारायणराव यांच्या कारकीर्दींतील सखारामबापूच्या कारभाराचे हप्तेः—

पहिला २०–७–१७६१ ते १४–१–१७६२
दुसरा ७–११–१७६२ ते १७६४ अखेर
तिसरा नोव्हेंबर ते डिसेंबर १७६९
चौथा २०–६–१७७२ ते २२–४–१७७३

माधवरावाच्या कारकीर्दींत सखारामबापूची खरीखुरी कामगिरी दिवाणगिरीच्या पहिल्या दोन हप्त्यांमध्येंच झालेली आहे. कारभारी या नात्यानें मुख्य दौलत राखण्याचें महत्त्वाचें काम त्यानें केलें. पानपतानंतर निजामाशीं टक्कर देण्याचें काम मोठ्या धोरणानें, कौशल्यानें करून त्यास राक्षसभुवनच्या लढाईत नामोहरम केले. या बाबतींत बापूची तुलना इंग्लडच्या इतिहासांतील थोरल्या पिटशीं करतां येईल. सप्तवार्षिक युद्धांत इंग्रजांची चोहोंकडून हलाखी असतांना पिटनें पुढें येऊन मुख्य सूत्रें हातांत घेतलीं व नवीन व्यवस्था अमलांत आणून युद्धाचें पारडें फिरविलें; किंवा लॉइड जॉर्जनें ज्याप्रमाणें मुत्सद्देगिरीनें अमेरिकेचें सहाय्य मिळवून गेल्या महायुद्धांत जर्मनांना शस्त्रास्त्रें खालीं ठेवण्यास भाग पाडिलें, तद्वतच निजामानें मराठी राज्यांत प्रलय मांडला असतां सखारामबापूनें पुढें होऊन 'मीच आपल्या राष्ट्राचें रक्षण करीन. तें इतर कोणासही करतां येणार नाहीं,' अशी पिटप्रमाणें घोषणा करून व मुत्सद्देगिरीच्या जोरावर भोसल्यास फोडून निजामाचा पराभव केला. बापूची ही कामगिरी पेशवाईच्या इतिहासांत फारच महत्त्वाची गणली पाहिजे. माधवरावांनीं व राघोबांनीं याबद्दल 'बहुत स्तव केला' असा उल्लेख स्वतः बापू एका पत्रांत करतो.[1]

---

१ पे. द. ३९·६१

बापूच्या शत्रूंनीं–विशेषतः पटवर्धनांनीं–मात्र त्याजवरती दोन्ही डिगरींवर हात ठेऊन स्वतःची तुंबडी भरणें हें त्याचें ध्येय होतें. सर्वांचा निःपात करण्यासाठीं किंबहुना पेशवाईचा नाश करण्यासाठीं ' विठ्ठल सुंदरची शागिर्दी करीन परंतु आपले मनोरथ सिद्धीस नेईन ' अशी बापूची प्रतिज्ञा होती वगैरे आरोप केलेले आहेत. सुप्रसिद्ध इतिहासाचार्य राजवाडे यांनींही ' सखारामबापूचीं कारस्थानें भूल पाडणारी असत. तो कलिपुरुष आहे अशी गोपाळराव पटवर्धनाची खात्री होती. आपणच दंगा करावयाचा, आपणच तो मोडावयाचें श्रेय घ्यावयाचें व घटकेंत आपणच राजनिष्ठ बनावयाचें हे सारे सखारामाचे खेळ असत, "[1] अशी सणसणीत विरुद्ध टीका बापूवर केलेली आहे. राजवाड्यांनीं हीं अनुमानें बहुधा पटवर्धनी दप्तरांवरून काढलेलीं असावीत. पटवर्धन हे बापूचे शत्रू असल्यामुळें त्यांच्या पत्रांतील पुष्कळ गोष्टी वजा करावयास पाहिजेत. तेव्हां अशा प्रकारची बापूचीं कारस्थानें होतीं किंवा नाहीं याबद्दल पुष्कळसा इतर पुरावा अजून पुढें आला पाहिजे. त्याशिवाय बापूचें खरें स्वरूप समजणार नाहीं. कसेंही असलें तरी बापूनें ' दौलत पुरती राखली ' ही गोष्ट पेशवेदप्तरावरून सिद्ध होते.[2]

माधवरावाच्या कर्नाटकांतील स्वाऱ्या बापूनें यशस्वी करून दाखविल्या व मोठा नांवलौकिक मिळविला. परंतु राक्षसभुवन व पुरंदर प्रकरणामुळें बापू व माधवराव यांनीं एकमेकांचा रंग जोगावला आणि दोघेहि एकमेकांस यापुढें पुरें ओळखून वागूं लागले. माधवरावानें बापूची नाडीपरीक्षा अचूक केली. बापूचा राघोबाकडे कल दिसूं लागतांच त्याच्याच विनंतीवरून म्हातारपणामुळें त्यास घरीं

१ रा. प्र. पृ. १०० २ पे. द. ३९. ६१.

कै. म. म. द. वा. पोतदार

बसविलें व स्वतः राज्यकारभार चालविला. सरंजाम मात्र त्याजकडे कायम ठेविला. वंदन किल्ल्याची सनद देतांना 'दौलतींचे व आमचे लक्ष धरून चालावे. आमचे बऱ्यांत आपलें बरे, आमच्या वाईटांत आपले वाईट याप्रमाणें चालल्यास अंतर होणार नाहीं. तेव्हां शपथपूर्वक यावत्‌शक्ती आमचे बरे तेच करावें"[१] अशी ताकीद बापूस दिली. तरीसुद्धां रिकामपणचा खेळ म्हणून चुलतेपुतण्याचा वाद बापूनें उकरून काढिला असा बापूवर आक्षेप येतो. परंतु माधवरावास या वादाचें जनकत्व बापूकडे आहे याबद्दल जर भरपूर पुरावा बापूविरुद्ध मिळाला असता तर त्यास ताबडतोब शासन झालें असतें. तसें झाल्याबद्दल अजून तरी निश्चितपणें उल्लेख पुढें आला नाहीं. बापूचा राघोबाकडे ओढा असे; परंतु राघोबाचे बापूशिवाय इतर पुष्कळ सल्लागार असत, तेव्हां या सर्व कटकटी बापूनेंच निर्माण केल्या असें म्हणतां येणार नाहीं. एखाद्या व्यक्तीकडे कल असणें वेगळे व त्या व्यक्तीस हाताशीं धरून कारस्थानाची उभारणी करणें या दोन्ही भूमिका निरनिराळ्या आहेत. तेव्हां ह्या वादाच्या मुळाशीं बापू नसला तरी तो सर्वस्वी अलिप्त होता असें वाटत नाहीं. माधवरावांनेंही बापूस पुष्कळ सौजन्यानें वागविलें आणि बापूनेंही माधवरावावर वचक ठेवला होता. बापूची सल्लामसलत माधवराव महत्त्वाच्या कामांत घेत असे. यावरून बापूची योग्यता व कामगिरी अजमावतां येण्यासारखी आहे.

---

१ इ. सं. सनदापत्रें. १६९.

# प्रकरण ७ वें

## नारायणरावाचा खून.

माधवरावाच्या मृत्यूनंतर बापू व राघोबा यांनीं नारायणरावास सातान्यास नेऊन पेशवाईचीं वस्त्रें घेतलीं. राघोबास रीजंट नेमण्यांत येऊन सखारामबापूस कारभारीपदावर कायम करण्यांत आलें. नाना-फडणवीसास फडनविशी मिळाली. नारायणरावाचें वय यावेळीं १७ वर्षांचें होतें. परंतु माधवरावासारखा समजूतदारपणा त्याचें अंगीं नव्हता. माधवरावाचा तापटपणा व तरतरी याचें अनुकरण करण्याचा नारायणराव प्रयत्न करी. परंतु मागचेंपुढचें धोरण, माणसांची परीक्षा व किंमत हीं त्यास कळत नव्हतीं. मरतेसमयीं माधवरावानें नारायणरावांस सखारामबापूच्या धोरणानें वागत जा म्हणून सांगितलें होतें. परंतु नारायणरावानें त्याकडे फारसें लक्ष दिलें नाहीं. एके प्रसंगीं सखारामबापूचा त्यानें भर दरबारांत शिवीगाळ करून अपमान केला. राघोबाची मुलगी दुर्गाबाई हिचें लग्न बाबूजी नाईक बारामतीकर यांच्या मुलाशीं ठरविलें होतीं. त्यांच्या माणसांनीं पार्वती-बाई(सदाशिवरावभाऊची बायको) सोंवळी झाल्याशिवाय लग्नसमारंभ घडवून आणण्याचें नाकारलें. तेव्हां बापू व राघोबा यानीं तो विधि उरकण्याचें ठरविलें.[1] परंतु नारायणराव त्यांच्या विरुद्ध होता. त्यास माधवरावाच्या मृत्यूनंतर लागलीच हें लग्न व्हावें हें पसंत नव्हतें. सखारामबापूनें नारायणरावास चार गोष्टी सांगण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यामुळें नारायणराव उलटा बापूवर फारच बिथरला.

सखारामबापू व नारायणराव यांच्यामध्यें खटका उडण्याचें दुसरें

---

१ खरे पृ. १९७७.

कारण असें झालें कीं, पटवर्धन सरदारांनीं सरकारांत भरणा केलेला नव्हता म्हणून त्याबद्दल सखारामबापू व राघोबा यांनीं पटवर्धनांचें मागें तगादा लावला. या बाबतींत बापू व राघोबा एक मतानें वागतात याचें नारायणरावास वैषम्य वाटूं लागलें. ता. १४–३–१७७३ मध्यें नारायणराव गोपिकाबाईस भेटण्यासाठीं गंगापुरास गेला. बरोबर सखारामबापू व वामनराव पटवर्धन हेही गेले. गोपिकाबाईनें नारायणरावास सखारामबापूला कारभारावरून काढण्याबद्दल सांगितलें, आणि नारायणरावानें ती गोष्ट मान्य केली.[१] 'स्त्रीबुद्धिः प्रलयं गता' दुसरें काय? याचा परिणाम नारायणरावास लवकरच भोगावा लागला. माधवरावासारख्या धोरणी पेशव्यानें नारायणरावास सखारामबापूच्या स्वाधीन केलें होतें तें कांहीं माधवराव मूर्ख होता म्हणून नव्हे. त्यानें बापूचें कर्तृत्व व शत्रुत्व या दोहींचा अनुभव घेतला होता. व पूर्ण विचारांतीं त्यानें ही गोष्ट केली होती. गोपिकाबाई व नारायणराव यांना मात्र या गोष्टीची कल्पना नव्हती.

एवंच परस्पराबद्दल विकल्प आल्यामुळें दादासाहेब व नारायणराव यांच्यामधील द्वैतभाव वाढत गेला. त्यांत अविचारी लोकांच्या सल्ल्याची भर पडली; त्यामुळें नारायणरावानें दादास पुनः प्रतिबंधांत ठेविलें. हें कृत्य करूं नये म्हणून बापूनें नारायणरावास सांगितलें; परंतु तें त्यानें ऐकलें नाहीं. दिवसेंदिवस सखारामबापूचें तर त्यानें न ऐकण्याचें ठरविलें आणि सखारामबापू विरुद्ध नाना फडणवीस हाताशीं धरला.[२] परंतु नानाचेंही तो ऐकत नसे. राघोबानें हैदरअल्लीकडे[३] व नागपूरच्या भोसल्याकडे

---

१ Forrest p. 250. २ किंप्रजेल. पृ. २११.

३ किंप्रजेल. पृ. २१२. राघोबानें अप्पाजीरामाबरोबर (हैदराचा वकील) पळून जाण्याचा प्रयत्न केला व त्याबद्दल नारायणरावानें अप्पाजीरामास जेरबंदानें ठोकला अशी माहिती किंप्रजेल देतो.

कैदेंतून सुटून जाण्याविषयीं कारस्थान केलें. हें कारस्थान नारायणराव गंगापूराहून परत आल्यानंतर उघडकीस आलें. त्यामुळें दादासाहेब व आनंदीबाई यांची कैद फारच कडक करण्यांत आली. दुसरी गोष्ट अशी घडली कीं नारायणराव राघोबास राज्यकारभारासंबंधीं सल्लामसलत विचारण्यास जाई; परंतु राघोबा त्याकडे मुळींच लक्ष देत नसे. या अपमानानें चिडून जाऊन नारायणरावानें दादांचा कैदेंत छळ चालवला. त्यामुळें त्यांचे खाण्यापिण्याचे हाल होऊं लागलें. सखारामबापू व मोरोबा फडणीस यानीं नानासाहेब पेशव्यांच्या कारकीर्दीमध्यें दादासाहेबांचा खर्च ८० लक्ष रुपये होता तरी नानासाहेब उदारपणानें तितकेंही चालवीत; तुम्ही त्यांचा खर्च कमी करूं नये वगैरे गोष्टी सांगून नारायणरावाची समजूत घालण्याचा प्रयत्न केला; परंतु त्याचा कांहींही उपयोग झाला नाहीं. या सुमारास नारायणरावानें सखारामबापूस कारभारावरून काढून नानाफडणीसास कारभार सांगितला. ही गोष्ट १२ एप्रिलचे सुमारास घडली. कैदेंतील छळ असह्य झाल्यामुळें दादासाहेब व आनंदीबाई यांनीं उपवास करण्यास सुरवात केली. आनंदीबाईनें सखारामबापूस आपल्या हालअपेष्टांची कहाणी कथन केली व या बाबतींत बापूसारख्यानें कांहींच मदत न केल्यास जीभ हांसडून प्राण देऊं अशी घोर प्रतिज्ञा केली. या गोष्टीमुळें बापूसही फार वाईट वाटलें व तो राघोबाच्या सुटकेची योजना करण्याच्या खटपटीस लागला.

बापूची आणखी एका तऱ्हेनें नारायणरावानें मानखंडना केली होती. वसईचा सुभेदार विसाजीपंत लेले हा बापूचा मित्र होता. त्याजवरती लांच खाल्ल्याचा व सरकारी वसुलाची अफरातफर करण्याचा आरोप येऊन चौकशीमध्यें तो अपराधी ठरला व त्यास नोकरीवरून

काढण्यांत येऊन १० लक्ष रुपये दंड ठोठावण्यांत आला. ही गोष्ट माधवरावाचे कारकीर्दींत घडली. आतां सखारामबापू कारभारी झाल्यानंतर विसाजीपंतास फिरून वसईचा सुभा देण्याची बापूनें सूचना केली. परंतु नारायणरावानें त्यास विरोध केला व त्याच्या नेमणुकीची गोष्ट काढण्याबद्दल बापूस शिव्या खाव्या लागल्या.[1] यामुळें नारायणराव व बापू यांमध्यें खूपच वितुष्ट आलें.

नारायणराव यावेळीं सर्वांसच अप्रिय होऊं लागला. त्यानें मुधोजी भोसल्याचे जे प्रभु वकील पेशव्यांचे दरबारीं होते त्यांना राजद्रोहाच्या संशयावरून कैद केलें. याच वेळीं पुण्यांत वेदोक्तावरून प्रभुप्रकरण उपस्थित झाले. नारायणरावानें सखाराम हरी, विठ्ठल यशवंत पोतनीस, रामचंद्र जिवाजी सबनीस वगैरे प्रभु पुढाऱ्यांस बोलावून आणून ब्राह्मणाप्रमाणें वेदोक्त न करण्याबद्दल त्यांचेकडून **नऊ कलमी** याद लिहून मागितली. वरील लोकांनीं याची अंमलबजावणी करण्याचें नाकारतांच त्यांना तुरुंगवासाची शिक्षा सांगण्यांत आली व पुष्कळ लोकांचा अत्यंत क्रूरतेनें छळ करण्यांत आला. या सर्व गोष्टींचा परिणाम म्हणजे दादासाहेब व तत्पक्षीय मंडळी यांनीं कट रचिला त्यास पुष्कळ प्रभू लोकांनीं मदत केली व या कटाचें पर्यवसान नारायरावाचा ३० ऑगस्ट १७७३ मध्यें अमानुष खून होण्यांत झालें.

नारायणरावाच्या खुनासंबंधीं निरनिराळ्या हकीकती आढळतात. नागपुरकर भोंसल्यांच्या बखरींत भोसल्यांचे प्रतिनिधी लक्ष्मणराव व व्यंकटराव काशी यांनीं सखारामबापूची गांठ घेऊन प्रभु प्रकरणाबाबत त्याचा सल्ला विचारला, व गारद्यांचे पुढारी सुमेरसिंग, खरकसिंग

१. Forrest p. 250.

व महंमद युसफ यांच्या साहाय्यानें नारायणरावाचा खून घडवून आणला अशी हकीकत आढळते. परंतु या खुनाबद्दल कोणाही प्रमुख प्रभु पुढाऱ्यांस फांशीं दिल्याचें उदाहरण आढळत नाहीं. खुनाबाबत पुढें बऱ्याचशा गारद्यांना मात्र ठार करण्यांत आले. पेशव्यांच्या बखरींत बापू व मोरोबा यांनीं राघोबाच्या मुक्ततेकरतां ' नारायणरावास धरावें ' अशी अक्षरें लिहून एक चिठ्ठी गाडद्यांच्या पुढाऱ्यांजवळ रघुनाथरावाच्या सहीकरतां दिली. ती आनंदीबाईच्या आकस्मिक हातीं आल्यावर तिनें 'ध'चा 'मा' केला अशी हकीकत आहे. यावरून कटाची सर्व जबाबदारी बापू व मोरोबा यांच्यावर पडते व नारायणरावाच्या खुनाचें जनकत्व आनंदीबाईकडे येते. तुळ्या पवाराची जी जबानी उपलब्ध आहे त्यावरून सखारामबापूनें तो कट रचिला व महंमद युसफकरवीं नारायणरावास ठार मारिलें असें सिद्ध होतें. पेशवे दप्तरांत आनंदीबाईची जी दिनचर्या प्रसिद्ध झाली आहे त्यांत आनंदीबाई " नारायणरावास दगा जाहला हेंहि आम्हांस ठाऊक नाहीं याविसी आमचे अंगीं लावणारानें लावावें आमचा विस्वास कायें गेला. "[१] असें म्हणते. म्हणजे नारायणरावाच्या खुनाबद्दल संपूर्ण अज्ञान दर्शविते. पुरंदरे दप्तरामध्यें पुढील हकीकत आढळते. ' श्रीमंत स्वारींत पर्वतीस जाऊन राघोजी आंगरे सरखेल कुलाबियाचे आले होते. त्यास भेटून वाडियास आले.... वर्तमान कळलें कीं गाडदी दंगावा करणार याचा बंदोबस्त करावयास हरि बल्लाळ यास सांगितला. व ते रंगो कान्हेर येकबोटे यांचे घरीं जेवावयास गेले. श्रीमंत जेऊन महालांत गेले तो सुमेरसिंग व मोहोंमद इसफ गाडदी याचा सरदार तलबाचा हंगामा

१ पे. द. ७-४५

म्हणोन वाडियाजवळ येऊन खिडकी पाडिली. त्या वाटेनें वाडियांत चढले....श्रीमंत महालांतून निघून श्रीमंत रघुनाथ बाजीराव आपले महालांत होते त्याजकडे गेले....तुळ्या पवार यानें मागें वोढून घेतले तो सुमेरसिंग यानें तलवारीचे वार टाकिले.'[१]

या सर्व हकीकती ताडून पहातां नारायणरावाच्या खुनाच्या कटांत कोणकोण मंडळी सामील होती हें नक्की ठरवितां येत नाहीं. मात्र नाना फडणवीस व हरीपंत फडके हे निश्चितपणें त्यांत नव्हते असें म्हणतां येईल. "राघोबास मुक्त करण्याचा कट नारायणरावाचा खून होण्यापूर्वीं सहा महिने झाला होता. त्यांत पुष्कळ मोठमोठी मंडळी (नानाफडणीस व हरीपंत यांच्याशिवाय) सामील होतीं. कटवाले नारायणरावास पकडण्याच्या प्रयत्नांत होते. परंतु तशी संधीच त्यांना मिळाली नाहीं. ता. ३० ऑगस्ट रोजीं मात्र वाड्यांत पहारेकऱ्यां शिवाय कोणीही नव्हते. आणि ही संधी मात्र कटवाल्यांनीं बरोबर साधली. यावेळीं नाना फडणवीस हे मुख्य कारभारी होते. परंतु त्यांनाही कटाचा सुगावा नव्हता ही महदाश्चर्याची गोष्ट आहे. गाडदी अस्वस्थ आहेत हें कळूनसुद्धां नाना व हरिपंत फडके यांनीं कोणीच त्याबद्दल फिकीर बाळगली नाहीं. प्रत्यक्ष खून करण्याचे कामीं पुढाकार घेण्यामध्यें महंमद युसफ व सुमेरसिंग आणि ५०० गाडदी हें प्रमुख होते असें म्हणतात व त्यांना **याकामीं राघोबाचा हुजऱ्या देसान व इतर चाकर यांनीं राघोबाच्या सांगण्यावरून वश करून घेतलें होते.** मुधोजी भोसल्याकडून राघोबा व सखारामबापू यांना नारायणराव बेड्या घालणार[२] असें कळल्यामुळें नारायणरावास मारण्याची मसलत कटवाल्यांनीं फार जलदीनें अमलांत आणिली.

१ पु. द. ३. १२४–२५. २ Forrest p. 250.

आपल्यास कैद करण्याचा बेत चालला आहे अशी इशारत खुद्द नारायणरावास मिळाली होती असें सांगतात तें खरें वाटत नाहीं. नारायणराव नुकताच जेवून वामकुक्षी करण्याकरतां वाड्यांत गेला. ही संधी साधून गाडदी वाड्यांत शिरून नारायणरावाचा शोध करूं लागले. नारायणराव त्यांच्या भयानें पळून राघोबाजवळ गेला आणि 'आपण राज्य करा मला तें नको माझा तेवढा जीव वांचवा' असें त्यास काकुळतीनें विनविलें. या गडबडींत नारायणरावाच्या पाठीवर एक लहानशी जखम झाली. कारण गाडदी त्याचे पाठीवरच होते. महंमद युसफनें पुढें होऊन राघोबाचे हातांतून नारायणरावास ओढल्यानंतर जवळ उभा असलेल्या सुमेरसिंगानें नारायणरावाचे तुकडे तुकडे केले. चापाजी टिळेकर नांवाचा एक खिदमतगार त्यांचे अंगावर पडला. त्यासही सुमेरसिंगानें ठार मारिलें. राघोबानें या कामाबद्दल गाड्यांच्या पुढाऱ्यांना ३ लक्ष रुपये देऊं केलें होते,"[१] अशा अर्थाची हकीकत पेशव्यांचे दरबारीं असलेला इंग्रज वकील **थॉमस मॉस्टिन** याच्या मुंबईच्या सेक्रेटरीएटमध्यें असलेल्या **डायरींत** आहे असें म्हणतात. मॉस्टिन त्या वेळीं पुण्यास असून ता. ३०, ३१ ऑगस्ट व सप्टेंबर १ या तारखेस घडलेल्या हकीकतीची विश्वसनीय माहिती आपल्या विश्वासू हस्तकाकडून मिळवून ती मुंबईस गव्हर्नर हॉर्नबी यास कळविली होती. यावरून ही माहिती सर्व विश्वसनीय असें म्हणण्यास हरकत नाहीं.

नारायणरावाच्या खुनास राघोबाची चिथावणी असून त्याचे शागिर्द, हुजरे, यांनीं हें काम गाड्यांच्या सहाय्यानें घडवून आणलें असें

१ ग्रँटडफ म्हणतो कीं, राघोबानें कटवाल्यांना मोठीं पेन्शनें व अधिकाराच्या जागा देण्याचें कबूल केले होते. पृ. २१३.

दिसतें. सखारामबापूचें या कटांत अंग होतें ही गोष्ट निःसंशय खरी आहे असेंही त्यावरून सिद्ध होतें. परंतु बापूनें महंमद युसफ, सुमेरसिंग व इतर दोघे सुभेदार व त्यांचे ५०० साथीदारांना नारायणरावास पकडून राघोबास गादीवर बसविण्याबद्दल सांगितलें होतें (१८ ऑगस्ट १७७३). नारायणरावास ठार मारावें असा बापूचा हेतू नव्हता; हें काम इतरेजनांनीं केलेलें आहे याबद्दल संशय नाहीं[1] असें फॉरेस्ट म्हणतो. रा. खरे हे पटवर्धनी दप्तरावरून असेंच अनुमान काढतात कीं, तो विशाल बुद्धिचा म्हातारा नारायणरावास फक्त धरून कैदेंत ठेवण्याच्या मसलतीस तयार झाला होता पण त्या मसलतीचें पर्यवसान भलतेंच झाल्यामुळें त्याचे सर्व बेत विस्कटून गेले[2]. म्हणजे नारायणरावास ठार मारावें असा बापूचा उद्देश नव्हता असें रा. खरे कबूल करतात. परंतु सखारामबापूच्या या मसलतींत पुढें मागें दादासाहेब प्रतिकूल झाले तर नारायणरावाची पुनः स्थापना करतां यावी हा हेतू होता असें त्यांचें म्हणणें आहे. खरोखरी बापूचा काय हेतू होता हें कांहींच सांगतां येणार नाहीं. तरी नारायणरावाचा खून करावा असें मुत्सद्यांपैकीं कोणाच्याच मनांत खरोखर नव्हतें एवढें फार तर म्हणतां येईल. यासंबंधीं वाचकांनींच अनुमान काढावें हें बरें.

नारायणरावाच्या खुनाची बातमी हां हां म्हणतां शहरभर पसरली व चोहोंकडे हाहाःकार झाला. शहरांत त्यावेळीं बरीच दंगल माजलेली होती. गाडदीही बेफाम झाल्यामुळें त्यांना ताब्यांत आणण्याचें काम कठीण होतें. दंगलीची बातमी कळतांच बापू कोतवाल—चावडी जवळ गेले. तेथें नारायणरावास ठार मारण्यांत आलें असून राघोबा

१ Forrest p. 250. २ खरे पृ. २००५.

गाड्यांच्या ताब्यांत आहे व ते जयजयकार करीत आहेत असें चौकशी अंतीं त्यांना कळले. चौकीजवळ बजाबा पुरंदरे, हरीपंत फडके, भवानराव हेही आले. गाडदी वाड्याजवळ कोणासही येऊं देत ना. तेव्हां वाड्यावर तोफा डागाव्या असा खवळलेल्या मंडळींत बूट निघाला परंतु या दंगलींत सर्वांचा नाश व्हावयाचा असें सांगून बापूनें सर्वांना मोडून काढिले. हरीपंताकडून एक चिठी लिहून ती वाड्यांत पाठविली. तिचें रघुनाथरावानें उत्तर लिहून कळविलें कीं, 'गाड्यांनीं नारायणरावाचा खून केला असून महत्प्रयासानें आम्ही गाड्यास शांत केले आहे, त्यावर बापूनें सर्व लोकांस घरीं जाण्यास सांगितलें व आपण प्रतिनिधी, बजाबा यांचेसह वाड्यांत गेले. तेथें राघोबानें त्यांना सर्व हकीगत कळविली. तेव्हां राघोबाची निर्भर्त्सना करून त्याच पावलीं ते सर्वजण माघारीं परतले.[१] 'दोन प्रहरीं बापू पुण्यापासून ८ मैलपर्यंत पळून गेला. पर्वतीजवळ पुष्कळ माणसांस आढळला. बायकामुलें त्यावेळीं घरींच होतीं. मध्यान्हरात्रीं घरास आला.'[२] चिंतो विठ्ठलानें बापूची गांठ घेऊन त्यास कारभारीपद स्वीकारण्यास विनंति केली परंतु तिकडे बापूनें लक्ष दिलें नाहीं. ता. २२ आक्टोबर १७७३ रोजीं बापू सासवडास आले. राघोबानें यावेळीं चिंतो विठ्ठलास कारभार सांगितला होता, तरी बापूस कारभार करण्याबद्दल त्यानें आग्रह सुरूच ठेविला होता. तेव्हां बापूनें अखेर राघोबास पत्र पाठवून म्हातारपणामुळें कारभार नको, फक्त सल्ला देईन म्हणून कळविलें.

रा. खरे म्हणतात कीं, सखारामबापूनें कारभार पत्करला नाहीं याचें कारण "दादासाहेबाचें राज्य आतां निर्वैर झालेसें पाहतांच बापूस

---

१ किंकेड व पारसनीस. २ खरे पृ. १९९१.

वाटूं लागले कीं आतां चित्तपावनांच्या दरबारांत आपणांस कोण विचारतो.''[1] परंतु यावेळीं दरबारांत चित्तपावनांचा वरचष्मा नव्हता. चिंतो विठ्ठल, सखाराम हरी हे दादाच्या पुठ्यांतले लोक कांहीं चित्तपावन नव्हते. दुसरीं कांहीं कारणें सांगण्यांत येतात तीं अशीं कीं फलटणच्या जहागिरीसंबंधानें माजी पेशव्यांच्या कारकीर्दींत बापूनें जी व्यवस्था केली होती ती दादासाहेबांनीं बदलली आणि बापूचे स्नेही भगवंतराव प्रतिनिधी यास पदच्युत करून भवानरावास प्रतिनिधीपद देण्याचें दादांनीं ठरविलें यामुळें बापूचें मन खट्टू झालें.

वास्तविक पाहातां सखारामबापूच्या औदासिन्याचें कारण राघोबा आपणास विचारणार नाहीं, राज्यकारभारांत कोकणस्थांचा चलचलाट होईल अशी भीति हें नसून आपल्या देखत नारायणरावाचा खून झाला ही आपल्यास लांच्छनास्पद गोष्ट झाली हें कारण होतें. बापूनें मनांत आणिलें असतें, तर राघोबाची मर्जी सांभाळणें त्यास अशक्य नव्हतें; तेव्हां राघोबा आपल्यास तुच्छ लेखील ही भीति बापूस वाटण्याचें कारण नसावें. राघोबा हाताशीं असतां कोकणस्थांचा वरचष्मा होईल ह्याबद्दल बापूनें बिलकूल क्षिति बाळगली नसती. परंतु नारायणरावाच्या खुनानें बापूच्या मनास चरका बसला. मरणसमयीं माधवराव पेशव्यांनीं नारायणरावास सखारामबापूच्या हातीं दिले होते, व नारायरावाचें रक्षण करून कारभार करीन असें त्याजपासून वचन घेतले होते, असें असतां नारायणरावाचें रक्षण आपले हातून होऊं शकले नाहीं याची बापूच्या जिवास खंती वाटत होती. 'आपणांस मरण येईल तर बरें' असें उद्गार त्याच्या तोंडातून निघाल्याचा उल्लेख सांपडतो.[2] यामुळें

१ खरे पृ. २००६. २ खरे पृ. २००७.

सखारामबापू कारभारांत उदासीन राहिले. त्यांच्या अपेक्षे बाहेर सर्व गोष्टी घडून आल्या; बारभाईच्या कारस्थानाची उभारणी बापूच्या या मनोवृत्तींतून झालेली आहे. बापू हा पक्का आपमतलबी, स्वार्थी, कलीचा अवतार, पाषाणहृदयी म्हणून त्याजवर त्याच्या शत्रूंनीं जो शिक्का मारलेला आहे तो किती अप्रस्तुत व अवास्तव आहे हें वरील माहितीवरून कळून येईल. कारुण्य, वात्सल्य, धन्याबद्दल आपलेपणा इत्यादि गुण बापूच्या अंगीं होते ही गोष्ट रा. खरे यांना सुद्धां नाइलाजास्तव याप्रसंगीं कबूल करणें भाग पडले.[1]

दत्तो वामन पोतदार.
१८० शनवार पेठ पुणे २.

१ खरे. पृ. २००७.

# प्रकरण ८ वें.

## बारभाईचें कारस्थान.

"सखाराम भगवंत केवळ राजकारणांतील विधि।"—प्रभाकर.

नारायणरावाच्या मृत्यूनंतर राघोबास पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं. इंग्रजांचा वकील मि. मॉस्टीन यानें पेशवाईपद मिळाल्याबद्दल राघोबाचें अभिनंदन केलें. परंतु राघोबानें महमद युसफ व सुमेरसिंग यांची भेट घेऊन त्यांना बरीच रक्कम बक्षीस दिली ही गोष्ट जेव्हां लोकांस कळली तेव्हां राघोबा सर्वांच्या मनांतून उतरला. नारायण-रावाचा खून करण्यास त्याची संमति होती, असें सर्व लोकांस वाटलें. प्रमुख प्रमुख मुत्सद्दी यावेळेस अक्कलगुंग होऊन राघोबा-बद्दल त्यांचीं मनें विटून गेलीं. बापूच्या चित्तवृत्तीचाही क्षोभ झाला होता. कांहीं दिवस विचार करून, अनुकूल प्रतिकूल गोष्टींचा अजमास पाहून नवीन कारस्थान रचण्याचें त्याच्या मनानें घेतलें. २२ आक्टोबर १७७३ रोजीं बापू सासवडास गेला. कारभार करण्याचें तर त्यानें नाकारलेंच होतें. राघोबानें त्यास पुष्कळ आग्रह करून पाहिला. परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं.

यावेळीं मराठ्यांच्या शत्रूंनीं चोहोंकडे उचल घेतली होती. हैदरानें बराचसा मुलूख गिळंकृत केला होता. दादांचा स्नेही मुधोजी भोसले याचा त्याच्या भावाशीं तंटा चालू होता. मुधोजीचा भाऊ साबाजी ह्यास निजामानें आश्रय दिला होता तेव्हां दादास निजाम व साबाजी या दोघांचेंही पारिपत्य करणें भाग होतें. अर्काटचा नबाब महमदअली यानें इंग्रजांची मदत घेऊन तंजावरचे राज्यावर स्वारी करून तें राज्य जिंकिलें होते याचा राघोबास विचार करावयाचा होता. अशीं एक ना दोन पुष्कळ कामें त्याजपुढें होतीं.

राघोबानें निजामाकडे वकील पाठवून साबाजीस स्वाधीन करण्याबद्दल त्याजपाशीं मागणी केली. परंतु निजामानें ही गोष्ट अमान्य केल्यामुळें राघोबा स्वारीसाठीं बाहेर पडला. निजामाचें पारिपत्य करून हैदरावर चालून जावें व त्याच्या मदतीनें अर्काटकर नबाब व इंग्रज यांना शह देऊन पुष्कळ लूट मिळवावी असा त्यांचा बेत ठरला. फौजा जमा करीत राघोबा जेजुरी, नीरानरसिंगपूर यामार्गे सिद्ध-टेकास आला. सखारामबापू, नानाफडणवीस, रामचंद्र गणेश, त्रिंबकराव, भवानराव, परशुरामभाऊ पटवर्धन वगैरे मंडळी बरोबर स्वारींत होती. सिद्धटेकाहून पेडगांवास आल्यानंतर ' सखारामबापू यांणीं चिरंजिवाचे मुंजीचे निमित्त करून निरोप घेऊन सासवडास आले.[1] बापू निघण्यापूर्वीं नाना, मोरोबा, हरिपंत यांनीं बापूस भेटून आमची कशी तरी सुटका करावी म्हणून त्यास विनंति केली. तेव्हां बापूनें राघोबाच्या मर्जींतला शागीर्द देव्या यास बोलावून नाना, हरिपंत वगैरे वरकांती राघोबास मिळालेल्या लोकांना सैन्यांत ठेवणें किती धोक्याचें आहे याची कल्पना दिली व त्यास राघोबाच्या कानावर ही गोष्ट घालण्यास सांगितलें. कांहीं दिवसांनीं नाना, मोरोबा यांनीं आजारीपणाचें मिष करून परत जाण्याची परवानगी जेव्हां मागितली, तेव्हां देव्यानें अगोदर पढवून ठेवल्याप्रमाणें राघोबानें या लोकांस परत जाण्याची मुभा दिली. हरिपंत पोटशुळाचे निमित्य झाल्यासारखे, चार दिवस हैराण आहे असें दाखवून सिद्धटेकास आला.[2] इकडे दादांनीं निजामाचा पराभव करून

१ म. रु. २-१०३. आजारीपणाचें निमित्य करून बापू सिद्धटेकास आले अशी माहिती रा. खरे पटवर्धनी कागदपत्रावरून देतात.

२ म. रु. २. १०३.

त्याशीं तह केला व त्रिंबकराव मामा व आनंदराव रास्ते यांना साबाजीचे पारिपत्यास पाठवून आपण कर्नाटकाकडे कूच केलें.

नाना, हरीपंत वगैरे मंडळी पुण्यास येऊन पोचतात न पोचतात तो बापू सासवडाहून पुण्यास आला व नाना व मोरोबा यांच्या गांठीं घेऊन राघोबास पदच्युत करून गंगाबाईच्या नांवानें राज्यकारभार चालवण्याची कल्पना त्यांना सांगितली. ती पटून त्यांनीं त्रिंबकराव मामासही आपल्या गुप्त हेरांच्या सहाय्यानें आपल्या बेतास अनुकूल करून घेतले. तेव्हां त्रिंबकरावमामानीं साबाजीशीं तह करून ते आणि साबाजी एक झाले व सखारामबापू व त्रिंबकराव मामा यांनीं राघोबाविरुद्ध युद्ध फुकारल्याचें जाहीर केलें.[१] सखारामबापू त्रिंबकराव मामास आपण रविवारी पुण्यास जाणार सबब सर्व मंडळीच्या गांठी घेऊन 'वरकड कित्येक साधनाचे प्रकार' केल्याची माहिती कळवितो, व शक्य असल्यास मामानें शनवारीं आपणांस भेटावे असें म्हणतो.[२] सखारामबापू ३० नोव्हेंबर १७७३ त पुण्यास आला, आणि राघोबाविरुद्ध कारस्थान रचले गेले. त्रिंबकरावमामा सखारामबापूस पत्र पाठवून बापू, नाना, तात्या व मोरोबा यांनीं एकत्र होऊन 'वाकडे घडोन पुढें कैलासवासीं नानाचे वंशास ठिकाण नाहींसे भावी दिसो लागले; त्यामुळें श्रीकृपेनें राज्याचाही बंदोबस्त व्हावा आणि चांगलेही दिसावे याकरतां श्रीमंत मातुश्री पार्वतीबाई व गंगाबाई यांना युक्तीनें काढून पुरंदरीं पोचविल्याची हकीकत कळली' असें लिहितो (८–२–१७७४)[३]. पेशवे दप्तराच्या आधारें घेतलेल्या वरील माहितीवरून सखारामबापूनें बारभाईचें कारस्थान राघोबाच्या मोहिमेवरून मध्येंच परत आल्या-

---

१ पे. द. ५ प्रस्तावना १. २ पे. द. ५.४. ३ पे. द.५ पृ. १०.

नंतर रचलें व राघोबाविरुद्ध एक संघ निर्माण केला असें सिद्ध होतें. पटवर्धनी कागदपत्रांत 'सखारामबापूनें परशुरामभाऊ पटवर्धनास अनुकूल करून गंगाबाईचा बचाव करण्यासाठीं दोन्ही पक्षाच्या मुत्सद्यांनीं व सरदारानीं एकत्र व्हावे आणि गंगाबाईच्या नांवें द्वाही फिरवावी अशा शपथा घेतल्या'[१] अशी माहिती आढळते. नारायणरावाच्या बखरीमध्यें सखारामबापू व त्रिंबकराव या दोघांनीं नानासाहेब पेशव्यांचा वंश असहाय्य गंगाबाईस पुढें करून चालवावा अशा शपथा घेतल्या व मोठें कारस्थान केलें अशी हकीकत मिळते.[२] खरे व बखरकार **बारभाईच्या कारस्थानाची** उभारणी व मसलत राघाबा मोहिमेस जाण्याचा अगोदर गुप्तपणें झाली होती अशी माहिती देतात, परंतु तीस पेशवे दप्तरांतल्या माहितीमुळें खो बसतो. पेशवे दप्तरांतील माहिती विश्वसनीय गणली पाहिजे.

बापूच्या कारस्थानास **बारभाई कारस्थान** असें नांव दिलें जातें. बारभाई याचा अर्थ बारा लोक असें मात्र नाहीं.[३] ज्यांत एकाहून जास्त लोकांच्या हातांत सत्ता असून विशेषतः ज्यांच्या धोरणांत कांहींच ताळतंत्र नसतो, त्या कारभाराला 'बारभाई' अशी संज्ञा प्राप्त झालेली आहे. राघोबा या लोकांना "फितुरी" अथवा "बारभाई" म्हणजे बारा ठिकाणचे ताळमेळ नसलेले लोक असें निंदाव्यंजक नांव देई; तर त्या मंडळांतले लोक एका विशिष्ट कार्याकरतां आपसांतील मतभेद विसरून एकत्र झाले म्हणून **अभिमानानें बारभाई**

---

१ खरे २०११. २ ना. ब. पृ. १०.

३ या कारस्थानांत बापू, नाना, मोरोबा, तात्या, त्रिंबकरावमामा ही प्रथम ५ मंडळी होती म्हणून त्यांना **पांचभाई** असें म्हणत (डफ, **किंप्रजेल** २१७ ). आनंदीबाई म्हणते ' पहिले पंचभाई नांव होतें मग बारभाई झालें; श्रीमंत तर 'फितुरी' असें पत्रांत लिहीत—पे. द. ७. ४७.

हा शब्द लावीत. या लोकांनीं अशा शपथा घेतल्या होत्या कीं नानासाहेबाच्या वंशजाखेरीज इतर कोणासही नमस्कार करावयाचा नाहीं, आणि आपापसांत अशी योजना ठरविली कीं गंगाबाईस बापाच्या घरीं जाण्याच्या निमित्तानें पुण्यांतून काढून सातार्‍यास नानांच्या ताब्यांत ठेवावयाची, अनुकूल संधि पाहून तिच्या नांवाची द्वाही फिरवावयाची, तिला जो पुत्र होईल त्याच्या नांवानें किंवा पुत्र न झाल्यास तिच्या मांडीवर दत्तक देऊन पेशवाई चालवावयाची, सखारामबापूस वडीलकीचा मान देऊन नानास त्याचा दुय्यम म्हणून नेमावयाचें, त्रिंबकरावानें सेनापतीचें काम करून निजाम व भोंसले यांना अनुकूल करून घ्यावयाचे, अशा प्रकारची ही मसलत होती. बापू व नाना यांनीं जाहीरनामा काढून सर्व लोकांस कळविलें कीं राघोबास राज्यपद मिळण्यास शास्त्र व रूढी यांचा कांहींच आधार नाहीं. नारायणरावाच्या खुनास त्यांचीच भर असल्यामुळें तो बंडखोर व राजद्रोही आहे. तेव्हां सर्व लोकांनीं त्यांस मदत न करतां गंगाबाईच्या पक्षास मिळावें.

बापूस पहिल्याप्रथम गरोदर गंगाबाईस कोठेंतरी सुरक्षित जागीं नेऊन ठेवण्याचें अतिशय महत्वाचें परंतु तितकेंच अवघड व कठीण काम करावयाचें होतें. पुणें शहर या वेळीं राघोबाच्या कबजांत होतें, परंतु पुणें शहरचा पूर्वींचा कोतवाल नारो अप्पाजी यानें राघोबानें नेमलेला अधिकारी केशवराव केतकर यास कैद केलें आणि बापूनें गंगाबाईस तिच्या पित्याच्या घरीं जाण्याच्या निमित्तानें बाहेर काढून पुरंदरास पोंचविलें. प्रथम गंगाबाईस सातार्‍यास ठेवण्याचा विचार होता परंतु 'पल्ला लांब यास्तव पुरंदरीं ठेवण्याचा' विचार मुक्रर झाला. नाना फडनवीसानें सातार्‍यास असलेला अधिकारी बाबूराव कृष्ण

यास लिहिलें. कीं, ' आम्ही श्री.सौ.पार्वतीबाई व गंगाबाई यास घेऊन रा. सखामबापूसह किल्ले पुरंदरास आलों (३०–१–१७७४). तुम्ही राजेश्रीस जलदी करून किल्ल्यावर नेणें यक घडीचाही विलंब न लावणें तुमचे भरवशावर केले आहे'.[1] सातारचे छत्रपती राघोबाचे हातांत सापडूं नयेत म्हणून नानाफडनवीसानें आपल्या विश्वासांतील मनुष्य बाबूराव कृष्ण आपटे यास मोठ्या इतबारीनें, खबरदारीनें व एकरूप राहण्याबद्दल लिहिलें. इकडे राघोबास संशय येऊं नये म्हणून बाबुराव व नागोजी शिंदे यांनीं त्यांना कळविलें कीं ' पुण्यांत कित्येकांनीं फितूर करून बदरहा वर्तणूक करूं लागले म्हणून राजश्रीस किल्यावरी नेऊन ठेविले.[2] भोळ्या राघोबानें या कामाबद्दल त्या दोघांस शाबासकी दिली आणि सुचविलें कीं "तुम्हाकडे ते पैगाम तऱ्हेतऱ्हेनें लावितील तरी सावध असावे," कारण अजून राघोबास कारस्थानाची कांहींच बातमी नव्हती.[3] खरोखरी ज्या लोकांच्याबद्दल राघोबाची एवढी खातरजमा होती तेच त्याचे विरुद्ध झाले.

रघुनाथरावानें सखारामबापूस पत्र लिहून कर्नाटकांत बोलाविलें. तो लिहितो, ' सांप्रत बहुत दिवस घरी आहां, औषध उपाय करून आरोग्य जाहला असाल यास्तव लवकर चांगला दिवस पाहून येणें. **तुम्ही मातबर शहाणे** जवळ असावें हें आमचे मानस. तुम्हास उचित तरी लवकर यावे[4]" (५–२–१७७४). भोळा बिचारा रघुनाथराव ! त्यास बापूनें आपल्या करितां काय काय वाढून ठेविलें

१ पा. सं. नं.७७; पे. द. ५. २२; २४ यामध्यें हरीपंतही गंगाबाई बरोबर होता असा उल्लेख आहे. २ खरे २१०८; पे. द. ५. १८. ३ कित्ता. ४ पे. द. ५. ८

आहे याची मुळींच कल्पना झाली नाहीं. तो बापूस अजून आपलाच समजत होता. तसेंच त्याच्या सैन्यांत बापूनें कृष्णराव काळे याच्यामार्फत फितूर पेरून ठेविला होता याची त्यास गंधवार्ताही नव्हती. पटवर्धनावर विशेषतः वामनराव पटवर्धनावर राघोबाची एवढी बहाल मर्जी बसली कीं त्यास एकनिष्ठ, राजनिष्ठ समजून तो आपल्या सर्व खलबतांत त्यास घेऊं लागला.[१] परंतु एका प्रकरणामुळें राघोबाच्या डोळ्यांवरील हें अज्ञानपटल दूर होऊन त्यास सर्व परिस्थितीची लख्खकन कल्पना आली.

राघोबानें हैदराचें कल्याणदुर्ग व रायदुर्ग हे किल्ले घेतले व बेदनूरास वेढा घातला. एके दिवशीं चार चौघांनीं समजाविलें कीं भवानराव प्रतिनिधी फितूर आहेत. त्याच वेळीं भवानरावाच्या कुरेंबाज वर्तनावरून राघोबाचा हा संशय दृढ झाला.[२] यावेळीं हैदरानें आपल्या वकीलामार्फत 'तुमच्या लष्करांत फितूर असल्यानें सावध रहा' असा निरोप राघोबास पाठविला. तेव्हां प्रतिनिधीला त्याच्या फौजेस निरोप देण्याबद्दल राघोबानें हुकूम सोडला. परंतु त्यानें तसें करण्याचें साफ नाकारलें. तेव्हां सेनापति मुराररराव घोरपडे यास प्रतिनिधीवर हल्ला करण्याचा हुकूम दिला. परंतु मुराररावानें जाब दिला कीं 'आमच्या राष्ट्राचा जो शत्रू असेल त्याचें पारिपत्य मी हौसेनें करीन पण हा घरगुती खटला यांत मी पडणार नाहीं.' इतर सरदारांनींही मुराररावाचीच री ओढली. कारण त्यांना ठाऊक होतें कीं, आज प्रतिनिधींची जी गत तीच आपली. शिवाय त्यांचा असा इरादा होता कीं 'सार्‍यांनीं एकत्र होऊन मुल्यास विश्वरूप दाखवावें.' आपलें कोणीच ऐकत नाहींसें पाहून हुजुरातचीं पथकें होतीं त्यांसी सज्ज

१ खरे पृ. २१००. २ पे. द. ५. ४०

राहाण्यास आज्ञा करून एक दिवस श्रीमंत सायंकाळीं खासे हल्ला करावयासी चालोन गेले.[१] इकडे प्रतिनिधीच्या स्वारांनीं मारीन, किंवा मरेन असा निश्चय केला. खुद्द भवानराव आपल्या बायकोस पाठीशीं घालून मरणास सिद्ध झाला. इतक्या थरावर गोष्टी आल्यानंतर परशुराम रामचंद्र भवानरावाचे मदतीस सामील झाले; तेव्हां दादासाहेब नरम पडले. इतक्यांत सेनापति दरमीयान पडोन समाधान केलें.[२] राघोबास यावेळीं सखारामबापूनें केलेल्या बारभाईच्या कारस्थानाची व फितुरीची पूर्ण माहिती समजली. आपणांस पदच्युत केलेलें पाहून दादांनीं कल्याणदुर्ग येथें हैदराशीं तह केला. त्यांत माधवराव पेशव्यांनीं जिंकलेले सर्व प्रांत हैदरास देऊन टाकले. इतकेंच नव्हेतर रास्ते, पटवर्धन, नरगुंदकर यांचा कर्नाटकांतला जहागिरीचा मुलूखही हैदरास दिला. या देणगीबद्दल हैदरानें दादासाहेब यास पेशवे म्हणून कबूल करून ६ लक्ष रुपये खंडणी देण्याचें वचन दिलें व कारभारी बापू व नाना यांनीं जें खूळ उभें केलें तें मानीत नसल्याचें जाहिर केलें.

राघोबानें या प्रसंगीं सैन्यांतील फितुरी लोकांचें पारिपत्य करण्याचा निश्चय केला. मुराररावास व वामनराव पटवर्धनास त्यानें हैदराकडून ऐवज आणण्यास पाठविलें व आपण त्यांचा मुलूख लुटावयास निघाला. मुराररावास याची कुणकुण लागतांच सैन्यानिशीं परत फिरून तो राघोबाच्या पक्षास मिळाला व राघोबास त्यानें गुत्तीस बोलाविलें. राघोबास त्यामुळें थोडासा जोर चढून त्यानें रामचंद्र गणेश व भवानराव प्रतिनिधि यास अटकेंत ठेविलें, आणि रास्त्यांच्या जहागिरींत शिरून

१ खरे २१०९–२११०; पे.द. ५.४०. २ पे. द. ५.४०

तालिकोट व बागलकोट यांजमधला मुलूख जाळून पोळून उध्वस्त केला व तो पटवर्धनांच्या मुलुखाकडे वळला.

राघोबानें त्रिंबकराव मामा व आनंदराव रास्ते यास साबाजीवर पाठविलें होतें. परंतु त्रिंबकराव व साबाजी येक होऊन राघोबाच्या वाटेवर बसले. राघोबाच्या फौजेंत आवई उठली कीं मामा राघोबावर चाल करून येणार. परंतु मामास यावयास विलंब लागल्यामुळें राघोबास वरीलप्रमाणें एकाएकीं फितुरी सरदारांचा समाचार घ्यावयास फावलें. वामनराव बापूस लिहितो, "मामाची फौज आलंद गुजोटी-कडे. मामाचे विलंबामुळें सर्व विलग पडले." पटवर्धनांनीं वरचेवर बापूस व नानास पत्रें पाठवून राघोबांनीं त्यांच्या मुलुखाचा किती उच्छेद मांडला होता, त्याचें हृदयद्रावक वर्णन केलें. राघोबानें जमखिंडी नजीक मुक्काम ठोकून शहर लुटावयाची व जाळावयाची आज्ञा आपल्या फौजेस केली. त्यानंतर मिरजही घेणार अशा कंड्या उठल्या. तेव्हां वामनराव कर्नाटकांतील काम अर्धवट टाकून मिरजेच्या रोखें निघाला. या वेळीं राघोबा कृष्णेच्या पाण्यानें वर येत होता. मामाची फौज जवळ आली तेव्हां तो रोख सोडून विजापूरच्या रोखें निघाला. तेव्हां मामाची फौज त्याच्या पाठलागास निघाली. हा पाठलाग मामा व हरीपंत यांना पुष्कळ दिवस पुरला.

## प्रकरण ९ वें

# सर्वाधिकारी (Dictator) सखारामबापू.

### बारभाई आणि राघोबाचा पाठलाग.

सर्वाधिकारी, हुकूमशहा ( Dictator ) हे शब्द हल्लीं लष्कराच्या, सोटेशाहीच्या जोरावर कोणी मनुष्य एखाद्या राष्ट्रांत सत्ताधारी होऊन सर्व सूत्रें आपल्या हातांत घेतो त्यास लावितात. प्राचीन काळीं रोमन लोकांमध्यें जे कॉन्सल निवडीत त्यांपैकीं एखाद्यास आणि-बाणीच्या प्रसंगीं सर्वाधिकार देत. त्यास सर्व प्रकारच्या गुन्ह्यांची चौकशी करण्याचा, प्रसंगीं देहदंडाचीही शिक्षा देण्याचा अधिकार असे. अशा कॉन्सलास डिक्टेटर (किंवा सर्वाधिकारी ) ही संज्ञा होती. सीझर सूलांसारखे महत्त्वाकांक्षी, मुत्सद्दी, रणगाजी डिक्टेटर पुष्कळ काळपर्यंत आपल्या हातांत सत्ता ठेवीत. ते तात्पुरते राजेच समजावयाचे व त्यांची शक्ति कर्तुमकर्तुमन्यथा कर्तुम् अशा स्वरूपाची असावयाची. कर्तबगार, बुद्धिमान् व शूर इसमांनाच अशा प्रकारें सर्वाधिकारत्व लाभलेलें आहे व त्या त्या माणसांची कामगिरी ही तशीच भरीव, आणिबाणीचा प्रसंग निभावून नेणारी अशी आढळते.

सखारामबापूस बारभाईच्या कारस्थानांत जो डिक्टेटर होण्याचा मान मिळाला तो कांहीं सोटेशाहीच्या किंवा लष्करशाहीच्या बळावर नव्हे. नालायक माणसाचे हातीं राज्यधुरा आली, चोहो-कडे फुटाफूट, कलह यांचा अतिरेक झाला हें ओळखून सर्व सर-दार, मुत्सद्दी यांनीं एकमतानें ज्ञानवृद्ध, तपोवृद्ध, व वयोवृद्ध अशा सखारामबापूकडे सर्वाधिकार सोंपविले. यासंबंधीं त्रिंबकराव मामा

नानास लिहितो 'पुढें येक खावंद शास्ता, पोख्ता कर्ता असावा. कोणाचे कोणी न ऐकावे असे न व्हावे. सर्वांगीं येकावर भार द्यावा. राजश्री बापू सर्वांस वडील केलेले पुरुष त्यानी आवघे डोईवर घेऊन करावें, आम्ही तुम्ही सर्व त्यास आनकूल व्हावे. दोहो-कडील सरदार मंडळीस त्यानी ममता, शासन भयपूर्वक उचित उपयोगी जो जसा असेल त्याचे तसे समाधान रक्षून वागवावे हाच पक्का येकमताचा विचार[१]" सारांश या भारी मनसब्याच्या कामास लायक, अनुभवी मनुष्य सखारामबापूखेरीज दुसरा कोणी राज्यांत नव्हता, म्हणून त्यास सर्वाधिकारी नेमिले. बापूसही या मनसब्या-च्या कामांत, सैन्याच्या हालचाली करण्यास, दबाब राखण्यास चौघांचे निर्लोभपणें सहकार्य पाहिजे होतें. कारण 'चौघे मातबर जीवप्राण येक करून डोई देतील तर हलकें जाईल, नाहींतर हें काम फारच आवघड, वोझे थोर होते.' बारभाईचें कारस्थान उभारून तें यशस्वी करून दाखविण्याचे बाबतींत सखारामबापूनें जी मेहनत, बुद्धिमत्ता, कार्याकार्यविचार, प्रत्युत्पन्नमतित्व, तत्परता दर्शविली ती केवळ अवर्णनीय, अद्वितीय होय. जी गोष्ट 'डोईवर घेतली' त्याकरितां सर्वांस मनसबा, युक्त्याप्रयुक्त्या सांगोन सर्वांची आनु-कूलता मिळवून आपली बाजी शेर केली. बापूची ही कामगिरी 'त्याची काय वर्णावी थोरी' अशाच कोटींतली आहे. पेशव्यांच्या दौल-तींत बापूस सर्व शहाण्यांमध्यें अग्रपूजेचा मान मिळतो त्याचें कारण सांगावयाचें झाल्यास किंवा एक ठळक उदाहरण द्यावयाचें झाल्यास **बारभाईचें कारस्थान** हेंच सांगावें लागेल. म्हातारपणांतही बापूनें असामान्य कर्तृत्वशक्ति, तरुणांसही लाजवणारा उत्साह, मुत्सद्देगिरी,

१ पे. द. ५-३३.

दूरदर्शित्व राजकारणांमध्यें दाखविलें, याबद्दल हिंदुस्थानच्या इतिहासांत जे हाताबोटावर मोजण्याइतके राजकार्यधुरंधर मुत्सद्दी होऊन गेले त्यांमध्यें त्यास स्थान देणें प्राप्त आहे.

बारभाईमंडळ उभारून गंगाबाईस सुरक्षित स्थळीं पोंचविल्यानंतर सखारामबापूस एकसमयावच्छेदेंकरून पुष्कळ गोष्टींत मन घालावें लागलें. या सर्व कामांत नानाची त्यास बरोबरीनें मदत झाली हें सांगणें अवश्य आहे. सर्व जनतेस गंगाबाईच्या पक्षास मिळण्याबद्दल त्यानें जाहीरनामा काढलाच होता. परंतु त्याशिवाय सर्व तालुकाधिकाऱ्यांना, कमावीसदारांना आज्ञा पाठविल्या कीं 'गंगाबाईसह कारभारी पुरंदरीं आले. तमाम सरदारांस पत्रें गेलींच आहेत. फौजेनिसी लवकर जमा होतील. आपल्या तालुक्याचा बंदोबस्त राखोन हुशार राहणें व वरचेवर लिहीत जाणें'.[१] राघोबाच्या पाठलागावर जावयाचे असल्यानें यावेळीं कारभाऱ्यास पुरंदरच्या बंदोबस्तास कोणी तरी लायक, चलाख, विश्वासू मनुष्य हवा होता. कारण पुरंदरास कायमचें ठाणें बापू व नाना यांना देऊन भागणारें नव्हतें. बापूनें पुरुषोत्तमदाजी पटवर्धनास बोलावून आणून त्याकडे ही कामगिरी सोंपविली व त्यानें ती उत्तम रीतीनें दक्ष, सावध राहून पार पाडली. प्रसूत होईतोंपर्यंत गंगाबाईस विषप्रयोग किंवा मारेकरी यांची भीति होती. परंतु पुरुषोत्तमदाजीनें ही जोखीम अंगावर घेतल्यामुळें बापू व नाना यांना पुणें सोडून दौऱ्यावर जातां आलें, व ठिकठिकाणचा बंदोबस्त प्रत्यक्ष परिस्थितीचें निरीक्षण केल्यानंतर करणें सुलभ होऊन राजकारणाचें पुढील धोरण आंखतां आलें.

---

१ पे. द. ५-२८.

यानंतर अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे बरेच मातबर लोक आपल्या पक्षास अनुकूल करून घेणें हें मोठेंच काम बापू व नाना यांच्यापुढें होतें. बापूचें जसें सावकार, शिलेदार यांच्यावर पराकाष्ठेचें वजन होतें तसेंच हैदर, करवीरकर, नागपूरचे भोसले वगैरे कडेही त्याचीं सूत्रें होतीं. त्याच्या शब्दास त्या त्या दरबारीं मोठा मान होता. त्यानें कृष्णाजी नारायण जोशी यास निजामाकडे पाठवून रुकनुद्दौलाकरवी निजामाकडून बारभाईंना मिळण्याचें वचन घेतलें. बापूनें याप्रसंगीं मुख्यतः 'मोगल अनुकूल करून घेतल्यामुळें पुढें फारसा पेंच पडणार नाहीं हें सर्वत्रांस कळून चुकलें.' खरोखरी तें एक मोठें 'मातबर साधन' झालें. निजामाची फौज बारभाईंना मदत करण्यासाठीं लातूर-तुळजापूरपर्यंत आली. भोसल्यांचा दिवाण दिवाकरपंत चोरघोडे यांनींही 'बारभाईकडेस आपलें मत आहे श्रमास आळस करणार नाहीं. मसलतीचे आरंभापासून मामाकडे आहोंत. तुम्ही मात्र फार सावध, खबरदार असावें' असें बापूस कळविलें. बापूच्या आग्रहावरून दिवाकरपंत मुधोजीस सोडून साबाजीस मिळाला व जानोजीची बायको दर्याबाई हीसही त्यानें साबाजीकडे आणिलें. दादाचा नातेवाईक बापूजी नाईक बारामतीकर यास १०० स्वारांनिशीं त्याचे मुलानें बारभाईचें सैन्याबरोबर जावें आणि दगाफटका, विश्वासघात न केल्यास बापूजीची सर्व कर्जे निवारण्याची हमी आपण घेऊं या अटीवर आपल्या पक्षाकडे बापूनें ओढिलें. नाईक या गोष्टीस कबूल झाला. गायकवाडांच्या राज्यांत दामाजीच्या मुलामध्यें भाऊबंदकी सुरू होती. त्यांपैकीं फत्तेसिंग गायकवाड बारभाईच्या बाजूचा प्रथमच होता. कारण त्यांच्याकडूनच

२ पे. द. ५-११.

फत्तेसिंगास सयाजीची मुतालिकी मिळाली होती. विरुद्धपक्षाचा गोविंदराव गायकवाड याजकडे हरी उमाजीस पाठवून बापूनें त्याचें मन बारभाईकडे वळविण्याबद्दल खटपट केली. गोविंदरावानें असें आश्वासन दिले कीं, कर्जामुळें प्रत्यक्ष सैन्याची मदत करतां आली नाहीं तरी बापूविरुद्ध जाणार नाहीं. बापूनें महादाजी गुरुजीस शिंदे-होळकरांकडे पाठविले. त्यांत असा हेतू होता कीं त्यांनीं जरी बारभाईंना मदत केली नाहीं तरी त्यांनीं राघोबास मिळूं नये, तटस्थ रहावें. एवढी गोष्ट त्यांच्याजवळून कबूल करून घ्यावयाची होती. त्याप्रमाणें तुकोजी होळकरानें गंगाबाईस कळविलें कीं सर्व कामकाजे येकीकडे ठेवून साहेबांचे लिहिल्याप्रमाणें डेरेदाखल जालो,[१] आणि सखारामबापूसही लिहिलें कीं 'येथील विचार आपल्याखेरीज नाहीं.'[२] महादाजी गुरुजींनें शिंद्याकडेही संधान बांधलें होतें परंतु शिंदे कर्तृत्ववान् महान् धोरणी व कावेबाज! त्यांचें म्हणणें पडलें कीं 'उभयतां धणी कोणासी झुंजावे. जोंपर्यंत झुंजतां येक धणी सबल त्याजकडे सहजच जाणें पडेल. दोन्ही थकतील आणि सलुखावर येतील तर आपण दरम्यान पडोन सलूख करून द्यावा'. [३]परंतु असें असलें तरी राघोबानें शिंद्याच्या जहागिरींत अनेक घालमेली करून महादजींचें शत्रुत्व संपादन केलें असल्यामुळें शिंदे दादास मिळणार नाहींत अशी बापूची अटकळ होती. ती कितपत खरी ठरली हें पुढें येईलच. इतकीं संधानें बांधल्यानंतर बापूनें त्रिंबकराव मामास लिहिलें, "शिंदे होळकर याजविसी साधन केले. राजेश्री फत्तेसिंग गायकवाड आपलाच आहे....फौजेचा जथ आहेच. पैक्याची काळजी न

१ पे. द. ५. ५०. २ पे. द. ५-४६. ३ पे.द.३६.५८.

करणें. तुमचा सर्व प्रकारें भरंवसा पुढील कर्तव्य जे सुचेल तें लिहूं."[१]

बापूंनीं जरी निरनिराळ्या सरदार जहागीरदाराकडे राजकारणें केलीं तरी मुख्य प्रश्न पैशाचा होता; आणि तो प्रश्न तर अजून सुटला नव्हता.'दाम करी काम'ही म्हण सुप्रसिद्ध आहे.पैसा उभा करणें फारच जिकीरीचें, त्रासाचें व मानहानीचें काम होतें. पैक्याची तजवीज करण्याबद्दल त्रिंबकराव मामांचीं वरचेवर पत्रें बापूस येत.[२] तेव्हां बापू व नाना यांना सावकारांची पायधरणी करावी लागली. कांहीं जहागीरदारांकडून सक्तीच्या खुषीनें देणग्या मिळविल्या. पुष्कळ खटपट केल्यानंतर पुण्यांतील सावकारांनीं बापूच्या नांवचीं खतें घेऊन लागेल तितका पैका देण्याचें कबूल केलें.[३] तरी पैसा मिळविण्याच्या कामांत पुष्कळाकडून बापूस नकारही मिळाला.[४] परंतु त्यानें धीर सोडला नाहीं, निराशा, निरुत्साह दाखविला नाहीं. कांहीं वेळेस दादासाहेबांच्या पक्षाचे जेवढे लोक होते त्यांची मालमत्ता जप्त करून बायकामुलें कैदेंत घालून व त्याजपासून मुक्ततेकरतां मोठा भूर्दंड घेऊन पैसा उभा केला.अशा प्रकारें नाना साधनें योजून पैशाची कशी-बशी तरतूद बापूनें केली.

राघोबास कोठेंही मदत मिळूं द्यावयाची नाहीं.शक्यतोंवर त्याच्या-संबधीं,त्याच्या सहाय्यकासंबंधीं बातम्या काढावयाच्या,शक्य झाल्यास त्याच्या सहाय्यकांचें पारिपत्य लागलींच करावयाचें किंवा त्यानुरूप पुढील धोरण आखावयाचें हीं बापूच्या राजकारणाची एक बाजू होती.

नेमून दिलेलीं कामें हाताखालचे लोक व इतर बाहेरगांवचे अधि-

१ पे. द. ५. १२. २ पे. द. ५. १९; २४; ३४, ३५; ३८.
३ खरे-नाना. १८. ४ पे. द. ५. ४२.

कारी करतात कीं नाहीं, हुकुमांची यथायोग्य, तत्परतेनें अंमलबजावणी होते कीं नाहीं हें पाहाण्याकडे बापूचा विशेष कटाक्ष असे. हुकूम बरोबर अंमलांत आणला नाहीं म्हणून नारो आनंदराव याची सडकून हजेरी घेतल्याचा उल्लेख आढळतो.[१] याशिवाय प्रसंगविशेषी लोकांस "जवाहीर, हत्ती, पोशाख, कितेकास लौकिकास आणणे वाढविणे पदारूढ करणे. सर्वांची उमेदखुशाली राखून प्रसंगीं हुकूम जरब राखोन त्याजपासून चाकरी करून घेणें"[२] वगैरे गोष्टी सखारामबापूस कराव्या लागल्या. 'देणे यादी'वर बापूनें 'द्यावे' असा शेरा करण्याचें ठरल्यानें **वडिलकीचा** म्हणजे पर्यायानें खुद्द **मालकाचा** दर्जा बापूकडे गेला. यावरून बापूसारख्या सूत्रचालकास केवढा व्याप, आटोप, अवधान द्यावें लागलें व जबाबदारी घ्यावी लागली, याची कल्पना होण्यासारखी आहे.

अशाप्रकारें सर्वतऱ्हेनें तजविजी केल्यानंतर दादासाहेबांचे पुरतें पारिपत्य करण्याचें बापू व नाना यांनीं चित्तांत धरलें. या बाबतींत सर्वस्व भरीस घालावें लागलें तरी हरकत नाहीं एवढी त्यांची तयारी होती. परंतु बारभाईंची स्थिति कांहीं फारशी समाधानकारक नव्हती. राघोबासारख्या हिकमती, सावध, रणझुंजार गड्याबरोबर त्यांनां टक्कर द्यावयाची होती. आणि हें काम कांहीं सोपें नव्हतें. त्यांतून दादासाहेब दौलतीचे धनी. त्रिंबकरावमामा बापूस लिहितो, "श्रीमंताजवळ नामी सरदार व पागा, तोफखाना तिकडे, गाडदी तिकडे फौजही तिकडे. केवळ ब्राम्हण मंडळी इकडे यैसे जाल्यास कसें सोईस पडेल. यास्तव या गोष्टीचा विचार तुम्ही केलाच पाहिजे".[३] चोहोंकडे दबाब बसवण्याकरतां सखारामबापूनें सैन्यांत यावें असा

१ पे. द. ५.३८. २ पे. द. ५. १९. ३ पे. द. ५. १९.

मामाचा आग्रह होता. [1] परंतु बापूस पुष्कळ कामें उरकावयाचीं असल्यानें ही गोष्ट घडून येऊं शकली नाहीं. सातारचा बंदोबस्त नागोजी शिंदे व बाबूराव कृष्ण यांनीं केला होता तरी राघोबांचीं कारस्थानें त्या बाजूस हेरामार्फत सुरूं झाल्यामुळें बापूस साताऱ्यास जाणें भाग पडलें (२८–२–१७७४ ).हरीपंतासही त्यानें साताऱ्यास बोलावून घेतलें. परंतु बापू साताऱ्यास जाण्याचे अगोदर हरीपंतानें तेथील किल्लेदारांना लष्करांतून जासूद आले असल्यास अडकवून ठेवण्याबद्दल सांगितले. साताऱ्यास आल्यावर बापूनें हरीपंतास जासुदा-संबंधी कामगिरी सांगितली. "लष्करांतून जासूद आले असल्यास त्यास पुसावें कीं तुम्ही कोणे मुकामीहून आलेत ? श्रीमंत बाई पुरंधरास घेऊन आलों हें वर्तमान कधीं कळलें ? फौज किती आहे? लष्कर गलबेल आहे कां हुषार आहे ? कांहीं फौज निराळी आली आहे किंवा काय वगैरे बारीक बारीक वर्तमान पुसावे" [2] बापूचें धोरण व दूरदर्शीपणा, सूचक प्रश्नांनीं बातम्या काढण्याची हातोटी यावरून चांगली व्यक्त होत नाहीं काय ?

आतां राघोबाच्या हालचालीकडे वळूं. राघोबा कृष्णेच्या पाण्यानें वर येत होता हें मागें सांगितलेंच आहे. प्रथम साताऱ्यास येण्याचा त्याचा बेत आहे,हें कळल्यावर बापू व हरीपंत यांनीं सातारचा कडे-कोट बंदोबस्त केला. परंतु राघोबांनीं आपला रोख बदलून विजापूरची वाट धरली. तेव्हां मामा व पटवर्धन यांनीं आपली फौज एकत्र करून, साबाजी व मोंगल यांस मागें टाकून दादाचे पाठोपाठ निघाले. राघोबानें मध्यंतरीं निजामाशीं संधान बांधलें, त्यास बरीचशी जहागीर देऊं केली परंतु निजामानें त्यांना कळविलें कीं ' सालमारीं आमच्या

१ पे.द.५.२६;३५. २ पा.सं.नं.७६.

व भोसले यांचे स्वारीमुळें प्रांत बुडाला. मामा व भोसले यांनीं बीड प्रांतांत गडबड फारच केली, तेव्हां बंदोबस्तास आम्ही माघारे जातो.'[१] निजामाचा दिवाण रुकनुद्दौला याचा व बापूचा चांगला स्नेह होता तेव्हां निजाम राघोबास मिळेल ही भीति बापूस नव्हती. शिवाय या बाबतींत निजामानें बापूची खातर-जमा केलेली होती. अशास्थितींत दादाचें निजामाकडील राज· कारण फुकट गेलें. मामा, हरीपंत[२] आपणास भारी आहेत असें पाहून दादांचा मोहरा माघारा फिरोन पंढरपूरचे रोखें निघाला. तेव्हां मामांनीं सडे होऊन पाठलाग केला.[३] साबाजी भोंसले व निजामाचा सरदार धौंशा हे मागाहून येत होते. परंतु त्यांची वाट न पाहतां मामानीं लांब मजल मारून **कासेगांव**नजीक दादास गांठले. मुधोजी भोसले यांची फौज दादास यापूर्वींच सामील झाली होती. मामांची फौज येते असें पाहतांच श्रीमतांच्या फौजा तयार होत्याच; त्या पुढें होऊन लढाई जुंपणार इतक्यांत दादाकडील मुधोजी भोसले यांची चिठी आली कीं 'लढाई करूं नये; इकडील बोलणार याव-याचे आहेत.'[४] त्यावरून फौजेस स्वस्थ रहावयास सांगून मामा चिठीचा जबाब लिहित बसले. तो अकस्मात् दादांची 'फौज, तोफखाना, गाडदी समीप येऊन पोचले. मागें निघण्याच्या गडबडींत दहा वीस खाशा निशी मामा होते त्याजवरती कोणाची दृष्टि राहिली नाहीं. जखमी होऊन धरले गेले. सलूख्याच्या संदर्भ लावून मामा पाडाव केले गेले.[५] हरीपंतानें मात्र फौजेस धीर देऊन साबाजी भोसले मागें होते तेथपर्यंत फौज हटत आणविली. त्या स्थळीं कांहीं दिवसांनीं नबाबही येऊन पोंचले.

---

१ पे. द. ५. ४०. २ यावेळीं हरीपंत मामाचे फौजेंत आलेला होता. ३ पे. द. ५. ४३. ४ पे. द. ५. ४३. ५ पे. द. ५. ४३.

कासगांवच्या लढाईतील पराभवामुळें कारभाऱ्यांच्या पायाखालील जमीन हादरली .हरीपंताच्या मतानें त्या लढाईतील पराभवाचें कारण मामांची दादाशी लगट करण्याची घाई हें होय. साबाजीची फौज येण्याची सुद्धां त्यांनीं वाट पाहिली नाहीं त्यामुळें मोठाच प्रसंग गुजरला. या ठिकाणीं खरोखर हरीपंतानेंच बाजू राखिली; म्हणून बारभाईच्या जिवावरचें संकट टळलें. पुरंदराकडे जासूद पळत येतांना पाहून बापूंनीं तत्काळ ताडलें कीं कांहींतरी घात झाला. लखोटे उघडून पाहतात तो मामा धरल्याची व फौज उधळल्याची बातमी. बापूंनीं जासूदास विचारले 'हरीपंत जिवंत आहेत कीं नाहींत ?' ते जिवंत आहेत असें समजल्यावर बापूंच्या जीवांत जीव आला आणि 'अहो ही तर सुरुवात आहे' असें म्हणून निराश झालेल्या नानास त्यांनीं भोजनास उठविलें अशी एक दंतकथा हरिवंशांच्या बखरींत आढळते. बापू हरीपंताची कर्तबगारी ओळखून होते, म्हणून पराभवाची त्यास फारशी क्षिति वाटली नाहीं. पुण्यामध्यें त्यावेळीं 'मनस्वी आवया आल्या व लोक हवालदील होऊन सामान बांधोन पळों लागले.' कारण दादा पुण्यावर चालून येणार ही भीति होती आणि खरोखर हरिपंतास झुकांडी देऊन दादा पुण्यावर येता तर पुणें त्याच्या स्वाधीन झालें असतें. परंतु जात्याच चंचल असल्यामुळें दादानें आपला बेत बदलला. अर्थात दादाची ही हालचाल बापूंच्या पथ्यावर पडली. बापू व नाना यांनाही पराभवाचे काय परिणाम होतील याची धाकधूग वाटत होतीच. पराभव झाला म्हणजे मित्रपक्षीय सोडून जातात हा अनुभव पराभूत राष्ट्रांना नेहमीं येतो. अशावेळीं त्यांची समजूत काढून, धीर देऊन त्यांना आपल्या बाजूस राखणें

हें मुत्सद्दीपणाचें काम असतें. बापू व हरीपंत यांनीं अशा प्रसंगीं शांत डोकें ठेवून पुढील मनसबे दुप्पट उत्साहानें हातांत घेतले[१] हें त्यांना भूषणावह आहे.

कासेगांवच्या लढाईनंतर राघोबानें बापूकडे सामोपचाराचीं बोलणीं काढिली. आणि हें स्वाभाविक होतें. कारण बापूस तो आपला समजत होता. ८ एप्रिल १७७४ मध्यें राघोबानें बापूस पत्र लिहिलें, त्यांत वररुची पाध्ये नांवाच्या इसमास 'मुख्य मतलब सांगून पाठविलें आहे' असा उल्लेख आढळतो. त्याचा कांहीं उपयोग झालेला नाहीं असें पाहून 'परलोक स्मरून विवेक केल्यास इहलोकीही उत्तम आहे. रयतेचेंही कल्याण आहे. राज्यही बाकी राहिलें तें वांचेल. यांत उत्तम दिसेल ते कराल. आम्हांकडून गैरवाजवी ओढकपणा होणार नाहीं' असा निरोप बज्याबाच्या विनंतिवरून चिंतो विठ्ठल व विसाजी केशव यांच्याबरोबर बापूकडे पाठविला व त्यांच्याशीं 'खुलासा मजकूर बोलण्याबद्दल' बापूस कळविलें. यावरून बापूस फोडण्याचा राघोबाचा उद्देश होता हें स्पष्ट कळून येतें. परंतु बापूनें यावेळीं राघोबास बिलकूल दाद दिली नाहीं. केसरींत छापलेल्या राघोबाच्या पत्रांत असाच मजकूर आढळतो. "चिंतो विठ्ठल व विसाजी केशव पिंपरीचे मुक्कामींहून तुम्हाकडे पाठविले आहेत. जबानीवरून कळलेंच असेल. सारांश दौलत बहुता दिवसांनीं वडिलांनीं मेलविली ती तुमचे आमचे कार्जियानें बुडवावी हें तुम्हांस उचित नाहीं. चिरंजीव गंगाबाईस पुत्र

---

१ खरे २१३८. बापूनें परशुरामभाऊस कळविलें "झाल्या गोष्टीस उपाय नाहीं...तरी आरंभिला मनसबा कोणेही प्रकारें शेवटास न्यावा."

व्हावा पुढें थोर जाहल्यानंतर दौलतही करील येविसी आमचेंच मानस आनकूल आहे. तुम्ही लटकें तर्ककुतर्क घेऊन कजिया वाढवून मोगलाचे घरांत दौलत घालितां हे या लोकीं व परलोकी बरें की काय? पूर्वी नारायणाचा काल झाला त्या वेळीं माडीवर शपथ घेतली ती विस्मरणांत आली कीं काय? असो जे जाहाले ते जाहाले पुढें तरी संभाळून करावे. सर्व कारभार आम्हीच करावा हाहि आग्रह नाहीं अतःपर तुम्हांस उचित दिसेल ते कराल. नेमिले असेल ते होईल "[१] पत्रांतील मजकुरावरून गंगाबाईचा मुलगा मोठा झाल्यावर त्यास राज्यकारभार देण्यास राघोबा तयार होता, परंतु कजिया करूं नये एवढेंच त्याचें म्हणणें होतें. नारायणरावाचा खून झाल्यावर बापूच्या व राघोबाच्या कांहीं आणाशपथा झाल्या होत्या त्या बापूनें पाळल्या नाहींत. या शपथा बहुधा बापूचे चालविण्याबद्दल असाव्यात. रघुनाथरावानें त्याप्रमाणें वागण्यांत अंतर केलें नाहीं. इतकें असून बापूनें कारस्थान करून राघोबाचें उच्चाटन करण्याचा प्रयत्न करावा हें अत्यंत गैर होय, असें म्हणण्याचा राघोबाचा रोख आहे.

'फितुरी, हरामखोर ढंगास प्रवर्तले' असें कारभाऱ्यांना उद्देशून बोलणारा राघोबाला आतां कजिया न करतां एकी करण्याची बुद्धि सुचावी यावरून बारभाईचा जोर त्यास पुरतेपणीं समजून आला होता असें म्हणावें लागतें. बापूसही राघोबा आपली गय

१ हें पत्र १७–४–१७७४ चें असून पैवस्ती नानाच्या हातची आहे. (१८–५–१७७४). यावरून नानाफडणीसानें हें पत्र दडपून ठेविलें असावें. परंतु हें पत्र नानाच्या हातांत आलें कसें?

करणार नाहीं हें पक्कें ठाऊक होतें; तेव्हां तो तडजोडीस तयार नव्हता. अर्थात् कोणी कोणापुढें नाक घासावयास राजी नव्हता. सातारच्या छत्रपतीकडून राघोबास पदच्युत केल्याचें व स्वतः राज्याधिकार हातांत घेतल्याचें फर्मान काढून मराठा-मंडळाची सहानुभूति मिळविण्याचा बापूचा बेत होता, अशी माहिती **स्प्रिंजेल** देतो.[1] ती कितपत यथार्थ आहे हें सांगवत नाहीं. पण याचवेळीं बारभाईच्या अशा प्रतिकूल व बिकट परिस्थितीमध्यें श्रीमंत मातुश्री गंगाबाई अश्वि शु॥ ७ इंदुवारी प्रसूत जाली. पुत्ररत्न ज़ाले.[2] (१८-४-१७७४). यामुळें बारभाईची मसलत पुष्कळच सावरली; तितकीच या बातमीमुळें राघोबास आतां राज्य मिळण्याची बिलकूल आशा राहिली नाहीं. कारण 'असल जाहल्यावर नकलेस कोण विचारतो' हें त्रिंबकरावाचें वचन सार्थ ठरलें.

**राघोबाचा पाठलागः**—हरीपंतांनीं कासेगांवच्या पिछेहाटीनंतर रुकनुद्दौलाशीं खलबत करून सांगोल्याजनीक माणेवर मुक्काम केला. राघोबामध्यें व त्याच्यामध्यें सात आठ कोसांचें अंतर होतें. हरीपंतानें लष्कराची जुळवाजुळव करून मोंगली फौजांशीं मिलाफ केल्याचें राघोबास समजतांच त्यांचा धीर सुटला व ते तुळजापूरचे रोखें चालले. ही बातमी कळतांच हरीपंत मोंगलासह पाठलागास निघाला. पुढें राघोबा व मागें हरीपंत असा हा 'शिवाशिवीचा खेळ' बरेच महिने चालला. तुळजापुरास उभयतां फौजा आल्या असतां भवानराव प्रतिनिधी दादास सोडून हरिपंतास मिळाला. परिंड्याजवळ हरीपंतानें मोंगलांचा सरंजाम भारी असल्यामुळें चहू-

---

१ स्प्रिंजेल. पृ. २२०; Forrest p. 253. २ पे. द. ५-४५.

कोसाचे अंतर मागें ठेवून आपण सडेच पुढें निघाला. मागाहून पायबंद दिला असतां राघोबा पैका कोठें मिळवील, काय खाईल, लोक त्याजपाशीं कसे राहतील हें हरीपंतास पहावयाचेच होते. या सर्वांचा विचार केला असल्यामुळें हरीपंतास एक प्रकारचा आत्मविश्वास वाटत होता. राघोबा जिकडे जाईल तिकडे त्याचा पिच्छा पुरवावयाचा असा हरीपंतानें चंग बांधला. 'नबाब आम्ही भोसले येकदिल असतां कोणेगोष्टीची चिंता नाहीं.' ही त्याची ठाम समजूत होती आणि ती अस्थानीं होती असें म्हणतां येणार नाहीं. दादासाहेब नगरहून पुण्यास येणार अशा आवया उठल्यामुळें नाना फडणवीसानें नारो अप्पाजीस पुण्याचा उत्तम बंदोबस्त करून बातमी राखून दादा वीस पंचवीस कोशी आल्यानंतर तुम्ही निघोन जावे तेथें न रहावें' म्हणून कळविलें.[१] परंतु दादासाहेब एकदम अंजठ्याचा घाट उतरून खानदेशांत ब्र्हाणपुरास आले व ब्र्हाणपुराहून इंदुरास येऊन दाखल झाले. पाठोपाठ हरीपंत होताच. इंदुरास तुकोजीनें दादाची भेट घेतली असें पाहतांच हरीपंतानें नागोराम, मोरो गिरमाजी, व निळो गोपाळ असे तिघेजण तुकोजीकडे बोलणें करण्यासाठीं पाठविले.[२] अर्थात् त्यामुळें राजकारणें व मसलती घाटूं लागल्या व यापुढें दादा उत्तरेकडील सरदारांच्या हातांतलें एक प्यादें होऊन बसला.[३] होळकर व शिंदे यांनीं सल्लखाचा घाट घातला व हरीपंतास पुढें येऊं नका म्हणून पत्रें लिहिलीं. एवढ्या अवधींत राघोबानें आपले वकील सुजाउद्दौला, रोहिले, मारवाडचे बिजेसिंग, कच्छचे महाराज, राजपुतान्यांतील राजेरजवाडे, जंजि-

१ पे. द. ५-४४. २ पे. द. ५, ५०. ३ Cambridge History of India Vol. V. p. 253-54.

त्याचे शिद्दी यांचेकडे पाठवून स्वतःस राज्य मिळविण्यासाठीं त्यांचे-कडे मदतीची याचना केली. याच सुमारास मुधोजी भोसले यांनीं शिंदेहोळकराचें धोरण जोखून नागपूरची वाट धरिली व तेथून बापू व नाना यांस 'आतां सर्व भरंवसा आपला आहे' अशा अर्थाचें दिलगिरीचें पत्र पाठवून त्यांच्याशीं सलोखा केला.[१]

पुढील भविष्य ओळखून ३० मार्च १७७४ रोजीं बापूनें महादजीस राघोबाला आश्रय देऊं नये अशा आशयाचीं पत्रें लिहिलीं व शक्य असल्यास वाटाघाटींस व पुढील धोरण ठर-विण्यास त्यास पुरंदरास बोलाविलें.[२] परंतु महादाजीनें बापूस पत्र लिहून कळविलें कीं 'आमचें लक्ष आपणावेगळें नाहीं. जी गोष्ट आपण योजिली ती सबळ पडावी हीच इच्छा!' याखेरीज उत्तर हिंदुस्थानांतील परिस्थिति कशा प्रकारची आहे व दादा-साहेब इकडे आल्यास काय परिणाम होतील ह्याचें त्यानें भडक चित्र रेखाटलें. हिंदुस्थानांत रोहिले व जाट यांचीं मराठ्यांविरुद्ध राजकारणें चालू होतीं. वजीर इंग्रजांची मदत घेऊन दोन लाख फौजेनिशीं बुंदेलखंडावर चालून येणार म्हणून आवई होती. नजफ-खान यानें राजपुताना आक्रमण करण्यास सुरुवात केली होती. अशा स्थितींत राघोबाचें हें खूळ महादजीविरुद्ध या लोकांस सामील झाले असते तर महादजीवर मोठाच प्रसंग होता हें निर्विवाद आहे. ही परिस्थिति अवास्तव होती असें म्हणतां येणार नाहीं. राघोबा आपल्या विरुद्ध असतां त्यास उत्तरेकडे जाऊं द्यावयाचें नाहीं हेंच मुख्य काम मुख्यतः शिंदे होळकर यांना त्यांच्या स्वतःच्या

१ पे. द. ५-४८. २ इ. सं. पृ. ५५.

सुरक्षिततेच्या दृष्टीनें करावयाचें होतें. राघोबास व बारभाईस त्यांनीं जाबसालावरी गोविले याचें कारण हेंच दिसतें. 'महादजी मोठा धूर्त असल्यामुळें या प्रसंगाचा फायदा घेऊन आपली सत्ता वाढविण्याचा त्याचा प्रयत्न होता' अशी टीका रा. खरे महादजीवर करतात.[1] महादजीनें आपलें हित प्रथम पाहिलें ह्यांत त्याला दोष कां द्यावा? त्यावेळीं सर्वांनीं स्वहितावर पाणी सोडिलें होतें आणि एकट्या महादजीनेंच राष्ट्रघात केला असें तर रा. खरे यांचें म्हणणें नाहीं ना? वस्तुतः राघोबा व कारभारी असे दोघेही शिंदेहोळकरांना आपापल्या बाजूकडे ओढूं लागले तेव्हां त्यास भाव चढला आणि त्यांनीं तो अधिक जास्त कां न चढवावा? कारण बारभाईंचा पक्ष न्यायाचा आहे म्हणून त्यास मिळावें तर त्यांचा जय होईल असा निर्वाळा कोण देणार? आणि राघोबास जय मिळाल्यास मात्र तो आपली कंबख्ती करणार हें शिंदे होळकरास निश्चित, पुरेपूर माहीत होतें. अर्थात् 'आत्मानं सततं रक्षेत्' या न्यायानें ते वागले. असो.

श्रीमंतास नानाप्रकारें बोध करून मर्जी ठिकाणीं आणण्याचा महादजीनें प्रयत्न केला आणि विचारविनिमय करून बापू व नाना यांना पुढील अटी कळविल्या. १ सैन्याचा पगार देण्यासाठीं राघोबास ६ लक्ष रुपये द्यावे. २ नोकर व इतर लवाजमा यांच्याकरतां एक लाख रुपये मंजूर करावे. ३ नारायणरावाचा खून करण्यामध्यें जे लोक सामील होते त्यांना शिक्षा करावी. केवळ संशयावरून अटक केलेल्यास सोडावें. ४ राघोबानें ५०० लोकांनिशीं पुण्यास रहावें. कृष्णराव बल्लाळ काळे यांच्या सांगण्यावरून व आपापसां-

१ खरे नाना पृ. ३०.

तील यादवी टाळावी म्हणून बापू व नाना यांनीं ह्या अटी मान्य केल्या. परंतु राघोबास या अटी मान्य होईनात. यावर महादजीनें सदाशिव चिमणाजी, मालोजी घोरपडे, सखाराम हरि, मानाजी फांकडे यांचीं बायकामुलें सोडून देण्याबद्दल व ब-हाणपुरास वाटा-घाटी करण्याकरितां फौजेसह यावें म्हणून बापू व नाना यांना विनंति केली. रघुनाथरावासही बारभाईशीं वाटाघाट व सलोखा करणें या वेळीं अगत्याचें वाटलें. तेव्हां राघोबाच्या तर्फेनें विष्णु महादेव गद्रे, होळकराच्या बाजूनें नारो गणेश शौचे व शिंद्याचे बाळाराव गोविंद असे तिघेजण पुरंदरास १० आक्टोबर १७७४ रोजीं येऊन पोहोंचले. तेथें बापू व नाना आणि हे तिघेजण यांच्यांत पुष्कळ खलबतें झालीं. रघुनाथरावानें १० लक्षांची जहागिर व दोन किल्ले घेऊन स्वस्थ बसावें अशी सूचना पुढें आली. पण ती दादास पसंत नव्हती. दादास १५ लक्ष रुपये व तीन महत्त्वाचे किल्ले पाहिजे होते. यावेळीं समेट करून देण्याबद्दल शिंद्यांनीं लाख पन्नास हजार रुपये व शिंदखेड वगैरे गांव स्वतःकरतां मागितले. मध्यस्थी करावी म्हणून कारभाऱ्यांनीं शिंद्यास रुपये व गांव दिले. तरी शिंद्यांनीं यावेळीं पत्रोपत्रीं बोलण्यांत कालक्षेप होतो व कोणतें बोलणें तडीस जात नाहीं असें कारभाऱ्यांना कळवून त्यास ब-हाणपुरास समक्ष येण्याबद्दल पुनः विनंति केली.

अशा तऱ्हेनें वकील पाठवून समेटाची बोलणीं लावण्यांत राघोबाचा उद्देश केवळ कालहरण करण्याचा व एकादा मित्र शोधून काढण्याचा होता. बापू व नानांना राघोबाचे हे डावपेंच कळत नव्हते असें नाहीं. परंतु राघोबाशीं समक्ष बोलणेंचालणें करण्यासाठीं

---

१ इ० सं० १. ५५

त्यांना पुरंदर सोडणें भाग होतें. हरीपंताचेंही असेंच म्हणणें पडलें कीं कारभारी सैन्यांत आलेखेरीज दबदबा वाटणार नाहीं. कारण साबाजी भोसले हरिपंतास सोडून मुधोजीस टक्कर देण्यासाठीं वऱ्हाडांत निघून गेले, निजामानें हजारों सबबी सांगून मराठ्यांच्या फौजापासून लांब रहाण्याचा उपक्रम सुरू केला व राघोबाच्या पाठलागांत टंगळमंगळ चालविली; अशा स्थितींत हरिपंतास कांहींच करतां येईना. हरीपंतानें ही वस्तुस्थिति कारभाऱ्यांस कळविली. याच वेळीं दक्षिणेंत हैदर व बसलतजंग यांनीं मराठी मुलुखास उपद्रव देण्याचें काम जोरांत चालवल्यामुळें त्यांचा कांहींतरी बंदोबस्त केल्याशिवाय कारभाऱ्याना पुरंदर सोडतां येईना. शेवटीं पुरंदरचा बंदोबस्त पुरुषोत्तम दाजीवर सोंपविण्याचें ठरवून बापूनें व नानानें एका पत्रामध्यें "श्रीमंत कासारबारीच्या सुमारे आले. उभयेता सरदाराच्या विद्यमानें ठराव जाहाला आहे, परंतु त्यांतील जाबसालांस दिकती पडतील. त्या येथून उगवावयास लांबण पडल्ये. दिसगतीवर पडते याजकरितां आम्ही उभयेतां कार्तिक वद्य पंचमीस येथून निघोन टोकेयाच्या सुमारे येतो. राजश्री सेनासाहेब सुभा यास घेऊन आपले फौजेंत आणावें "[१] असा आपला उद्देश जाहीर केला. पुरंदरचा बंदोबस्त करून बापू नाना व रामचंद्र गणेश हे २९-११-१७७४ रोजीं पुरंदराहून निघाले, ते औरंगाबादेस २३-१२-१७७४ रोजीं येऊन पोहोचले. निजाम व रुकनुद्दौला यांनीं बापू व नाना यांचें थाटाचें स्वागत केलें. उभयपक्षीं वस्त्रें देण्यांत येऊन नजराणे झाले.[२]

---

१ पे. द. ५.६० २ बापूच्या कीर्दींत त्या दिवशीं ५३५ रु.

औरंगाबादेहून कारभारी टोक्यास आले असतां शिंदे होळकर दादास घेऊन मालेगांवपर्यंत आले. परंतु दादा तेथून निसटून पळून गेले व उठविले कीं, "बापू व नाना यांच्या चित्तांत आपणास कैदेंत घालावयाचें होतें." वास्तविक पाहातां बापू व नाना यांनीं शिंद्यांस असा निरोप पाठविला कीं, 'तुम्ही जे जे मागत आलांत ते ते आजपर्यंत आम्ही तुम्हांस व राघोबास देत आलो इतके असूनही कराराप्रमाणें श्रीमंतास वागावयास लावण्याचे तुमच्याने होत नसल्यास, **त्यास खुशाल वाटेल ते करूं द्यावे.**' या निरोपापैकीं शेवटच्या वाक्याच्या शब्दार्थाप्रमाणें अक्षरशः आचरण शिंदे होळकरांनीं केलें व आपल्या मुलुखास निघून जावयाचें ठरविलें.[१] त्यामुळें राघोबानें उत्तरेकडे पलायन केलें. त्यांच्या पाठीमागें एका मजलीनें शिंदे होळकर, त्यामागें हरिपंत घोरपड्यासुद्धां, त्याच्या पाठोपाठ ३ मजलीचे तफावतीने कारभारी मोंगलसुद्धां अशी ही मालिका लागली. यावेळीं महादजीनें सखारामबापूस चकविलें ही गोष्ट खरी. 'शिंदे होळकरांनीं आशेस गोऊन किल्यावरून उभयेतास काढून दादासी बिघाड करून मसलत लांबवून खर्चाखालीं आणले व शेवटीं दादास काढून दिले'.[२] या उल्लेखावरून शिंदे होळकरांनीं

४ आणे खर्चीं पडले त्यांत १ चिरा, १ मिठा, १ पटका, १ गोशपेच, १ नालाबंदी इतके जिन्नस होते. तितकाच खर्च नानांनीं केला. निजाम व इतर दरकदार यांना दरबार भरवून बापूनीं व नानांनीं थाटाची मेजवानी दिली. त्या दिवशीं एकंदर खर्च १८२३ रु. ६ आणे झाला. त्यांपैकीं ४५० रु.ची बापूनीं खर्च केले त्यांत २०० रु.शाल व किनखापाचीं वस्त्रें २५० रु. निजामास दिलीं. तितकाच खर्च नानांनीं केला. बाकीचा निम्मा खर्च निजाम व रुकनुद्दौला यांनीं केला.

१ खरे २१९५. २ पे. द. ५.६६.

दादाशीं संगनमत करून त्यास पळवावयाची फूस दिली असावी असा संशय येतो.

उज्जनीपलीकडे जाऊन बडोद्यास गोविंदराव गायकवाडाकडे जाण्याचा दादांचा बेत होता. परंतु तो बदलून फर्दापूरच्या घाटानें ते धारच्या किल्ल्यास पोहोंचले. त्यांची बायको आनंदीबाई गरोदर होती सबब तिला तेथें ठेवून ते उज्जनीवरून गुजराथेकडे वळले, व बडोद्यास जाऊन पोहोंचले. तेथेंही हरीपंताची फौज जवळ आली. धारेस असतांना राघोबाचा सुजाकडे जाण्याचा बेत होता पण तो फिसकटला. राघोबा बडोद्याहून कूच करून अहमदाबादेकडे आला तो इंग्रजांचा आश्रय मिळावा या हेतूनें. तरी शिंदे होळकर हरीपंतास हिसके देऊन त्यास थोपवून धरून मध्यस्थी करण्याचा आव आणीतच होते. इकडे बापू व नाना निजामास घेऊन कासारबारी, थालनेर, तारखेडे वगैरे गांवांहून नर्मदा ओलांडून सेंधवेबारीस आले. तेथून बऱ्हाणपुरानजीक त्यांचा मुक्काम झाला. बऱ्हाणपुरास बापू व नाना यांस असें कळलें कीं राघोबा धारच्या किल्ल्यांत आनंदीबाईस ठेवून खंबायतेस इंग्रजांच्या आश्रयास गेला. तेव्हां बापू व नाना यांनीं हुकूम पाठवून धारच्या पवारांचा सरंजाम जप्त केला. परंतु या संधीस निजामानें कांहीं तरी सबब दाखवून पुढें येण्याचें नाकरलें. साबाजी भोसले तर मराठ्यांस अगोदरच सोडून गेला होता. शिंदे होळकर तर आपल्या मुलुखाकडे पळालेच होते. सुजानें दोआबांतील राहिलेलीं मराठ्यांचीं ठाणीं जिंकून घेतलीं होतीं. गुजराथेंत फत्तेसिंग व गोविंदराव यांच्यामध्यें लढा पडलेलाच होता. वऱ्हाडांत मुधोजी व साबाजी यांच्यांत लढाया चालू होत्या. दक्षिणेंत प्रतिनिधी बंधू भवानराव व भगवंतराव, कित्तूरकर देसाई वगैरेंनीं बंडावा माजवला होता. कोल्हापुरकर व इचलकरंजीकर यांच्यांत तंटे लागून

चकमकी सुरू होत्या. हैदरानें बंकापुर जिंकलें होतें. कारभारी पुण्यांत नाहींत ही संधी साधून इंग्रजांनीं फौज व आरमार पाठवून साष्टी व आसपासचा प्रदेश तडकाफडकी हस्तगत केलाच. या सर्व बातम्या बापू व नाना यांना बऱ्हाणपुरास कळल्यावर पुढें जाण्यांत कांहीं विशेषार्थ नाहीं असें जाणून आपल्या बरोबरीची फौज हरीपंताकडे पाठवून त्यांनीं 'लवकरच देसीं जाण्याचा विचार केला'. साष्टी बेट शक्यतेर ताब्यांत घेणें व इंग्रजांना बोरघाटांत पायबंद घालणें हें काम त्यांनीं प्रथम करण्याचें ठरविलें.[1]

१ पे. द. ५·७२; खरे २२३८.

# प्रकरण ९ वें

## साष्टीचा वेढा व इंग्रज-मराठे युद्ध.

साष्टी व वसई हीं कोंकण प्रांताचीं नाकीं असल्यामुळें लष्करी डांवपेचाच्या दृष्टीनें त्यास अतिशय महत्त्व आहे. मुंबईच्या गव्हर्नरनें इ. स. १७६९सालीं आपल्या मिनिट बुकांत असें नमूद करून ठेविलें कीं "मराठ्यांची वाढती सत्ता ही आपणांस दुःखाची व धोक्याची सूचना आहे. मद्रास व बंगाल सरकार त्यांच्याकडे फार बारकाईनें लक्ष देत आहे. आपणांस तूर्तातूर्त साष्टी कशा प्रकारें हस्तगत करतां येईल याकडे डोळ्यांत तेल घालून पहात बसलें पाहिजे." यावरून इंग्रजांस साष्टीचें महत्व केवढे वाटत होतें याची कल्पना होईल. बापूचा मित्र वसईचा सुभेदार विसाजीपंत लेले हा साष्टी व वसई घेण्यासंबंधानें इंग्रज कसे टपून बसले आहेत व त्यांचे प्रयत्न कसकसे चालले आहेत याची माहिती पुणें दरबारास कळवीत असे. जकातीच्या बाबतींत याची करडी नज़र असल्यामुळें इंग्रज लोक याला शत्रु समजत असत. बारभाईचें कारस्थान झाल्यानंतर जी यादवी सुरू झाली तिचा फायदा घेण्याचें इंग्रजांनीं ठरविलें. बापू व नाना पुरंदरहून निघण्यापूर्वीं इंग्रजांचा वकील **मॉस्टिन**'आपणांस सुरतेची जनराली सांगावयाबद्दल मुंबईचे जनरलानीं बोलाविलें' अशी बापूस लोणकढी थाप मारून मुंबईस गेला ( १६–१२–१७७४ ). तिकडे त्यानें फौज व आरमार पाठवून साष्टी व वसई हे दोन किल्ले घेण्याबद्दल मुंबईच्या गव्हर्नराचें मन वळविलें. वास्तविक पाहातां इंग्रज व मराठे यांच्यामध्यें आज ३५ वर्षेंपर्यंत सलोखा होता. तो मोडण्यासारखें कांहींच कारण घडलेलें नव्हतें.

" कैलासवासी आप्पासाहेबी तहरह केला त्यास ३५ वर्षे झाली. त्यास निखालसता होती. सांप्रत संधी पाहून त्यानी लबाडी केली,"[१] असा एके ठिकाणीं उल्लेख आढळतो. त्यांनीं मराठ्याविरुद्ध युद्ध असें पुकारलेंच नाहीं किंवा लढाईची घोषणाही केली नाहीं. यावरून परिस्थितीचा योग्य वेळीं फायदा घेण्यांत इंग्रज लोक किती चतुर आहेत हें कळतें. इंग्रज जनरल **रॉबर्ट गॉर्डन** व **टेलर** यांनीं बाराशें माणसानिशीं साष्टीवर हल्ला चढविला व ॲडमिरल **वॉटसन** यानें आरमाराच्या सहाय्यानें समुद्रांतून त्यांचा पाठपुरावा केला. यावेळीं इंग्रजास इतकी खात्री होती कीं, " सारी पेशवाई उलटून पडेना कां साष्टी व उरण आमचे हातांतून जाणार नाहीं " असे ते म्हणत; व ही घोषणा ऐकून सर्व लोकांस आश्चर्य वाटे कीं ' संपदा कांहींच नसतां इंग्रज इतका दाब व मगरूरीच्या गोष्टी सांगतात हें काय ! '[२] परंतु मराठ्यांची परिस्थिति इंग्रजांनीं पूर्णपणें आकलन केली होती. कवायती फौजेच्या व शिस्तीच्या जोरावर आपण कोणासही हार जाणार नाहीं असा त्यांस आत्मविश्वास होता.आणि कारभारी पुण्यापासून दूर असल्यामुळें सैन्याची मदत साष्टीस मिळणार नाहीं हेंही इंग्रजांनीं ओळखलें होतें.

वेढा पडल्यावर साष्टीचा किल्लेदार आनंदराव राम यांनीं बापूस पत्रें पाठवून ' गाडदी व बरकंदाज फार पाहिजेत' असें लिहून सैन्याची मदत मागितली[३]. पुण्याहून नारो आप्पाजीनें ' साष्टीत सरंजाम पोख्त नाहीं, म्हणून विसाजी कृष्ण बिनीवाले या उत्तर हिंदच्या स्वारींत नांवाजलेल्या सरदारास ३ हजार

१ पे. द. ३५·५६. २ पे. द. ५·७३. ३ पे. द. ३५·३६

लोकांनिशीं बापूच्या सांगण्यावरून साष्टीस पाठविले. इकडे बापूनें त्याचप्रमाणें शहाजी भोसले यास वसईस मदत करावी म्हणून लिहिलें व मराठी आरमाराचे अधिपति आनंदराव धुळप व रघूजी आंग्रे यांनाही इंग्रजी आरमाराशीं लढाई देऊन तें गुंतवून ठेवण्याबद्दल आज्ञा केली. तसेंच इंग्रजांच्या बंदराशीं कोणीही व्यापार करूं नये व त्यांना माल पुरवूं नये म्हणून सक्तीचे वटहुकूम सोडले. कांहीं लोभी व्यापारी यावेळीं मराठी दरबारास लाख लाख रुपये परवान्याकरितां भरण्यास तयार झाले होते. परंतु तशा प्रकारचे दस्तक त्यांना देण्यांत आले नाहींत. बापू साष्टीचें महत्त्व पूर्णपणें ओळखून होते म्हणून शक्यतोंवर तें ठिकाण आपल्या हातांतून जाऊं नये याबद्दल त्यानें फार परिश्रम घेतल्याचें दिसतात.

इंग्रज सैन्याचा तळ जेथें पडला होता ती जागा डावपेंचाच्या दृष्टीनें फार फायद्याची होती. इंग्रज सैन्यांतील तोफखान्याचा भडी-मार किल्लयावर चालला होता. तर दुसऱ्या बाजूनें इंग्रजांच्या आरमारी तोफांचा सारखा मारा किल्लयावर सुरूंच होता. सैन्य व आरमार एकमेकांस पाठपुरावा करीत होते म्हणून त्या ठिकाणीं जाऊन तोफा बंद पाडणें विसाजी कृष्णास अशक्य होतें. त्याच्या सर्व सैन्याचा संहार झाला असता. तेव्हां किल्लयाजवळच तळ देऊन योग्य संधीची वाट पहात बसण्याखेरीज विसाजी कृष्णास गत्यंतर नव्हतें. संधी साधून त्यानें बाहेरील थोडेसे लोक किल्लयांत घातले. किल्लयांत अगोदरच फितूर होता. "यासमयी आरमार असते तर फार मोठें कार्य होते" असें विसाजी कृष्ण बापूस लिहितो. धुळपास पत्रें गेलीं असूनही त्यानें आपलें आरमार पाठ-विलें नाहीं. नारो अप्पाजी लिहितो "धुळपास पत्रे लिहितां लिहितां

भागलो आतासे निघत आहेत[१]. आरमार येत नाहीं असें पाहून रघुजी आंग्र्यानें 'खुष्कीच्या मार्गानें लोक पाठवितो' असें विसाजीस कळविलें. परंतु तेही लोक वेळेवर आले नाहींत; सखारामबापूनें वासुदेव बाबा नांवाच्या इसमाबरोबर १००० लोक व ५ लक्ष रु. साष्टीस रवाना केले. " इंग्रजांचे आगीचे भय फार तेव्हां रात्रीचा येलगार करावा. बरकंदाज माणूस फार भरून ठेवावें " म्हणून विसाजी कृष्ण, नारो आप्पाजी, यांस बापूंनीं सूचना केल्या; परंतु बापूंच्या या सूचनांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. मराठ्यांची आरमारी बाजू लंगडी पडल्यामुळें उघड्या डोळ्यानें विसाजी कृष्णास किल्ला जमीनदोस्त होत असलेला पहाणें भाग पडलें. इंग्रजांनीं ख्रिस्ती प्रजेचीं मनें आपलीशीं केल्यामुळें मराठी सैन्यास दाणावैरण मिळेना. अशा स्थितींत विसाजीचा व किल्लेदार आनंदराव राम यांचा तरणोपाय नाहींसा झाला. " टोपकरानें किल्ल्याच्या सफेल्या मारून नेस्तनाबूद केल्या. तोफा लटक्या केल्या. किल्ल्याच्या तटबंदी जमीनदोस्त झाल्या ".[२] आठ दिवस मारगिरी झाल्यानंतर फौज येऊन पावत नाहीं असें पाहून आनंदराव राम यानें किल्ला इंग्रजांच्या हवालीं केला. " **मैदानची लढाई असती तर जी फौज स्वामींनी रवाना केली तीच फौज काम करते. पाण्यामुळें रावतास पेंच. पाईचें लोकांचेंच काम फार**", असें विसाजी कृष्ण बापूस लिहितो[२]. बापू व नाना पुरंदरास आल्यानंतर त्यांनाही हा किल्ला परत घेणें परम दुर्घट आहे, त्याकरतां २०–२५ लक्ष रुपये खर्च करावे लागतील असें कळून आलें. खर्चाची तंगचाई

१ पे. द. ३५,१४४. २ पे. द, ३५, १६३

असल्यामुळें अर्थात् साष्टी परत घेण्याचा उद्योग कारभाऱ्यांना सोडून द्यावा लागला.

इंग्रजांनीं साष्टी काबीज केल्यामुळें मराठयांच्या सत्तेस व दबाबास फार जोराचा धक्का बसला. साष्टी हातची गेल्याबद्दल बापूस अतिशय वाईट वाटलें. इंग्रजांनीं कोणतेंही कारण न दाखवितां एकदम किल्लयास वेढा देऊन तो घेतला. हें कृत्य त्यांनीं मराठे व इंग्रज यांचे सलोख्याचे संबंध असतां केलें ही लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. त्यामुळें मॉस्टीनास सर्व मराठे अत्यंत लबाड म्हणून समजून चुकले. "मोस्टीन इंग्रज मात्रागमनी. दोन वर्षें पुण्यांत सालसवाणें दाखवून होता. वस्तुतः पाहतां सरकारांत कांहीं विलग पडल्यास साष्टी घ्यावी हेंच त्याचें लक्ष्य होतें?"[1] भोळे बिचारे मराठे! साष्टी हातांतून गेल्यानंतर मोस्टीनास शिव्या देऊं लागले. एवढ्यावरून कांहीं धडा घ्यावा तर तोही नाहीं. पुढें मोरोबाच्या कारस्थानांत मोस्टीनलाच आपल्या खलबतांत घेतल्याचें दिसून येईल. परकीय दरबारचे लोक राजधानींत सालसवाणें राहतील ही मराठयांची कल्पनाच राजनीतीच्या तत्त्वाशीं विसंगत दिसते. असो. मोस्टीनास साष्टीसंबंधीं विचारतां "पोर्तुगीज तो किल्ला घेणार असें ऐकिल्यावरून आपण तो किल्ला घेतला" असें त्यानें आनंदराव खासगीवाले यांस आपल्या कृत्याचें समर्थन करण्यासाठीं सांगितलें. अशाप्रकारें बारभाईची सर्व तऱ्हांनीं लंगडी बाजू होऊन त्यांना इंग्रजांचें पारिपत्य करणें अशक्य कोटींतलें होऊन बसलें.

**इंग्रज–मराठे युद्ध**–बापू व नाना नर्मदातीरावरून पुरंदरास आल्यावर त्यांनीं १५–१–१७७५ रोजीं निजामास भेटीस बोलावून

---

१ पे. द. ३५. ५६

पूर्वींचाच स्नेह कायम करावा म्हणून त्याशीं बोलणें केलें निजामानें कारभाऱ्यांची अडचणीची ही संधि साधून दौलताबाद किल्ल्याची मागणी केली.[1] बापू व नाना यांना अर्थात् नकार देववेना, कारण निजाम शत्रुपक्षास मिळाला म्हणजे कारभाऱ्यांची पुरी १०० वर्षें भरलीं. निजामाची आराधना संपल्यावर बापूनें या सुमारास वामनराव पटवर्धन व आनंदराव रास्ते यांस हैदरावर रवाना केलें. इचलकरंजीकर व कोल्हापूरकर यांची लढाई चालू होती ती मिटविण्यासाठीं कोनेरराव पटवर्धनास पाठविलें. परंतु त्याचा मोड होऊन त्यास परत यावें लागलें. याबद्दल बापूंनीं पटवर्धनांची चांगलीच कानउघाडणी केली. ही लढाई टाकून कोनेरराव पळूनच आले; ऐवज तर अजून सरकारांत भरलाच नाहीं इत्यादि आरोप बापूनें पटवर्धनांवर केले. याबद्दल पुष्कळ भवति न भवति होऊन हें प्रकरण मिटलें व अखेर रामचंद्र गणेशास फौज देऊन करवीरकरावर त्यास रवाना करण्यांत आलें.

राघोबानें खंबायतेहून सुरतेस जाऊन मुंबईकर इंग्रजांशीं तह केला. त्यास **सुरतेचा** तह असें म्हणतात[2]. त्यांत इंग्रजांनीं २५०० स्वारांनिशीं राघोबास मदत करून पुण्याची गादी मिळवून देण्याचें आश्वासन दिलें. त्याकरतां राघोबानें साष्टी, वसई, भडोच व सुरत हे प्रांत इंग्रजांना द्यावे; इंग्रजांच्या सैन्याचा खर्च द्यावा वगैरे अटी ठरल्या. त्याप्रमाणें इंग्रज सेनापती कर्नल कीटिंग हा दादास घेऊन सुरतेस आला. हरिपंतानें यावेळीं फत्तेसिंग गायकवाडास आपल्या बाजूस वळवून घेतलें होतें. पुढें युद्धास तोंड लागून कीटींगच्या व हरिपंताच्या नापार, नाविलनपाडा येथें निकराच्या. चकमकी

१ खरे २१८२

२ Forrest p. 211-5; Aitchison, Treaties. VI 20.

झाल्या. कांहीं वेळेस इंग्रजांचा जय होई तर कांहीं प्रसंगीं मराठ्यांना यश मिळे असें चाललें होतें. शेवटीं पावसाळ्यामुळें इंग्रज भडोचेस छावणीस राहिले व हरीपंत खानदेशांत गेला.

पुणें दरबारचें राजकारण या वेळीं दिवसेंदिवस फिकें पडूं लागून त्यांच्यावर नाना प्रकारचीं संकटें येऊं लागलीं. तरीही बापूनें चोहोंकडे नवीन कमावीसदार नेमून 'जागजागा सावधता धरावी' म्हणोन कळविलें होतें.[1] त्यांतूनही विशेष गोष्ट अशी घडली कीं, निजामाचा दिवाण रुकनुद्दौला हा ह्या सुमारास मृत्यु पावला. त्याचा व बापूचा स्नेह असल्यामुळें निजाम बारभाईस मिळाला होता, परंतु आतां निजामानें सवाई माधवरावास पेशवा म्हणून मान्यता देण्याचें नाकारलें. त्याचा कल आतां दादाकडे झुकूं लागला. तेव्हां बापू व नाना यांना पुन्हां निजामाचीं आर्जवें करणें भाग पडलें; व १८ लक्ष रुपये उत्पन्नाचा मुलूख देऊन त्याची समजूत काढावी लागली. यामध्यें बिनिवाले व धायगुडे यांच्या जहागिरीचे प्रांत होते. अर्थात् ते नाखूष झाले. परंतु मोबदला प्रांत देऊन त्यांची समजावणी केली. शिवाय त्यांत पैठण, जोगाईचें अंबें, वेळापूर अशीं क्षेत्रें होतीं; तेव्हां बापूचें असें म्हणणें होतें कीं 'पैठण क्षेत्र गंगातीर ब्राह्मणाची जागा न द्यावे' परंतु जाबसाल लांबणीवर पडूं नये एवढ्याकरतां द्यावे लागले.[2] बापूचा असा बेत होता कीं नबाबाकडे राजकारण करून त्याचे फौजेस बाहेर काढावे म्हणजे 'आपला जथ पाहिल्यावर' त्यामुळें दादा व इंग्रज नरम पडतील. मग दादा इंग्रजांकडेच राहतात कां सरदारास जाऊन मिळतात तें कळून येईल व त्यासारिखा पुढें विचार करतां येईल. बापू नानास सुचवितात

१ पा. सं. नं. ५८. २ पा. सं. नं. ७९.

कीं, भिकाजीपंतास दादाकडे बोलून पाठवावे व " त्याणी त्यासी सलूखाच्या स्नेहाच्याच गोष्टी गोडगोड बोलावे तोडू नये. असे रीतीनें केल्यास बरे आहे."[१] दौलतीच्या अशा कठीण परिस्थितींत सखारामबापू नानांस ' अधिक उणे बोलावयाचे असल्यास बोलावे ' म्हणून सल्ला विचारतात.[२] यावरून दादा व इंग्रज यांशीं तोंड देण्यांत येथपर्यंत तरी दोघे एकमेकांच्या विचारें चालत होतें हें स्पष्ट दिसतें.

बारभाईच्या पक्षाचा साबाजी भोंसले याची मुधोजीशीं लढाई होऊन त्यांत साबाजी ठार झाला व दादाच्या पक्षाचा मुधोजी विजयी झाला. त्यामुळें बारभाईचा एक मोठाच आधार गेला. इंग्रजांची यावेळेस चढती कमान होती. बलिष्ठ आरमारांच्या सहाय्यानें त्यांना आपल्या सैन्यास मदत पोचवितां येत असे. बापू लिहितात " मुंबईवाल्यांनीं दोन गलबतें बेलापूरास पाठविलीं कारण काय तें पुरें कळलें नाहीं." मराठ्यांची ती एक बाजू लंगडी होती. हरीपंत लांब गेलासें पाहून पावसाळ्यांत दादास घेऊन इंग्रजांनीं संबंध गुजराथ व्यापिली. त्यामुळें फत्तेसिंगास त्यांच्याशीं तह करणें भाग पडले. बापूंना या गोष्टीचें स्वप्न अगोदर पडलें होतेसें दिसतें. ते लिहितात " अकार * मात्र दगा हरयेक जागा करतील. यास्तव कुलाबा, साष्टी, वसई, सुरत येथील बातमी चांगली असावी. वरचेवर बातमी येत जावी. सुरतेकडील बातमी येत नाहीं. गोविंदराव गायकवाड कोठें आहेत काये करतात हे कलत नाहीं येविसीची कलेल तसी तरतूद करून बातमी दुहेरी वरचेवरी येवी असे करावे. गोविंदराव पैका कोठें घेतात हे वरचेवर कलवावे. मोस्टीन सुरतेकडे

१ पा. सं. ८१. २ पा. सं. नं. ८१. * अंग्रेज = इंग्रज.

गेला तो कोठे राहिला काये करीतो हे वरचेवरी कळवावें. त्यास पुण्यांतील साहुकारांची लिहिलीं [ पत्रें ] सुरतेस जात असतील तेथून येत असतील नसल्यास यावे असे साहुकारासही सांगोन बातमी वरचेवर कची कले असे जाल्यानें बरें आहे."[१] सावकारांच्याकडून मॉस्टीनची बातमी काढण्याची बापूची क्लृप्ति त्याच्या कार्यकुशल कल्पकतेची एक द्योतक आहे. इंग्रज हे सावकार तेव्हां सावकारांच्या बातम्या सावकारास ठाऊक या दृष्टीनें हा बाण नेमकाच लागणार होता. पण इंग्रजांनीं दादास अगोदरच सुरतेस आणून आपली छाप चोहोंकडे बसविली होती. "दादा सुरतेस येतो अशी आवई पडून पुण्यांत आठ चार रोज थोडीशीं गडबड होईल," अशी भीति बापूस वाटल्याचें दिसतें.[२] कारण ह्याचा परिणाम म्हणजे 'आम्हावर दबाव' व 'आपलें काम' असा होईल व त्यामुळें इंग्रजांची बाजी शेर होईल असा बापूचा अंदाज होता व तशाच गोष्टी पुढें घडून आल्या. तेव्हां या सर्व परिस्थितीचा विचार करतां इंग्रजांच्या बातम्या काढणें हें महत्त्वाचें काम होतें. परंतु बापूच्या या एकंदर सावधगिरीचा परिस्थिति बदलण्या इतका फारसा परिणाम झाला नाहीं.

सर्व परिस्थिति प्रतिकूल होत चाललेली पाहून बापू व नाना यांनीं जिवाजीपंत काळे यांस लढाई बंद करून तह करण्यासाठीं मुंबईस रवाना केले.[३] जिवाजीपंतानीं इंग्रजांशीं बोलणें लाविलें कीं दादासाहेबांनीं १५ लक्ष रुपये व दोन किल्ले घेऊन रहावे व इंग्रजांनीं २० लक्ष रुपये घेऊन साष्टी सरकारांत परत द्यावी.[४] परंतु इंग्रजांस या मागण्या कबूल नव्हत्या. त्यांचे म्हणणें बापूच्याच

१ पा. नं. नं. ७१. २ पा. स. नं. ८३. ३ खरे २३५९.
४ खरे २३६१.

शब्दांत पुढीलप्रमाणें होते. " जिवाजीपंत काळे मुंबईहून आले त्याणी तेथें वर्तमान सांगितले त्यास येथें पाठविले त्याचे बोलणें आइकले. इंग्रजांचे बोलणं श्रीमंत दादास जागीर दाहाची द्यावी असे आहे. नाहीं म्हटल्यास सिंद्याचे मध्यस्तीनें देत होता आमचे कां न आइकावे असें म्हणतात."[1] यामागण्यासंबंधीं बराच विचार-विनिमय करून बापूनें नानास पुढील विचार सुचविला, "ते (इंग्रज) बोलत असता उत्तर न करावे तर बंगाल्याहून वकील येऊन यावरी जें सलूख होतो असेही प्रमाण नाहीं. कसे पडेल नकळे.यास्तव याजवळ बोलावे थोडेबहुत त्यास खर्चास २ लाख परियंत नेमून देऊ आनखी सिबंदी वगैरे खर्च लागेल सरासरी तीन चार पर्यंत बेरीज होईल याजवरी आइकावे जागीर म्हणतील ती द्यावी तर गुदस्ता देत होतो त्याजवर खराबी काय जाली आता जागीर कोठून द्यावी या अन्वयें यासी बोलोन पाठवणें."[2] बापूचा विचार शक्यतोवर ओढून धरण्याचा होता. पावसाळा संपल्यावर हरी-पंतानें गुजराथेकडे कूच करून गनिमी काव्यानें इंग्रजास बेजार कर-ण्याचा बेत ठरलेला होता. परंतु या मोहिमेस सुरवात होणार तोच कलकत्त्याचा गव्हर्नरजनरल **वॉरन हेस्टिंग्स** यानें मुंबई सरकारास 'मराठ्याशीं चाललेलें युद्ध अविचाराचे,अनधिकृत,भीतीप्रद आहे'असें कळविलें.**वॉरन हेस्टिंग्स** यानें शिवाय **सखारामबापूस** एक विस्तृत पत्र पाठविलें त्यांतील सारांश असा कीं," मुंबईकर इंग्रज हे आमच्या हाताखालचे असून आम्हास न विचारतां त्यांनीं दादासाहेबांचा पक्षस्वी-कारून तुम्हाशी लढाई आरंभिली आहे सबब आम्ही मना केली आहे. तुम्हीहि लढाई मना करावी. तहाचे करारमदार ठरविण्याकरतां तुम्हा-

१ पा. सं. नं.८१ २ पा. सं. नं. ८१ (बापूचें नानास पत्र.)

कडे वकील पाठवितो." [१] कारभाऱ्यांनीं कालमान पाहून हें बोलणें तत्काळ मान्य केलें. **सखारामबापूनें वॉरन हेस्टिंग्स** यास २९ जुलै १७७५ रोजीं उत्तर पाठविलें तें महत्वाचें असल्यानें सबंध उद्धृत करतो. " तुमचें शहाणपण, धूर्तता, व बुद्धिमत्ता ह्यांचीं अनेक उदाहरणें माझ्या ऐकण्यांत आल्यावरून तुमच्याशी स्नेह जोडावा अशी माझी फार दिवसापासून मनीषा होती. परंतु अद्याप योग आला नव्हता. कोणतीही गोष्ट तिची वेळ आल्याशिवाय घडून येत नसते. असो ईश्वरकृपेनें याच प्रसंगीं माझ्या इच्छेनुरूप आपलें पत्रहि आल्यामुळें हा योग जुळून आला आहे. आपलें पत्र वाचून आपल्या स्नेहाविषयीं खात्री झाली व संतोष वाटला. सदरपत्रामध्यें तुम्ही मुंबईचे सरदारास राघोबास मदत न देण्याविषयीं लिहिलें. तसेंच कंपनीच्या हुकुमावाचून त्याला दिलेली कुमक परत घ्यावी व श्रीमंत रावांच्या राज्यास उपद्रव देऊं नये असा हुकूम पाठविला असेंहि लिहिलेलें वाचून संतोष झाला.×××पूर्वापार संबंध असा आहे कीं, मुंबईचे सरदार व पेशवे यांच्यामध्यें स्नेह असून तो स्नेह अनेक तह व करारांनीं बळकट झालेला होता. इतक्यांत दुर्दैवानें श्रीमंत नारायणराव यास रघुनाथरावानें ठार मारिलें, ही हकीकत जगजाहीरच आहे; तथापि त्यांना पुत्र झाला असून त्यांच्या आश्रयाखालीं आम्ही रहात आहोंत. हा पुत्र झाल्यापासून सर्वांस उल्हास व उमेद आला व त्याला मसनदीवर स्थापन करण्यांत आले. × × × × कैलासवासी रावांच्या वेळीं मी व नाना कारभार पहात होतो व त्याचप्रमाणें आतांसुद्धां गादीची मनःपूर्वक चाकरी आम्ही करीत आहों व करण्यास तयार आहों. याबद्दल एकंदर आबाल-

१ "परिशिष्ट" पहा.

वृद्ध संतोषित आहेत. त्याचप्रमाणें नबाब उल्मुल्क यांचीहि आम्हांबरोबर पूर्वींप्रमाणें दोस्ती आहे. × × × × × × ही हकीकत होतांच रघुनाथराव हिंदुस्थानाकडे पळाले व त्यांच्या पाठीवर सरकारची ही फौज गेली. इतक्यांत मुंबईचे सरदारानीं या सरकारबरोबर असलेला पुरातन स्नेह व निरनिराळे तह एकीकडे ठेवून लबाडीनें या सरकारच्या साष्टी वगैरे जागा घेतल्या व सरकारच्या फौजाबरोबर लढाई करीत परागंदा झालेल्या रघुनाथरावाबरोबर तह केला. तुमच्या देशांत तहनामे पाळण्याविषयीं कडक नियम आहेत, ज्यांच्यामध्यें तह ठरतात ते त्याविरुद्ध मरेपर्यंत वागत नाहींत असें असतां मुंबई सरकारांनीं स्नेहाचा संबंध तोडून असें वर्तन चालविलेलें पाहून मला फार आश्चर्य वाटलें! या वर्तनाबद्दल त्यांचा बंदोबस्त करणें जरूर पडल्यावरून आमची फौज मोठ्या तयारीनिशीं त्यांच्यावर पाठविली आहे × × × माझा हेतू आपल्या धन्याचा अधिकार बळकट करावा, प्रजेचें कल्याण करावें, तिला सुख द्यावें, आणि मातबर लोकांतील तंटे मोडून ऐक्य करावें असा आहे. त्याचप्रमाणें तुमचीहि इच्छा आहे. ×××× बाळाजीपंतांनीं आपल्यास वेगळें लिहिलें आहे. पत्राचें उत्तर पाठवून दोस्ती कायम ठेवावी." [१] यावेळीं हेस्टिंग्सनें वकील पाठवून युद्ध बंद केलें ही गोष्ट एकापरीनें मराठ्यांच्या हिताचीच झाली. कारण मराठी राज्याची परिस्थिति अतिशय बिघडून गेलेली होती व अशा

१ Secret Committes 5th Report p. 80. सरदेसाई म. रि. ५ पृ. २५१ पहा. बापू व नाना यांनीं वारन हेस्टिंग्स यांस "दोघांच्या नांवानें वेगवेगळालीं पत्रें ( एकाच मजकुराची कां असेनात ) पाठवावीत" असें कळविलें होतें. त्याप्रमाणेंहेस्टिंग्स दोघांस वेगवेगळीं पत्रें पाठवित असे.

स्थितींत हें युद्ध तसेंच पुढें रेंगाळलें असतें तर मोठाच प्रसंग होता ! दुसरी बाजू पाहतां कलकत्तेकर इंग्रजांना नापारच्या लढाईचें वृत्त ऐकून मुंबईकरांनीं अंगावर घेतलेल्या मनसुब्यास पुढें यश मिळेलच असा संभव दिसला नाहीं. त्यांतून निजामाची फौज मराठ्यांना येऊन मिळणार हा अंदाज ओळखून इंग्रजांना लढाई थांबविणेंच इष्ट वाटलें. मुंबईकर इंग्रजांची मात्र वॉरन हेस्टिंग्सनें युद्धतहकुबी मागितली ही मोठीच लुडबूड केली अशी समजूत झाली; परंतु रेग्युलेटिंग ॲक्टान्वयें हेस्टिंग्स यांस हिंदुस्थानांतील कंपनीच्या मुलुखावर प्रमुख अधिकार मिळाल्यामुळें मुंबईकरांना तात्पुरती कां होईना त्याजपुढें मान तुकवावी लागली. अशा प्रकारें मराठे व इंग्रज या दोघांनाही स्वतःसंबंधीं अनिश्चि-तपणा व ऐकामेकांबद्दल धास्ती वाटत असल्यामुळें तह घडवून आला आणि ही गोष्ट परस्परांच्या दृष्टीनें हिताचीच झाली.

## प्रकरण १० वें.

# सर्वाधिकारी सखारामबापू.

### (१) पुरंदरचा तह, (२) इंग्रजांचे लपंडाव,

### (३) अंतस्थ भानगडी.

मराठ्यांशीं तह ठरविण्यासाठीं इंग्रजांचा वकील **कर्नल अप्टन** व त्याचे सहकारी कॅप्टन ॲलन मॅकफर्सन, सर जेम्स पॅटरसन, डॉ. सूटोन बँक्स्, व कॅप्टन बेंजामिन रो हे कलकत्याहून १० जुलै १७७५ रोजीं निघून काल्पीमार्गें पुरंदरास यावयास निघाले. सखारामबापूनें अप्टनास पेशवाई मुलुखांतून येण्यासाठीं परवाना पाठवून ठिकठिकाणच्या अधिकाऱ्यांना त्यांस सामोरे जाऊन त्याची उत्तम बडदास्त ठेवण्याबद्दल व सामानसुमानाची मदत करण्याबद्दल लिहिलें.[1] अप्टनबरोबर १२ हत्ती ७०० पायदळ व ८०० घोडेस्वार इतका लवाजमा होता. औरंगाबादेच्या रस्त्यानें तो २८ डिसेंबर रोजीं पुरंदरास येऊन पोहोंचला.[2] बापू व नाना यांनीं पुरंदरच्या पायथ्याशीं उभारलेल्या शामियानांत त्याचें स्वागत केलें व त्यास राहण्यासाठीं सुमेरसिंगाचा वाडा दिला. ता. ३१ डिसेंबर रोजीं दरबार भरला असता अप्टननें बालपेशव्यांची भेट घेऊन त्यांना वस्त्रें, नजराणे दिले.

वॉरन हेस्टिंग्सनें अप्टनास मराठ्यांशीं तहासंबंधीं बोलणीं करणें, साष्टी व वसई हीं बेटें मागून घेणें, मुंबईसरकारनें राघोबास मदत करून जें युद्ध सुरू केलें, त्याबद्दल कंपनीच्या वतीनें दिलगिरी

---

१ रा. १०. १३२; प. कॅ. ४. ३४६. २ पे. द. ३६. २८१

प्रदर्शित करणें, सुरतेचा तह रद्द करणें वगैरे कामें घडवून आणण्या-बद्दल संपूर्ण अधिकार दिलेले होते. अप्टन पुण्यास आला तरी मुंबई सरकारनें युद्ध थांबविण्याविषयीं कर्नल कीटिंग यास हुकूम सोडिले नव्हते. तेव्हां सखारामबापूनें हेस्तिंग्स यांस कळविलें कीं, " मुंबई सरकारनें गव्हर्नर जनरलचा हुकूम अंमलांत आणल्याचें दिसत नाहीं. राघोबाच्या मदतीस दिलेली फौज परत बोलावण्यांत आली नाहीं. त्याचप्रमाणें त्यांनीं मराठ्यांचीं जिंकलेलीं ठाणीं परत देण्यांत आलेली नाहींत. मराठी सैन्य मात्र युद्ध थांबवून परत फिरलें आहे. तेव्हां जनरलानीं मुंबई सरकारास तेवढे हुकूम ताबडतोब द्यावे."[1] हेस्तिंग्सनें त्याप्रमाणें मुंबईकरास लिहितांच त्यांनीं कीटिंगास युद्ध थांबवून सुरतेस येण्याबद्दल लिहिलें;व त्याप्रमाणें तो राघोबास सोडून सुरतेस निघून गेला.

अप्टन व त्याचे सहकारी यांनीं बापू व नाना ह्यांची पुरंदरच्या पायथ्याशीं कोंढीत येथें १ जानेवारी १७७६ रोजीं भेट घेऊन तेथें तहासंबंधीं खलबतें सुरू केली[2]. सखारामबापू, नाना फडणीस, कृष्णराव काळे, कर्नल अप्टन व त्याचे सहकारी व एक दुभाषा हे संध्याकाळीं बसत व त्यांचीं खलबतें मध्यरात्रीपर्यंत चालत. इंग्रजांस खुर्चीशिवाय बसण्यास श्रम होऊं लागत तेव्हां कारभाऱ्यांनीं खुर्च्या मागविल्या. परंतु त्यास ही संवय कोठची? पुरुषोत्तम दाजी लिहितात ' कारभारी खुर्चीवर बसून फार भागले म्हणजे भुईवरही बसत ' ! असो.

इंग्रज वकीलांनीं वाटाघाटी सुरू झाल्यानंतर बापू व नानांना पहिल्याप्रथमच कळवलें कीं " आम्ही राघोबाचा पक्ष धरला तो

१ प. कॅ. ४. ३५६–७. २ पे. द. ३६. २९२

वाजवी अगर गैरवाजवी असो आम्ही सावकार नफा तोटा पहाणार''. अर्थात् इंग्रजांचें असें म्हणणें होतें कीं साष्टी, वसई हीं ठिकाणें आणि भडोच व सुरत हे महाल तुम्ही आम्हास दिले पाहिजेत. यावर बापू व नाना यांचें असें उत्तर होतें कीं " जी लढाई तुम्ही अन्यायानें सुरूं केली म्हणून म्हणता, तिजबद्दल मुलूखही मागतां ही कोठली तऱ्हा ! " बापूनें अप्टनास स्पष्ट जबाब दिला कीं, रघुनाथरावास आमच्या स्वाधीन करावें आणि परस्परांनीं परस्परांचा लढाईंत घेतलेला मुलूख परत द्यावा या अटीवर तह होऊं शकेल. नाहींपेक्षां यापुढें वाटाघाट करणें तहकूब ठेवावें लागेल. कर्नल अप्टन आपलें म्हणणें यत्किंचितही मागें घेईना, व कारभारी ढिले सोडिनात. सरते शेवटी अप्टनानें रुसून परत जाण्यास निरोप मागितला. कारभाऱ्यांनीं तो दिला, तेव्हां अप्टनानें ७ फेब्रुआरी १७७६ रोजीं कलकत्त्यास कळविलें कीं, 'सलुख मोडला.' [२] त्याजवरून कलकत्त्याचे लाट साहेबांनीं मुंबईस लिहिलें कीं ''अप्टनाचे मराठे ऐकत नाहींत तर लढाईचा सरंजाम करणें येथून मदत पाठवितो.'' तेव्हां कर्नल कीटींग यानें गुजराथेंत पुनः मराठ्यांशीं लढाई सुरू केली व तो सबंध गुजराथ घेणार असा रंग दिसूं लागला; परंतु हरिपंत अजून गुजराथेंत होता; त्यामुळें मराठ्यांना फारसें भिण्याचें कारण नव्हतें. पण इंग्रजांनीं यावेळीं निजाम, हैदर, भोसले, होळकर, शिंदे, याजकडे कारस्थानें सुरूं केली. त्यांनीं मद्रास व अयोध्याकडील आपापल्या सरकारास पत्रें लिहून मराठ्यांना शह बसेल अशा तऱ्हेनें राजकारणें करण्यास सांगितलें. शिंदे होळकर तर सरकारी कामाविषयीं उदासीनच होते. तेव्हां ''लढाई बहुत दिवस

१ खरे ले. ७१६१ २ प. कॅ. ५. ९; केंब्रिज हिस्टरी ५. २५७

चालली खर्चाची वोढ फौजेस पोटास नाहीं. जिकडे तिकडे दंगे. सरंजामचा पैका येत नाहीं, कर्ज मिळत नाहीं शिबंदीचा पेच भारी अशी बिकट परिस्थिती भगवंते निर्माण केली'' असें जाणोन 'सर्वनाशे समुत्पन्ने अर्धं त्यजति पण्डितः' या न्यायानें बापू व नानांनीं इंग्रजांच्या बहुतेक मागण्या कबूल करण्याचें ठरविलें. बापूनें अंबादासपंतास माधवराव जाधवरावाकडे पाठवून त्या करवीं " आपटेणास छेडून पुसिलें की तुम्ही प्रतिज्ञा करून सलुख केला असतां कीटण तर ऐकत नाही तेव्हां तुमचे कोणाचे प्रमाण ते काये मानावे तुमचे ऐकत नाही तो स्वतंत्र असे अखेरसाल जाहले पुढे विचार काये बहुतारीतीनें कायिल केले " तेव्हां आपटेणाने खुलासा सांगितला जे " तुमचे आमचे मध्ये सलुख ठरत नाहीं असे जाले होते ते वर्तमान आम्हीं कलकत्यास मराठे ऐकत नाहीं असे लिहिले होते "[1] सारांश अप्टननें सलूख मोडल्यामुळें युद्धास इंग्रजांनीं सुरुवात केल्याची गोष्ट कबूल केली; परंतु त्यानें पुनः कलकत्त्यास पत्र पाठवून कळविलें कीं ' फिरोन सलुख ठरला मराठे यांनीं ऐकले.' त्याचा हेस्टिंग्सनें जाब पाठविला कीं 'सलुख झाला तो मानला उत्तम आहे.[2] सखारामबापू पुढें लिहितात कीं " त्या पत्राची आपटणाने नक्कल मुंबईस रवाना केली. ते आज† पावली ( असेल ) तेथून ३ रोजी सुरतेस जाईल तेथून कीटणास पावेल तेव्हां त्याची खातरजमा होईल गुंता नाहीं असे आपटेणांचे बोलणे आहे तेव्हां सदाशीव रामचंद्र यांनी पहिल्या पत्रांतील वर्तमान लिहिले आहे ते लटके. कलकत्यास सलुख मानल्याची पत्रे आली यावरून आपटण

१ पा. सं. नं. ९४ हें पत्र बापूनें नानास तहाची हकिकत कळावी म्हणून लिहिलें ...... २ किंता, † २५-४-१७७६

आपली जागा बहुत संतोषी आहे सलुख ठरविल्यानें मुहुर्ता करतां चार दिवस राहिले होते त्या दिवसांतच ठराव झाले म्हणोन त्यांनीं लिहिले होते त्याचे जाब आले याउपर गुंता पडणार नाहीं असे दिसते कळले पाहिजे "[१] या पत्रावरून इंग्रज वकीलाची अत्यंत मुत्सद्देगिरीची वागणूक असूनही ग्रँटडफ त्यास साधा भोळा व सरळ म्हणतो व दक्षिणी ब्राम्हण मात्र महाबिलंदर व वस्ताद ! त्यांच्याशी बोलण्यांत अप्टन सहज बनला गेला असें लिहितो आणि त्याचीच 'री' केंब्रिजहिस्ट्रीकार ओढतात याचें आश्चर्य वाटतें.[२] कारभाऱ्यांनीं इंग्रजांच्या मागण्या कबूल केल्यावरून १ मार्च १७७६ रोजीं पेशव्यांतर्फे सखारामबापू व बाळाजी जनार्दन ऊर्फ नानाफडणवीस आणि इंग्रजांतर्फे अप्टन व इतर सहकारी यांनीं **पुरंदर येथें तहावर** सह्या केल्या. तहाचा आशय असा होता कीं, "गव्हर्नर जनरल साहेब तयार असतील तर पेशव्यांनीं ३ लक्ष रुपयांचा मुलूख साष्टीबद्दल इंग्रजास द्यावा नाहींतर साष्टी इंग्रजाकडेच रहावी; भडोच शहराजवळचा मुलूख व १२ लक्ष रुपये लढाईचा खर्च इंग्रजास द्यावा; राघोबानें सैन्यास १ महिन्यांत रजा द्यावी व २५ हजार रुपये पेन्शन, १ हजार स्वार व कांहीं नोकर यासह गोदावरीतीरीं रहावे; इंग्रजांनीं दादा किंवा त्यांच्या तर्फे कोणी बंड केल्यास त्यांना मदत करूं नये.[४]

१ पा. सं. ९४. २ Duff. Vol II.p.53-54; Cambridge History of India Vol. IV p. 257. ३ साष्टी संबधींची ही अट बापूस कबूल नव्हती, कसेंही करून ग. ज. नें ती परत द्यावी असें त्यांचें म्हणणें होतें. प. कॅ ५. २३ पहा. ४ Aitchison Treaties. VI.28; प. कॅ. ५.९८.; सिंप्रेजल पृ. २३१; खरे २५५६

पुरंदरचा तह म्हणजे मराठे व इंग्रज यांच्या लढ्यांतील तात्पुरती युद्धतहकुबी होय. उत्तम तोफा व बंदुका, उत्कृष्ट कवाईत व आरमार वगैरेंच्या सहाय्यानें इंग्रजांनीं साष्टी हस्तगत केली व गुजराथेंत मराठ्यांना चांगलाच हात दाखविला. तरी हरीपंताच्या गनिमी काव्यानें इंग्रज बरेच बेजार झाले व आणखी दोन पराभव झाल्यास आपला दबाव, कर्तबगारी यांबद्दल नेटिवांच्या मनांत आदर राहणार नाहीं असें वाटल्यावरून तहाबद्दल बोलणें इंग्रजांनीं काढिलें. मुंबईच्या इंग्रजांची ही पडती बाजू गव्हर्नर जनरल वॉरन हेस्टिंग्स यानें यावेळीं मोठ्या मुत्सद्दीगिरीनें सावरून धरिली. सखारामबापू वगैरे मुत्सद्यांनासुद्धां इंग्रजांशीं युद्ध चालू ठेवणें खर्चाचें जिकीरीचें व परिस्थितीच्या दृष्टीनें अवघड काम वाटूं लागलें होतें असा उल्लेख मागें आलेलाच आहे. तरी अशा परिस्थितींत सुद्धां कारभाऱ्यांनीं चोहोंकडचा बंदोबस्त कसाबसा उरकून युद्धाचा मुख्य भर इंग्रजाकडे द्यावयाचा ठरविला होता. म्हणून जरी तह झाला तरी त्यानें हा लढा कायमचा मिटला अशी दोन्ही पक्षांची समजूत नव्हती. विशेषतः इंग्रजांची तर नव्हतीच नव्हती. खुद्द गव्हर्नर जनरल वॉरन हेस्टिंग्स यानें तहास जरी मान्यता दिली तरी तपशीलासंबंधीं तो अत्यंत नाखूष होता. मुंबईसरकार तर प्रथमपासूनच तहाच्या विरुद्ध होतें. वॉरन हेस्टिंग्सनें अप्टनास वाटाघाटीस पुण्यास पाठविण्याचें ठरविलें तेव्हां मुंबईकरांनीं टेलर नांवाचा वकील कलकत्यास पाठवून त्या करवीं आपली बाजू न्याय्य असल्याचें समर्थन गव्हर्नरजनरल-इन-कौंसिलांत केलें होतें. तहाविरुद्ध जरी प्रत्यक्ष उठावणी करणें मुंबई-सरकारास यावेळीं शक्य नव्हतें तरी अंतस्थ रीतीनें राघोबास त्यांनीं आपल्या लगामीं लावून आसरा देण्याचें ठरविलें होतें. इंग्रज म्हणत

कीं, " श्रीमंत राजश्री दादासाहेब धनी नव्हत. तरी एक वर्षभर ........मुलुकांचा नाश करून कारभारी याही केलें काय? धरून बंदीत कां न ठेविले ते धनी व हे चाकर तेव्हां यांचा हात त्याजवर कसा चालतो"[1]राघोबाचा राज्यावर धनीपणाचा हक्क आहे ही गोष्ट इंग्रज पक्के समजून होते. म्हणूनच त्यांनीं त्यास हाताशीं धरिलें.

पुरंदरचा तह म्हणजे बापूच्या उपयुक्त सार्वजनिक कार्याची कमाल मर्यादा होय. बापूच्या अक्कलहुशारीनें बारभाईचें तारूं संकटाच्या भोंवऱ्याचा भेद करून शरिसलामत बाहेर पडलें. शिंदे होळकरांची मदत नसतांही बापूनें इंग्रजांशीं टक्कर देण्याचें काम इतक्या धडाडीनें व धोरणानें पार पाडलें, कीं इंग्रजांनाही पेशव्यांशीं दोस्ती करणें जरूर वाटलें. बापू व नाना या दोघांनींही एक विचारानें वागून अंगीकृत कार्य यशस्वी करून दाखविण्यास कंबर कसली; म्हणूनच बारभाईचें आसन स्थिर झालें. बारभाईचें कारस्थान उभारल्यानंतर एकुलत्या एक पुत्राचा मृत्यु वढून आला तरी सखारामबापूंनीं सर्व दुःख गिळून कार्यांत आळस केला नाहीं यावरून त्यांची कर्तव्यनिष्ठा व चिकाटी चांगलीच दिसून येते. तसेंच तह घडवून आणण्यामध्येंही कोठें पड घ्यावी, कोठें ओढून धरावें वगैरे परराष्ट्रमंत्र्याच्या अंगीं आवश्यक असणाऱ्या गुणांची अत्युत्कटता बापूंनीं पुनः एकवार सर्वांच्या प्रत्ययास आणून दिली. सारांश, बारभाईचें कारस्थान उभारल्यापासून पुरंदरच्या तहावर सह्या होईतोपर्यंतची बापूची कामगिरी अलौकिक, भरीव, राष्ट्रहितकारक व नाणावलेल्या मुत्सद्यांस साजेसी आहे यांत शंका नाहीं.

---

१ पे. द. ५. ७४.

पुरंदरच्या तहानंतर इंग्रजांच्या पुढील धोरणाकडे लक्ष पुरविणें व अंतर्गत राज्यकारभारांत सर्व स्थिरस्थावर करणें या दोन मुख्य गोष्टींत बापूंस लक्ष घालावें लागलें.

**इंग्रजांचे लपंडाव व डावपेंचः**—पुरंदरचा तह झाल्या-नंतर राघोबानें कलकत्त्यास वकील पाठवून अप्टननें तह ठरवितांना आपला विचार घेतला नाहीं; इंग्रजांवर विश्वासून निजा-मानें देऊं केलेली मदत आपण नाकारली त्यामुळें आपला किती तोटा झाला हें गव्हर्नर जनरल व त्याचें कौन्सिल यांस विस्तृतरीतीनें कळविलें. याच सुमारास त्यानें इंग्लंडच्या बादशहास पत्र लिहिलें कीं, "करारमदार तहनामे पाळण्याबद्दल इंग्रज लोकांची ख्याति आहे तेव्हां कलकत्त्याचे गव्हर्नर जनरल व मुंबई सरकार यांना तहाच्या अटी-प्रमाणें राज्य मिळवून देण्याचें कामीं आपणास मदत करण्याबद्दल बाद-शहांनीं हुकूम द्यावा."[१] याचा परिणाम असा झाला कीं, पुरंदरचा तह झाल्यानंतर विलायतेंतील कोर्ट ऑफ डायरेक्टर्स यांनीं गव्हर्नर जनरल व मुंबई सरकार यांना एक खलिता पाठवून सुरतेच्या तहास मान्यता दिली व राघोबाचें रक्षण करून त्यापासून मिळालेला मुलूख ठेवून घ्यावा असें कळवून पुरंदरच्या तहाबद्दल नापसंती व्यक्त केली.[२] एवढी सवलत सांपडतांच मुंबई सरकारनें राघोबास सुरतेस ठेवून घेतलें होतें तें पुरंदरचा तह झुगारून देऊन त्यास मुंबईस बोलाविलें व मलबार हिलवर त्यास रहावयास जागा दिली. अशा प्रकारें पुरंदरच्या तहाच्या बाबतींत इंग्रजांनीं शक्य तितक्या त्यांतल्या अटी टाळण्याचें किंवा त्याविरुद्ध वर्तन करण्याचें धोरण स्वीकारलें.

सखारामबापूनें वॉरन हेस्टिंग्स याजकडे पत्र पाठवून तक्रार केली

१ Forrest p. 282. २ Forrest p. 214.

कीं मराठे व इंग्रज यांच्यांत तह घडून आल्यामुळें कायमचा स्नेह-संबंध जडेल अशी आशा होती. परंतु दुःखाची गोष्ट अशी कीं, तहांतील अटीप्रमाणें मुंबई सरकारची वागणूक होत नाहीं. यावरून इंग्रज लोकांमध्यें प्रामाणिकता, निखालसता फार कमी आहे असें वाटूं लागतें. साष्टी फार वर्षे पेशव्यांच्या ताब्यांत होती ती इंग्रजांनीं दगाबाजी करून घेतली.तो प्रश्न अजून अनिर्णितच आहे. इंग्रजांनीं गायकवाडापासून कांहीं महाल लावून घेतले. कर्नल अप्टन भडोच मागतोच; अर्काटचा नबाब महमदअल्लीखान यानें तंजावर, रामनाथपूर वगैरे ठिकाणें घेतली असून चौथ, सरदेशमुखीचा ऐवज आज कैक वर्षें पेशव्यास दिला नाहीं. या सर्व कृत्यांस इंग्रजांची मदत व फूस आहे हें स्पष्ट दिसून आलेलें आहे. ह्याचें परिणाम फार भयंकर होतील. "[1] या पत्रास हेस्टिंग्सनें गुळमुळीत व उडवाउडवीचें उत्तर पाठविलें. "तह झाला आहे. आतां तक्रार करणें बरोबर नाहीं. आपलें शहाणपण, कर्तृत्व, न्यायप्रियता ही प्रसिद्ध आहेत.तेव्हां आपण व इतर मराठे सरदार तहांतील करारमदार मोडणार नाहींच. आम्हीही शक्यतो तें पाळण्याचा प्रयत्न करूं. [2] " तरी सखारामबापूनें साष्टी देण्याबद्दल हेस्टिंग्सकडे पत्रें पाठवण्याचा सपाटा चालविला.सखारामबापूचीं ह्या प्रकरणांतलीं पत्रें युरोपांतील कोणत्याही कर्त्या, मुत्सद्दी पुरुषास शोभण्यासारखीं आहेत. मुत्सद्दी तहाची, त्यांतील शब्दार्थाची कशी ओढाताण आपल्या फायद्यासाठीं करीत असतात हें हीं पत्रें वाचून चांगलें कळून येतें. त्यावरून परराष्ट्रीय राजकारणांत सखारामबापू, नाना वगैरे पुरुष

---

१ प. कॅ. ५ १६; २६. २ प. कॅ. ५.१७.

इंग्रजांच्या तोडीस तोड, तितकेच मुरब्बी व धोरणी होते, ह्यांबद्दल किमपि शंका रहात नाहीं.

"साष्टी प्रकरणांत सखारामबापूची कुरकूर व तक्रार चालूंच आहे" ह्याबद्दल वॉरन हेस्तिंग्सनें एका पत्रांत आश्चर्य प्रगट केलें.[१] यावर साष्टी मराठ्यांच्या ताब्यांत आज ५० वर्षें असोन मुंबईचे इंग्रजांनीं ती पूर्वींचे तहनामे कोळून पिऊन हस्तगत केली. इतकें असूनही गव्हर्नर जनरलासारखे सभ्य गृहस्थही त्यांच्या अन्याय्य कृत्यास पाठिंबा देतात हें केवढें आश्चर्य आहे. या सर्व गोष्टींचा विचार इकडील सरकारांत चालू असून त्याचे परिणाम चांगले होणार नाहींत" अशा अर्थाचें अत्यंत जोरदार, सडेतोड पत्र बापूनें हेस्तिंग्स यास लिहिलें.[२]

याचा थोडाफार इष्ट परिणाम होऊनच कीं काय सखारामबापूचें समाधान करण्यासाठीं वॉरन हेस्तिंग्सनें मद्रासचा गव्हर्नर लॉर्ड पिगू यांस तंजावरचें राज्य पूर्वींचा राजा तुळजाजी यास परत देण्याबद्दल लिहिलें.[३] परंतु ही गोष्ट करण्याचें कारण असें दिसतें कीं उत्तरेंतील शिंदे, होळकर, भोसले इत्यादि मराठे सरदार एकवटून पेशव्यास आपणांविरुद्ध सामील होतील अशी भीति इंग्रजांस यावेळीं वाटली असावी. शिंदे होळकर इतके दिवस लढाईपासून अलिप्त होते परंतु तंजावर प्रकरणामुळें मराठे कदाचित् विरुद्ध होतील. तेव्हां ब्राम्हणभाई मराठे यांची एकदम एकजूट होऊं नये असा हा डाव होता.

इंग्रजांनीं राघोबास आश्रय देऊं नये हें तहांतलें मुख्य कलम मोडून इंग्रजांनीं राघोबास पेन्शन देऊन मुंबईस ठेवून घेतलें हें मागें

१ प. कॅ. ५. ४८  २ प. कॅ. ५. ५०.  ३ प. कॅ ५. ५०

सांगितलेंच आहे. राघोबाकडून चोहोंकडे वकील पाठवून त्याच्या कार्यास सहानुभूति व शक्यतर मदत मिळविण्याचे इंग्रजांचे जारीचे उद्योग—भगीरथ प्रयत्न सुरूं होते. खुद्द राघोबानें तर सखाराम बापू, बालाजी जनार्दन व सवाई माधवराव वगैरेंना पकडून देण्याबद्दल सनदा, बक्षिसें वगैरेंची पुष्कळांना लालूच दाखविल्याचीं पत्रें आढळतात. [1]कोल्हापूरच्या छत्रपतींना बारभाईविरुद्ध बंड करण्यास त्यानें चिथाविलें होतेंच: तसेंच सदाशिवरावभाऊंचा तोतया निर्माण झाला होता त्यासही त्यानें व इंग्रजांनीं पैशाची व सैन्याची मदत पाठविली. **तोतयाच्या बंडाची** हकीकत मोठी चमत्कारिक पण करुणरसप्रधान अशी आहे.

मध्यवर्ति सत्ता कमजोर झाली म्हणजे राज्यावर हक्क सांगणारे तोतये निर्माण होतात हें पुष्कळ देशांच्या इतिहासावरून दिसून येतें. इंग्लंडमध्यें 'गुलाबी युद्ध' म्हणून आपापसांत जी यादवी सुरूं झाली तीमध्यें लँबर्ट सिम्नेल व परकीन वार्बेक सारखे तोतये राज्यावर हक्क सांगण्यासाठीं पुढें आले. अशींच गोष्ट मराठ्यांच्या इतिहासांत दिसून येते. **सुखनिधान** नांवाच्या कनोजा ब्राम्हणास सदाशिवराव-भाऊ बनवून त्याच्या वतीनें राज्याचा वांटा मागण्याची खटपट एकदोघा अज्ञात इसमांनीं सुरूं केली. थोरल्या माधवरावाच्या कारकीर्दीत या तोतयाचें पारिपत्य होऊन त्यास रत्नागिरीचे किल्लयावर कैदेंत घालण्यांत आलें होतें. त्यास यावेळीं मुक्त करून गादी मिळवून देण्याचा प्रयत्न करावा अशी प्रसिद्ध सावकार व किल्लेदार रामचंद्र नाईक परांजपे यास इच्छा झाली. तोतयाची कैदेंतून सुटका झाल्यानंतर त्याचा बोलबाला फार झाला. हजारों पोटभरू लोक त्यास

१ वाड. पे. स. पृ. ६०;

मिळाले. थोडया अवधींत मुंबईपर्यंत बहुतेक कोंकणपट्टी त्याच्या स्वाधीन झाली. इचलकरंजीचे घोरपडे, सदाशिव दिनकर, रघुनाथराव कोलटकर यासारखे प्रतिष्ठित लोक त्यास मिळाले. हैदर व इंग्रज यांनींही त्यास मदत दिली.

'तोतया' समजून लोक त्याची उपेक्षा करतील असें बापूस प्रथमारंभीं वाटलें.परंतु त्याचें बेसुमार प्रस्थ वाढून त्यास कमालीबाहेर यश मिळणार असें वाटल्यावरून तत्काल कडक उपाययोजना करणें बापूनानांस भाग पडलें. भिवराव पानसे व शिंदे तोतयावर चालून गेले व एकदोन लढायांत त्याचा पुरा मोड झाला. परंतु बंडांत सामील झालेल्या हजारों लोकांस इंग्रजांनीं मुंबईस आश्रय दिला. साष्टीमधील हॉलसे नांवाच्या इंग्रज अधिकाऱ्यानें पेशव्यांच्या फौजेवर गोळ्या झाडून हल्ला करण्याची धमकी दिली. तोतया पळून गेला असतां रघूजी आंग्र्यानें त्यास पकडलें. त्यावर मुंबईच्या गव्हर्नरानें रघूजीस असा निरोप पाठविला कीं 'सदबास आमच्या स्वाधीन करा नाहींतर लढाईस तयार रहा;' पण रघूजीनें ह्यास न जुमानतां तोतयास बारभाईच्या स्वाधीन केलें. त्यानंतर सुप्रसिद्ध रामशास्त्री यांच्यापुढें त्याची चौकशी होऊन त्यांस देहांत शिक्षा देण्यांत आली. तोतयास मदत केल्याच्या आरोपावरून इचलकरंजीकर घोरपडे यांना जबर दंड ठोठावण्यांत आला 'धोंडभट सिद्धये व ६०।७० गोसावी यांना कैदेंत घालण्यांत आले.' रामचंद्र नाईक परांजपे यांची रुजुवात घेऊन त्याची सर्व मालमत्ता जप्त करण्यांत आली व बायकामुलें कैदेंत ठेविलीं. बाबूजी नाईक वगैरेंच्या मध्यस्तीचा यांस कांहीं उपयोग झाला नाहीं.या सर्व गोष्टींस बापूची पूर्ण संमती होती व त्यांच्याच संमतीनें नानानें

या सर्व गोष्टी केल्या.[१] या प्रकरणासंबंधीं "**पारिपत्याशिवाय धास्त पडत नाहीं. पारिपत्य हें झालेंच पाहिजे**" अशा प्रकारचें बापूचें मत नानास पाठविलेल्या एका पत्रांत आढळतें.[२] तहाविरुद्ध मुंबईचे इंग्रजांनीं तोतयास मदत केली याबद्दल सखारामबापूनें वॉरन हेस्टिंग्सकडे तक्रार केली; परंतु या बाबतींत माहिती मागवून चौकशी करतो हें ठरीव साच्याचें उत्तर पाठवून वर मित्रत्वाच्या चार लंब्या लंब्या गप्पा हेस्टिंग्सनें मारिल्या.[३]

इंग्रजांनीं स्वतः तहांतील कलमें न पाळण्याचा अप्रत्यक्षपणें जरी विडाच उचलला होता तरी बाह्यात्कारीं शिष्टपणा कायम राखून पुणें दरबाराकडे तहांत ठरल्याप्रमाणें १२ लक्ष रुपये व तीन लक्ष रुपये आकाराचा मुलुख द्यावा म्हणून मागणी करण्यासाठीं 'मेघफराज' ( Macpherson )यास पाठविलें. नाना फडणवीसांनीं त्याची गांठ घेऊन त्यास चोख उत्तरें दिलीं. तीं उत्तरें 'जितकी केली तितकी समर्पक आणि खरी अशी केली. फार चांगलें झालें त्याचा संशय तोडिला' असें लिहून बापूनीं नानाची पाठ थोपटली.[४] बापूनें अर्थात् बारा लक्ष रुपये देण्याची टाळाटाळ चालविली. नानास त्यांनीं पुढील गोष्टी सुचविल्याचा उल्लेख आढळतो. "मुंबईकरांनीं लबाडी केली. त्याणी महाल जंबूसर सोडावे यैसे करारांत असतां त्यांनीं कराराप्रमाणें केलें नाहीं तेव्हां बारा लक्ष रुपये कोठून द्यावे. आम्हास मसलत दुसरी पडली अद्यापि द्यावे समजले तरी ते जंबूसराचे महाल त्याणी मागूं नयेत हाहि प्रकार आहे. त्याचा विचार माधवरायास पुसावे. विचारे जाले तरी

१ पा. सं. नं. २६. २ पा. सं. नं. ५७ ३ प. कॅ. ५. ८५.
४ पा. सं,नं. २१.

बोलावे. जंबूसर त्याजजवळ आहे तेव्हां पैकाही ते मागणार नाहीत याचा विचार करून बोलावे. कलकत्तेकरासी सलूख करावयाचा प्रसंग पाडीला हे उत्तम आहे. परंतु मागतील काये हे नकळे आलेच तरी चेनापटणकर जवळ आहेत ते जाणावे हे सुचवून दादाचे पारिपत्य करावे ही गोष्ट जाहीर व्हावी. ''[1]

तह पाळण्याचे बाबतींत इंग्रजांचे लपंडाव ओळखून इंग्रजास तीन लक्ष रुपयांचा मुलूख देण्याचे बाबतींत नाना फडणवीसांनीं एक नवीन कोडें घातलें. त्यांनीं इंग्रजांस कळविलें कीं तीन लक्षांचा मुलूख देण्याची गोष्ट कबूल आहे खरी; परंतु त्या मुलुखाचा सध्याचा वसूल तितका असला पाहिजे असा तहांत कोठेंही उल्लेख नाहीं. तेव्हां कमाली आकाराचा म्हणजे त्या मुलुखाचा जास्तींत जास्त आकार केव्हांतरी दप्तरीं नमूद असेल तो मुलूख आम्हीं तुम्हांस देऊ; असें म्हणून गुजराथेंतील आमोद व आसपासचा रुक्ष व ओसाड प्रदेश इंग्रजांस देण्याची तयारी दर्शविली. कर्नल अप्टन त्यावेळीं कलकत्त्यास परत गेला असून त्याची जागा मॉस्टीननें घेतली होती. त्यानें हा मुलूख स्वीकारण्याचें साफ नाकारलें. तेव्हां बापूनें मॉस्टीनच्या आगळीकपणाबद्दल तक्रार करून 'त्यास परत बोलवावे व मुंबईकरास हा तीन लक्षांचा मुलूख घ्यावयास भाग पाडावे ' अशा आशयाचा मजकूर हेस्टिंग्स यास कळविला.[2] अशाप्रकारें हा प्रामाणिकपणें तह पाळण्याचा वाद बापू व नाना आणि हेस्टिंग्स यांना दोन वर्षेपर्यंत पुरला.

इंग्रजांना थोडेसें ताळ्यावर आणण्यासाठीं बापू व नाना यांनीं एक तिसराच उपाय योजिला, तो इंग्रजांना शल्यासारखा बोचला.

---

१ पा. स. नं. २१. २ प. कं. ५,१०६; खरे.नाना ६०

इंग्रज व फ्रेंच यांचें वैर त्यावेळीं सर्वत्र महशूर होतें. सेंट ल्यूबिन नांवाचा फ्रेंच गृहस्थ पुण्यास आला. चोलचें बंदर व रेवदंड्याचा किल्ला आपणांस देऊन दोस्ती करावी म्हणजे पेशवेसरकारला कवाइती फौज, तोफा, बंदुका वगैरेंचें सहाय्य करूं किंवा पेशव्याच्या १० हजार फौजेस कवाइत शिकवून तयार करूं असें त्याचें म्हणणें होतें. बापू व नाना यांनीं त्याची मोठी बडदास्त ठेविली. [1] उभयपक्षीं जाबसाल होऊन बापूकडून फ्रेंच बादशहास पत्रांचीं उत्तरें गेलीं. सेंटल्यूबिनास पुण्यास कायम ठेवून घेण्याचा कारभाऱ्यांचा विचार होता. अर्थात् इंग्रजांच्या वकिलास (मॉस्टीनास) आतां कोणी विचारिनासें झाल्यामुळें त्यानें चडफडून हाकाटी केली कीं मराठे व फ्रेंच एक झाले, अर्थात् मराठ्यांनीं तह मोडल्यामुळें त्यांचें पारिपत्य करणें जरूर आहे. इंग्रजांनीं यावेळीं मराठ्यांशीं युद्ध आरंभिलें असतें परंतु मॉस्टीनच्याच सल्यावरून त्यांनीं ही गोष्ट तहकूब केली. कारण पुण्यांत एक मोठें कारस्थान घाटून त्यांत इंग्रजांना मोठा फायदा मिळण्याचा संभव होता; म्हणून मराठी राज्य सैन्याच्या जोरावर आक्रमण करण्याचा बेत त्यांनीं तूर्त रहित केला. त्या कारस्थानाची माहिती पुढील प्रकरणांत देऊं.

**अंतस्थ भानगडी**—इंग्रजांशीं मराठ्यांचे वरील प्रकारचे संबंध असले तरी कारभाऱ्यास इतर पुष्कळ गुंतागुंती उरकावयाच्या होत्या. महाराष्ट्रांत जिकडे तिकडे बंडाळी माजली होती तिचा बीमोड करण्याचें काम त्यांना करावयाचें होतें. याकामीं त्यांना शिंदे होळकरांची मदत आपसूखच मिळाली. कारण बापू व नाना यांनीं स्वतःच्या कर्तबगारीवर इंग्रजांशीं तह घडवून आणला. आतां फट-

---

[1] पे. द. ५. ८७.

कून वागल्यास आपला फायदा नाहीं, असें शिंदे होळकरांनीं ओळखून पुणें दरबारच्या कामकाजांत मन घालण्याचें ठरविलें. सखारामबापूनें महादाजीकडे ऐवज मागितल्यामुळें तो बापूवर फारच रुष्ट होता. बापूनें होळकरास सूट दिली परंतु शिंद्यावडून ऐवज आणण्यासाठीं विसाजी कृष्णास हिंदुस्थानांत पाठविण्याचा त्याचा विचार ठरला.[1] महादजी येवढ्यामुळें अतिशय चिडून गेला व भोसल्याकडे पत्रें लिहिलीं कीं "मुसद्दी केवळ लबाडी करूं लागले तुम्ही आम्ही यांचें पारपत्य करूं. राज्य तुमचेंच आहे."[2] अशा परिस्थितींत सखारामबापूनें शिंदे होळकरांचीं ही जोडी फोडून त्याकरवीं आपलीं कामें पार पाडण्याचें ठरविलें. नाना फडणवीसांनीं शिंद्यास चुचकारून, अनुकूल करून घेऊन त्यास आशेर, बऱ्हाणपूर वगैरे देण्याचें ठरलें. त्यामुळें नाना व महादजी यांमध्यें गट्टी जमली व त्याच्या जोरावर नानानें पुढें मोठमोठीं राजकारणें उलगडलीं. बापूकडे होळकर व नानाकडे शिंदे आल्यावर राज्याचा बंदोबस्त करण्याचें काम कारभाऱ्यांना चांगल्या तऱ्हेनें करतां आलें. तुकोजी होळकरानें करंकबचें ठाणें घेतलें. हरीपंतास हैदराकडे रवाना करण्यांत आलें. पटवर्धनांना कित्तूर, सुरापूर वगैरे जहागीरदारांचें पारिपत्य करण्यासाठीं पाठविलें. तोतयावर महादजी व भिवराव पानशे गेले. अशा प्रकारें चोहोंकडचा बंदोबस्त करण्यासाठीं मातबर, कर्तीं माणसें पाठविण्यांत आलीं. राघोबाची स्त्री आनंदीबाई धारेस होती. १० जानेवारी १७७५ रोजीं ती बाई प्रसूत होऊन दुसरे बाजीराव जन्मास आले. बाळंतपणांतून उठल्यानंतर तिनें फौज चाकरीस ठेवून आसपास दंगा व लूटमार सुरूं केली. तेव्हां कारभाऱ्यास तिच्यावर फौज पाठविणें

१ पे. द. ५. ८६. २ पे. द. ५. ८६.

भाग पडलें. तिला पुण्यास आणून ठेवण्यासाठीं मराठी सैन्यानें घोरस वेढा घातला. वेढ्यांत सांपडल्यानंतर बाईची पैशाची फारच तारांबळ उडाली. तेव्हां तिनें सखाराबापू व नाना फडणीस यांना वेगवेगळीं परंतु एकाच मजकुराचीं पत्रें पाठविलीं. बापूस पाठविलेलें पत्र महत्त्वाचें परंतु अप्रकाशित असल्यामुळें सबंध देतो.

पौछ १५ ॥ श्रीशंकर ॥ ( ३–९–१७७६ )

साबान सबा.

सहश्रीय चिरंजीव राजश्री सखारामबापू यासी प्रति सौ. आनंदीबाई आसिर्वाद. उपरी येथील कुशळ जाणोन स्वकीये कुशळ लेखन करीत जाणे. बहुत दिवस जाहाले. तुम्हाकडून पत्र न आले. याचे कारण काय ? त्यास यैसे न करणें. सदैव पत्र पाठवून संतोषवीत जाणें यानंतर इकडील मजकूर तर राजश्री रंगराव महादेव व कोनेर शिवदेव येथें येऊन किल्यासी खटखट करितात. नित्य उठोन गोलागोली होत आहे. कही बंद केली आहे. तुमचें नांव घेतात कीं आम्हांस त्यांनीं पाठविलें आहे कीं किला घेऊन आपल्यास पुण्यास न्यावें. त्यास आम्ही त्याजला उत्तर दिले कीं आम्हांस पुण्यास त्यास नफा कोणता ? हें त्यांच्या चित्तांत असतें तरी सिंदे होलकर व हरि बलाल या कामास नामर्द नव्हते. तुम्ही येथें येऊन एक महिना होऊन चुकला. बंदुखा मारून लोक मात्र जखमी करता तिही रुपयाची गांवची माणसें ठेवून धामधूम मात्र किल्याभोंवतीं करिता ही गोष्ट तुम्हास योग्य नाहीं. याप्रमाणें त्याजकडे निरोप पाठविला. त्याजवरून त्याणी दहा पाच कलमे लबाडीची लिहून पाठविली. त्याचे उत्तर कलमास योग्य केलें. येकीकडे वकील बोलावयास पाठवावें व येकीकडेस मोरच्यांचे बंदोबस्त करावें. याप्रमाणें करितात.

लबाड्याही फार बोलितात. आम्ही त्यास बाहेर निरोप पाठविला कीं आम्ही व चिरंजीव येथें आलों आहों. तुम्ही येऊन मोर्चे लाविलें. तुम्हांस किला न आला तरी तुमची आबरू मात्र गेली. बाइकावर तलवार कोणीही धरली नाहीं ती तुम्ही धरलीत. येवढें मात्र तुमचे पदरीं पडले. श्रीसत्तेनें कदाचित् किला तुमसी मऊ बोलिला तरी अंत धर्णा मर्द नाहीं. बाइका मुलासी तरवार धरून पराक्रम काय विशेष जाहला. आम्हांस तो हेंच मोठेपण कीं तुम्हांकडील पांच सात माणूस व हजार दीड हजार स्वार इतका अटंबर घेऊन येथें येऊन बसला. मोरचेही नवगांवांत आणिले. इतकें असोन आम्ही महिनाभर लढाई घेतली. आणि ही जर परियंत लढवेल तवपावेतों लढतच आहों हेंच आमचें थोरपण आहे. आम्ही बाइका होऊन आतून लढतो. तुम्ही पुरुष असोन बाहीरून लढता यातच लहानमोठेपण शहाणे आहेत ते निवडीत असतील. याप्रमाणें त्यांचे आमचे बोलणें जाले. परंतु ते लहान माणूस त्यास शंका कांहींच नाहीं. तरी हेंच बोलणें तुम्हासी आहे. आणीकही घरगुती जाबसाल कीं आम्ही येथें आलों कोणते समयास? कारण कोणतें रुपयाचेही त्या काळांत बळ किती? च्यार माणुसें चांगली तेही तुम्हाजवळ उठून आलीत. त्यापक्षी येथें चांगले माणूस काय असेल आम्ही कोणें तऱ्हेनें येथें आहो हे तुम्हास कलत नसेल कीं काय? **तुम्ही तो दौलतीमध्यें शहाणें येक आहां† असे असोन आम्हांवर तलवार धरोन उभें राहिला या गोष्टीस तुम्हास वाईट कसे म्हणाव?** इतका उद्योग कोणते

† नाना फडणवीसास पाठविलेल्या पत्रांत "फडणीस कारभारी आहां" असे शब्द आहेत. २ पारसनीस संग्रह.

कारणासाठीं केला आहे हें कळत नाहीं. पुरुषाकडे केला तर असो. आम्हांकडे करून तुम्हांस नफा काय ? तरी ही गोष्ट तुम्हांस योग्य नाहीं. तरी यासी मनाची चिठ्ठी पाठवून आम्हांस येथें खर्चा-वेचासाठीं दोचवलाखाचे परगण्याच्या यादी व शहाणा माणूस पाठवून देणें. कटकटीसी अम्हातुम्हासी प्रयोजन नाहीं. इतकें असोन तुमच्या थोरपणास जो योग्य असेल तें करणें. श्रीसत्ताप्रमाण आहे.शा.छ.९रजब बहुत काय लिहिणें हे विनंति.''[२]आनंदीबाईच्या या पत्राचा कांहींही उपयोग झालेला दिसत नाहीं.कारभाऱ्यांनीं दीड वर्षपर्यंत खपून आनंदीबाईचें हें बंड मोडून टाकिलें व तीस नर्मदा-तीरीं मंडळेश्वर येथें १७७७ च्या मार्चांत नेऊन ठेविलें.

तोतयाचें पारिपत्य झाल्यावर नानानें महादजीस कोल्हापूरकरावर चालून जाण्यास सांगितलें. परंतु कांहीं जहागीर मिळाल्याशिवाय हें काम करण्याचें त्यांनें नाकारलें.यावर आशेरचा किल्ला व माळव्यांत १० लक्षांची जहागीर देण्याचें नानानें बापूस न विचारतां शिंद्यास देण्याचें कबूल केलें. त्यावर महादजी सैन्य व तोफखाना घेऊन निघाला व रहिमतपुरास छावणी केली. कोल्हापूरकरांचे व बापूचे संबंध सलोख्याचे होते. कोल्हापूरचा शूर सरदार येसाजी शिंदे हा सखारामबापूस पित्याचा मान देई व कोल्हापूरची राणी दुर्गा-बाई ही " शिवशाही रक्षण करावी यदंनिमित्यं सेवेविशी निर्माण जगदंबेनें तुम्हांस केलें आहे '' असें बापूस म्हणत असे. यामुळें कोल्हापूरकरास बापूची फूस आहे असें नाना व पटवर्धन यांना वाटे. म्हणून नानानें मुद्दाम महादजीस कोल्हापूरकरावर रवाना केलें. हें बापूस नाना व महादजी यांमध्यें स्नेहसंबंध घडून आलेला आहे कळतांच तो सासवडास जाऊन राहिला. प्रथमतः बापूस हरीपंत

व नाना एकत्र होऊन आपणास डोईजड होतील अशी भीति वाटत होती. तेवढ्याकरतांच हरीपंत इंग्रजावरील मोहिमेहून परत आल्यावर त्याची नेमणूक हैदराकडे करण्यांत आली. परंतु शिंदेही नानास मिळल्याचें कळतांच सखारामबापूनीं नानांचें राजकारणांतील महत्त्व नाहींसें करण्यासाठीं खटपट सुरू केली व त्याचें पर्यवसान इंग्रजांच्या मदतीनें एक महत्त्वाचें कारस्थान उभारण्यांत झालें.

बारभाईसंबंधीं इंग्रज मुत्सद्यांचें काय मत होतें तें हेस्टिंग्सच्या एका पत्रांत चांगलें दिसून येतें. तो लिहितो, ' पुण्याचे कारभारीमंडळ अगदींच दुर्बल आहे. जे गृहस्थ कारभार चालवितात त्यास राज्य चालविण्याचा कायदेशीर हक्क कांहींच नसून शिवाय त्यांची आपापसांत गोडी नाहीं. त्यांच्यांत वरिष्ठ सखारामबापू, तो आतां वयोवृद्ध व दुखणेकरी आहे. त्याचा दुसरा साथीदार नाना फडणवीस. या दोघांनीच पुणें सरकारचे वतीनें पुरंदरच्या तहावर सह्या करून दिल्या. परंतु ते कारभारास कंटाळले आहेत. लोकांचा पेशवेसरकारवरील विश्वास नाहींसा झाला आहे. भाऊबंदकी, फितूर सर्व ठिकाणी सुरू आहेतच. कांहीं दिवसांनीं ते विकोपास जातील; राज्य खंबीरपणें चालण्यांस मुख्यतः विश्वास व इभ्रत लोकांत कायम असणें जरूर आहे.परंतु सर्व ठिकाणी त्याचा अभाव आहे.''[1]

इंग्रजांनीं पेशवाईत आपला हात शिरकविण्याचा प्रयत्न केला यांत काहीं नवल नाहीं.

---

१ हेस्टिंग्सचें एल्यट यास पत्र—सरदेसाई–रियासत उ. १. १६७–८

# प्रकरण ११ वें.

## मोरोबाचें कारस्थान व इंग्रज–मराठे युद्ध.

बारभाईचें कारस्थान उभारतांना सखारामबापूनें ज्या कांहीं लोकांस आपल्या विचारांत घेतलें होतें त्यांपैकीं मोरोबा हे एक होते. बापूकडे वडिलकी व नानाकडे अखत्यारी आल्यानंतर मोरोबास कांहींच महत्त्वाची अधिकाराची जागा देण्यासारखी नव्हती. तेव्हां उदासीन होउन मोरोबादादा शिवनेरीस रहावयास गेले[1] त्यावेळीं लोक म्हणत कीं " दादास निराळे टाकलेहे वाईट केले. हे उगेच राहाणार नाहीं· जैसे बापू, नाना येक झाले त्याप्रमाणें यास मसलतींत घ्यावे."[2] परंतु बापू व नाना यांनीं त्यांना कोठल्याही मसलतींत घेतलें नाहीं, याचें मोरोबास मोठें वैषम्य वाटलें. माधवराव पेशव्यांनीं एके वेळीं मोरोबांना मुख्य कारभारी नेमिले होते त्याअर्थीं कर्त्या पुरुषांत आपली गणना झाली पाहिजे असें त्यास वाटे. कारभारी आपणांस विचारीत नाहींत असें पाहून बज्याबा व बाबूजी नाईक यांच्या सहाय्यानें सखाराम-बापू, नाना, गंगाबाई व तिचा मुलगा यांना पकडून राघोबांस गादी-वर आणण्यासाठीं त्यांनीं कट केला. पावसाळ्यांत पुरंदरावरील थंड हवेमुळें कारभारी वगैरे मंडळी सासवडास रहावयास आली असतांना त्या चौघांना एकदम कैद करण्याचा मोरोबांनीं व्यूह रचला. परंतु ३० जून १७७४ रोजी या बेताचा थोडा अगाऊ सुगावा कारभाऱ्यास लागल्यामुळें त्यांनीं पुरंदरावर रातोरात प्रयाण केलें. त्यामुळें ही मसलत फसली. पुरंदरावरही फितूर पेरून या मंडळींना

---

१ पे.द. ५. १७. २ पे. द. ५. १७.

कैदेंत घालण्याचा प्रयत्न त्यांनीं पुन्हां सप्टेंबरांत करून पाहिला परंतु तोही निष्फळ झाला.

बापूंना पुरंदर सोडून सातान्यास जावयाचें असल्यानें आपल्यामागें मोरोबा कांहीं गडबड करतील म्हणून त्यांनाहीं सातान्यास घेऊन जाण्याचें योजिलें. "आपण आलिया खेरीज सातान्याकडे न जावे असे चित्तांत आहे. पहिल्या मुहूर्तानेंच यावे" असें बापू मोरोबास लिहितात.[1] मोरोबानें यानंतर फारशी हालचाल केल्याचें दिसत नाहीं. इ.स. १७७७ मध्यें नाना फडणवीसांनीं मोरोबास खूष करण्यासाठीं सैन्य खातें नवीन निर्माण करून त्यावर मोरोबास नेमून त्यास ४ लाखांचा सरंजाम द्यावा असें सुचविलें. परंतु या योजनेस बापूनें विरोध केला तेव्हां नानानें ती योजना सोडून दिली. पुढें कांहीं दिवसांनीं बापूनें नानांच्या सूचनेस पाठिंबा दिला,पण यावेळीं मोरोबा काम करण्यास तयार नव्हता. तो उघडपणें बापू व नाना यांना कारभारांतून हांकून देण्याच्या गोष्टी बोलूं लागला.

पुरंदरच्या तहानंतर सखाराम बापू व नानाफडणवीस यांमध्यें पूर्वींसारखी चित्तशुद्धि राहिली नाहीं हें मागील प्रकरणाच्या शेवटीं सांगितलेंच आहे.बापू व नाना यांच्यामध्यें वितुष्ट येण्याचे आणखी पुष्कळच प्रकार घडून आले.त्यामुळें प्रसंगानुसार हा कलहाग्नि पेट घेणार असा रंग दिसूं लागला. दोघांचे स्वभाव तर भिन्न होतेच परंतु धोरणेंही भिन्न होतीं. बापूची तडजोडीची वृत्ति असल्यामुळें कारभारांत किंवा राजकीय धोरणांत मतभेदाचा, वादाचा प्रसंग येई तेथें बापू बहुतकरून नानांच्या मतावर सर्व कामकाज सोपवीत. फक्त सुचेल ती अडचण

१ पां. संग्रह

मात्र निदर्शनास आणीत. कांहीं प्रसंगीं बापू स्वतःचें म्हणणें शेवटास नेत. परंतु असे प्रसंग फार थोडे. बारभाईचें कारस्थान उभारून गंगाबाईच्या नांवानें द्वाही फिरविल्यानंतर सखारामबापूकडे **वडिलकीचा**—अनभिषिक्त पेशव्यांचा दर्जा (De facto ruler) गेला व नानाफडणवीसाकडे अखत्यारी म्हणजे हुकमांची अंमलबजावणी करण्याचें (Executive) काम आलें. यामुळें सखारामबापूस सर्व राज्यांत फारच मोठा मान मिळाला आणि कर्तृत्व, मुत्सद्दीपणा वगैरेंच्या दृष्टीनें तो त्यास मिळाला हें योग्यच झालें. परंतु अंमलबजावणी खातें नाना फडणवीसाच्या ताब्यांत असल्यामुळें खरीखुरी सत्ता नानांच्या हातांत आली आणि पुढें पुढें तर नानांनीं बापूस फारसे न विचारतां आपल्याच जबाबदारीवर कामें उरकण्याचें धोरण स्वीकारलें; त्यामुळें बापूकडे वडिलकीचा मान अर्थात् नाममात्र राहिला. सखारामबापू असंतुष्ट होण्यास हें एक कारण झालें.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे **'देणें यादी'** संबंधाची. सरकारांतून कोणास कांहीं देणें असल्यास जी याद होई त्यास 'देणें यादी' म्हणत. ह्या यादीवर खुद्द मालकानें (म्हणजे येथें बापूनें) 'द्यावें' असा शेरा मारून ती याद मंजूर केल्यानंतर कारभाऱ्यानें तिजवर 'देवावे' असा शेरा देऊन ती रक्कम नियोजित इसमास द्यावयाची. बापूचा हा अधिकार फार मोठा असल्यामुळें त्यांना पुष्कळ लोकांस आपल्या मर्जीप्रमाणें वागण्यास भाग पाडतां येत होतें. नानांनीं हळुहळू 'देवावे' असा शेरा मारून किरकोळ कामें बापूस न दाखवितां व त्यांचा शेरा न घेतां उरकून घेण्याचा पायंडा पाडला. महत्त्वाचें राजकीय काम बापूकडे नेऊन त्यांचा सल्ला घेतल्याशिवाय परभारें त्याची वासलात ते लावीत नसत हें जरी

खरें असलें तरी नाना व महादजी यांची आणभाक झाल्यापासून नाना बापूस अशीं कामें केवळ निमित्तमात्र समजावीत व त्यांची अंमलबजावणीहि ते आपल्या मनाप्रमाणें करीत. आपलें महत्त्व कमी करून उचलबांगडी करण्याचा नानांचा हा प्रयत्न आहे असें बापूच्या मनानें घेतलें.

नाना व बापू यांमध्यें विरोध उत्पन्न होण्याचें आणखी एक कारण म्हटलें म्हणजे निरनिराळ्या सरदारांशीं त्यांचे संबंध हें होय. प्रत्येकजण आपापल्या स्नेहीसरदारांना व जाह्गीरदारांना सवलती देण्याचा प्रयत्न करी; त्यामुळें वादाचा प्रश्न उद्भवे. बारभाईचें कारस्थान उभारल्यानंतर युद्धासाठीं सरकारचा जो खर्च झाला त्याची तोंडमिळवणी करण्यासाठीं बापूंनीं नानांच्या संमतीनें सर्व सरदारांच्या उत्पन्नावर **हक्करुसूम** किंवा **दहकपट्टी** नांवाचा कर बसविला. पटवर्धनांनीं या बाबतींत पुष्कळ तक्रार केली. "सरकारची जशी वोढ तशी आमचीही वोढ आहे" असें त्यांचें म्हणणें होतें. परंतु बापूनें त्यांच्याकडे बिलकूल लक्ष दिलें नाहीं. उलट त्यांना असें बजाविलें कीं, 'तुम्ही या सर्व मनसब्यांत अग्रेसर असतां तुम्ही वोढावें हें तुम्हांस योग्य नाहीं. इतकें असूनही वोढलें तरी भीड धरीत नाहीं.'[१] वास्तविक पाहतां बापूनें सर्व सरदारांना कळविलें होतें. कीं 'सुबत्ता झाली कीं तुमचे मनोगत रक्षू.' इतकें असूनही पटवर्धनांनीं तक्रार चालू ठेविली. तेव्हां नानांची यांना फूस आहे, नाना मुद्दाम जाबसाल अंगाबाहेर टाकतात असा बापूंचा ग्रह झाला; व पटवर्धनांनीं अखेर पड घेतली तरीसुद्धां बापू नानांवर 'पिसाळल्यासारखें' झाले आहेत असा परशुरामभाऊंचा या प्रकर-

१ खरे २४९१.

णासंबंधीं उल्लेख मिळतो. इतकें झालें तरी शेवटीं बापूच्या मनांत अढी रहावयाची ती राहिलीच म्हणाव याची !

बापूंचा मुलगा आकोपंत यास कांहींतरी अधिकाराची जागा मिळावी अशी बापूंची फार दिवसापासून स्वाभाविक इच्छा होती. परंतु नाना फडणवीसास ही सूचना पसंत पडली नाहीं. यामुळें बापूंचें मन खट्टू झालें होतेंच. निजाम, भोसले, गायकवाड, इंग्रज, हैदर यांच्या दरबारामध्यें बापूंच्या शब्दास मोठा मान होता, पण बारभाईनंतर नाना बापूच्या बरोबरीनें राजकारणांत चमकूं लागल्यामुळें हीं दरबारें नानास दबकून वागूं लागलीं. बापूस नानांचा हा राजकारणांतील वरचष्मा सहन होणें शक्य नव्हतें. या सर्व कारणामुळें बापूंच्या मनांत नानाचें महत्त्व राजकारणांतून अजीबात नाहींसें करण्याचें विचार घोळूं लागले. बापू अतिशय खोल व दूरदर्शी असल्यामुळें त्यांनीं आपल्या विचारांची परिस्फुटता ‘करणें असेल अपाय तरी बोलून दाखवूं नये । परस्परें प्रत्यय प्रचीतीस आणावा’ या न्यायाप्रमाणें एकदम केली नाहीं. हळूहळूं ते त्या उद्योगास लागले व मोरोबास पुढें करून नानास चांगलीच प्रचीती आणून दिली. परंतु अशा प्रकारें परिस्थितीस कलाटणी देण्याच्या कामांत मात्र दुटप्पीपणा, विश्वासघात, स्वार्थपरायणता यांचें माप त्यांच्या पदरांत पडलें. यामुळें बापूंच्या अंगच्या गुणासंबंधीं ‘गुणानामेवायं तव जननि दोषः परिणतः’ असें म्हणण्याची पाळी पुढील पिढीवर आली. असो.

प्रथमतः नानांच्या विरुद्ध जेवढी मंडळी असतील ती अनुकूल करून घेण्याचा बापूंनीं प्रयत्न चालविला. नानांचा चुलतभाऊ मोरोबा यास नानांचें वैषम्य वाटतें ही गोष्ट बापूस ठाऊक होती; तेव्हां

प्रथम त्यास बापूंनीं हाताशीं धरलें आणि नानास कारभारी पदावरून काढून मोरोबास ती जागा मिळवून देण्याचा मनसबा केला. होळकरही नानाफडवीसावर नाखूष होता. नानानें महादजीस आशिरगड व १० लक्षांची जागीर दिली हें होळकरांस सहन झालें नाहीं. हरीपंतानें होळकराची गांठ घेतली त्यावेळीं त्याचे बोलण्याचा भाव असा होता कीं बापू व नाना यांनीं येक दिवस आम्हास सलामसलत पुसली नाहीं[१]. यास्तव त्यानें कारभाऱ्यांशीं, विशेषतः नानाशीं, विरोध करण्याचें धोरण स्वीकारलें. बडोद्याचे फत्तेसिंग व गोविंदराव गायकवाड यांमधील गादीबद्दलचा तंटा कारभाऱ्याकडे आला असतां २८ लक्ष रुपये सरकारांत नजर देण्याच्या करारावर फत्तेसिंगाच्या बाजूनें कारभाऱ्यांनीं निकाल दिला. नजराण्याची रक्कम जास्त अहे ती कमी करावी अशी होळकरानें सूचना करतांच फत्तेसिंगही एवढी रक्कम देण्यास अळंटळं करूं लागला व होळकराच्या मध्यस्थीमुळें अर्थात् कमी रक्कम घेऊन कारभाऱ्यांस तडजोड करावी लागली. नारोशंकर व त्याचे मुलगे यांच्या भांडणांतही होळकरानें अशीच मखलाशी करून पुणें दरबारास पैका मिळूं दिला नाहीं. नाना फडणवीसानें त्यास कर्नाटकांत स्वारीवर जाण्यासाठीं हुकूम केला असतां अनेक सबबींवर जाण्याचें तो टाळूं लागला. होळकर नानावर रुष्ट आहे असें पाहून बापूनें त्यास आपल्या बेतास अनुकूल करून घेतलें.

राघोबा अजून इंग्रजांकडेच होता. तो त्यांच्याकडे राहिला तर आज नाहीं उद्या इंग्रज मराठी राज्य आक्रमण करणार हें बापूस दिसत होतें. राघोबास झाली इतकी शिक्षा पुरे झाली आतां त्याशीं मिळतें घ्यावें व इंग्रज आणि मराठे यांच्या वादाचें मूळच उपटून टाकावें असा

१. पे. द. ५. ८९.

बापूचा बेत होता. राघोबास परत बोलावण्यांत नानांचें पारडें शिंद्याच्या वजनानें जड झालें आहे तें हलकें होईल अशीही बापूची अटकळ होती. एवंच नानाचें महत्त्व शक्य तर कमी करून राघोबाशीं तडजोड करण्याचा बापूचा विचार होता. परिस्थितीमुळें राघोबाही बराच निवळला असावा हें समजून पुष्कळ वर्षें त्याच्या सहवासांत धालवलेल्या बापूस त्याच्याबद्दल कळवळा उत्पन्न होणें स्वाभाविक होतें. दादा कांहीं कोठल्या झाडाचा पाला नव्हता. दौलतीवरती त्याचाही हक्क होताच. अशा स्थितींत दादास आणण्यासाठीं मोरोबाच्या मसलतीस बापू अनुकूल झाल्यास मनुष्य स्वभाव लक्षांत घेतां त्यास फारसा दोष देतां येत नाहीं.

मोरोबाची मसलत अशी होती कीं, (१) सवाई माधवराव याजकडे पेशवेपद रहावें; वडिलकीचा मान राघोबास द्यावा; (२) सखारामबापू मुख्य कारभारी असावेत; (३) दुय्यम कारभाऱ्याचें काम मोरोबांनीं करावें; (४) नानास काढून लावावें. या मसलतींत मोरोबाचें मोठें चातुर्य दिसून येतें. बापूस मुख्य कारभारीपद असल्यामुळें व राघोबास वडीलकीचा मान मिळाल्यामुळें बापूस ही कल्पना पटली होती. अर्थात् दादाच्या बाजूची मंडळीही आपणांस अनुकूल व्हावी. सवाई माधवरावाकडे पेशवेपद राहणार असल्यामुळें बाकीची पुष्कळशी मंडळी खूष व्हावी. येऊन जाऊन नाना व तत्पक्षीय मंडळी यांचेंच केवळ उच्चाटण व्हावें अशी खुबीदार योजना या मसलतींत केली होती.[1]

या सर्व व्यवहारास सैन्याची मदत पाहिजे होती. तेव्हां मोरोबांनीं कांहीं पठाण व गाडदी चाकरीस ठेविले. होळकरास पांच लक्ष

---

१ खरे नाना. ४०.

रुपये देऊन त्याजपासून मदतीचें अभिवचन घेतलें. इंग्रज वकील मॉस्टीन यानें मोरोबापाशीं इंग्रजांच्या मदतीचें भडक चित्र रंगविलें होतें, तेव्हां इतकें झाल्यावर प्रसंग पडल्यास इंग्रजांची मदत असावी म्हणून मॉस्टीन यासही मोरोबानें आपल्या खलबतांत घेतलें. या सुमारास राघोबानें मोरोबाकडे बाबूरावास पाठवून त्याच्या-मार्फत सखारामबापूशीं बोलणें लाविलें. राघोबास वडिलकीचा मान पाहिजे होता; त्याकरतां कारभाऱ्याकडे बऱ्याच गोष्टी सोंपविण्यास तो यावेळीं तयार झालाहोता. या गोष्टीस कारभारी तयार असतील तर दहा शुचिर्भूत ब्राह्मणांसमोर आपण शपथ घेऊं असें त्याचें म्हणणें होतें.[1] परंतु कारभाऱ्यास संपूर्ण अखत्यारी पाहिजे होती. फक्त 'देणे' 'देवावे' राघोबानें करावें असें ते म्हणत. राघोबा शेवटीं मोरोबा, बजाबा, बापू यांच्या म्हणण्याप्रमाणें वागण्यास तयार झाल्यावर ह्या मंडळींनीं त्यास पुण्यास बोलावण्याचें ठरविलें. मोरोबानें त्याप्रमाणें मुंबईच्या गव्हर्नरास पत्र लिहून सखारामबापू, होळकर, बजाबा पुरंदरे यांच्या सारखी बडीबडी मंडळी राघोबास अनुकूल होतील; तेव्हां इंग्रजांनीं राघोबास फौजेसह पुण्यास आणावे असें कळविलें. नानानें सेंट ल्यूबीन या फ्रेंच वकिलास दरबारीं ठेवून घेतल्यामुळें कंपनीच्या सत्तेस व व्यापारास मोठाच धक्का बसेल असें मुंबईकर इंग्रजांस वाटत होतें. तेव्हां त्यांनीं मोरोबाच्या मसलतीस संमति दिली व त्याप्रमाणें मुंबईच्या कौन्सिलांत ठरावही झाला कीं, "सखारामबापूसारखा पहिल्या दर्जाचा अधिकारी व दिवाण व कर्नल अप्टननें ज्याच्याशीं तह केला व ज्याची तहावर पहिली सही आहे असा बडा मनुष्य आपणास सैन्याची मदत मागेल तर ती

१ प. कॅ. ५. १४२.

जरूर देण्यांत येईल. त्यामुळें मराठ्यांशीं मागें झालेल्या तहास यत्किंचितही बाध येऊं शकत नाहीं." इकडे मोरोबानें सांगितल्या वरून इंग्रजांचा वकील मॅास्टीन हा मुंबईस गेला व राघोबास घेऊन पलटनासहित साष्टीस येऊन राहिला; सूचना मिळाल्यावर इंग्रजांनीं पुण्यास यावें असा मोरोबा व इंग्रज यांचा बेत ठरला. या मदती-बद्दल ३६ लक्ष रुपये मोरोबानें इंग्रजांस देण्याचें कबूल केलें.

मोरोबा, बापू, वगैरेंनीं हें कारस्थान गुप्त राखण्याचें ठर-विलें होतें. शत्रुपक्षाचें बलाबल किती आहे याचा अंदाज काय शहाणा मुत्सद्दी अगोदर पाहून ठेवित असतो. त्यास अनुसरूनच कीं काय बापूंनीं नानांच्या पक्षाचे, कर्नाटकांत हैदरावर गेलेले, हरीपंत फडके यांच्याकडे पत्र पाठवून 'त्याजवळ फौज किती आहे, कोणाचे राऊत किती आहेत, देसी किती आले. सरंजामी इतलाखी सिलेदार व पागेचे बारगीर तुम्हाजवळ असोन त्यांचे सरदार तेथें नाहींत कोण' वगैरेची तपसीलवार याद मागितली.[२] हरीपंतानें त्याप्रमाणें सर्व हकीकत लिहून कळविली व सैन्याची व पैक्याची मदतही मागितली. त्यावर नानानें बाजीपंत व आप्पा बळवंत यांचे बरोबर सात आठ हजार फौज देऊन कर्नाटकांत पाठवावें असें बापूस सुचविलें. या सूचनेस बापूनें तत्काळ रुकार दिला. कारण नानांचे स्नेही जेवढे लांब जातील तेवढें बापूस हवेंच होतें. बापूनें स्वतः त्यांच्या बरोबर जाण्याची तयारी दर्शविली. पुरंदराहून त्याप्रमाणें निघून ६ कोसांवर कवडी म्हणून गांव आहे तेथें ते येऊन राहिले.[३] अपश-कुनाचें निमित्त करून त्यांनीं बाजीपंत व अप्पा बळवंतास पुढें जाण्यास सांगितलें. स्वतः मात्र गेले नाहींत. नाना या सुमारास

१ Forrest p.307. २ पे. द. ५. ८७. ३ Forrest p. 311.

मेणवलीस गेले. हरीपंतानें बापूस 'फौजेंत गलबल रुपयासाठी फार जाली आहे ' असें कळविलें, तेव्हां बापूनें हरिपंतास उलट लिहिलें कीं, " नानांचे मेणवलीस जाणें याच दिवसांत झाले. शिवाय होळकराकडील ऐवजही आला नाहीं. इलाज नाहीं. त्यामुळें हिसका ".[१]

नाना मेणवलींहून परत आल्यावर राजकारणें कांहीं तरी घाटत आहेत असा त्यास संशय आला. त्यांनीं मोरोबाची गांठ घेऊन त्यांचीं समजूत काढण्याचा प्रयत्न करून पाहिला. परंतु तेवढेंच निमित्त करून मोरोबा रुसून बारामतीस गेले. होळकरही या सुमारास वाफगांवीं येऊन राहिले. नानांनीं त्यानंतर बापूची गांठ घेऊन त्यांच्याशीं कांहीं गोष्टी केल्या. परंतु बापूंनीं त्यास कसलाही थांगपत्ता लागूं दिला नाहीं; इतकेंच नव्हे तर नानास आपण कसल्याही परिस्थितींत सोडणार नाहीं असें भासविलें. ' प्रसन्नसलिले गूढनक्र इव ' अशी बापूची वृत्ति होती हा पटवर्धनी दप्तरांतील उल्लेख नानांच्या दृष्टीनें पहातां कोणासही वास्तविकच वाटेल. परंतु मुग्धता म्हणजे सत्याचा अपलाप नव्हे. तें एक मुत्सद्दीपणाचें लक्षण समजलें जातें. असें जर असेल तर बापूनें नानास कळेल असें ' इशारतीचें कांहीं बोलणें ' काढलें नाहीं तर त्यास नक्राची उपमा केवळ आकसानें, पक्षाभिनिवेशानें दिली असें म्हणावें लागेल.

एवढें कारस्थान शिजलें तरी नानास त्याची यत्किंचितही कुणकुण बरेच दिवस नव्हती. परंतु एके दिवशीं मोरोबाचे शिद्दी फराद व आठशे पठाण नोकरी पहाण्याच्या निमित्तानें पुण्यांत आले. नानांच्या शिपायांच्या व त्यांच्या कांहीं कारणांवरून चकमकी झाल्या. चौकशींत हे लोक मोरोबाच्या पक्षाचे आहेत एवढी गोष्ट जाहीर

१ पे. द. ५. ९३.

झाली. तेव्हां नानांच्या डोक्यांत एकदम प्रकाश पडला. पकडलेल्या लोकांपैकीं कांहींस फांशीं दिलें व कांहींना कैदेंत ठेविलें. याचें अगोदर थोडे दिवस बापूच्या पत्रावरून व होळकराच्या हालचालीवरून नानास संशय आलेला होताच. होळकराच्या ऐवजाबद्दल नानांनीं बापूस लिहिलें असता बापूंनीं "हरिपंताची चव कांहीं राहिली नाहीं. याउपर विचार करणें प्राप्त आहे. केवल नासले आहे. आपण लौकर यावें[1]." वगैरे मजकुराचें पत्र नानास लिहिलें.याच सुमारास होळकराकडील पैका न देण्याबद्दल बापूची सूचना झाली असावी असा तिकडे हरिपंतास अंदेशा आला व ही गोष्ट त्यानें नानास सुचवितांच नानांचा संशय बळावला. यावेळीं 'वृद्धाचे ( बापूचे ) मनांत स्थाईभाव काय घोलतात' हें नानानें पुरतेपणीं जाणलें व होलकरांकडील ऐवजाबद्दल हरिपंतास कळविलें कीं "आंतून येवढा मातबर आश्रा न देण्याविसी सांपडला; तेव्हां जरूर देतील!" म्हणजे होळकर बिलकूल ऐवज देणार नाहींत कारण बापूची त्यांना फूस आहे असा नानांच्या लिहिण्याचा भावार्थ होता.

बापूंच्या अशा 'येक प्रकारच्या कवाईती' पाहून[2] नानांनीं चोहोंकडे पत्रें पाठवून आपल्या पुढील कारस्थानाचीं सूत्रें पक्कीं करण्यास सुरुवात केली. निजामाचा व त्यांचा स्नेह असल्यामुळें त्यांनीं फौजेची मदत मागितली. त्यावरून निजामानें फौजेची सिद्धता केली व डेरे दिले. हरीपंत व परशुरामभाऊ पटवर्धन हे हैदरावरील मोहीम अर्धवट टाकून मिरजप्रांतीं महादजीस मेळवून घेण्यासाठीं परत येऊं लागले. शिंद्यांनींही करवीरकरांशीं कसाबसा तह उरकून घेतला. बाजीपंत व अप्पाबळवंत हेही कृष्णातीराहून घाईघाईनें पुण्याकडे

१ पे. द. ५. ९२. २ पे. द. ५. ९३.

यावयास निघाले. या सर्व गोष्टीचा बापूंस अगोदर अंदाज होताच; म्हणून सिद्दी फरादचें प्रकरण झाल्यावर बापूंनीं गुप्तपणें मोरोबास निरोप पाठवला कीं, " मंत्र फुटला त्वरा करा. "

बापूकडून सूचना मिळतांच मोरोबा, होळकर व तत्पक्षीय मंडळी १६-१७ हजार फौजेनिसी मिळून पुण्यावर चालून आले व त्यांनीं पुणें शहर ताब्यांत घेऊन शिक्के कट्यार, जरीपटका, नौबत हीं ताब्यांत घेतला व चोहोंकडे चौकीपहारे बसविले. नानास यावेळीं कांहीं सुचेनासें झालें; तेव्हां ते एकदम निघून पुरंदरावर गेले म्हणूनच वांचले. " पुरंदरच्या किल्लेदारांनीं नानास आंत घेण्याचें साफ नाकारलें तेव्हां सखारामबापूस बोलावून आणिलें. परंतु त्यासही किल्लेदारांनीं दाद दिली नाहीं. तेव्हां अशा प्रतिकूल परिस्थितींस बापूंनीं नानांस मोरोबाशीं समेट करण्याची सूचना केली. नानांनीं बिकट प्रसंगीं पड खाऊन ती तत्काळ कबूल केली व बापूस मध्यस्थ होण्याबद्दल विनविलें. बापूंनीं ही गोष्ट कबूल केली व नंतर ते सासवडास गेले. नाना पुरंदरींच राहिले[१] " अशी माहिती पर्शियन कॅलेंडर्समध्यें आढळते. मोरोबानें मात्र आपल्या मताप्रमाणें राजकारभार इकडे सुरू केला. त्याच्या मसलती-प्रमाणें बापूस कारभारीपद मिळालें. परंतु कोणतेंही काम बापू मोरोबाच्या विरुद्ध करीत नसत. नानाच्या पक्षाची मंडळी जोंपर्यंत पुण्यास आली नव्हती तोंपर्यंत मोरोबाचें हें औट घटकेचें राज्य चांगलें चाललें. आतां फक्त दादास पुण्यास आणावयाचें होतें व या वेळीं राघोबाची मोरोबास पत्रें आलीं कीं " सरदारांची अनुकूलता करून सरदारांचे शपथपूर्वक पत्र पाठविलें. त्यास खासा स्वारी चैत

१ प. कॅ. ५. १६२-३

वद्य प्रतिपदेस मुहूर्तें बाहेर निघेल. तुम्ही आपली फौज व तुकोजी यांची हजार फौज कल्याण नजीक पाठवून देणें तुम्हीं कारस्थानी व हिंमत धरून काम केले येणेकरून बहुत खुषी जाहली .... सेवा कराल हा भरंवसा आहे. येथून जंगी सरंजामानिसी जलद येऊन पोहोचतो. निजाम अल्ली खान पारिपत्य करूं लागेल तरी त्यासुद्धां पारिपत्य होय ऐसा सरंजामबरोबर घेऊन येतो. सरंजाम हुकमी आहे. " परंतु दादा पुण्यास येणें ही गोष्ट बापूस पसंत नव्हती. कारण दादा व इंग्रज पुण्यास आले म्हणजे ते आपणास कोणत्या ना कोणत्या तरी कारणावरून शिक्षा करतील हें बापू जाणून होते. कारण दादाच्या दृष्टीनें बापू पहिल्या प्रतीचा 'हरामखोर'. म्हणून बापूनें मोरोबा व होळकर यांच्यांशीं वाटाघाट करून समेट करण्याची सूचना नानापुढें मांडली. कृष्णराव बल्लाळ व माधवराव यास मोरोबातर्फे नानाकडे पाठवून असा करार ठरविला कीं, वडीलकीचा मान व मुख्य कारभाऱ्याचा अधिकार बापूकडे तसाच रहावा; अखत्यारीचा कारभार मोरोबांनीं करावा; परंतु नानाच्या संमतीशिवाय कोणतीही गोष्ट करूं नये. पुंरदरचा बंदोबस्त व पेशव्यांच्या संरक्षणाचें काम नानाकडेच रहावें; राघोबास तूर्त आणण्याचें करूं नये.

या समेटामुळें मोरोबाचे हातीं सर्व कारभार मिळाला व त्यानें राज्य चालविण्याची हौस फेडून घेतली. अर्थात् राघोबाचें पुण्यास परत येणें मोरोबास मनापासून बरें वाटेना. राघोबास वडीलकीचा मान द्यावयाचा असल्यानें तो पुण्यास येणें बापूसही इष्ट नव्हतें. इंग्रजांची मदत घेऊन दादा पुण्यास येणार म्हणजे इंग्रजांचें प्रस्थ पुण्यास वाढणार. बापूसारख्या मुत्सद्यास परकीयांचें वर्चस्व पुणें दरबारांत

प्रस्थापित होणें केव्हांही खपलें नसतें. बापूचा हेतु केवळ नानास नमविण्याचा होता. तेवढ्यापुरतां इंग्रजांच्या नाममात्र मदतीचा उपयोग जरूर पडल्यास त्यानें करूनही घेतला असता; परंतु आपापसांत समेट झाल्यामुळें सर्व सत्ता इंग्रजांच्या आहारीं जाण्याची वेळच त्यानें येऊं दिली नाहीं. मोरोबाचे हातीं राज्यकारभार आल्यावर इंग्रजांस वाटूं लागलें कीं मराठी राजकारणांत आपला मुसलप्रवेश होणार आणि मराठी राज्य आपल्या तंत्रानें चालणार अशीं सुखस्वप्नें त्यास पडूं लागलीं. परंतु मोरोबा—बापू यांनीं नानाशीं समेट केल्याची बातमी त्यांना समजली तेव्हां मोरोबा बापूस आतां आपली गरज पडणार नाहीं हें मॉस्टीनें ओळखलें. अर्थात् राघोबासह पुण्यास विजयोत्साहानें प्रवेश करण्याच्या त्यांचा बेत आतां थंड पडला व त्यांस चुरमुरे खात घाटाखालीं स्वस्थ बसणें भाग पडलें. या प्रसंगासंबंधीं "राजश्री बापूचें कारस्थानास जोडा नाहीं" असे प्रशंसापर उद्गार पटवर्धनी दप्तरांत आढळतात.

राघोबा या वेळेस इंग्रजांची मदत न घेतां एकटा पुण्यास आला असता तर कारभाऱ्यांनीं त्याचें स्वागत केलें असतें असा एक उल्लेख पर्शियन कॅलेंडर्समध्यें मिळतो. [१] परंतु ही गोष्ट तितकीशी सोपी नव्हती. कारण राघोबा एकटा कधींच पुण्यास आला नसता! आनंदीबाईच्या पत्रांतून राघोबास पकडून कैदेंत ठेवण्याचा कारभाऱ्यांचा उद्देश होता हें स्पष्ट दिसतें. [२] राघोबानें मोरोबा, बापू, नाना व होळकर यांना असें कळविलें कीं, सवाई माधवरावाच्या नांवें राज्य चालावें, दिवाणी आपला मुलगा बाजीराव यास द्यावी व मोरोबास अखत्यारी द्यावी; सवाई माधवराव व बाजीराव वयांत

१ प. कॅ. ५. १७५. २ प. कॅ. ५-१३०; ऐ. टि. १.२९.

येईतोंपर्यंत राघोबानें वडिलपण करावें, म्हातारपणामुळें बापू काम करणार नाहींतच तेव्हां ते पुण्यांत असेतोंपर्यंत त्यांची सल्लामसलत घ्यावी,[१] इत्यादि अटी मान्य करण्यास आपण तयार आहों. परंतु मोरोबानें बापूच्या सल्ल्यावरून राघोबास आमंत्रण करण्याचें तहकूब ठेविलें हें मागें सांगितलेंच आहे. परंतु इंग्रजांचा वकील मॉस्टीन ह्यानें मात्र मोरोबाच्या पाठीमागें दादास बोलावण्याबद्दल निकड लाविली. " राजकारण ठरल्याप्रमाणें लांबणीवर टाकूं नये, " अशा अर्थाचीं त्याचीं पत्रें मोरोबास जात होतीं.[२]

मे महिन्यांत शिंदे व हरीपंत यांच्या फौजा एकत्र होऊन नानास मदत करण्यासाठीं पुण्याकडे यावयास निघाल्या आहेत असें कळल्यावर दादास आणण्यासाठीं गोपाळ नाईक तांबवेकरास मोरोबांनीं मुंबईस पाठविलें. परंतु इंग्रजांना यावेळीं सखारामबापूसारख्या मुत्सद्याकडून लेखी आमंत्रण पाहिजे होतें. पुरंदरच्या तहावर बापूची सही होती तेव्हां त्याच्याकडून आमंत्रण आल्यास मोरोबानें कबूल केलेल्या ३६ लाखांस एक जामीन तरी मिळाला ! ह्या गोष्टीकडे त्यांचें लक्ष्य होतें. याशिवाय इंग्रजांना पुरंदरच्या तहान्वयें मिळणारा ३ लक्षांचा मुलूख गुजराथेंत नको होता. ते वसई व त्याच्या आसपासचा प्रांत मागत होते. बापूस शिंदे हरीपंत एक झाल्यामुळें आपली परिस्थिति कठीण होत जाणार हें जरी कळत होतें तरी इंग्रजांशीं लेखी गुंतण्यास तो तयार नव्हता. या सर्व प्रकरणांत ' सखारामबापू आपणास दुटप्पी धोरणानें फसवणार' अशी मुंबईचा गव्हर्नर हॉर्नबी व

१ प. कॅ. ५, १६९–७०. २ पा. सं. मॉस्टिन-पत्रें. १–४.

कौन्सिलर मि० बॉडम् यांची खात्री पटत चालली.[1] आणि खरोखरी तशीच गोष्ट पुढें घडून आली. इंग्रजांनीं सांगितल्यावरून मोरोबानें बापूकडे दादांना आणण्याबद्दल चिठी पाठवून लेखी आमंत्रण देण्यास सांगितलें तेव्हां बापूनें स्पष्ट सांगितलें कीं, "आपण लिहूनबिहून कांहीं एक देणार नाहीं."

हरीपंत व शिंदे पुण्याजवळ येत चालले व इंग्रजांच्या मदतीची फारशी आशा नाहीं हें पाहून बापूंनीं भिवराव पानशामार्फत नानाशीं सख्य जोडिलें[2] व बाबूराव केशव यास शिंद्याकडे स्नेहाची बोलणीं करण्यासाठीं पाठविलें. अशाप्रकारें बापूनीं इंग्रजांस व मोरोबास आयत्या वेळीं दगा दिला. मोरोबानें फ्रेंच वकील अजून दरबारीं ठेऊन घेतलाच होता. राघोबास पुण्यास नेण्याबद्दल कारभाऱ्यांपैकीं कोणीच बोलणें काढीत नाहींत. तेव्हां हे तिघे कारभारी महा लबाड आहेत अशी इंग्रजांची खात्री झाली. त्यांच्याशीं युद्ध करण्याशिवाय दुसरा तिसरा मार्ग शिल्लक नाहीं असें पाहून 'पुरंदरच्या तहाप्रमाणें १४ दिवसांत सर्व प्रकरणांचा निकाल लावा नाहींतर युद्धास तयार रहा' अशा आशयाचा खलिता मुंबईहून पुण्याकडे रवाना झाला. परंतु पावसाळा नजीकच असल्यामुळें इंग्रज कांहीं एक वांकडे करूं शकणार नाहींत हें बापू व नानास पक्कें ठाऊक होतें. तेव्हां इंग्रजांच्या या धमकावणीस त्यांनीं भीक घातली नाहीं.

सखारामबापू या वेळीं स्वतःच्या लग्नासाठीं वंदन किल्ल्याजवळ गोवें म्हणून गांव आहे तेथें ता. ३ मे १७७८ रोजीं गेले व लग्न करून ८।९ दिवसांनीं भिवंडीस आले. महादजी शिंदे यावेळीं नीरा नदीवर लोणंदजवळ मुक्काम करून होता. शिंद्याची भेट घेण्यासाठीं

१ प. क ५. १६१. २ खरे ३२७३–५.

बापू भिंवडीहून ता. २ रोजीं परिंच्यास आले; परंतु शिंदे जेजुरीस न जातां मोरगांवीं गेले.तेव्हां ता. ४ जून रोजीं बापूंनीं एकट्यानेंच मोरेश्वर मुक्कामीं हरीपंत व पटवर्धन यांची भेट घेतली व दुसरे दिवशीं बापू, हरीपंत, शिंदे वगैरेच्या भेटी जाहल्या. मोरोबाच्या मनांत बापूंनीं शिंद्याच्या भेटीस जाऊं नये असें होतें. कारण त्यांना संशय होता कीं, "हे पुढें जाणार तेव्हां काय बोलतील न कळे. पुढें जावयाचें काम नाहीं. शिंदे येथें येतच आहेत....त्यांचे मुद्दे कबूल करूं." परंतु बापूंनीं त्यांचें न ऐकतां पुढें होऊन शिंद्यांची भेट घेतली व लढाई न करतां तडजोड करावी असें सांगून शिंद्यांची झाल्या प्रकाराबद्दल क्षमा मागितली. याबद्दल पटवर्धनी दप्तरांत पुढील उल्लेख सांपडतो-" हा दोष मजकडे. आमचेविशी क्षमा करावी. हा दोष मजकडे खरा. परंतु राखावे. मोरोबा आपल्यास कैद करीत होता म्हणून आलो. या उपरी तुमचे विचारास येईल तसा कारभार करावा. जे नाना व तुम्ही सांगाल ते ऐकूं. राजश्री हरीपंताच्या व परशुरामपंताच्या मनांत याविशी वाकडे फारच आले आहे. त्यांची खातरजमा होत नाहीं ते व्हावी."[१] निरनिराळ्या लोकांच्या व शिंद्यांच्या भेटी यावेळीं होऊन वाटाघाटी झाल्या. त्यासंबंधीं बाबूराव वैद्यास आलेलें पत्र महत्त्वाचें आहे; तें असें:-राजश्री बाबूरावजी स्वामींचे सेवेसी विनंति उपरी येथील वर्तमान तरी पाटीलबाबा रा मोरोबा-दादा यांची भेट घेत नव्हते तेव्हां राजश्री बापूंनीं शिंदे यांचे डेरियासी एक प्रहर राहून सक्त रदबदली केलीं. तेव्हां त्याणी कबूल केले कीं तुमचे डेरियासी येऊ तेथे भेट होईल त्यावरून राजश्री

१ खरे ३२८७

मोरोबादादा तयार होऊन गेले तो शिंदे रा। हरीपंत तात्या यांचे कोटांत गेले. तेथील तमाम मानकरी यासी भेटले चार सहा घटका तेथेंच लागल्या तदनंतर आपले गोटास आले मग भोजन जाहले तो परियेंत हे जाऊन उभेच होते तदनंतर बापूचे डेरियास अगोदर शिंदे आले मग येथून दादा गेले तेथेच भेटी जाहल्या दुसरे काल सोमवारीं शिंद्यांच्या व श्रीमंतांच्या भेटी जाहल्या. राजश्री नानाच्या व सिंद्याच्या भेटी राजश्री धोंडोबा आपा पुरंदरे यांचे विहिरीचे पुढें जाहाल्या. श्रीमंत खाली उतरले. खाली डेरा दिला होता. अगोदर श्रीमंतांच्या व सिंद्यांच्या भेटी जाहल्या बापू पुढें येऊन बैसलेच होते. मग रा। हरीपंत व नानाच्या भेटी आदकोसावर जाहल्या परवर अनमंडळी व मानकरी सर्व भेटले हरीपंत सुधा नाना श्रीमंताचे डेरीयासी आले सर्व मंडळींचे येक प्रहर बोलणें जाहले मग शिंदे गेले त्याचे पाठीमाघे बापूही गेले राजश्री नाना व हरीपंत व कृष्णराव बल्लाळ याचे येक प्रहर भाषण जाहले संध्याकाल होत आला श्रीमंतसुधा नाना किल्ल्यावर गेले वरकड मंडळी आपलेले गोटास गेले भेटीचा समारंभ फार चांगला जाला. फौजही विशेक हजार आली होती वरकड पुढील विचार कर्तव्याचा ठरला नाहीं. होईल ते मागाहून लिहूं हे विनंति. ''

बापूनीं आपणास अखेर फसविलें असें पाहून मोरोबांनीं नानाकडे बोलणें लाविलें कीं '' तुम्ही आम्हा एक होऊन वृद्धास पटकी द्यावी. '' परंतु नानानें या बोलण्याचा तिरस्कार केला. सिंद्यांनीं यावेळीं बापू व नाना यांमध्यें एक अंतस्थ करारनामा करून दोघांची दिलजमाई करून दिली. ' नानांनीं दौलतींत बापूचें वडीलपण सर्व प्रकारें रक्षावें. बापूंनीं नानावर दौलतीचा भार ठेवावा.

संशय आला तरी समक्ष बोलून संशयनिवृत्ति होत जावी. आंतबाहेर असूं नये. बापूस पुत्र होईल त्यास नानांनीं शहाणे करावें. बापूप्रमाणें स्वरूप पाहून त्याचे हातून 'देवावे' करीत जावे. सचीवपंतावर उभयतांची ममता असावी. दौलतीचें कल्याण तीच नीत बापूंनीं नानास सांगत जावी. बाहेर राजकारणें करणें व पाहणें हीं उभयतांची अंतःकरणपूर्वक एक असावी" वगैरे गोष्टी त्या करारांत होत्या.[1] हा करार अर्थात् कागदावरच राहिला. शिंदेहोळकरांची भेट झाली असतां 'वृद्धांनीं आपणास फसविले' अशी बापूविरुद्ध तक्रार तुकोजी होळकरानें केली; परंतु महादजीनें होळकराची समजूत काढिली व दौलतीमध्यें निष्कारण बखेडा करण्यांत सामिल झाल्याबद्दल उलट त्यासच दोष दिला. सारांश बापूवर महादजीचें पारिपत्यरूपी संकट आलें होतें तें आपसूखच निवारण झालें.

नानांनीं यावेळीं चोहोंकडे बंदोबस्त करून मोरोबाची व तत्पक्षीयांची नाकेबंदी केल्यामुळें निराशेनें मोरोबांनीं वरिश्रीचा आव आणून 'सिके कट्यारीविसी व जरीपटक्याविसी आग्रह बहुतच धरिला. यासाठीं मरावें इतका आग्रह होता परंतु इकडूनही आग्रह बहुतच जाहला तेव्हां त्यांनीं आग्रह सोडिला व दोन्ही वस्ता दिल्या.' ता. २० रोजीं मोरोबांनीं जरीपटका नानांच्या स्वाधीन केला व ते 'होळकराच्या विद्यमानें ठरलेल्या कराराप्रमाणें' बहुलेस जाऊन राहिले. परंतु फंदफितूर व राजकारणें करूं लागलें, तेव्हां २२ जून रोजीं नानांनीं त्यास नगरच्या किल्यावर कैद करून पाठविलें. मोरोबास मिळालेल्यापैकीं बिनिवाले, घायगुडे वगैरे लोकांस पुष्कळ भूर्दंड

---

[1] इ. सं. पृ. १९९.

द्यावा लागला. बापू व होळकर यांनीं स्वपक्षीयांचा बचाव करण्याचा थोडाबहुत यत्न केला, परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं.

कोल्हापुरापैकीं खंडणीचा ऐवज आला तो शिंद्यास 'बक्षीस केला' व त्याचें समाधान केलें. खरोखरी शिंद्यानें फार चांगलें काम केलें व नानाच्या व त्याच्या स्नेहाची चांगली परीक्षा झाली. दौलतीचा कारभार पूर्ववत सुरू झाला. 'या उपर कोणतीही गोष्ट करावी अशी कोणाची ताकत राहीली नाहीं. कारण सर्वांस पुरतेपणीं समजले कीं अशी गोष्ट कदापी सिद्धिस जाणार नाहीं किंवा स्थित राहणार नाहीं;' हें मोरोबाच्या कारस्थानापासून सर्वत्रांस दिसून आलें.

सखारामबापूस पुढें नानानीं कैद केलें असतांना त्यांच्या व्यवस्थेकरतां नेमिलेल्या एका कारकुनाकरवीं मोरोबाच्या कारस्थानासंबंधी माहिती बापूंच्या तोंडून काढण्याचा नानानें प्रयत्न केला. त्यासंबंधी इतिहाससंग्रहांत एक पत्र श्री. पारसनीसांनीं छापलें आहे तें महत्त्वाचें आहे. " वृद्ध चिठ्यांच्या वगैरे गोष्टी बोलतात. त्यांत हे विना अपराधी ऐसे दर्शवितात. बोलतां बोलतां मी एके दिवशीं मागिल पुसों लागलों. ' बारभाईचें कारस्थान ठरवितांना तुम्ही,नाना, हरीपंत, परशुरामभाऊ, त्रिंबकराव वगैरे एकत्र होऊन तुमच्या व नानांच्या शपथा झाल्या कीं नाहीं?" तेव्हां उत्तर केलें 'जाहाल्या होत्या!' तर मग मोरोबाच्या मसलतींत बापूचें अंग आहे असें लोक कां म्हणतात ? " त्याचें उत्तर केलें. "गोपाळ नाईक, चिंत्या वगैरेनीं माझा फुकारा केला!" मी म्हटलें, 'उगाच फुकारा होत नाहीं कांहीं असेल.' तेव्हां बोलिले 'मी नानाचे व मोरोबाचे ठीक करून देणार होतो.' तेव्हां मी उत्तर केलें 'पूर्वीं मोरोबाच्या तुमच्या शपथा झाल्या नव्हत्या. गंगाबाईस घेऊन

यावयाचे सोबती दोघे तिघे, तेवढ्यांचीच शपथ मग त्यास अंतर देऊन मागती बदल खाऊन भलतीकडेच जावे हें ठीक केलें नाहीं.' त्यावर म्हणों लागले 'शपथ पूर्वीं जाली खरी, परंतु मध्यें दोन तीन गलबला जहाल्या त्यामध्यें ती शपथ गेली. शब्दापलीकडे कांहीं मिळालें नाहीं ' त्यावर मी म्हटलें "गंगाबाईस आणण्याचे सोबती नाना व आपण ऐसे असतां शपथ गलबलेंत गेली हें कसें बोलतां? त्यावरून उगाच राहीले."[१] या व मागील एका † पत्रांतील उल्लेखावरून सखारामबापू राजकारणांत आणाशपथा घेत परंतु त्या पाळण्याची फारशी फिकीर करीत नसत असें दिसतें. पण राजकारण हें अनिर्बंध असतें; त्यांत एका विशिष्ट पद्धतीनुसारच वागूं म्हटल्यास सर्वस्वास मुकावें लागतें. जेव्हां उच्च ध्येय राजकारणांत नसेल तेव्हां स्वार्थ, स्वतःची कातडी शाबूत राखणें हेंच प्रत्येक माणसाचें ध्येय होऊन बसतें; मराठेशाहीच्या उत्तर काळांत बहुतेक मुत्सद्यांचे हेंच ध्येय दिसून येतें. सारांश संघशक्ति दुणावल्यामुळेंच मराठी साम्राज्याचा नाश झाला. मोरोबाचें कारस्थान हा एक रिकामपणाचा खेळ होता. या खेळांत कांहीं जणांस लागलें, कांहींस जखमा झाल्या तर कांहीं शाबूत राहिले. हें कारस्थान म्हणजे आपापसांतील फाटाफुटीचा, घरभेदेपणाचा एक नमुनेदार मासला होय. हा खेळ खेळून बापूनें कांहीं राष्ट्रकार्य केलें असें तर नाहींच परंतु आजपर्यंतच्या त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीवर सर्वस्वी बोळा फिरविण्याचें कार्य मोरोबास हाताशीं धरून त्यांनीं केलें असें म्हणावें लागतें. जिवितहेतु संपल्यावरही कित्येक विभूतिसुद्धां उगाच लुडबूड करीत जगत असतात व त्यायोगें त्यांच्या उज्ज्वल नांवास कलंक लागेशी

† पृ. १३२. १ ऐ. टि. ६.३६.

कृत्यें त्यांच्या हातून होतात अशी उदाहरणें इतिहासांत बरींच सांपडतात. सखारामबापूची हीच तऱ्हा हें झाली मोरोबाचें कारस्थान व नंतर इंग्रज मराठे युद्ध यांतील बापूंच्या वागणुकीवरून म्हणावें लागते. व्यक्त्यभिनिवेशास बळी पडल्यामुळें त्यांच्याबद्दल चोहोकडे वाईट मत झालें व दिवाकरपंडिताप्रमाणें त्यांचे शेवटचे दिवस बंदिवासांत गेले.

**इंग्रजांशीं पुनश्च युद्धः**—मोरोबाच्या कारस्थानाची विल्हेवाट लागून पुण्यांत सर्व स्थिरस्थावर झाले तरी मराठी राज्याचें शत्रू 'आ' वासून उभे होतेच. हरीपंत व परशुरामभाऊ पटवर्धन हैदराबरील मोहीम अर्धवट टाकून पुण्यास आले होते. तेव्हां ही संधि साधून हैदरानें मिरजेपर्यंत मराठ्यांचा प्रदेश आक्रमण केला. याशिवाय कोल्हापूरच्या छत्रपतींनीही गडबड आरंभिलेली होती. कित्तूरकर देसाई यांचें बंड, विजापूर व पंढरपूर प्रांतीं बेरडांचा दंगा, खानदेशांत भिल्लांचें व गुलजारखानाचें बंड; कऱ्हाडच्या बाजूस प्रतिनिधींचें बंड; अशी बजबजपुरी चोहोंकडे माजलेली होती. होळकराचें इंग्रजांकडे अजून संधान होतें. शिंद्यांना अशिरगड न मिळाल्यामुळें ते रुसून बसले होते. इंग्रजांनीं पुणें दरबारास युद्धास तयार रहाण्याबद्दल निर्वाणीचा खलिता पाठवलेला होता. खजिन्यांत तर पैसा नाहीं, किल्लेकोटावर फौज पुरेशी नाहीं, शिबंदी नाहीं, रयत नागवलेली अशा स्थितीला नाना, हरीपंत व परशुरामभाऊ अगदीं त्रासून गेले. परशुरामभाऊ या सर्व अनर्थाचें खापर सखारामबापूच्या माथीं फोडतात व म्हणतात कीं " कपी ( बापू ) तर राज्यास किडाच ईश्वरें निर्माण केला." परशुरामभाऊच्या या विधानासंबंधीं विचार पुढें करूं. परंतु सखारामबापू मोरोबाच्या फिसा-

लतीस अनुकूल झाल्यामुळें दौलतीच्या चालत्या गाड्यास खीळ घातली गेली व त्याचें पर्यवसान म्हणजे चोहोंकडे अव्यवस्था व बंडें उद्भवली ही गोष्ट मात्र खरी.

मोरोबास कैदेंत घातल्यानंतर कांहीं दिवसांनीं म्हणजे ता. २५ जून रोजीं सखारामबापू ज्वर, अतिसाराच्या दुखण्यानें आजारी पडले. अतिशय हैराण झाल्यामुळें जागचे हालतांही येईना. त्यामुळें मोठमोठे सरदार, मुत्सद्दी त्यांच्या भेटीस जाऊं लागले. शिंदेही भेटीस गेले. त्यावेळीं बोलाचालींत असें ठरलें कीं उभयतां सरदारांनीं इंग्रजांवर जावे व उभयतां कारभाऱ्यांनीं कर्नाटकांत जावें. बापूस सात आठ दिवसांनीं आराम वाटूं लागला. इंग्रजांचा शह यावेळीं होताच; तेव्हां नाना फडणवीसानें परशुरामभाऊस कर्नाटकांत पाठविण्याचें ठरविलें व शिंद्यास बऱ्हाणपूर देण्याचें कबूल करून इंग्रजांविरुद्ध लढण्याचें त्याजपासून वचन घेतलें. बापू कांहीं दिवसांनीं चांगले बरे होऊन ता. २८ जुलैच्या सुमारास हवाफेरीकरतां गुलटेकडीजवळ विसाजी केशव यांच्या बागेंत रहावयास गेले. इंग्रजांशीं युद्धाची तयारी करावयाची असल्यानें पुनः त्यांना तिकडे लक्ष द्यावें लागलें.

पश्चिम किनाऱ्यावर फ्रेंचांचीं कारस्थानें सुरू आहेत व पोर्तुगीजही त्यांना कदाचित् सामील होतील असें जाहीर करून वॉरन् हेस्टिंग्सनें मुंबई सरकारच्या मदतीस सहा पलटणें कर्नल लेस्लीच्या हाताखालीं देऊन खुष्कीनें काल्पीमार्गें त्यास सुरतेस जाण्यासाठीं रवाना केले व मराठ्यांच्या मुलुखांतून जाण्यासाठीं परवाना पाठवावा म्हणून सखारामबापूस पत्र लिहिलें. हा परवाना मॉस्टीन त्यास दिल्यास तो (मॉस्टीन) पलटणाच्या सेनापतीकडे पाठवील असें या पत्रांत म्हटलें

होतें.[1] मराठे व फ्रेंच यामध्यें आपल्याविरुद्ध कांहीं वाटाघाटी चालल्या आहेत अशी बातमी हेस्तिंग्सला मॉस्टीननें कळविली होती. वस्तुस्थिति थोड्या फार अंशानें तशीच होती. नाना व सेंट ल्यूबीन ह्यांच्यामध्यें मोरोबाच्या कारस्थानानंतर एक करार झाल्याबद्दलची नोंद पर्शियन कॅलेंडर्समध्यें आढळते. त्यामध्यें सेंट ल्यूबीननें फ्रान्समधून फौज मागवून पेशव्यांच्या मदतीनें इंग्रजांना ह्या भागांतून हाकून द्यावे व याकरतां त्याजला एक सरकारांतून जागीर देण्यांत यावी. परंतु सध्यापुरते ( मोरोबांचा बंदोबस्त पुरा होईतोंपर्यंत ) त्यानें स्वस्थ रहावें, अशी अटही फ्रेंच वकीलास नानानें घातली होती असें दिसतें.[2] पॉंडिचेरीच्या फ्रेंचांनीं नानाकडे पत्र पाठवून इंग्रज लोक अप्रामाणिक आहेत, पुणें दरबारांत जो गोंधळ माजला आहे त्याच्या बुडाशीं मॉस्टीन आहे, वगैरे हकीकत कळविली होती.[3] नाना व सखारामबापू यांनाही या सर्व गोष्टी कळत होत्या. म्हणून फ्रेंच वकिलाच्या बुजगावण्याच्या उपयोग इंग्रजांना शह देण्याचें कामीं व मॉस्टीनचें उद्योग बंद पाडण्याचे कामीं त्यांना शक्यतर करून घ्यावयाचा होता. इंग्रज किंवा फ्रेंच यांच्याशीं खेळीमेळीच्या नात्यानें कारभारी केव्हांच वागले नाहींत. बापू एका पत्रांत लिहितात. " फरासिसाचेविसी संशय न घ्यावा. टोपीकर तेथून सर्व रीत सारखी आहे हे समज पुर्ती आहे. "

कलकत्याच्या कौन्सिलमध्यें कंपू पाठविण्याबद्दल खुद्द हेस्तिंग्स यास फारसा पाठिंबा मिळाला नाहीं. ते एक 'वेडगळपणाचें लष्करी साहस ' होते असें सर फिलिफ फ्रॅन्सिस यानें म्हटलें आहे. परंतु स्वतःच्या जबाबदारीवर हेस्तिंग्सनें ही कामगिरी पार पाडण्याचें

१ प. कॅ. ५. १८०. २ प. कॅ. ५. १८६. 3 Forrest p.331.

ठरविलें व शिष्टपणाचा आव आणून बापूस पत्रें लिहिलीं. हें ओळखून पलटणांना परवाना पाठविण्याच्या कामीं सखारामबापूनें टाळा-टाळी केली व हेस्टिंग्स यास लिहिलें कीं असे परवाने देण्याबद्दल पुरंदरच्या तहांत अट नाहीं.[१] नानाफडणवीसानें या सुमारास गुप्तपणें बाळाजी गोविंद खेर व बुंदेलखंडांतील इतर राजेरजवाडे यांना इंग्रज सैन्याचा मार्ग रोखण्याबद्दल पत्रें लिहिलीं. त्याप्रमाणें बाळाजीनें **कर्नल लेस्लीस** काल्पीच्या किल्ल्याजवळ अटकाव केला; तेव्हां मोठें युद्ध होऊन तोफांच्या सहाय्यानें लेस्लीनें तो किल्ला काबीज केला. परंतु यांत त्याच्या सैन्याची बरीच खराबी झाली. ह्या गोष्टी पुण्यास समजल्या तेव्हां सखारामबापूनें बाळाजीची तर-फदारी करून हेस्टिंग्स यास लिहिलें कीं "काल्पीच्या किल्लेदारानें जी गोष्ट केली ती बरोबरच आहे. कारण कोणत्या हेतूनें इंग्रज सैन्य पुढें चाललें आहे हें समजून घेणें किल्लेदाराचें कर्तव्यच होतें. तें केल्या-शिवाय सैन्यास पुढें जाऊं देणें म्हणजे त्या अधिकाऱ्यानें आपलें काम बरोबर बजावलें नाहीं असा अर्थ होतो. परंतु यावरून सलूख मोडण्याचा आमचा प्रयत्न आहे असें आपण समजूं नये."[२] काल्पीच्या मार्गानें जाणें कठीण आहे असें दिसून आल्यानंतर नागपूरच्या मार्गानें जाण्याचा इंग्रजांचा बेत होता. हेस्टिंग्सनें मुधोजीस अगोदर पत्र लिहून कर्नल लेस्लीला या बाबतींत वाटाघाटी करण्यास अधिकार दिले आहेत असें कळविलें होतें. त्याचप्रमाणें मुधोजीस साताऱ्याच्या गादीवर बसविण्याचा बूट हेस्टिंग्सनें काढून मराठामंडळांत भेद पाडण्याचा मोठाच प्रयत्न आरंभिला होता. त्याकरतां त्यानें मि. इलियट यास मुधोजीकडे पाठविलें. परंतु इलियट हा वाटेंत मरण

१ प्र. कॅ. ५. १४५. २ प्र. कॅ. ५-२०१, २०७.

पावल्यामुळें हा बेत तसाच राहिला. हेस्तिंग्सनें पुनरपि या वाटाघाटीस चालना दिली. कर्नल लेस्ली ही थोडे दिवसांनीं मरण पावल्यामुळें कर्नल गॉडर्ड या हुशार, शूर, विश्वासू, धूर्त मनुष्याची सेनापतींचे जागीं नेमणूक करून त्यास नागपूरमार्गें सुरतेस जाण्याविशीं आज्ञा केली. ह्या गोष्टी कळतांच सखारामबापूनें भोसल्यांच्या दरबारीं राजकारणें सुरूं केलीं. लक्ष्मणरावजीस त्यानें कळविलें कीं, "हालीं इंग्रज नागपुरास येणार तुम्हांस कदाचित् म्हणतील कीं तुमचा आमचा स्नेह आम्हांस मुंबईस जाणें तरी त्यास सांगावे कीं दर्यांतून जावें. खुष्कीतून मुलूख पहात जावें याचें कारण काय? हिंदुस्थानचा मुलूख खराब करून पैका घेतला या गोष्टी जाबसालाच्या मोठ्या आहेत. तहनाम्यांत खुष्कीनें इंग्रजांनीं यावें असें नसतां हिंदुस्थानांत यावयाचें कारण कोणतें? तहनाम्यांत हा अर्थ कांहींच नसता हे चाल त्यांनीं नवीन केली. प्रामाणिकता कोठें राहिली. सुजाउद्दौल्याचे केलें त्याप्रमाणें या राज्यांत करूं पाहतात." मुधोजी, दिवाकरपंत यांना या सर्व गोष्टी समजावून सांगण्याबद्दल व मुंबईच्या इंग्रजांशीं राजकारण पक्कें करण्याबद्दल बापू रावजीस लिहितात. "विनंती उपरी पेशजी कलकत्याहून कर्नल अपटन पुरंदरास सलूख करण्यास आला ते समई इकडून त्यासी उत्तर जाले कीं या सलूखांत ममईकर यास घेऊन सलूख करावा. त्यासी नित्य संबंध जें होणें तें त्याचें विचारे व्हावें तेव्हां करनल जान अपटइन याणी उत्तर केलें कीं ममईकर ताबेदार आम्ही मुखत्यार जसें करूं आणि करारांत येईल त्याप्रमाणें ममईकर वर्तणूक करतील याप्रा बोलोन त्याणी सलूख केला. करारनामा जाला त्याप्रा ममईवाले याजकडून जामलतन (?) आले. नाना प्रकारें दिक्कती व

हिसके करतात. समंध यासीच कलकत्तेवाले लांब दूर जाबसाल कागदीपत्रीं कोठवर ल्याहावा त्यास हाली इंग्रज नागपुरास येणार तेथें बोलणें पडल्यास ममईकर सांपडून बोलणें व्हावें ते पक्के. खेरीज ममईकर कांहींच नव्हेच माघे प्रतियास आले नाहीं याजकारितां हा मजकूर तुम्ही राजश्री सेना धुरंधर व राजश्री महादजी सिंदे यांचे मारफतीनें ममईकर बोलत आहे हे पेशजी लिहिलेच आहेत. तेथें इंग्रज येईल त्यासी बोलावण्यांत अगोधर ममईकरास घेऊन बोला यैसे असावे श्रीमंत राजश्री दादासाहेबास त्याणी भेटावें आसे करारांत आसतां काये म्हणोन ठेविलें आसेच सलूख असतात कीं काये हें पाहावें याजवरून सर्व समजावें. **गोड बोलावे त्रिकाल सत्ता दाखवावी आणि राज्यच घ्यावें हें इंग्रजास सवे लागली आहे** याचा विचार पुर्ता पहावा हे विनंति. ( २९ आक्टोबर १७७८ ).

विलायेंतंत इंग्रज व फ्रेंच यांची लढाई सुरूं होती यामुळें इंग्रजांनीं फ्रेंचांचीं हिंदुस्थानांतील ठिकाणें जिंकून घेतलीं. त्यांमध्यें कलकत्यापासून १२ कोसावर 'डागा' म्हणून ठिकाणही घेतल्यामुळें तेथील अधिकारी **मुसा छौलिया** हा 'चाळीस पनास फरासीस व पंचवीस स्वार इतक्यानशी पळोन कटकास आला.' तेव्हां इंग्रजांनीं भोसल्यास पत्रें पाठविली कीं त्यास कैद करून आमचे हवालीं करावा. परंतु सखारामबापूनें रावजीस पत्र लिहून दिवाकरपंत 'फरासीस यास कैद करून पाठविणार किंवा इंग्रजांस कांहीं तोड लावून लिहिणार' ते तपास करून कळवण्यास सांगितलें. बापूच्या मनांत त्यांना कैद करूं नये असें असावें. इंग्रज या वेळीं बळेश्वर

बंदरहून संमळपूरपर्यंत आल्याची गोष्ट बापूस कळली असल्याचें एका पत्रावरून दिसून येतें. अशा समयीं इंग्रजांचे व भोसल्यांचे बोलणें काय झालें 'मुद्दा काये हे सविस्तर' लिहीत जावे म्हणून रावजीस बापू लिहितात. बापूच्या मतानें 'इंग्रजासी करार झाला आहे त्याप्रमाणें त्याणी व इकडून चालावें यांत अंतर नसावें' परंतु इंग्रजांचे जाबसाल वेगळेच होते. लष्करीदृष्ट्या शत्रूच्या मुलुखाची माहिती झाली म्हणजे आक्रमणाच्या किंवा चढाईच्या दृष्टीनें तें मोठेंच काम झालें. शिवाय इंग्रजांजवळ नकाशे तयार करण्याची विद्या चांगली असल्यामुळें मराठ्यांच्या मुलुखाची टेहेळणी करून ठेवण्याची ही योजना होती. ही गोष्ट बापू व नाना यासारख्या दूरदृष्टीच्या मुत्सद्यांस दिसत होती म्हणून त्यांनीं शक्यतोंवर तह-नाम्यांतील शब्दांचा, अर्थाचा कीस काढून, आजपर्यंत कोठल्याही पाश्चिमात्य राष्ट्रानें मराठ्यांच्या मुलुखांतून जाण्याची परवानगी मागितली नाहीं; जावयाचें असल्यास जलमार्गानेंच जात असत; त्याप्रमाणेंच इंग्रजांनीं करावें वगैरे गोष्टी इंग्रज मुत्सद्यांच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न केला व शक्य तेथें सशस्त्र प्रतिकार व जरूर तेथें जाबसाल सुरू केले. मुधोजी भोंसले कदाचित् इंग्रजांस आपल्या मुलुखांतून जाण्यास परवानगी देतील (तशी त्यांनीं पुढें दिलीच). हें ओळखून सखारामबापूनें निजामाकडेही राजकारण करून ठेविलें होतें व त्याप्रमाणें निजामानें होशिंगाबाद येथें बरीच फौज जनरल गॉडर्डचा मार्ग रोखण्यासाठीं ठेविली होती. बापूनें दिवाकर पंडितास 'बंदगान आलीकडील दोस्तींत स्नेहांत कांहीं अंतर नाहीं. परंतु इकडील बरें वाइटाचें सोबती आपण आहात. सरकार कामाचें उणें जेथें द्रीष्टीस पडेल तेथें पूर्णता करीत जावी' अशा अर्थाचें पत्र

लिहून इंग्रजांच्या सैन्यासी एकजुटीनें तोंड देण्याचा विचार केला व त्यांत भोसले, नबाब यांनाही सामील करून घ्यावयाचा त्यांचा मानस होता. परंतु भोसल्यांनीं याबाबत विशेष नेट व चिकाटी न दाखवितां इंग्रज सेनेस आपल्या मुलुखांतून जाण्यास वाट दिली. भोसल्यांनीं माघार घेतल्यामुळें इंग्रजांच्या आक्रमणाचा मार्ग सुकर झाला व गॉडर्ड पुढें विशेष अटकाव न होतां सुरतेस पोंचला. ही इंग्रजांचे सामर्थ्य दर्शविणारी इतिहासांत अतिशय महत्त्वाची गोष्ट घडून आली.

काल्पीमार्गें सुरतेस इंग्रजी कंपू पाठविण्याचा वॉरन हेस्टिंग्सचा असा उद्देश होता कीं बुंदेलखंडांत महादजी शिंद्याच्या हाताखालीं जे राजेरजवाडे आहेत त्यांमध्यें 'स्थापनाउच्छेद' करावा व पुणें दरबारांस केवळ दबाबानें फ्रेंच वकील काढून लावण्यास भाग पाडावें.' बुंदेलखंडांतील आपला मुलूख इंग्रजांच्या माऱ्यांत सांपडणार हें ओळखून व भांडणाचें मूळ काढून टाकावें म्हणून महादजी शिंद्यांनीं बापूकडून फ्रेंच वकीलास निरोप देवविला.[1] गॉडर्ड सुरतेस आला हें कळतांच बापूनें गव्हर्नर जनरल वॉरन हेस्टिंग्स यास कळविलें कीं, "आम्ही फ्रेंच वकीलास २५ जून रोजींच जाण्यास सांगितलें होते परंतु जहाजांच्या दुरुस्तीकरतां तो राहिला होता. ता. १२ जुलै रोजीं त्यानें पुणें सोडिलें. मॉस्टीन हा गैरवाका मजकूर समजावून दोन्ही सरकारांत भांडणें लावितो सबब त्यास परत बोलवावा".[1] तसेंच नागपुरास जिवाजीपंतास लिहिलें कीं इंग्रजांचा वकील वाटाघाटीस आला असतां फ्रेंच वकीलासंबंधी बोलणें निघाल्यास त्यास असें कळवावें कीं, "इंग्रजांचा व सरकार बिघाड हे वर्तमान चहूकडे जालें त्या संधीस वकील फरासीसानीं

१ प. कॅ. ५.२०१; २४०.

पाठविला येथें आल्यानंतर त्यास साफ उत्तर जाले कीं इंग्रजांची आम्हासी पक्का सलूख जाहला तुम्ही जावे राहूं नये ते समई त्याणे दोन गाष्टीची रदबदली केली की मी येथें च्यार महिने राहातो माझा जाब येईल मग मी जाईन हें एक. दुसरे मज (?) दोन च्यार जहाजे सावकारी आली त्यास माल पुण्यास आणून विकावयाची परवानगी (द्या). तेव्हां मातबराकडील यास येकायेकी येथून जा राहून नको असें कसे म्हणावे दुसरे दोन जहाजाचे मालाची परवा-वानगी दिल्ही पुढें जहाजें आली तरी साफ अनकूल पडणार नाहीं यैसे सांगितले तो खासा येथे होता इतक्यांत तो राहील्याचा संशय इंग्रजास जाला त्यांचीं पत्रे याणी न राहण्या विशी येऊ लागली तेव्हा इंग्रजासी स्नेह दुसरा अर्थ नाहीं आहादपैमान (?) होऊन तहनामा जाला तो मंजूर जाणोन फरासिसाचे वकिलास निरोप दिल्हा तो गेला इतका येथील प्रकार दुसरा अर्थ नाहीं या विशीं-चा संशय इंग्रजांनीं घ्यावा यैसे नाहीं आणि घेऊंही नये." बापूनें या ठिकाणीं फ्रेंच वकिलास निरोप देण्याचें जें कारण दिलेलें आहे तें केवळ मुत्सद्दीपणाचें दिसतें; वस्तुस्थितिनिदर्शक नव्हे. कारण नानांनीं फ्रेंच वकिलास मुद्दामच ठेऊन घेतलें होतें हें मागें सांगित-लेंच आहे. परंतु तीच गोष्ट मुत्सद्दी भाषेंत सांगण्याची हातोटी बापूस कशी बेमालूम साधली होती हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

कलकत्त्याच्या सुप्रीम कौन्सीलनें २३ मार्च १७७८ च्या खलि-त्यांत इंग्रजांविरुद्ध असलेला मराठी दरबारांतील पक्ष काढून टाकण्या-साठीं सुचेल त्या मार्गाचा अवलंब करण्याची परवानगी मुंबई सर-कारास दिलेली होती व मॉस्टीन तर या गोष्टींचीच वाट पहात

होता.[१] या वेळेस मोरोबा वगैरे मंडळी कैदेंत असल्यामुळें सखाराम बापूच काय तो मागील कारस्थानापैकीं शिल्लक राहिला होता व त्यांनाच फोडावयाचें मॉस्टीननें ठरविलें.[२] सखारामबापू हा इंग्रजांचा मित्र नव्हे असें म्हणणारा मॉस्टीन आतां त्याच्याकडे संदर्भ लावितो हें विशेष आहे. बापूचा कल दिवसेंदिवस दादाकडे व त्याचे सहाय्यक इंग्रज यांकडे झुकत होता आणि याचें कारण म्हणजे नानाचें शिंद्याच्या वजनानें झालेलें जड पारडें हें होय. परंतु बापूचा इंग्रजाकडे हा कल केवळ वरकरणी होता. इंग्रजांनीं राघोबाकडून सामदामाच्या गोष्टी दोघां कारभाऱ्यांशीं चालविल्याच होत्या. राघोबाकडून जाहीरनामा काढून सवाई माधवरावानें पेशवाई चालवावी, राघोबानें नायबगिरी करावी, बापूकडे दिवाणाचें पद असावें, शिंदेहोळकरांना पुणें दरबारास द्यावयाच्या सर्व ऐवजाची सूट देण्यांत यावी वगैरे सूचनाही कारभाऱ्याकडे व सरदाराकडे पाठविण्यांत आल्या.[३] इंग्रजांनीं बंगाल घेतल्यानंतर जी द्विदल राज्यपद्धति अमलांत आणली तशाच प्रकारची व्यवस्था राघोबास पुण्यास नेऊन तेथें सुरू करावी असा त्यांचा मानस होता. परंतु नाना व महादजी यांनीं इंग्रजांच्या या सर्व सूचना धुडकावून लावून युद्धाची तयारी केली. अर्थात् त्यांना संमति देणें बापूस भाग पडलें. परंतु बापूची ही अनुकूलता केवळ वरपांगी होती. विशेष उत्साहानें या कार्यांत त्यानें भाग घेतला असें दिसत

---

१ Forrest I. 314. २. Forrest I. 353. " It therefore appears to us that Sakharam Bapu is the only man with whom we can hope to form engagements that must lead to our main object. " ३ Forrest p. 334.

नाहीं. दुटप्पी धोरण ठेवले होते. बापूंच्या पुतण्याची सून यावेळीं मृत्यु पावल्यानें ते कांहीं दिवस सासवडीं गेले व सुतक संपल्यानंतर फौजेंत येऊन दाखल झाले.[१]

होळकराचा कारभारी नारो गणेश याची मुक्तता करून नाना व महादजीनें त्याकरवीं होळकराचे इंग्रजांकडील संधान बंद पाडिलें. चिंतो विठ्ठल वगैरेंनीं इंग्रजांस कळविलें कीं इंग्रजी फौज घाटावर गेल्यास होळकर वगैरे सरदार तीस येऊन मिळतील. परंतु प्लासीच्या लढाईचा येथें मात्र अनुभव इंग्रजांना आला नाहीं. सर्व मराठे सरदारांत एकी वसत होती; व एकही सरदार फुटून इंग्रजांना मिळाला नाहीं.

अशा प्रकारें सर्व फौजेची सिद्धता झाल्यावर इंग्रजांशीं तोंड देण्याचें काम राहिलें. ही मोहीम नोव्हेंबर १७७८ मध्यें सुरूं झाली. इंग्रज सेनेचें आधिपत्य एका कमिटीकडे होतें व **जनरल कार्नाक** हा मुख्य अधिकारी होता. राघोबा व मॉस्टीन हेही या फौजेबरोबर होते. राघोबा यावेळीं कांहीं कारणानें इंग्रजांवर नाखूष होता. त्यानें गोव्याचा पोर्तुगीज गव्हर्नर जनरल डॉम जोसे ड कामारा याजकडे वकील पाठवून मदतीची याचना केली होती परंतु तिजकडे त्यानें लक्ष दिलें नाहीं. त्यामुळें राघोबास इंग्रज सेनेबरोबर जाणें भाग पडलें. इंग्रज मराठ्यांशीं लढत लढत तळेगांवापर्यंत आले. या ठिकाणीं मराठी फौजांनीं इंग्रज सेनेस चोहोंकडून घेरलें. पिछाडीकडून १० हजार मराठी फौजेनें त्यांची दाणावैरण, रसद बंद केली. कलकत्त्याहून पाठविलेली फौज मदतीस येण्याचें चिन्ह दिसेना. अशा स्थितींत हळूहळू पिछेहाट करण्यास इंग्रज सेनापतींनीं हुकूम दिला.

१ खरे ३३६१; प. कॅ. ५. २६६.

तेव्हां मराठी फौजांनीं त्यांच्यावर हल्लयावर हल्ले चढविले. सखारामबापूच्या पथकानें एका नाल्यांतून इंग्रजी फौजेवर जोराचा बंदुकीचा मारा केला अशी माहिती पर्शियन कॅलेंडर्समध्यें आढळते. [१]

इंग्रजांकडून तहाचा संदर्भ लागला. ता. १४ जानेवारी १७७९ रोजीं इंग्रजांचा वकील फार्मर हा शिंद्याकडे येऊन म्हणाला कीं, 'इंग्रज हे व्यापारी असल्यामुळें त्यांना रक्तपात करणें योग्य वाटत नाहीं. राघोबानें त्यांची मदत मागितली म्हणून ती त्यांनीं दिली. पुरंदरच्या तहानें सलोखा झाला असून ही लढाई त्यांनीं सुरू केली याबद्दल फार्मरनें दिलगिरी प्रदर्शित केली. कारभाऱ्यांनीं उत्तर दिलें कीं राघोबा हा आपल्यापैकींच असल्यामुळें त्याचें काय करावयाचें तें आमचें आम्ही पाहून घेऊं. तुम्ही मुळींच बोलूं नये. त्यास प्रथम आमच्या हवालीं करावा. तुम्ही आम्हाशीं अन्यायानें लढाई सुरूं केली याबद्दल साष्टी वसई परत द्यावी, तसेंच जंबूसर चिखली वगैरे महाल द्यावे, भडोच्या वसुलाचा माघारा भरणा इकडील सरकारांत करावा; सर्व कैदी सोडून द्यावे; बंगालच्या कंपूस परत जाण्याबद्दल लेखी हुकूम पाठवावेत; नानासाहेब माधवरावापासून चालत आलेल्या तहनाम्याप्रमाणें चालावें; राघोबाकडून घेतलेलें सर्व जडजवाहीर परत द्यावें. फार्मरनें हें सर्व म्हणणें ऐकून घेऊन परत आपल्या छावणीकडे कूच केलें. तेथें खलबतें होऊन फार्मरनें शिंद्यास कळविलें कीं इतक्या अटी कबूल करावयास आपणास अधिकार नाहीं. तेव्हां "अप्टननें केलेला तह मोडण्याचा अधिकार तुम्हांस कोणी दिला तें लेखी दाखवा" असा शिंद्यानें सवाल करतांच फार्मरनें दुसरे दिवशीं कोरा

१ प. कॅ. ५.२८९.

कागद महादजीच्या हातीं दिला. त्यावर सर्व अटी लिहून महादजीनें त्या बापूकडे पाठविल्या. बापूनें सर्वांचा विचार घेऊन,व मि. फार्मर व ले. चार्लस स्टूअर्ट यांना गव्हर्नर जनरलची या तहास मान्यता मिळेतोंपर्यंत व साष्टी परत मिळेतोंपर्यंत ओलीस ठेऊन घ्यावें हें कलम जास्त लिहून ती याद इंग्रजांकडे पाठविली. इंग्रजांनीं सर्व मागण्या कबूल केल्या व राघोबास शिंद्यांच्या फौजेंत पोचतें केलें आणि मुंबईस जाण्याची तयारी केली. या रीतीनें लढाईचा शेवट लागला.

शिंद्यानें दादास झांशीस ठेवण्यासाठीं हरी बाबाजी यांजबरोबर फौज देऊन रवाना केलें. जातांना रघुनाथरावानें स्वखुषीनें राज्यत्याग केल्याचें जाहीर करून अतःपर राज्याचा लोभ धरणार नाहीं. आमचे खासगी खर्चाकरतां १२ लक्षांचा मुलूख दिलातो घेऊन झांशींत राहूं. श्रीमंत सवाई माधवरायांनीं आपले धनीपण करावें. आपला पुत्र बाजीराव यांनीं कारभार मुतालिकी करोन असावें. मुलें थोर होईतों नाना फडणीस व सखारामबापू यांनीं कारभार कुलयेत्वार करून राज्य सांभाळावें, " असें बापू व नाना यांना सांगून राघोबा झांशीकडे जाण्यास निघाला. अशा प्रकारें राघोबास इंग्रजांचा आसरा सोडावा लागून पुन्हां शिंद्यास शरण यावें लागले. परंतु ही मानहानीची स्थिति ज्या सखारामबापूनें त्यास आणिली असें तो समजत होता त्याचा एकप्रकारें सूड त्यानें झांशीकडे जातांजातां घेतला. ती माहिती पुढील प्रकरणांत देऊं.

## प्रकरण १२ वें.

# सखारामबापूंची कैद, अखेरचे दिवस व मृत्यु.

इंग्रजांशीं लढाई आटोपल्यावर राघोबा महादजी शिंद्याच्या स्वाधीन झाला. त्याचप्रमाणें चिंतो विठ्ठल, सदाशिव रामचंद्र व खरगसिंग यांनाही आपल्या हवालीं करण्याबद्दल महादजीनें इंग्रजांस सांगितलें. इंग्रजांनीं त्याप्रमाणें सर्व गोष्टी केल्या. राघोबा ज्यावेळीं शिंद्याचे फौजेंत आला त्यावेळीं बापू तेथेंच होता. परंतु बापूनें राघोबाशीं एक चकार शब्दसुद्धां काढला नाहीं. यामुळें एकवेळीं बापूवर 'सर्व मर्जी' असलेल्या दादास त्याचा फारच संताप आला. शिंद्यानें जेव्हां चिंतो विठ्ठलास इंग्रजांकडे फितुरी केल्याबद्दल शिक्षा करण्याचें ठरविलें तेव्हां चिंतो विठ्ठल महादजीस बोलला, "राजद्रोहाबद्दल मला शिक्षा करणार तर मग तशी बापूस कां करूं नये. राघोबास याबद्दल विचारा." त्यावेळीं शिंदे उठून राघोबाकडे गेले. राघोबा त्यासमयीं पोथी वाचीत बसले होते. शिंद्यांनीं गोष्ट काढतांच राघोबानें आपल्या पोथींतून बापूचीं दोन पत्रें काढून शिंद्याच्या स्वाधीन केलीं. चिंतो विठ्ठलास लिहिलेल्या चिठींत पुढील मजकूर होता. "विनंति उपरी. दक्षिणेकडे (हैदराकडे) सूचना केली आहे. आम्हींहि पाय पसरून बसलो आहो. अशांत जलदी कराल तितकी उपयोगी आहे."[1] शिंद्यानें ही चिठी आपणांजवळ ठेविली. नाना फडणवीसानेंही बापूचीं अशीच फितुरीचीं पत्रें धोंडभट काटके व ज्योतिपंत यांच्याजवळ असलेलीं पकडलीं होतीं.

---

१ खरे अधिकारयोग पृ. १२८; चिठ्यांचा हा पुरावा बनावट होता असें बापूंच्यातर्फेनें सांगण्यांत येतें.

ता. २४ जानेवारीच्या सुमारास सखारामबापू आपल्या मुलीच्या लग्नासाठीं वाईस गेले होते. भोरच्या सचीवांचा मुलगा रघुनाथ चिमणाजी यास ती मुलगी दिली. लग्नाप्रीत्यर्थ बापूनें ४० हजार रुपये खर्च केला. लग्नसोहळा वगैरे सर्व मोठ्या थाटानें झाला. त्यानंतर बापू तळेगांव मुक्कामीं आले. शिंदे वगैरे सर्व मंडळी अजून तेथेंच होती. पुढें पुरंदरास आल्यावर शिंद्यानें बापूची गांठ एकांतीं घेऊन ज्या इसमांनीं फितूर केला त्यांना काय शिक्षा करावी म्हणून विचारलें. बापूंनीं सांगितलें कीं, अशा इसमास कैद करून किल्यावर पोचवावें. तेचसमयीं शिंद्यांनीं चिठ्या पुढें टाकून 'अपराध पदरीं घालून कैद करून सिंहगडास पाठविलें.'[१] ही गोष्ट २७ फेब्रुवारी १७७९ रोजीं घडली. असें म्हणतात कीं नाना व महादजी आपणांस फितुरीबद्दल कैद करणार ही बातमी बापूस अगोदर समजली होती व निजामाची मदत घ्यावी असेंही बापूस पुष्कळांनीं सुचविलें होते. या संबंधांत निरनिराळे व परस्परविरोधी उल्लेख सांपडतात. "असे कैक फितूर माझ्या खिशांत आहेत" असें बापूनें उत्तर दिल्याचें आढळतें. त्याचप्रमाणें "सांप्रत आपल्यास कैद करून प्राण घेतील यांत आपली क्रिया राहून पात्र साधन घडेल. वाचणें तरी किती दिवस. कोणीही अग्रेसर होऊन श्रीमंतांचे दौलतीचे पैरवी बांधावी हे नैकसल्ला" असें विचारी, मुत्सद्दीपणाचें उद्गार बापूनें काढल्याचाही उल्लेख मिळतो. तसेंच निजामाची मदत घेण्यासंबंधीं "अंतःकलहांत परक्यास हात घालूं दिला तर राज्यनाश होतो. तें आपणांस कर्तव्य नाहीं. मग त्यांत आपलें कांहींही

१ प. कॅ. ५. ३१९; रा. १०. १३६; खरे ३४३९–४०; इ. सं. हो. कै. पृ. ६.

होवो " असें प्रत्युत्तर दिल्याचें आढळतें.[१] नानाफडणविसाच्या कारकुनानें बापूसंबंधी " वृद्ध चिठ्यांच्या गोष्टी बोलतात त्यांत विना अपराधी ऐसें दाखवितात. " अशी हकीकत नानास कळविल्याचा उल्लेख आहे.

सखारामबापूस कैद करण्यांत आलें त्यावेळीं खुद्द नाना फडणविसानें कोंकणांत जाण्यापूर्वीं त्यांची गांठ घेतली असतां बापूंनींच स्वतःच्या कैदेबद्दल मत प्रगट केलें तें असें; "तुम्ही हें कृत्य केलें फार चांगलें. उगाच प्राकृत संसार करण्यांत चार हुकूम असल्यास पुरी पडत नाहीं. तेव्हां ही तर दौलत त्यांत धनी नाहीं. चार हुकूम म्हणजे दौलतीचा नाश. परंतु या दौलतीचे रफीक पूर्वींपासून होळकराचें घर. सांप्रत तुम्ही सिंदीबन वाढविलें आहे. यापासून तुम्हास अपाय होईल. हें खचित मनांत वागवून फार जपावें. बाकी तुम्ही रजाचा गज करून दौलत नमुदास आणाल हा मज भरंवसा. सांगितल्या गोष्टीस फार जपावें."[२] आपल्या कामांत सखारामबापू विरोध करतात हें पाहून सत्ताधीश बनलेल्या नानानें शिंद्याच्या सहाय्यानें बापूस बाजूस सारिलें ही गोष्ट अगदीं साहजिक अशीच आहे असा बापूच्या म्हणण्याचा भावार्थ आहे.आणि ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं; नानाचा हेतु तसाच होता.परशुरामभाऊ पटवर्धनांचें बापूच्या कैदेबद्दलचें मत एका पत्रांत पहावयास मिळतें; "गोष्ट वाईट झाली **चांगला कर्ता पुरुष होता.** परंतु खेळ न जात यामुळें हें प्राप्त झाले. होणार सुटत नाहीं. आजपावेतो उभयताही कर्नाटकाच्या स्वारीस यावें असें होतें. त्यास तर आतां असें घडलें. पुढें काय मनसबा करतात

१ ऐ. गो. २. ५०. २ इ. सं. हो. कै. पृ. ६.

पहावें."[1] महादजीचा कारभारी बाळाजी जनार्दन यानें कोटेकर लालाजी बल्लाळ यास बापूच्या कैदेसंबंधीं पाठविलेलें पत्र श्री० सरदेसाई यांनीं रियासतीच्या (उत्तरार्ध भाग १) १९७ पानांवर छापलेलें आहे तें येथें उध्दृत करतो. "वृद्ध अमात्य इकडील अधिकारी. मुळापासून कुचाळे करावे, हीं चालच. त्यासी दोन तीन वर्षें श्रीमंत यजमानसाहेबांची स्वारी या प्रांतीं येऊन जाहली. बखेडे उभे रहात गेले. त्यांचे पारिपत्य बरें खसीनें केलेच. परंतु मागती वरचेवर खूळ उभे राहते याचे कारण व कर्तृत्व समजलेंही होतें. परंतु कोणी गोष्ट दागदूम पत्ते दर दस्तऐवजीं सापडल्याविना काय करावे. त्याअर्थीं क्षमा करीत गेले. ज्येष्ठ (दादा) हस्तगत झाल्यावर त्यांनीं इत्थंभूत जीं जीं सूत्रें होतीं ते सांगितली. वृद्धाचे दस्तऐवजीं होते ते काढून दिले. तेव्हां पक्का मुद्दा सापडला. मग त्यांचे अंगीं लावून त्यास कायल केलें. उभयतां राज्यास आमलपणावह होते. श्रीमंत यजमानांनीं निर्वेध करून दिल्हे. याउपर राज्य चालविणें, संरक्षण करणें अधिकारी याजकडे आहे." सखारामबापूस कैद केल्यानंतर राज्याची परिस्थिति कशी झाली याचें वर्णन **बाजीपंत बव्र्यानें** पुढील शब्दांत केलें आहे. "सखाराम भगवंत कोशकीटकाप्रमाणें कैद जाल्यावर राहिल्यांची केवळ आब गेली. आणि इतबार राहिला नाहीं आणि आश्चर्य करितात कीं या निर्माल्याचा आंदेशा करून तांब आदि करून दिवसगतावर घालतात. फौजेस कपर्दिकही देत नाहींत. जीवमात्र राजी नाहीं आहे त्यांत बंदोबस्त नाहीं कांहीं मिळत नाहीं. सरदार राजी नाहींत फौजही नाहीं. आहे त्यास खावयास मिळत नाहीं किलेदार

१ खरे ३४३९–४०.

सर्व बेदिल हजार पांचशें माणसांनीं काय करावे तेहि दैवहत बुद्धिहत जाले आहेत. अलिकडे शिंद्याचे आचरण फंदावाचोन नाहीं त्यास बुद्धीनें टाकिले आहे. होळकराचा प्रकार तर जघन्य.''[1] सखारामबापूस कैदेंत घातल्यानंतर 'नाना फडणवीस हा दक्षिणचा राजा झाला व शिंदे त्याचे सहकारी बनले.' असा उल्लेख प. कॅ. मध्यें आढळतो.[2] त्याचा आशय एवढाच कीं नानाच्या हातीं सर्व सत्ता केंद्रीभूत झाली.

कैद केल्यानंतर सखारामबापूस सिंहगडीं पाठविण्यांत आलें. त्या संबंधीं सिंहगडचा किल्लेदार नारो महादेव गद्रे यानें सखारामबापू सिंहगडीं पोचल्याचें व त्यास बंदोबस्तानें ठेविल्याबद्दल नाना फडणवीसास पत्रद्वारें कळविलें. "सखाराम भगवंता बरोबर भवानी शिवराम, नीलकंठ विठ्ठल, रामचंद्र जनार्दन, सटवोजी गलावडे, गाडदी शंभर व राघो विश्वनाथ वगैरे लोक पाठविले आहेत तर किल्यावर घेऊन भोवत्या चौक्या पहारे बंदोबस्त करावा या आज्ञेप्रमाणें आज प्रातःकाली किल्ल्यावर राघो विश्वनाथ....गाडदी वगैरे घेऊन वाड्यांत ठेविले आणि जनार्दन राम वगैरे लोक व सरदार सेवेसी आले आहेत येऊन पोहोचतील.''[3] नाना फडणवीसानें बापूस जरी चौकीपहाऱ्यांत ठेविले होते तरी बापूची एकंदर बडदास्त फारच चांगली ठेविली होती. दोन नोकर, नित्य दानास रोजी १० रुपये, व्यतिपाताचे दिवशीं २। तोळे सोन्याच्या २८ पुतळ्या दानधर्मास; उत्तम जेवण; शाकभाजी, विड्याचीं पानें; श्राद्धविधी वगैरे सर्व बाबतींतली

---

१ पे. द. ३६–३८५. २ प. कॅ. ५. ३४०.

३ पा. स. नं. ३९.

तरतूद केलेली होती.[१] बापू प्रतापगडीं असतांना दुधाकरता १ गाय व म्हैस पुण्याहून पाठविल्याची माहिती मिळते. यावरून बापूची दूध पिण्याचीही व्यवस्था ठेविली होती असें दिसतें.[२] अशाप्रकारें बापूस सन्माननीय राजकीय कैदी म्हणून मानण्यांत येऊन त्यास सर्व प्रकारच्या सवलती देण्यांत आल्या होत्या.

बापूस सिंहगडास पाठवल्यानंतर पाठीमागें त्याचें सर्व उत्पन्न, फौजेचा व जातीचा सरंजाम जप्त करण्यांत आला. 'घर पागा कोठी व दाणा वगैरेची चौकशी बाळाजी पंत ठोसर व पांडुरंगराव गोडबोले यासी सांगितली. कसबे सासवड येथील वटेश्वरानजीकचा वाडा व लष्करचा गोट बाळाजीपंत ठोसर यांनीं जप्त केला.[३] माचीच्या वाड्यांतून मिळतील तेवढें दागिने जप्त करून आणिले. याशिवाय बापूकडे फौजेच्या व स्वतःच्या सरंजामाकरतां गुजराथ, खानदेश वगैरे प्रांत होते तेही सरकारांत घेण्यांत आले. जप्तीच्या मुलुखाची यादी शेवटीं परिशिष्टांत दिली आहे ती जिज्ञासू वाचकांनीं नजरेखालीं घालावी. मुळामुठा नदीच्या संगमाजवळचा सुंदर बाग व पाषाणचा बागही नानानीं घेतला. हिवरें व सासवड येथील वाडयांतून **एकंदर ५० लक्षांचें द्रव्य** निघालें. "सखाराम पंत यांचे म्हातारपणचे द्रव्य २० लक्ष साहुकारी यातून घरांतून सोने व मोहोरा

१ स. मा. रो. पृ. २५२ बापूच्या पायांत ४० शेरांची बेडी घातली होती व त्याचे खाण्यापिण्याचे फार हाल झाले अशी माहिती धाकटे शाहू राजे यांच्या चरित्रांत ४९–५० पानांवर आढळते परंतु ती माहिती चुकीची आहे हें वरील उल्लेख पाहतां कळून येईल. २ स. मा. रो. पृ. २५२. ३ पे. द. ४५.७.

३० लक्षांचे निघालें. [१] ते सर्व सरकारजमा करण्यांत आलें. अशा प्रकारें बापूच्या सर्व इस्टेटीची विल्हेवाट नानानें लाविली. हें प्रायश्चित बापूस त्याच्या फितुरीबद्दल देण्यांत आलें हें सांगणें नकोच.

कैदेंत असतांना हरीपंतानें बापूची गांठ घेऊन शिंद्यानें निवळ दगाबजीनें तुम्हास कैद केलें. तरी सुटण्याचा प्रयत्न करून (बापू) पुन्हा राज्यकारभार करण्यास तयार असल्यास सर्वजण येऊन मिळतील असें त्यांना ( बापूंना ) सुचविलें. परंतु 'आतां आपले म्हातारपण झाल्यामुळें उपाधीचा आपणास वीट आला आहे; यदाकदाचित् नानांनीं मुक्त केल्यास काशीस जाऊन राहूं; परंतु कारभाराची दगदग नको' असें उत्तर केल्याचा उल्लेख पर्शियन कॅलेंडर्समध्यें सांपडतों. [२] निजामानें पेशवे, नानाफडणवीस व शिंदे यांना पत्र पाठवून बापूच्या अटकेबद्दल जाब विचारला व त्यांची सुटका कधीं करणार म्हणून चौकशी केली. त्यास शिंदे व नाना यांनीं उत्तर पाठविलें कीं, "सखाराम बापूनीं अविचारानें कांहीं राजकीय स्वरूपाचा गुन्हा केल्यामुळें त्यांना प्रतिबंधांत ठेविलें आहे. त्यास मुक्त करण्याचा तूर्त सरकारचा विचार नाहीं कारण तसें झाल्यास राज्यांत विनाकारण बखेडे उपस्थित होतील"[३] ( २० सप्टेंबर १७७९ ) निजामानें या बाबतींत पुढें कांहीं

१ पे.द. ३६. ३८५; प.कॅ. ५. ४०५मध्यें "नानानें बापूचा वाडा पाडून ६० लक्ष रुपये वसूल केले. नागपूरच्या लोकांना नानांची श्रीमंती दाखविण्याचाही नानाचा प्रयत्न असेल" असें म्हटलें आहे. खरे पृ. ३४४१ वर " तूर्त तेरा उंट भरून कापड व नक्त कांहीं मोहोरा जामदारखानेस दाखल जाहले. पुरतां झाडा नाहीं येकंदर आकार जाहल्यावर लिहूं " असा उल्लेख आढळतो.

२ प. कॅ. ५. ३४९. ३ प. कॅ. ५. ३६२.

अधिक केल्याचें आढळत नाहीं. कदाचित् या उत्तरानें त्याचें समाधान झालें असावें. परंतु सखारामबापूस मुक्त करण्याचा नानाचा विचार आहे अशा अर्थाच्या बातम्या मधून मधून उठत असत. शिवाजीपंत म्हणून बापूचा एक आप्त होता त्यानें बापूस सोडविण्याचा प्रयत्न केला; परंतु त्यास कैदेंत पडावें लागलें. यानंतर बापूच्या सुटकेचें फारसे प्रयत्न झाले नाहींत. कांहीं उपद्यापी लोक बंड करतील या भीतीनें नानानें बापूस सिंहगडाहून काढून प्रतापगडी जयरामपंत बापट यांचे हवालीं केलें. तेथील हवा बापूच्या प्रकृतीस मानवेना तेव्हां तेथून त्यास नगरच्या किल्ल्यावर नेण्यांत आलें. या ठिकाणीं नाना कालांतरानें कैद होऊन येतील त्यावेळीं त्यास देण्याकरितां एक भविष्यसूचक चिठ्ठी बापूनें तेथील किल्लेदाराच्या स्वाधीन केली होती. "शिंद्याकरवीं तुम्हीं माझा जसा शेवट केलात तसाच शिंदे तुमचा शेवट करतील" अशा अर्थाचा मजकूर या चिठ्ठीवर लिहिलेला होता. पुढें सन १७९८त नानास खरोखरच बंदिवास प्राप्त झाला तेव्हां तेथील किल्लेदारानें बापूंची वरील चिठ्ठी नानास दिली. ती वाचून नानास रडूं कोसळलें. हीं गोष्ट पावगीकृत ग्रंथांत दिली आहे. बापूस नगराहून रायगडास नेण्यांत आले;[१] व त्याठिकाणीं अतिसाराचें विकारानें आजारी पडून या थोर, वयोवृद्ध, अनुभविक, मराठी सम्राट—दरबारांतील प्रमुख म्हणून नांवाजलेल्या मुत्सद्याचे श्रावण शु॥ त्रयोदशी शके १७०३ रोजीं (२ आगष्ट १७८१) देहावसान झालें.[२] त्यांच्या उत्तरक्रियेसाठीं

१ म. रु. २.११०–१११. २ इ. सं. पृ.१५१; Duff Vol II 165–6. "This Venerable old man, the once great Sakharam Bapu perished miserably in Raigad after

(पान २१७ वरील टीप पहा)

नाना फडणवीसानें ५ हजार रुपये खर्च केले. मरणसमयीं बापूचें वय अजमासें ६५ वर्षांचें असावें. त्याच्या पश्चात् त्याच्या घराण्याची मोठी दुर्दशा झाली. बापूच्या मरणसमयीं त्यांच्या तीन बायका काशीबाई, राजूबाई व जिऊबाई हयात होत्या. त्यांस नानानें सालीना फक्त ८ हजार रुपयांची नेमणूक करून दिली पेशवाई बुडून इंग्रजी राज्य झाल्यावर जुन्या प्रतिष्ठित घराण्याच्या कैफियती सरकारनें मागविल्या होत्या. त्यांत बोकील घराण्याची कैफियत बापूच्या नातवानें ( यशवंतराव आको ) सादर केलेली होती. त्यावरून बापूच्या वंशजास इ स० १८३२ सालीं हिवरें गांवीं सालीना एक हजार रुपयांचें उत्पन्न होतें. सखारामबापूनंतर त्याच्या नातेवाइकांपैकीं कोणी नांवारूपास चढल्याचें आढळत नाहीं. बापूबरोबर त्याची संपत्ति व कीर्ति हीं दोन्हीं लयास गेलीं.

स्वारीं कारभारीं ( Chief of the General Staff ) व धुरंधर मुत्सद्दी म्हणून सखारामबापूनीं चांगलाच नांवलौकिक आपल्या हयातींत संपादन केला. पेशव्यांच्या स्वाऱ्यांत बापू किंवा बापूचें पथक नेहमी हजर असे. बापूनें स्वतः जातीनें जशी पुष्कळ लढायांत चांगली कामगिरी बजावलेली आहे तशीच स्वराष्ट्राची वकिलीही मुत्सद्दीपणानें केलेली आहे. यास्तव साडेतीन शहाण्यांत त्यांस अग्रस्थान देण्यांत येते.

---

sharing every vicissitude of privation & grandeur of toil and triumph, which a leader in the camps & courts of a great empire must experience.

# प्रकरण १३ वें.

## संकीर्ण माहिती.

**दिनचर्याः**—सखारामबापू बांध्यानें थोडे सडपातळ असले तरी त्यांची प्रकृति शेवटपर्यंत बरी होती. नाना फडणवीसांची प्रकृति अशक्त असल्यामुळें नेहमीं कांहींना कांहीं त्यांची तक्रार चालू असे. थोडीबहुत तशीच गोष्ट बापूंची होती. कदाचित् म्हातारपणीं बापूंना संधिवातासारखा रोग जडला असावा. कारण नारायण तेल व सुवर्णवर्ख यासारखीं औषधें ते नेहमीं जवळ बाळगीत. थोरल्या माधवरावाच्या कारकीर्दींत बापूस जेव्हां घरीं बसावें लागलें त्यावेळचीं त्यांची दिनचर्या एका पत्रांत उपलब्ध आहे. "सखारामपंत सासवडींच आपल्या वाडियांत आहेत. प्रातःकाळीं उठावें शौचास जाऊन तोंड धुवणें चार घटका सगडीजवळ बसावे उपरांतिक निद्रा करावी सहा घटकापर्यंत निजावें तदोत्तर उठोन स्नान करावे दोन प्रहरा भोजन करावे त्यानंतर चारपांच डाव सोंगट्याचे खेळावे पुढें चार घटका पोथी पुस्तक वाचावे मग श्रीवटेश्वरास जावे मग संध्या करावी. रात्रीस आपला घरचा कारभार करावा व कोणी आला गेला ऐसे प्रहर नऊ घटका जाणावे उपरांतिक निजावे...."[१]

सकाळीं ६ वाजतां....प्रातर्विधि.

६ ते ६–३० शेकणें.

६–३० ते ९ थोडीशी झोंप.

९ ते १२ स्नान, संध्या, पूजा अर्चन वगैरे.

---

१ हा मजकूर व बापूसंबंधीं इतर माहिती रा. कृ. वा. पुरंदरे यांच्याकडून मिळाली. ही दिनचर्या इ. स. १७७० च्या सुमारची असावी असा आमचा तर्क आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| दुपारीं १२ | ते | १ | भोजन. |
| १ | ते | ३ | सोंगट्या खेळणें. |
| ३ | ते | ५ | पोथीपुराण वाचणें. |
| ५ | ते | ७ | वटेश्वराचें दर्शन; संध्या. |
| ७ | ते | ८ | भोजन. |
| ८ | ते | ११ | घरकारभार; हिशेब पहाणें; लोकांच्या भेटी. |
| रात्रीं १२ च्या पुढें | | | झोंप. |

सकाळीं उठल्याबरोबर बापू शेगडीजवळ बसत असत. यावरून ते दिवस थंडीचे असावेत असें वाटतें. या दिनचर्येंत ९ वाजेपर्यंत बापू थोडीशीं झोप घेत असत हें विशेष वाटतें. सामान्यतः यावेळेस कोणी झोंप घेत नाहीं. त्याचप्रमाणें बापूस भेटावयास रात्रीं लोक येत असत हेंही विशेष महत्त्वाचें दिसतें. त्यावेळेस त्यांचीं खलबतें चालत असत असें अनुमान यावरून निघूं शकतें. या दिनचर्ये-वरून सरकारी कामकाज बापू केव्हां करीत असत हें कळण्यास मार्ग नाहीं. नाना फडणीस ११ ते ५ पर्यंत बहुधा कचेरींत काम करीत बसत; तीच गोष्ट बापूंची होती किंवा नाहीं हें सांगतां येत नाहीं. परंतु बारिकसारीक गोष्टींकडे नानाइतकी बापूची नजर नव्हती हें निर्विवाद आहे. नानास कारकुनी कामाचा उरक मोठा विलक्षण असे. त्याचा दरारा व शिस्त ही कडक होती. बापूचा देशस्थी कारभार होता. त्यांत नेहमीं देवाण घेवाण चालावयाची.

**खासगी**—बापूचा आचार शुद्ध ब्राम्हणाचा होता तरी ते कर्मठ होते असें वाटत नाहीं; संध्यादि नित्यनैमित्तिक कर्में ते ठरा-विक वेळीं करीत असत. त्यांचें मुख्य दैवत म्हणजे शंकर. हिवऱ्यास

चारणावती नदीवर त्र्यंबकेश्वराचें देवालय बापूंनीं पुष्कळ पैसे खर्च करून बांधिलें. त्याचप्रमाणें सासवडास कऱ्हा नदीला बरीच रक्कम खर्च करून घाट बांधला. तसेंच हिवऱ्यास २ घरें बांधलीं त्यांपैकीं एक ६०० रुपयांस खरेदी केल्याबद्दलचा इ. स. १७६७ सालचा चकनामा माधव नीलकंठ पुरंदरे सरदेशमुख देशपांडे यांच्या हातचा आढळतो. बापूचें धर्मादायाकडे अजमासें वार्षिक १२ हजार रुपये खर्च होत. कोणीहि भिक्षुक त्यांचेकडून विन्मुख गेला नाहीं. इ. स. १७५९ मध्यें बापूंनीं सासवडापासून कांहीं कोसांवर असलेल्या सिद्धेश्वराजवळ महारुद्र केले. त्या वेळेस नानासाहेब पेशव्यांनीं लिंबक सोनदेवास आठ रोज रातसुधा रखवालीसाठीं पाठविले होते.[१] वैदिक, शास्त्री, पुराणिक इत्यादि विद्वान व नटनर्तकादि कुशलकलाभिज्ञ लोकांची बापूच्या घरीं चांगली संभावना होई. बापूंचा गोतावळा फार मोठा होता व त्यांपैकीं पुष्कळ जणांस त्यांनीं आश्रय दिलेला होता. नानांनीं कधींही आपल्या नातेवाईकांस जवळ केलें नाहीं ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. बापूकडे नोकरचाकर पुष्कळ असत. २१ मोलकरणी घरगुती कामावर असून प्रत्येकीस ३ रु. ७ आ. पगार देण्यांत येई. इ. स. १७७३ मध्यें बापूच्या कीर्दीस रु. २०३,३०४ जमा असून खर्च रु. १९१,२४६ होता. त्यांत बाजेखर्च (Shaving) रु. १९५ होता ही नवलाची गोष्ट आहे.

बापूस शेलके शेलके परदेशी, स्वदेशी जिन्नस विकत घेऊन घरीं व्यवस्थेनें त्यांचा संग्रह करण्याचा नाद होता. कांहीं वेळेस असे जिन्नस त्यांना सरदारांकडून किंवा मुत्सद्यांकडून भेट म्हणून येत असत. पेशवाईत बिलोरी पेले, गालिचे, मेणबत्त्या यांचा वापर सर्व-

१ पे. द. ३९.३५.

साधारण श्रीमंत माणसाच्या घरीं असे. बापूकडे हे जिन्नस वापरीत असत हें सांगावयास नकोच. बापूंच्या खोलींत सुवर्णवर्ख व नारायण तेल या दोन वस्तु असावयाच्याच हें मागें सांगितलेंच आहे. बापूंना वडिलकीचा मान असल्यामुळें सरकारी दस्तकान्वयें त्यांनीं खरेदी केलेल्या किंवा त्यांना नजर म्हणून मिळालेल्या मालावर जकात माफ असे. अशा मालामध्यें उत्तम तांदूळ, उंची वस्त्रें, कस्तुरी, लाकडी सामान वगैरे हजारों रुपये किंमतीचे जिन्नस असत. अशा मालासंबंधीं काढलेले सरकारी दस्तक येथील पेशवे दप्तरांत बरेच पहावयास सांपडतात. निजाम, हैदर, भोसले, कोल्हापूरकर छत्रपती यांच्या दरबारांत बापूचें चांगलें वजन होतें व त्यांच्याकडून पुष्कळ नजराणे बापूस येत. निजामाकडून बापूस 'मदारुलमहाम' हा किताब मिळाला होता.

बापूस चहा पिण्याची चांगलीच संवय होती. परशुरामभाऊ पटवर्धन व नाना फडणवीस हेही चहा पीत असत. हें चहाचें व्यसन मॉस्टीन, अप्टन वगैरे इंग्रजांचा सहवास घडल्यामुळें या लोकांत बोकाळलें असावें. बापू रायगडास असतांना त्यांच्या खोलींत ४ पौंड चहा, चहादाणी वगैरे वस्तू होत्या अशी माहिती मिळते.

**कौटुंबिक सौख्य**—गृहसौख्याच्या बाबतींत एकंदरीनें शेवटीं बापू कमनशिबी होते असें म्हणावें लागतें. त्यांचें पहिलें लग्न इ. स. १७३२ च्या सुमारास झालें असावें. ह्या बाईस जो मुलगा झाला तोच आबोपंत होय. याचें लग्न थोरल्या माधवरावाच्या कर्नाटकच्या स्वारीनंतर १।१।१७६७ रोजीं रघुनाथ चिमणाजी पंतसचीव यांची मुलगी गोदूबाई इच्याशीं सासवड मुक्कामीं झालें. हा

लग्नसोहळा जवळ जवळ दोन महिने चालला होता व तोंपर्यंत सचिवांची मंडळी सासवडासच होती.[१] हा आकोपंत इ. स. १७७५ च्या मे महिन्यांत वारला त्यामुळें म्हातारपणीं बापूस अतिशय दुःख झालें. यावेळीं बारभाईचें कारस्थान बापूनें हातीं घेतलें होतें. परंतु पुत्रवियोगाचें सर्व दुःख गिळून तें कारस्थान यशस्वी करण्यासाठीं तनमनधन अर्पण केलें. कच्च्या दिलाच्या मनुष्यानें सर्वसंगपरित्याग केला असता. या संबधीं एका पत्रांत उल्लेख सांपडतो तो असाः—" विनंति उपरी, श्रीमंत राजश्री सखारामबापूचा पुत्र आकोपंत बाबा याचा काल जाहला तो मजकूर....मोठा घात झाला. याजमुळें सौ. ताईस मोठें दुःख झालें तें लिहावयासी हात न चले....श्रीमंतास श्रम जाले तो प्रकार काये ल्याहावा तथापि मसलत भारी पडली याजमुळें उपाय नाहीं....नाहीं तरी येकादे तीर्थीं जाऊन बसते कोण्हाचे हातीं न लागते....त्या सारिखा ज्ञानी विवेकी कोण्ही नाहीं त्याचे तेंच येक. यैसा पुरुष पुढें होणें कठीण. आम्हा सर्वत्रांचीं आवसानें झाडून गेलीं. तथाप त्यांनीं अवसान धरून मसलत जैसी आरंभिली तैसी सिधीस न्यावी यैसा निश्चये."[२]बापूस आकोपंताशिवाय आणखी एक मुलगी झाली ती अंताजी माणकेश्वराचा मुलगा बहिरोपंत यास दिली. बापूंचें दुसरें लग्न इ. स. १७६५ च्या एप्रिल मध्यें लक्ष्मेश्वरीं झालें. गदग परगण्यांत राहाणारा, सावनूरच्या नबाबाच्या दिवाणगिरीवर असलेला गिरिधरराव म्हणून श्रीमंत गृहस्थ होता त्याची मुलगी. 'मंगलवेढ्याहून वधूची रवानगी केली'[३] असा हिच्यासंबंधानें गोविंद हरी उल्लेख करतो. या स्त्रीपासून बापूस एक कन्या झाली ती भोरच्या सचीवांचा

---

१ पे. द. ३९.७९ २ भा.इं.स.त्रै. ३ खरे पृ. ९७५.

मुलगा शंकरराव रघुनाथ यास दिली. हें लग्न ता २४ जानेवारी १७७९ च्या सुमारास वाईस झालें. लग्नप्रीत्यर्थ बापूनें ४० हजार रुपये खर्च केले.

आक्रोपंत वारल्यानंतर पुत्रसंततीच्या आशेनें बापूनें आणखी तीन लग्नें (म्हणजे एकूण पांच लग्नें) केलीं. तिसरे इ. स. १७७६ मध्यें, चौथें १७७७ मध्यें व शेवटचें १७७८ च्या मे महिन्यांत. शेवटच्या लग्नांतली बापूची बायको चांगली थोर होती.[१] अखेरच्या या दोन्ही लग्नांबद्दल आनंदीबाईनें बापूस एक नाजूक चिमटा घेतला आहे. "नवी भावजय लाडकी केली तिचें नांव काय ठेविलें ? दुसरी कधी करावयाची वगैरे."[२] या तीन बायकांपैकीं राजूबाई हीस मुलगा झाला होता व पेशव्यांकडून ७५ रुपयांचा बाळंतविडा पाठवण्यांत आला होता.[३] हा मुलगा फार दिवस जगला नाहीं. पेशव्यांच्या वाड्यांत पुष्कळ केळवणें होत व या समारंभांत वस्त्रांचे अहेर करण्याची चाल होती. हळदीकुंकवाच्या प्रसंगीं वाड्यांत बापूंच्या स्त्रियांस शालू, शेले वगैरे दिल्याचे उल्लेख आढळतात. बापूच्या मृत्युसमयीं या तिन्ही बायका हयात होत्या, परंतु त्यांपैकीं दोन लवकरच वारल्या. बापूची पांचवी व शेवटची बायको जिऊबाई व बापूची सून गोदूबाई (आक्रोपंताची बायको) यांचें लवकरच पटेनासें झालें. तेव्हां नानानें त्यांना वेगवेगळ्या नेमणुका ठरवून दिल्या (इ. स. १७८४). त्यांपैकीं जिऊबाईच्या वांट्यास ३९४२ रु. ६ आणे व गोदूबाईच्या वांट्यास रु. ४०५७–१४ आणे सालीना येत असत.[४]

---

१ खरे ३२००. २ ऐ. टि. १. १९. ३ स. मा. रो. पृ. २५२. ४ परिशिष्ट पहा.

बापूची स्त्री जिऊबाई ही इ. स. १८२५ मध्यें गंगास्नानास गेली होती. परत येतांना घाटणगांवचे मुक्कामीं जरीमरीचा वाखा होऊन फाल्गुन वा। १२ स कैलासवासी झाली. पुढें बापूच्या सुनेनें त्यावेळचे कलेक्टर मि० चॅपलेन यांच्या मार्फत कंपनी सरकारची परवानगी घेऊन बापूचे चुलते धोंडो महादेव यांचे चिरंजीव यांस ज्येष्ठ वद्य १३ शके १७४७ रोजीं विधिपूर्वक दत्तक घेऊन नांव यशवंतराव ठेविलें.

सखारामबापू व त्यांचे इतर बंधु हे १७६३ पर्यंत एकत्र रहात होते. परंतु पुढें बापूचा पुतण्या शंकराजी निंबाजी यानें बापूशीं तंटा आरंभिल्या कारणानें त्या सालीं सर्व जिनगींचें वाटप करण्यांत आलें. या वांटपामध्यें मोलकरणी, नोकर, गाडे, रथ, पुस्तकें, पोथ्या वगैरे सजीव निर्जीव वस्तूंची सुद्धां वाटणी झाली.[1] बापूनें आपल्या पुतण्यास 'धर्मशास्त्राच्या मतापेक्षां अधिक वांटा दिला तरी सुद्धां त्यानें 'नाना प्रकारें वल्गना करून दुरुत्तरें मनमानेसे बोलल्या वरून सखाराम बापूनीं माधवराव पेशव्याकडे अर्ज करून ' दोघां बंधूस घरचे घरांत समजावे बाहेर फजीती न व्हावी, म्हणून सर्व वाटप केले तरी सुद्धां हे अशा प्रकारें वर्ततात तेव्हां त्यास ताकीद द्यावी' म्हणून विनंती केली. त्या प्रमाणें माधवरावानें ( बापूच्या पुतण्यास ) समक्ष बोलावून त्यास चांगली तंबी दिली.[2] माधवरावाची बापूबद्दलची आपुलकीची भावना यावरून अजमावतां येण्यासारखी आहे.बापूचे वडील बंधू बाजीपंत व त्याचा मुलगा हे धोंडो दत्तात्रय कायगांवकर यांच्या दिवाणगिरीवर कांहीं दिवस होते. निंबाजीचा मुलगा शंकराजी यानेंही थोडे दिवस

१ पु. द. भाग ३ पहा. २ पे. द. ३९. ७५.

अक्कलकोटच्या शहाजी भोसल्याकडे नोकरी केली. पुढें त्यांच्या संबंधी निश्चित माहिती उपलब्ध नाहीं.

बापूचीं पुष्कळशीं पत्रें अलिकडे उपलब्ध झालीं आहेत. साताऱ्याच्या **पारसनीस–संग्रहांत** अजमासें सवाशें पत्रें बापूच्या हातचीं आहेत. त्यांशिवाय पेशवे दप्तरांत प्रसिद्ध झालीं तीं निराळींच. बापूंचा तरुणपणचा जो पत्रव्यवहार आढळतो त्यांत त्याचें अक्षर चांगलें आहे; परंतु म्हातारपणीं हात कांपत असल्यामुळें त्यावेळच्या पत्रांतलें अक्षर कांपरे, दुर्बोध, व वेडेंवाकडें आहे. सखारामबापूंची नेहमी तोंडी कारभार उरकण्याची ( सहसा लेखी न गुंतण्याची ) पद्धति असल्यामुळें त्यांचीं पत्रें फारशी मिळत नाहीत असा एक आक्षेप आहे. परंतु त्यांत कांहीं तथ्य नाहीं.

**सखारामबापूंच्या कांहीं आख्यायिका, दंतकथा वगैरे—**

१ श्रीमंत भाऊसाहेब यांनीं पुणें शहरास कोट बांधावयास आरंभ केला व सखारामबापूस विचारिलें, ' बापू तुम्ही कोट पाहिला कीं नाहीं ? ' बापूंनीं उत्तर दिलें, "कोट पाहिला आहे परंतु अक्कलेची मजबुती फारच कमी दिसली. " तेव्हा श्रीमंतांनीं ' कां ' म्हणून विचारलें. बापूंनीं सांगितलें कीं शत्रु कोटापाशीं दाखल होईल तेव्हां कोटाचा उपयोग. परंतु जो राजा आपले शहरापावेतों शत्रु येईपर्यंत बातमी ठेवणार नाहीं त्यास कोटाचा उपयोग तरी कसा होणार ? राजानें दोमचारशें कोसांवर शत्रु आहे तोंच त्याजवर नजर देऊन त्याचा प्रतिबंध केला पाहिजे. आणि इतक्या दूर अंतरावर शत्रु असतां जर बंदोबस्त करावयाचा तर मग कोट कशास पाहिजे ? ही तक्रार श्रीमंताचे लक्षांत येऊन कोट बांधण्यास मनाई केली. या कोटाची खूण अद्याप नागझरीजवळ आहे.

२ एके दिवशीं माधवराव बल्लाळ पेशवे हे स्वतः चंद्रचूड याचे कारकुनापाशीं हिशेब समजावून घेत होते. इतक्यांत कांहीं तक्रार पडली. त्यावरून कारकून बोलिला की 'आम्ही या प्रमाणें आज पर्यंत करीत आलों. आतां आपण नवे यजमान जाहला. तुमच्या ध्यानास येत नाहीं याचें कारण "जुने तमाशे व नवे डोळे." त्यास आम्ही काय करावें?' असें बोलतांच श्रीमंत रागास येऊन त्यांनीं 'जास्ती बोललास तर तोंड फोडीन' असें बोलून वर हात उचलला. तों पाठीमागें सखारामबापू होते त्यांनीं हात धरला. तेव्हां पाठीमागें पाहून बोलिले, 'हात कां धरलात?" तेव्हां बापू म्हणाले की "सरकारचा जो हात दिल्लीचे बादशहा, लखनौचे वजीर, हैदराबादचे निजाम यांच्यावर पडावयाचा तो या गरिब ब्राम्हणावर पडेल तर ठीक दिसणार नाहीं म्हणून मागचे मागें हात धरला. मग श्रीमंतांची मर्जी असेल तसे." श्रीमंत खूष झाले.

× × ×

३ एके समयीं इंग्रजांनीं बोलणें लाविलें कीं आमचा वकील पुण्यास असावा. तेव्हां दरबार भरला.तमाम मुत्सद्दी व सरदार यांस पाचारण केलें. त्यावेळीं सखारामबापूंनीं सांगितलें कीं "पेशव्यांचा वकील इंग्लडास ठेवावा व इंग्रजांचा वकील पुण्यास आणावा तर बरोबरी होईल. एक पक्षीं वकील घेतल्यांस आपले घरचा भेद बाहेर जाईल व दुसऱ्याचे घरचा भेद मात्र आपणास कळणार नाहीं व येणेंकरून आपल्या राज्याचा मात्र तोटा होईल."

× × ×

४ विठ्ठल शिवदेव विंचूरकर कालवश झाले, त्यावेळीं बापूंनीं त्याचा मुलगा शिवाजी विठ्ठल याची गांठ घेतली. त्याप्रसंगीं फार

दुःख होऊन गहिंवरून बापू म्हणाले " विष्णूस चार हात तसे आमचे मालिकास शिंदे, होळकर, विंचूरकर आणि पटवर्धन."

× × × ×

५ " बापूची दृष्ट मोठी नष्ट " ही गोष्ट जुन्या लोकांत प्रसिद्ध आहे. बापूची नजर चांगल्या पदार्थावर पडावयाचा उशीर, मग त्याचा नाश झालाच म्हणून समजावें. एकदां नव्या बांधलेल्या वाड्यांत बापूस पानसुपारी झाली. तेव्हां तेथल्या एका चौकटीवरील नक्षीकडे बापूची नजर गेली. तिची त्यानें फार तारीफ केली. झालें. दुसरे दिवशीं सकाळीं पाहतात तों तिचें लाकूड भंगून त्यास चिरा पडलेल्या दिसल्या. अशामुळें त्यांच्या पुढें चांगले नेण्याची कांहीं सोय नसे. फार तर काय ! पण आपल्या एकलत्या एक मुलास मरेपर्यंत त्यानीं आपल्या समोर आणिलें नाहीं, असें सांगतात.

× × × ×

६ एके दिवशीं एक गरीब द्रवीड ब्राह्मण बापूकडे कांहीं संभावना होईल या हेतूनें आला. बापू यावेळीं सासवडास रहात होते. ब्राह्मणानें दक्षिणेची गोष्ट काढतांच बापूंनीं त्यांना ' नाहीं ' किंवा ' होय ' असें कांहींच ठाम उत्तर दिलें नाहीं. परंतु पुरंदराकडे बोट दाखवून नानास भेटावयास सांगितलें. ब्राह्मण त्याप्रमाणें पुरंदरास जाऊन नानास भेटला; परंतु नानानें त्यास बापूस भेटण्यास सांगितलें. अशा प्रकारें एकमेकांनीं एकमेकांकडे जाण्यास सांगितल्यामुळें ब्राह्मण हेलपाटे घालून दमला व त्याच्या हातांत कांहींच पडलें नसल्यामुळें त्यानें पुढील विनोदी श्लोक रचलाः—

" गडाच्च सासवडं यामि सासवडाच्च पुनर्गडम ।
गड सासवडयोर्मध्यें द्रविडो लुडबुडाम्यहम् ॥ "

७ माधवराव पेशव्यांनीं राक्षसभुवनच्या लढाईनंतर राज्यकारभार हातीं घेतला व हैदरावर स्वारी केली. श्रीमंतांचे स्वारीसमागेम कर्नाटकांत सखारामबापु होते. तेव्हां मुक्कामी फौजेचा भरणा काय आहे, कोण सरदार कोणचे बाजूस वगैरे बातमीस खासा हैदरखान फकिराचा वेष घेऊन रात्रीस गोटास फिरत असतो, वारंवार येत असतो अशी बातमी बापूस लागली. तेव्हां बापूंनीं बातमी राखून फकीर आपले राहुटींत बोलावून घेतला आणि त्याची तसबीर होती ती पाहून फकिराचा चेहरा आणि तसबीरीचा चेहरा मिळाला. त्याजवरून त्याचा हात धरून बापू बोलिले कीं तुम्ही फकीर नव्हे हैदरखान आहां तुम्हास सरकारांत नेऊन गुजरावें लागतें. चौकशी अंतीं फकीर झाल्यास सुटका होईल तोंपर्यंत जाऊं देणार नाहीं. इतकें ऐकून बापूजवळ वचन मागून, मी हैदरखान, मजला जीवदान द्यावें, असें फकिरानें विनविलें. मग बापूनीं विचार केला कीं, चोहूं देशांत चार खुला (?) आहेत. म्हणून सरकारांत फौज बाळगून हुशार राहून दरसाल त्याजपासून खंडण्याही घेतात. तेणेंकरून लाखों फौज पोसली जातें. यास्तव हैदरखानासारखा मोहरा हातीं लागला असतां याजवर उपकार करून सोडावे. त्याजपासून बापूंनीं लाखोलाख रुपयांच्या हुंड्या चिठ्या घेऊन त्याप्रमाणें त्याची मुक्तता करून त्यास पळवून लाविलें. पुढें ही बातमी फुटली. माधवरावास हा प्रकार कळला तेव्हां लाचाचा ऐवज बापूनीं सरकारांत जमा केला व "अशा रीतीनें आपल्या फौजेंतील लोकांचीं पोटें भरतात. नाहीं तर त्यांची वाट काय?" याप्रमाणें गोड बोलून बापूनीं माधवरावाचा राग शांत केला.[१]

---

१ वाड. कैफीयत पृ. १६७. ही दंतकथा बापूस पैशाचा लोभ नव्हता हा गुण दाखविण्यासाठीं त्यांच्या वंशजानें दिलेली आहे.

८ ग्रँट डफनें आपल्या इतिहासांत सखाराम बापू, गंगाबाई व नाना फडणवीस या तिघावरतीं एक दोषारोप केलेला आहे. तो लिहितो नानाफडणवासांनीं ज्या एका गोष्टीचा आपल्या महत्त्वाकांक्षेस उपयोग करून घेतला होता, ती गोष्ट पुष्कळांस माहीत नव्हती. गंगाबाई ही नाना फडणवीसांस पूर्णपणें वश होती व ह्या एकमेकां-वरील वैषयिक प्रेमाचें स्वरूप अगदीं गुप्त होतें. आणि त्या थेरड्या कारभाऱ्यास ( सखाराम बापूस) आपल्या बाजूस वळविण्यास उत्तम उपाय कोणता हें नानांनीं (बारभाईचे कारस्थानाचे वेळीं ) गंगाबा-ईस शिकविलें होते.'' [1]म्हणजे एकूण सखारामबापू हा कामानें खूळ लागलेला भ्रष्ट म्हातारा होता! व गंगाबाईमुळेंच त्याचें व नानांचें कांहीं वर्षें सूत जमलें होतें!! या व अशा कित्येक कंड्या इंग्रजांनीं राघोबांचा पक्ष घेतला असल्यामुळें दादांचे प्रतिपक्षी तेवढे वाईट असें भासवण्यासाठीं पिकविल्या असाव्यात. अर्थात् त्यांत बिलकूल सत्य नाहीं हें सांगणें नकोच.

**पेशवाईतील देशस्थकोंकणस्थ वाद**—युद्धांत पराभूत झालेल्या राष्ट्रांतील परिस्थिति अगदीं बिघडून जाते, लोकांची प्रवृत्ति भांडणें करण्याकडे, बंड करण्याकडे होते, ही गोष्ट गेल्या महायुद्धांत पराजित झालेल्या जर्मनी, आस्ट्रिया, तुर्कस्थान वगैरे देशांकडे पाहिल्यास दिसून येईल. राष्ट्रांत पक्षोपपक्ष निर्माण होऊन एक पक्ष दुसऱ्या पक्षावर युद्धांतील पराभवाची जबाबदारी टाकूं पाहतो व त्याचें पर्यवसान आपापसांत यादवी माजण्यापर्यंत जातें. अशा-वेळीं नेपोलियन, हिटलर, किंवा मुस्सोलिनी यांच्यासारखा

1 Duff Vol. II p. 17.

तेजस्वी हिरा पुढें येऊन सर्वसत्ताधारी होतो किंवा या यादवी-पासून राष्ट्र परतंत्र होण्यापर्यंत मजल जाते.

' पानिपतच्या महायुद्धानंतर मराठी राज्याची स्थिति अशाच प्रकारची ( दुसऱ्या प्रकारची ) झाली होती. देशस्थ ब्राह्मण कोकणस्थावर पानपतच्या अपयशाचें खापर फोडीत तर देशस्थांनीं व मराठे सरदारांनीं पानपतचा मनसुबा बिघडविला असा आरोप कोकणस्थ त्यांच्यावर करीत. याचें पर्यवसान देशस्थ पक्ष व कोकणस्थ पक्ष यांच्यांत लट्ठालठ्ठी होऊन राज्यनाश होण्यांत झालें. पानपतानंतर जी लाथाळी, एकमेकाविरुद्ध जी कारस्थानपरंपरा सुरू झाली ती पेशवाईच्या अंतापर्यंत चालली होती ' असें सुप्रसिद्ध इतिहासलेखक **ग्रँट डफ** यानें आपलें मत प्रदर्शित केलें आहे.[१] आणि थोड्या फार फरकानें त्याचाच अनुवाद **जस्टिस रानडे** यांनीं 'राईज ऑफ दि मराठा पॉवर' या आपल्या पुस्तकांत केलेला आहे.[२] मराठी साम्राज्याच्या तत्कालीन परिस्थितिसंबंधी विचार करतां ही मीमांसा कांहीं अंशीं वस्तुस्थितीस धरून आहे असें कबूल केलें तरी केवळ देशस्थ कोकणस्थ वादामुळें मराठी साम्राज्य रसातळास गेलें हें ह्मणणें चुकीचें आहे हें आम्ही दाखवणार आहोंत.

श्रीशिवाजीमहाराजांनीं स्वराज्यस्थापना केली त्यावेळीं अधिकाऱ्याच्या जागा केवळ व्यक्तींची लायकी, कर्तबगारी पाहूनच दिल्या. जातिविषयक भेदाभेद त्यांनीं मानले नाहींत. तोच प्रघात शाहू महाराजापर्यंत चालत आलेला होता. त्यावेळीं देशस्थ, प्रभु वगैरे ज्ञातीचे लोक राजकारणांत प्रामुख्यानें चमकले. प्रतिनिधी,

1 Duff Vol. I p. 535. 2 Introduction to the Peshwa's diaries by Ranade p. 357.

सचीव, मंत्री, न्यायाधीश, पंडित वगैरे अधिकाराच्या जागांवर देशस्थ ब्राह्मण होते. त्यावेळीं कोकणस्थ किंवा चित्पावन शेतीवाडी करून कोकणांत शांततेनें रहात असत. राजकारणांत फारसा भाग त्यांनीं घेतला नाहीं. परंतु बदलत्या काळाबरोबर त्यांनींही या क्षेत्रांत पाऊल टाकलें व कर्तबगारी करून दाखविण्यास सुरवात केली. बाळाजी विश्वनाथासारख्या कोकणस्थास शाहूनें पेशवेपद दिलें तें त्याच्या अंगची कर्तबगारी ओळखून व तो तसेंच अलौकिक कार्य करून दाखवील या भरवंशावरच दिलें होतें. देशस्थ कोकणस्थ हा भेद त्यांच्या मनांत नव्हता. देशस्थ कोकणस्थ वादाची प्राणप्रतिष्ठा पुढें नानासाहेब पेशव्यांच्या कारकीर्दींत झाली असें म्हणतात.[1] महादजी पुरंदऱ्याच्या पत्रामध्यें नानासाहेब पेशवे कोकणस्थांचे पक्षपाती आहेत अशी माहिती सांपडते. "श्रीमंतास आपले जातीचा अभिमान फार आहे. देशस्थ कोकणस्थ, कराडे प्रभु सेणवी मराठे हें सर्व स्वामीचे स्वामी इतक्याचे मायेबाप चाकरी मात्र सर्वांनीं दौलतीची करावी हे जातिभेद अभिमान नसावे."[2] यावरून नानासाहेब पेश-

१ नानासाहेब पेशव्यांचे कारभारी महादाजीपंत पुरंदरे हे काशीयात्रेस जाणार होते. परंतु बरेच दिवस त्यांचें जाणें लांबणींवर पडल्यामुळें नानासाहेब पेशव्यांनीं एकेदिवशीं याचें कारण विचारलें. तेव्हां महादाजींनीं उत्तर केलें कीं "एखादा कोकणस्थाचा पोऱ्या शागीर्द मिळाला तर पाहतो. 'कोकणस्थांचाच पोऱ्या कां' म्हणून विचारतांच "त्यांची काय लायकी आहे. आम्ही देशस्थ आहोंत म्हणून राज्ययंत्र चाललें आहे" असें उत्तर महादाजींनीं दिलें. हें उत्तर नानासाहेब पेशव्यास झोंबून कोकणस्थ जातीचा दर्जा वाढविण्याची खटपट त्यांनीं सुरू केली. पटवर्धन, रास्ते, फडके वगैरे कुटुंबें कोंकणांतून आणून त्यांना फडांत कामें दिलीं व पुढें त्यांनाच सरदाऱ्या दिल्या, अशी एक आख्यायिका या वादाच्या उगमासंबंधीं सांगतात.

२ पु. द. भाग ३. पहा.

त्यांनीं केवळ कोकणस्थांनाच जास्त सवलती देऊन पुढें आणण्याचा विचार केला होता. लायकीनालायकीचा प्रश्न क्षणभर बाजूस ठेविला होता असें दिसतें. जसजसे पेठे, पटवर्धन, फडके, रास्ते, भानु वगैरेंना अधिकार मिळत गेले तसतसे त्यांनीं देशस्थांविरुद्ध एकजूट करण्याचा प्रयत्न केला; व याला तोड म्हणून सखारामबापू, अंताजी माणकेश्वर, चंद्रचूड, विंचुरकर, राजेबहाद्दर, पुरंदरे, रायरीकर वगैरे देशस्थ सरदार–मुत्सद्यांनीं आपला एक सुसंघटित पक्ष बनवला असें सांगण्यांत येते. पटवर्धनांच्या सर्व कागदपत्रांतून देशस्थ–कोकणस्थ वादाचें भूत नाचत असलेलें दिसतें. सखारामबापूच्या अंगीं तर "चित्तपावनांचें नांव देशांत नाहीसें करण्याचा बापूचा मनसबा होता' असे आरोप चिकटविले आहेत.[१] वास्तविक नानासाहेब व थोरले माधवराव पेशवे यांच्या कारकीर्दीतील अस्सल कागदपत्र चाळले असतां देशस्थ व कोकणस्थ असे निव्वळ जात्याभिनिविष्ट पक्ष त्यावेळच्या राजकारणांत अस्तित्वांत होते असें वाटत नाहीं. परंतु हा देशस्थ,हा कोकणस्थ,हा दुजाभाव अगदींच नव्हतां असें मात्र नाहीं.राजकारणांत जातगोत, नातें, स्नेह वगैरेंचा पगडा राजकारणी पुरुषांच्या मनावर बसतां कामा नये हें तत्त्व म्हणून कबूल.परंतु मनुष्य स्वभावाच्या दृष्टीनें विचार करतां नात्यागोत्याच्या माणसाचें हित पाहाण्याकडे पुष्कळांचा कल झुकणार हेंहि कबूल करावें लागेल. स्वदेशाभिमान, राष्ट्राभिमान म्हणजे कांहीं स्वकीयांचा बळी देणें अगर त्याचें अहित करणें असा अर्थ होत नाहीं. तेव्हां विशिष्ट कार्य हातीं घेण्याचें प्रसंगीं ज्यांचे हितसंबंध–नात्याचे संबंध आहेत अशीं माणसें एकत्र येणारच.तेव्हां देशस्थांनीं कोकणस्थांना व कोकण-

१ खरे १०४; १५४.

स्थांनीं देशस्थांना नांवें ठेवण्यात अर्थ नाहीं. कारण दोघांनीं त्याच गोष्टी केलेल्या आहेत. राष्ट्रकार्यांत त्यांनीं लायकीनालायकीचा प्रश्नच फक्त डोळ्यांपुढें ठेवला होता, जातिभेदाचें वारें अगदींच दोघांच्या मनास शिवलें नव्हतें असें पुढें आलेल्या पुराव्यावरून म्हणतां येत नाहीं. तरीसुद्धां माधवराव पेशव्यांच्या कारकीर्दींत जे दोन पक्ष ठळकपणें दिसतात त्यांच्यामध्यें सुद्धां देशस्थांच्या बाजूला सर्वच देशस्थ होते असें नाहीं. त्या पक्षाचा अध्वर्यु सखारामबापू यानें राघोबाचें म्हणजे कोकणस्थांचें पुढारीपण पत्करलें होतें. शिवाय सखाराम हरी, अबाजी महादेव यांसारखे प्रभु, कोकणस्थ वगैरे लोक या-पक्षांत होते. सारांश निव्वळ देशस्थ किंवा निव्वळ कोकणस्थ असे पक्ष अस्तित्वांत नसावेत असें वाटतें. परंतु तसा वाद मात्र होता.

पेशवाईमध्यें जे पक्ष निर्माण झाले त्यांचें मूळ पेशव्यांच्या मोहिमांत आहे. नानासाहेब पेशव्यांनीं एकसमयावच्छेदेंकरून उत्तर व दक्षिण दिशांना आपले उद्योग आरंभिले; त्यामुळें विशिष्ट विचारांचे किंवा कांहीं कार्य केल्यामुळें ज्यांचा स्नेहभाव वृद्धिंगत झाला असे लोक एकत्र झाले. उत्तरेकडे विंचूरकर, राजेबहाद्दर, चंद्रचूड, सखारामबापू वगैरे लोक रघुनाथरावाच्या स्वाऱ्यांत प्रामुख्यानें असल्यानें साहजिकच त्यांची जूट झाली. दक्षिणेकडच्या स्वाऱ्यांची जबाबदारी सदाशिवरावभाऊ, नानाफडणवीस, पटवर्धन सरदार, पेठे वगैरेंच्यावर पडल्या कारणानें त्यांचे हितसंबध निगडित झाले व या दोन बाजूंमध्यें एकमेकांसंबंधीं साशंक वृत्ति, चुरस निर्माण झाली. वादाचें बीज या स्पर्धेंत निर्माण झालें असें जरी असलें तरी विंचूरकर, नारोशंकर यांच्यासारखे सरदार माधवरावाच्या कर्नाटकच्या स्वारींत गोपाळराव पटवर्धन, रास्ते यांच्याशी खांद्यास खांदा भिडवून

लढले. सखारामबापूंनीं बारभाईच्या कारस्थानांत पटवर्धनाशीं सहकार्य केलें. अशा कित्येक उदाहरणांवरून देशस्थकोंकणस्थ असा केवळ ज्ञातीचा वाद त्या वेळीं नसून राजकीय प्रश्नाबाबत दोन किंवा अधिक तट पडत असत; आणि बरेचसे देशस्थ एका बाजूला व कांहीं कोंकणस्थ दुसऱ्या बाजूला झाल्यामुळें देशस्थ कोंकणस्थ वादाचा आभास मात्र उपन्न झाल्यासारखा दिसतो. वस्तुतः सखारामबापूसारखा देशस्थ मुत्सद्दी राजकारणांत चमकत होता. हें पेठे, पटवर्धनासारख्या तेजस्वी परंतु दीर्घद्वेषी माणसांस संहन होत नव्हतें. नानासाहेब पेशव्यांनीं त्यांना जवळ केल्यामुळें बापूस अधिकारावरून खाली ओढण्याचा त्यांचा प्रयत्न असे. परंतु बापू आपल्यापेक्षां सर्व बाबतींत कांकणभर सरस आहे हें अखेरीस त्यांच्या निदर्शनास आलेंच. सारांश हा व्यक्तीव्यक्तीमधील चढा-ओढीचा मामला होता. अधिकाराबाबत तंटा होता. तें ज्ञातिविशिष्ट भांडण नव्हतें. अधिकाराबाबत भांडणें प्रत्यक्ष पितापुत्रांतही झा-ल्यांचीं उदाहरणें इतिहासांत आढळतात. औरंगजेबानें आपल्या भावास ठार मारून पित्यास कैदेत टाकिलें तें केवळ अधिकारलाल-सेनें. राघोबासही अधिकार—सत्ताच पाहिजे होती. पेशवाईत त्या वेळीं व्यक्त्यभिनिवेश जास्त बळावत चालल्यानें व्यक्तीच्या स्वरूपा-प्रमाणें भांडणास स्वरूप दिलें जाई. सखारामबापू सर्वांत श्रेष्ठ अशा दिवाणगिरीच्या पदावर व तो देशस्थ आणि त्याच्या विरुद्ध बाजूचे लोक कोंकणस्थ; म्हणून या वादास देशस्थ कोंकणस्थ वादाचें स्वरूप येतें. परंतु तें खरें स्वरूप नव्हे पांघरूण आहे असें आम्हास वाटतें.

**सखारामबापू व राघोबा**— नानासाहेब पेशवे, राघोबा,

सखाराम बापू हे एके ठिकाणीं लहानपणीं वाढल्याकारणानें राघोबा व सखारामबापू यांचा एकमेकाशीं जिव्हाळ्याचा संबंध जडला. पेशव्यांच्या उत्तरेकडील स्वाऱ्यांमध्यें राघोबा व सखारामबापू हे प्रामुख्यानें पुढें आले व त्यांनीं मराठ्यांचे झेंडे अटकेपार नेऊन दिगंत कीर्ति मिळविली. अर्थात दोघांमधलि सघंट्टन अधिक दृढतर झाले. नानासाहेब पेशव्यांनीं मरतेसमयीं राघोबा व सखारामबापू यांचे हातांत माधवरावास दिल्यानें यापुढें राघोबा व बापू एक दिलानें वागूं लागले. परंतु हें त्यांचें सख्य दरबारांतिल इतर मंडळींस न पाहवल्यामुळें वादाचें कारण उपस्थित झालें. बापूच्या राजिनाम्यामुळें त्यांत भर पडली; व अशा प्रकारें दरबारांत दोन फळ्या होऊन आपल्या विरुद्ध पक्षियांचा सत्यानाश करण्याचें धोरण प्रत्येकानें अमलांत आणिलें.

' राघोबाची सगळी मर्जी आपणावर आहे ' ह्याबद्दल सखारामबापूची खात्री होती व त्याकरतां शक्यतोंवर ' दादाकडिल कल जरूर दाखवण्याचा ' त्यांचा प्रयत्न असे. तर माधवराव पेशव्यास बापू आपल्या लगामी असावा असें वाटे. यासंबंधीं बापूच स्वतः एका पत्रांत लिहितात, " मुलाची गोष्ट तरी .... दादाचे माणूस दूर करावे आपले जवल करावे हा भाव फार .... परंतु दादा-कडिल कल आम्हास जरूर दाखवावा लागतो."[1] बापूनें आपल्या कर्तृत्वानें माधवरावावर छाप ठेवली होती. परंतु बापू आपल्यास पूर्णपणें वश होणार नाहीं अशी शेवटपर्यंत माधवरावानें आपल्या मनाशीं खूणगांठ बांधून ठेवली होती. तसेंच माधवरावाची आपल्यावर 'अर्धी मर्जी' आहे हें बापूही ओळखून होते. राघोबाच्या

१ पे. द. ३९. ६१

पक्षाच्या मंडळीची बाजू होतां होईलतों उचलून धरण्याचा बापूचा प्रयत्न असे व राघोबासही बापू मजला बुडविणार नाहीं असा भरंवसा होता.

राघोबा व बापू ह्यांचे वरीलप्रकारचे संबंध असल्या कारणानें, बापूस राघोबाच्या स्वभावांतील खाचाखोंचा पूर्णपणें माहिती होत्या. " हुजूरची मर्जी कोण्या तऱ्हेनें नीट राहाते, कोण्या तऱ्हेनें बिघडते यास तुम्हींच माहितगार आहां, " असें आनंदीबाई बापूस एका पत्रांत लिहितें. राघोबाचा स्वभाव अतिशय चंचल व भोळा होता. दीर्घसूत्रीपणा त्याच्या गांवींही नव्हता. एकाच वेळीं मुत्सद्यापासून तो हलक्या दर्जाच्या शागिर्दापर्यंत सर्वांस तो विश्वासांत घेई; त्यामुळें त्याची मति वरचेवर पालटे. जी गोष्ट मोठमोठ्या मुत्सद्यांची, सरदारांची ऐकूं नये तीच गोष्ट केवळ हुजऱ्याचे सांगण्यावरून राघोबा करीत असे. आणि कांहीं कांहीं वेळेस स्वतःचाच दुराग्रह शेवटास नेई. यामुळें दादास सांभाळून घेऊन राज्यशकट हांकणें हें काम अत्यंत अवघड व नामुष्कीचें होऊन बसे. राघोबाची अवस्था सांबाच्या पिंडीवर बसलेल्या विंचवासारखी होती. त्याच्या विलक्षण स्वभावाचा परिणाम माधवराव, बापू, नानाफडणवीस, गोपिकाबाई वगैरेंना व राज्याला चांगलाच भोगावा लागला. माधवरावाचे मतानें 'त्यास दुःसंगाची बाधा होती. एरवी तीर्थरूप स्वच्छ अंतःकरणाचे स्फटिकवत्' परंतु त्रिंबकराव व गोविंद हरी त्यास ' सखारामबापूच्या शब्दानें चालणारा ' असें समजत.

नानासाहेब पेशव्यांच्या मृत्युनंतर राघोबाकडे 'समुद्रवलयांकित पृथ्वीचा' खराखुरा अधिकार आला; परंतु त्याची जबाबदारी संभाळण्याची अक्कल त्याजपाशीं नव्हती. बापूंच्या शब्दांत सांगावयाचे

म्हणजे, "रघुनाथरावाचा कारभार सुस्त, लटका व वोढा यांचे प्राक्तनाचा गुण ऐसा की जे प्रथमतः आसान काम असेल ते कठीणसे दिसून आयासे विलंब होते."[1] आणि खरोखरी हीच गोष्ट राघोबाच्या आयुष्यक्रमांत प्रामुख्यानें दिसून आली. एकंदरीनें राघोबासंबंधी कोणासच पूज्यभाव नव्हता. ज्यांचा कांहीं भाव होता तो हळूहळू पूज्यापर्यंत येऊन ठेपला होता. पुण्यांतल्या सर्व ब्राह्मणांनीं मिळून त्यास पत्र लिहिलें त्यांत त्यांच्या हातून घडलेल्या चुकांचा पाढा वाचून नंतर "तुम्ही महाराज भोळे. राजाई तुम्हांस कळेना. तीन पिढ्या दौलत मिळविली ती तुम्ही क्षयास नेली," वगैरे शब्दांनीं त्यांची पूजा केली तरी त्यास कांहींच वाटलें नाहीं. माधवरावासारख्या शहाण्या राज्यकर्त्यानें त्याच्याशीं फार ताणण्याइतकें नव्हे तरी बरेंच कडक व सावधपणाचें वर्तन ठेविलें होतें. त्यानें बापू आणि राघोबा यांना कारस्थानें करण्यास सवडच ठेविली नाहीं. परंतु तें धोरण नारायणरावाचे कारकीर्दींत सुटलें. नारायणरावानें अविचारानें राघोबास प्रतिबंधांत ठेवून त्यांचा छळ चालविला, बापूस कारभारावरून काढिलें. याचा परिणाम फारच वाईट झाला. राघोबाच्या चिथावणीवरून नारायणरावास राज्यावरून काढण्यासंबंधीं जो कट निर्माण झाला त्यास बापूनें संमति दिली व शेवट नारायणरावाच्या खुन झाला. परंतु यानंतर मात्र बापूस राघोबांबद्दल अत्यंत तिटकारा वाटूं लागला. नेहमीं राघोबाची कड घेणाऱ्या बापूनें त्याजविरुद्ध बारभाईचें कारस्थान उभारून त्यानें कितीही आर्जवें, विनंत्या केल्या तरी त्यास भीक न घालतां त्याचा पाठलाग करून सर्वस्वी पारिपत्य करण्याचें मनावर घेतलें, ह्या गोष्टीस बापूच्या चरित्रांत मोठेंच ऐतिहासिक महत्त्व आहे.

---

१ पे. द. ९; १६८–७०

अशा प्रकारानें राघोबास चोहोंकडून घेरले असतां किंवा सर्वांनीं हिडिस फिडिस केलें असतां तो आपणांस शरण येऊन आपण सांगू त्या अटी पाळून स्वस्थ बसेल व राज्यकारभार सुरळीत चालूं लागेल अशी बारभाईंची खात्री होती. परंतु राघोबाची शिंदेहोळकरादि स्वकीयांच्या सहाय्याची अपेक्षा फोल ठरल्यानंतर तो निराशेनें परकीय इंग्रजांच्या आश्रयास गेला आणि इंग्रजांचा पेशवाई आस्ते आस्ते आक्रमण करण्याचा बेत फारा दिवसांचा असल्यामुळें त्यांना अनायासें ही एक पर्वणीच चालून आली. अशा स्थितींत इंग्रजांकडे गेलेल्या राघोबाची हरतऱ्हेनें समजूत काढून त्यास परत आणणें हें राज्यकर्त्यांचें–राज्यहित पाहाणारांचें मुख्य कर्तव्य ठरतें. संभाजी मोंगलाकडे गेला असतां शिवाजीनें त्यास मोठ्या युक्तीप्रयुक्तीनें परत आणलें. बारभाईच्या उत्पादकांपैकीं सखारामबापू सारख्यांनीं विचारांतीं हीच भूमिका पत्करली असल्यास त्याजकडे फारसा दोष येणार नाहीं.[१] परिस्थितीप्रमाणें राजकीय धोरणांतही बदल करणें जरूर आहे ही गोष्ट कोणीही नाकबूल करणार नाहीं. अर्थात् राघोबाशीं मिळतें घेण्याच्या बापूच्या मनोवृत्तींत केवळ स्वार्थ होता. राज्यहिताची दृष्टि नव्हती असें वाटत नाहीं. परंतु राघोबाशीं संगनमत केल्याबद्दल बापूवर दुटप्पीपणाचा–राजद्रोहाचा आरोप टीकाकारांकडून (खुद्द नाना फडणवीसासारख्या माणसाकडून) केला जातो तो केवळ अट्टाहासानें होय. नानांच्या रोमरोमी राघोबाबद्दल द्वेष बाणल्यामुळें त्यांना दादाचा छळ करावयाचा होता. आनंदीबाईही एका पत्रांत कारभाऱ्याकडे जावें तर ते प्राण घेणार, अशा स्थितींत एक बाजू

१ सरदेसाई. Main Currents of Maratha History p.171 172.

घेतलेली तडीस न्यावी असे उद्गार काढते. राघोबाचा प्राण घेण्याचा विचार बापूच्या मनास शिवला नाहीं. शत्रूशीं सुद्धां तडजोडीच्या वृत्तीनें वागावयाचें सामान्यतः त्याचें धोरण असे.[1] राघोबाशीं तड-जोड होऊं शकत नाहीं असें पाहून आनंदीबाई बापूस लिहिते, "जन्मभर चांगले केले व म्हातारपणीं इंग्रजांच्या घरांत दौलत घातली हें अपेश तुम्हावर येईल.' म्हणजे आनंदीबाईसारख्या-सही राघोबानें इंग्रजांची मदत घेण्यांत दौलत बुडत चालली ही गोष्ट दिसत होती. ती गोष्ट सखारामबापूसारख्या मुत्सद्यास समजली नव्हती असें कसें म्हणावें ? मोरोबाच्या कारस्थानांत व त्यानंतर बापूनें ज्या हिकमती योजिल्या त्या केवळ नानासारख्या बेपर्वा, हट्टी माणसाचा नक्षा उतरवण्यासाठीं व राघोबाशीं तडजोड करण्यासाठीं योजिल्या. राघोबाला परत आणण्यांत इंग्रजांची मदत कोठच्या मर्यादेपर्यंत घ्यावयाची ही गोष्ट बापूसारख्या मुत्सद्यानें जाणली नव्हती असें नव्हे. तेव्हां सखारामबापूवर कोठल्याही तऱ्हेचा आरोप करण्यापूर्वीं तत्कालीन परिस्थिति, राजकारणांतील उच्चनीच कल्पना या ध्यानांत घेऊनच काय सिद्धांत मांडावयाचा तो मांडला पाहिजे.

**कांहीं आक्षेप**—सखारामबापू व राघोबा यांचें संबंध वर वर्णि-ल्याप्रमाणें असल्याकारणानें बापूचा राघोबाशीं पत्रव्यवहार होत असे. त्यामुळेंच त्याबद्दल पुष्कळांना संशयपिशाच्चानें झपाटलेलें होतें व त्याची परमावधि म्हणजे कांहीं कांहीं व्यक्तींनीं बापूकडे जाण्याचें सोडलें "सकारनामकाच्या घरीं जाऊं नये, जेवावयास बोला-विलें तरी जाऊं नये; बोलावयाचे ते तितक्यास तितके असावे....

१ सरदेसाई रियासत ५. १३९.

दरबारास सकाऱ्या नसेल त्यावेळीं जावें. "[१] साडेतीन शहाण्यां-तील दुसरे शहाणे दिवाकर पंडित यांच्या संबंधीं अशाच तऱ्हेचे उल्लेख सांपडतात.[२] या व्यक्तींनीं असें काय कोणाचे घोडें मारलें होतें? हा प्रश्न साहजिकच उभा राहतो. परंतु राजकारणांत या व्यक्तींनीं नानातऱ्हांनीं आपलें वर्चस्व कायम ठेवण्याचा प्रयत्न केला, म्हणूनच यांच्यावर एवढा गहजब करण्यांत येतो. वस्तुतः त्यांच्यावर फितु-रीचा राजद्रोहाचा, घरभेदेपणाचा, कौटिल्याचा आरोप करणारांनीं त्यावेळची राजकीय परिस्थिति, मुत्सद्यांचा व सरदारांचा रंगबदले-पणा, व व्यक्तीहितांचे बाबतींतील त्यांची व्यस्त प्रमाणांत वागणूक या सर्व गोष्टी ध्यानांत आणिल्या पाहिजेत. सांप्रतकाळच्या कल्प-नांच्या मापानें त्या काळच्या मुत्सद्यांची योग्यता मोजणें असमंजस ठरेल.

सखारामबापूंना राष्ट्रहितादि कल्पना नव्हत्या, त्यांचीं सारीं कृत्यें आपल्या पोळीवर तूप ओढण्याची होतीं, अशी टीका त्यांच्यावर करणारांना बापूच्या एका पत्रांतच उत्तर मिळतें. राघोबा व माध-वराव यांच्यांत वितुष्ट आलें असतां बापू लिहितात. "याजला वाटते की माझे लक्ष असेल तेच करावें........दादाचे माणूस दूर धरावे. ........याजकरतां खोटेपण करतो. हा पेच मोठा आहे. **तथापि चित्तांत विचारही करतो की हे गोष्टी करतां नासूं नये. दौलतेस अपाय आहे, असें चित्तांत येते.**[३] राघोबा व माधवराव यांचे संबंध ठीक नसतांना बापूस सावधगिरीनें वागावें लागले. नाहींतर भांडणांत त्यांचा निकाल लागावयास कांहीं उशीर नव्हता.

---

१ पु. द. ३. ले. ८३. २ पे. द. २०.१९४. ३ पे. द. ३९. ६१.

वरील आधारावरून बापूनें दौलतीचें हिताहित पाहिलें नाहीं असें म्हणणें चुकीचें ठरतें. दौलतीचें हित ओळखून व पेशवे, दादा तील भांडणतंटे लक्षांत घेऊन स्वपक्षाच्या हिताच्या दृष्टीनें डावपेच लढवावयाचें हें काम कांहीं सोपें नव्हे. यांत कांहीं वेळेस कांटा कमी अधिक प्रमाणांत एकीकडे झुकणारच! तेव्हां सखाराम-बापूनें केवळ व्यक्तिहितच पाहिलें, राष्ट्रकार्य केलें नाहीं हें म्हणणें कोणीही धुडकावून लावील. राजकारणांत थोडा फार दुटप्पीपणा राखावाच लागतो. परंतु त्यामुळें तो कांहीं फारसा दोष होत नसून गुणच समजला जातो.[1]

दुसरी गोष्ट म्हणजे परशुरामभाऊसारखा बापूची बारभाईच्या कारस्थानांतली कामगिरी पाहिलेला, समजूतदार व कर्तबगार मनुष्य जेव्हां बापूविरुद्ध "**कपि (बापू) तर केवळ राज्यासि किडाच ईश्वरें निर्माण केला**" असे उद्गार काढतो तेव्हां त्या विधानांत कांहीं बराच खोल अर्थ भरलेला असावा असें कित्येकांना वाटतें; आणि खरोखरच मोरोबाच्या कारस्थानापुरती बापूची एकंदर वर्तणूक पाहिली असतां असेंच वाटतें कीं बापूचे हे सर्व 'साठी बुद्धी नाठी' चे खेळ होते. सवाई माधवराव अल्प-वयी असल्यामुळें बापू मोरोबा व नाना यांचे असे खेळ चालूं शकले. यावेळीं दौलतीस अपाय होईल ही गोष्ट बापूस समजूनही उमजली नाहीं. नानांचा पाडाव करण्याच्या व्यक्त्यभिनिवेशाच्या भरांत आपण काय करीत आहोंत याचें त्यांना भान राहिलें नाहीं. या वेळचें त्यांचें कार्य जनतारूपी जमीनिस सुपीक व कसदार करण्यापेक्षां

1 " Art thou a Statesman
And canst be hypocrite!" Dryden.

ओसाड, निःसत्त्व व नापीक करण्यांत झालें. राघोबाला बोलावण्यांतहीं बापूंची कमालीची धरसोड दिसून आली. इंग्रजांची मदत त्यांना शिरजोर होऊ न देतां घ्यावयाची, राघोबावर दया करून त्यास वडीलकीचा मान द्यावयाचा, नाना व तत्पक्षीयांचा उच्छेद करावयाचा, स्वतःचें कारभारीपद कायम ठेवून सर्व सूत्रें आपल्या तंत्रानें चालवावीत, अशा प्रकारची एक अत्यंत क्लिष्ट पण आखुडशिंगी, बहुदुधी अशी मसलत रचण्याचे कामीं बापूंचीं पुष्कळशीं धोरणें फसलीं आणि त्यामुळें चोहोंकडे बजबजपुरी माजून राजकारणाचा विचका झाला. यास्तव बापूनें हें कारस्थान उभारलें नसतें तर एवढ्या थरास गोष्टी आल्या नसत्या, असें म्हणावें लागतें. आणि या परिस्थितीपुरताच म्हणजे मोरोबाच्या कारस्थानाच्या परिस्थितिपुरताच विचार केल्यास परशुरामभाऊ पटवर्धनांच्या जहरी टीकेस थोडीबहुत पुष्टीच मिळेल अशींच बापूंचीं कृत्यें दिसतात. मात्र या टीकेचा संबंध बापूच्या गतकारकीर्दीशी जोडतां कामा नये; ती चूक होईल. परंतु बापूच्या विरुद्ध पक्षानें त्यांच्या पुढील विग्राहक कारकीर्दीच्या काळेपणाची छाया त्यांच्या मागील वर्तनावर बळेंच ओढण्याचा प्रयत्न केला आहे तो अश्लाघ्य आहे. प्रत्येक व्यक्तीच्या हातून सर्व प्रसंगीं उपयुक्त कामगिरी घडून येते असें नाहीं. पुष्कळ वेळीं अपेक्षेपेक्षां निराळ्या गोष्टी घडून माघार घ्यावी लागल्यामुळें, राजकीय वातावरणांत विषण्ण परिस्थितीचे काळेकुट्ट ढग जमून अंधःकार होतो. परंतु असें झालें तरी त्यामुळें एखाद्या व्यक्तीच्या पूर्व कर्तबगारीस बाध येऊं शकत नाहीं.

बापूनें शपथा, प्रतिज्ञा कःपदार्थ समजून झुगारून दिल्या असें सांगण्यांत येतें. परंतु राजकारणांत शपथा, प्रतिज्ञा यांना कामा-

पुरतें, ठराविक मर्यादेपर्यंतच महत्त्व द्यावयाचें असतें. बापूनें बारभाई-च्या वेळीं शपथ घेतली ती मोडून राघोबाशीं संगनमत केलें असा आरोप करण्यांत येतो. परंतु नाना फडणवीसांचीही नानासाहेबांच्या वंशाखेरीज इतरांना नमस्कार करावयाचा नाहीं ही प्रतिज्ञा त्यांनीं दुसऱ्या बाजीरावास आपण होऊन गादीवर बसविलें त्यावेळीं मोडलीच कीं नाहीं? स्वत्व राखण्यासाठीं परकीयांशीं—जो मदत देईल त्याशीं—कारस्थानें करणें हा नित्याचाच नियम त्यावेळीं होऊन बसला होता. म्हणजे व्यक्तिहित व स्वोत्कर्ष हीं साध्यें बनलीं व राज्यहित व राज्योत्कर्ष हीं साधनें झालीं व 'खालीं डोकें वर पाय'-असा उफराटा प्रकार होऊन एकप्रकारचा तमाशाच चालू झाला. इंग्रज व हैदर यांच्यांशीं फितूर केल्याबद्दल बापूस ज्या नानानें प्रतिबंधांत ठेवलें त्याच नानानें इंग्रजांची मदत महाडचें कारस्थान करून घेतली कीं नाहीं? अशी एक ना दोन उदाहरणें तत्कालीन अवनत परिस्थितीची, त्या काळच्या मुत्सद्यांच्या राजकीय नीतिभ्रष्टेतची म्हणून देतां येतील. अपवाद थोडे. सारांश '**खऱ्या मुत्सद्दीपणास उत्तम राजकीय नीतीमत्तेची जोड अवश्य पाहिजे**' या राजकीय तत्त्वाचें ज्ञान त्यावेळच्या मुत्सद्यांस नव्हते. त्यांची नजर 'वाऱ्यास पाठ देण्यापुरतीच;' चालू काळापुढें जात नसे. अशा स्थितींत त्यांचें जीवनकार्य त्यांच्या हयातींत जरी भपकेदार दिसलें तरी त्यांच्या मागें तें तेज मंद पडून कालगतीनें त्याजवर काळिमा चढला. बापू, दिवाकर पंडीत, नानाफडणवीस या सारखी अत्यंत कर्तीसवर्ती माणसें "जिवंतपणीं स्वदेशाभिमानी पण मरतेसमयीं राजद्रोही"[1] अशा स्वरूपांत गणली गेली, हा कालाचा महिमा होय.

---

[1] They lived as Patriots and died as Traitors.

**सखारामबापू, मॉस्टिन, हेस्टिंग्स इत्यादि**:—बाळाजी बाजीराव पेशव्यांच्या कारकीर्दींत इंग्रजांनीं मराठ्यांस मिळून आंग्र्यांची नाविक सत्ता नष्ट केली तरी मराठ्यांबद्दल इंग्रज नेहमीं साशंक असत. जंजिऱ्याच्या शिद्दीची सत्ता निर्मूलन करण्यासाठीं पेशव्यांनीं मागितलेली मदत इंग्रजांनीं नाकारली. तेव्हां पेशव्यांनीं इ. स. १७५८—५९ मध्यें फ्रेंचाची मदत घेऊन मुंबई व जंजिरा हीं दोन्ही ठिकाणें घेण्याचा आपला उद्देश जाहीर केला. तेव्हां त्यामुळें गडबडून इंग्रजांनीं मेजर प्राइस नांवाचा वकील पेशव्यांकडे पाठविला. परंतु पेशव्यांनीं किरकोळ व्यापारी सवलती देण्यापलीकडे इंग्रजांच्या कांहींच मागण्या कबूल केल्या नाहींत. पुढें थोरल्या माधवरावानें पुनः आपली सत्ता चोहोंकडें प्रस्थापित करतांच इंग्रजांना त्याचें भय वाटूं लागलें. म्हणून इंग्रजांनीं **थॉमस मॉस्टीन** नांवाचा वकील पुनः दोन्ही सरकारामध्यें व्यापारी तहनामा घडवून आणण्यासाठीं पाठविला. मॉस्टीननें पुण्यास आल्यानंतर रामाजी महादेव व गोविंद शिवराम यांचे मार्फत मुख्य कारभारी सखारामबापू यांची गांठ घेण्याचा प्रयत्न केला. तो लिहितो "सखाराबापू हे राज्यांतील प्रमुख वजनदार मुत्सद्दी असून माधवराव पेशवे महत्वाच्या कामांत त्यांची सल्लामसलत वरचेवर घेतात असें समजल्यावरून त्यांची भेट घेण्याचा मी प्रयत्न केला. भेटीचा योग आतां जरी जमला नाहीं तरी त्याकरतां कांहीं दिवस थांबावयाची तयारी दर्शविली." मॉस्टीनास १३ डिसेंबर १७६७ रोजीं सखारामबापूकडून कळविण्यांत आलें कीं उत्सवप्रसंगामुळें दोनतीन दिवस भेट होऊन शकणार नाहीं. पुढें सवडीनुसार पाहूं. अखेर ता. १७ डिसेंबर १७६७ रोजीं संध्याकाळीं ७॥ वाजतां बापूंनीं त्याची गांठ घेतली. त्यावेळीं मॉस्टीननें

गोविंद शिवराम यांच्या सांगण्यावरून बापूंना थोडा नजराणा व कांहीं वस्तु भेटीदाखल दिल्या. किरकोळ औपचारिक संभाषण झाल्यावर पेशव्यांची भेट करवून देण्याबद्दल मॉस्टीननें बोलणें काढिलें. राजकारणावर बोलतांना त्यानें इंग्रजांचा व मराठ्यांचा अखंड स्नेह रहावा अशी मनीषा प्रगट केली व असें भासविलें कीं "त्यांत मराठ्यांचा फायदा आहे. कारण या दोस्तीच्या जोरावर त्यांना दिल्लींत पुनः वर्चस्व स्थापितां येऊन जाट व अबदाली याना हांकून लावितां येईल." बापूनें मॉस्टिनचें सर्व म्हणणें शांतपणें ऐकून घेऊन एक दोन दिवसांनी पेशव्यांची भेट करवून देण्याचें त्याला आश्वासन दिलें. त्याबरहुकूम ता. १९ डिसेंबर रोजीं माधवराव पेशव्यानें मॉस्टिनची दरबारांत भेट घेतली व मॉस्टिननेंही पेशवे, सखारामबापू, गोविंद शिवराम, नाना-फडणवीस, रामाजी चिटणीस वगैरे मंडळींना वस्त्रें, नजराणे दिले. भेटींत माधवरावानें मॉस्टिनची कोणतीच मागणी कबूल केली नाहीं. फक्त इंग्रजांचा एक प्रतिनिधी पुण्यास राहाण्याबद्दल सरकारची कांहींच हरकत नसल्याचें सांगितलें. परंतु हें घोंगडें तसेंच भिजत पडलें होतें. त्यानंतर ५ वर्षांनीं म्हणजे २९ सप्टेंबर १७७२ रोजीं मि० मॉस्टिन यांस मुंबईच्या गव्हर्नरनें पुणें दरबारीं इंग्रज वकीला-तीच्या कामावर पाठविलें. त्यास दिलेल्या हुकुमांत असें म्हटलें होतें कीं, कंपनीच्या बंगाल व कर्नाटक प्रांतांसंबंधीं मराठ्यांचें काय धोरण आहे हें समजून घेऊन त्यासंबंधीं ताबडतोब बातमी येथें कळ-वावी व येथून जसा हुकूम मिळेल त्याप्रमाणें वागावें................ (तो मिळेतो पर्यंत अक्कलहुशारीनें कोणतेंही धोरण स्वीकारण्यास त्यास परवानगी होतीच.)

मॉस्टिन यांस राहाण्यासाठीं गोविंद शिवरामाच्या बागेंत जागा देण्यांत येऊन त्यासंबंधीं सर्व व्यवस्था रामाजी चिटणीसाकडे देण्यांत आली. यावेळीं ( ७ आक्टोबर १७७२ ) नारायणराव व सखारामबापू हे माधवराव पेशव्यांची प्रकृति बिघडल्यामुळें थेऊरास गेले असल्याकारणानें मॉस्टिनची सर्व सोय लागली नाहीं. तरी दुसरें दिवशीं त्या बागेंत ( हल्लींची गणेशखिंड ) मॉस्टिनची बहुतेक सर्व व्यवस्था रामाजी चिटणीसानें करून दिली. ता. १८ आक्टोबर रोजीं नारायणरावांनीं मॉस्टिनास भोजनास आमंत्रण दिले. मॉस्टिननें त्यावेळीं नारायणरावाकडे माधवराव पेशव्यास भेटीकरतां आणलेल्या वस्तु नजर केल्या. [1] भेटींत कंपनीच्या खलित्याचें उत्तर दिवाण सखारामबापू कांहीं दिवसांनीं देतील,कारण नुकत्याच त्यांच्या एका नातेवाईकाचा मृत्यु घडून आल्यामुळें ते घरीं गेले आहेत, असें नारायणरावानें मॉस्टीनास कळविलें. पुढें ता. १९ रोजीं मॉस्टीनास सखारामबापूंनीं भेटण्याबद्दल लिहिलें. मॉस्टीन म्हणतो, "सखारामबापूंनीं मजला भेटून जाण्याविषयीं विनंति केली. मी जाऊन भेटलों. भेटींमध्यें बापूनें पेशव्यांचा इंग्रजांशीं स्नेहसंबध राहावा याबद्दल अनुमति दर्शविली व स्नेहाच्या कल्पनेबद्दल समाधान व्यक्त केलें.आपला वकील पुणें दरबारीं ठेवून घेण्यास कांहीं आडकाठी नाहीं. कंपनी सरकारच्या खलित्यास मात्र माधवरावांचा सल्ला घेतल्याशिवाय उत्तर देतां येणार नाहीं असें ते (बापू) बोलले." मॉस्टीननें या नंतर नानाफडणवीसाची गांठ घेऊन पुन्हा हाच खलित्याचा प्रश्न उपस्थित केला परंतु त्यासही तेंच उत्तर मिळालें.

माधवरावाच्या मृत्यूनंतर नारायणरावाचा खून होईतोंपर्यंत

१ सोन्याची तरवार १ व ११६१७ रु.चे इतर किरकोळ जिन्नस.

मॉस्टीन पुण्यासच होता, व तेथल्या सर्व हालचालींची बित्तंबातमी तो मुंबईस कळवीत असे. या अवधींत त्यानें कंपनीला बऱ्याच सवलती मिळविण्याचा प्रयत्न केला; परंतु बापूंनीं त्याची डाळ शिजूं दिली नाहीं. " सखारामबापू हे कंपनीसरकारचे कट्टे दुष्मन आहेत व नाना फडणवीस हे अत्यंत कर्तृत्ववान् गृहस्थ आहेत" असें मॉस्टीननें एका पत्रांत मुंबईच्या गव्हर्नरास कळविलें. यावरून या दोघांसंबंधी इंग्रजांची काय कल्पना झाली होती हें कळून येतें. नारायणरावाच्या खुनानंतर बारभाईचें कारस्थान उभारलें गेलें, त्या संबंधीं इत्थंभूत माहिती मॉस्टीन मुंबईस कळवीत असे व संधि पाहून त्यानें साष्टीचा किल्ला घेण्यास मुंबई सरकारास भर दिली व राघोबास हाताशीं धरलें. भेदनीतीचा यथास्थित उपयोग करून मॉस्टीननें मराठ्यांत भांडणें लावून इंग्रजांचें पिलू मराठी राज्यांत शिरकविण्याची कामगिरी चांगल्या प्रकारें केली यांत शंका नाहीं. सखारामबापू, विसाजी केशव, नाना फडणवीस यांसारख्या माणसांस त्याची कारस्थानें कळत नव्हती असें नाहीं. परंतु परिस्थितीपुढें ते कांहीं एक करूं शकले नाहींत.

बापूच्या शहाणपणाची, मुत्सद्देगिरीची कीर्ति कलकत्त्यास हेस्टिंग्सच्या कानापर्यंत गेलेली होती. बापूस पाठविलेल्या पत्रांतून हेस्टिंग्सनें त्याचा गौरव केलेला आढळतो. [१] परंतु या वेळेपासूनच हिंदुस्थानचें राजकारण इंग्रजांच्या ताब्यांत गेलें व ते म्हणतील तें धोरण व बांधतील तें तोरण ' अशी परिस्थिति निर्माण झाल्यामुळें त्याच्या-

1 Mostyn's Despatches.

१ "I have heard of you wisdom and capacity from everywhere and therfore trust in you person." फॉरेस्ट२४६

पुढें बापूनानांसारख्या मुत्सद्यांचा इलाज चालेनासा झाला. हिकमती हेस्टिंग्सनें अखेर अखिल हिंदुस्थानांत इंग्रजांची सत्ता मराठ्यांशीं तुल्यबल करून ठेविली; इतकेंच नव्हे तर स्वतःकडे राजकारणाचा हुकमी डाव घेतला.

**सखारामबापू, पटवर्धन व प्रतिनिधी वगैरे:**— सखारामबापूंचे व पटवर्धनांचे संबंध कशाप्रकारचे होते या संबंधीं भरपूर माहिती मागील प्रकरणांतून आलेलीच आहे. आतां प्रतिनिधींचे व बापूचे संबंध पाहातां त्यांच्या बाबतींत सखारामबापूनें पुष्कळसा अन्याय केला असें दिसून येतें. घोडनदीनंतर बापूच्या सल्यावरून प्रतिनिधींची तीन पिढ्यांची दौलत राघोबानें जप्त केली. यामुळें त्यावेळचे प्रतिनिधी भवानराव व त्यांचे मुतालिक गमाजी यमाजी हे अतिशय चिडून मोगलाकडे गेले. परंतु राक्षसभुवनानंतर इ. स. १७६५ मध्यें सखारामबापूनें भवानरावास प्रतिनिधीपद पेशव्यांकडून देवविले. परंतु याच वेळीं त्यांचे बंधु भगवंतराव यांनीं आपला हक्क सांगण्यास सुरवात केल्यामुळें पुनः ही गोष्ट अर्धवटच राहिली. त्यांतल्या त्यांत भगवंतरावांचा मुतालिक हणमंतराव गुळवणी हा बापूचा स्नेही ( तदनंतर आप्तापैकीं ) असल्यामुळें भगवंतरावाची बाजू बापूनीं अनेक सबबीवर उचलून धरली. अखेर माधवराव पेशव्यानेंही प्रतिनिधीपद भगवंतरावास दिलें. तेव्हां तेजस्वी व पाणिदार भवानरावानें या अन्यायामुळें खवळून बंड केलें व सातारप्रांतीं धुमाकूळ मांडला. तेव्हां त्यांच्या पारिपत्यासाठीं बापूंनीं रामचंद्र गणेशास पाठविलें. रामचंद्रपतानें भवानरावापासून एकूण एक ठाणीं परत घेतलीं; पण भवानराव पेशव्यास शरण गेल्यामुळें त्यास ५ लक्षांचा सरंजाम मिळाला. परंतु प्रतिनिधीपद व विटे, खानापूर

वगैरे भगवंतरावकडेच राहिले. अशा प्रकारें दोन्हेही बंधु असंतुष्ट राहिले.

पुढें बारभाईच्या कारस्थानांत भवानराव बारभाईकडे मिळाला व बापूनींही पूर्व वैर विसरून भवानरावाची मर्जी राखिली. ता. ३ आगष्ट १७७४ रोजी भवानरावास प्रतिनिधीपद बापूंनीं बहाल केले. [१] परंतु भगवंतरावाकडेही थोडा सरंजाम ठेविला. अशा रीतीनें भवानराव डोईजड होऊ नये अशी व्यवस्था केली. परंतु याचा परिणाम असा झाला कीं संधि मिळतांच भगवंतरावांनीं बंड केलें व मुलुखाचा उच्छेद मांडला. पुढें भगवंतराव ५-४-१७७६ व भवानराव ३०-८-१७७७ रोजीं वारले व ही यादवी तात्पुरती तरी बंद झाली. बापूनें अशा प्रकारें प्रतिनिधी घराण्यांत नारदाची कळ लावून कोणांसही चैन पडूं दिलें नाहीं.

**राज्यकारभार** —कारभाराचे बाबतींत नानापेक्षां बापूची कर्तबगारी व धडाडी ही अधिक होती, परंतु नानाप्रमाणें बापूचा स्वभाव करारी नव्हता. राजकीय कामकाजांत होतां होईलतों 'वारा येईल तशी पाठ देण्याचें त्यांचें धोरण असें' अशा अर्थाचें विधान ग्रँटडफनें बापूबद्दल केलेलें आहे. [२] कारभार करीत असतांना बापूनें उत्तम बुद्धिचातुर्य व कर्तृत्व प्रगट केलें याबद्दल शंका नाहीं. कारभार उरकीत असतां पुष्कळदां अनेक तक्रारींची, दाद लावण्याचें काम मोठें जोखिमीचें व जिकीरीचें असतें. अनुकूल प्रतिकूल

१ प्रतिनिधी घराण्याचा इतिहास भाग २ पृ. ४४२.

२ Duff 'A time serving courtier ready to change sides at any moment.' "Bapu, always a political Trimmer"–Cambridge History of India V. 262

विचारसरणीमुळें पुष्कळ लोक मित्र किंवा शत्रु बनतात. बापूंनीं पुष्कळांचें शत्रुत्व संपादन केलें त्यामुळें त्यांच्या कारभारांत हृदयशून्यता (Want of Scruples of Conscience) व विवेकभ्रष्टता होती असा आरोप त्याजवरती करण्यांत येतो; त्यांत कांहींच तथ्य नाहीं हें त्यांचें सर्व चरित्र वाचून पहाणारांस दिसून येईल.

पेशवाईंत मोठमोठे अधिकारी, सरदार-जहागीरदारांचें काम करीत असतां नजराणे, बक्षीसें घेत असत. त्यांना हल्लींच्या भाषेंत 'लांच' म्हणतां येणार नाहीं. तो प्रकार त्यावेळीं सार्वत्रिक होता. निरनिराळीं कामें केल्याबद्दल मुराराव घोरपडे, रघूजी आंग्रे वगैरेंनीं बापूस उत्पन्नें लावून दिलेलीं होतीं. तसेच मोठमोठ्या सरदारांचे फडणवीस, कारभारी वगैरे नेमण्याचे बरेच हक्क किंवा दरखही बापूस मिळालेले होते व ते देतांना बापूस पुष्कळ रकमा नजर म्हणून मिळत.[1] अशाप्रकारें कारभार चालवीत असतां नानाप्रमाणेंच बापूनें बरीच संपत्ति मिळविली होती. बापूंचा स्वभाव नानाप्रमाणें कडक नसल्यामुळें पुष्कळशी मंडळी त्यांच्या कारभारावर संतुष्ट असत. मोहिमांत व शांततेच्या काळांत उत्तम कारभारी म्हणून बापूचा लौकिक होता.

**स्वभावचित्र** —सामान्य लोकांशीं वागतांना बापू परोपकारी, दयाळू व धार्मिक वृत्तीचें होते. सर्वांशीं गोड बोलून, तडजोडीच्या वृत्तीनें वागून आपलें काम हलक्या हातानें हातोहात साधण्याची खुबी जशी त्यांना साधली होती तशी पेशवाईंतील कोणाही मुत्सद्यांस साधली नाहीं. शत्रूंची खुमखुमी जिरवून पुन्हां त्यांच्याशीं सामोपचारानें वागण्यास तयार. पटवर्धनासारख्या हाडवैऱ्याबरोबरही

१ 'परिशिष्ट' पहा.

समेट करून खांद्यास खांदा भिडवून कामकाज करावयाचें. सर्व कामांत कमालीची सावधगिरी असावयाची. शत्रूस बोलण्यांत किंवा लिहिण्यांत कसलाच थांगपत्ता लागावयाचा नाहीं; परंतु मित्रासही अंगीकृत कार्य कळावयाचें नाहीं. सर्व मसलतींत अत्यंत खोलपणा, गुप्तपणा ठेवावयाचा. 'आधी केले मग सांगितले' असेंच धोरण असावयाचें. पण कोणासही तोडावयाचें नाहीं. सर्व लोक राजी राखावयाचे. स्वीकृत कार्यांत धडाडी तर विलक्षणच. त्यांत पराकाष्ठेची मेहनत, त्रास पडला तरी कसलीही फिकीर नाहीं. बारभाईचें कारस्थान उभारल्यानंतर एकुलत्या एक मुलाचा मृत्यू घडून आला तरी अवसान सोडले नाहीं. जैसी मसलत आरंभिली तैसी सिद्धीस नेली. एखादा मनसबा भारी पडला, माघार घ्यावी लागली तरी डोकें शांत ठेवून उत्पन्न झालल्या बिकट परिस्थितींतून अशा खुबीनें मार्ग काढावयाचा कीं प्रतिस्पर्ध्याची अक्कल गुंग व्हावी व त्यानें यांच्या पुढें साष्टांग नमस्कार घालावा. चोहोंकडे संदर्भ लावून ठेवावयाचा आणि आपणास जेथें परिस्थितीची अनुकूलता दिसेल तेथले मोहरें इरेस घालावयाचें. कर्तबगारीबद्दल कोणाचेंच दुमत नाहीं. 'तुम्ही कालचक्रासही फिरवाल' अशीच पुष्कळांची खात्री त्यामुळेंच माधवराव, नानासाहेब या सारख्यांना वाटे कीं हा आपल्या लगामीं असावा.

स्वदेशाभिमान होताच परंतु स्वाभिमान सोडण्याची बिलकूल तयारी नव्हती. त्यांच्या स्वाभिमानास ज्यानें धक्का लाविला तो आज ना उद्यां रसातळास गेला हें नक्की समजावें. त्याकरतां नाना हिकमती लढवितील, सर्वस्व भरीस घालतील. कारण पारिपत्याशिवाय धास्त पडत नाहीं हीं ठाम समजूत. प्रतिस्पर्ध्यांना नमविण्याची

बुद्धि फार. यामुळें सर्व आयुष्यभर अहमहमिकेची शर्यत खेळावी लागली. त्यांत पुष्कळांचीं नाकें ठेचलीं; परंतु शेवटीं म्हातारपणामुळें हात चालेनासा झाल्यावर शस्त्रसंन्यास करणें भाग पडलें आणि तेंहीं केवळ प्रतिकूल परिस्थितीमुळें दुसऱ्याकडून करविलें गेलें. पण त्याबद्दल वाईटही वाटलें नाहीं. एका श्रेष्ठ कवीच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे " Farewell, a long farewell to all my greatness, This is the state of man. " या उद्गारांत शेवटीं जगाचा कायमचा निरोप घेतला.

**बापूच्या जीवनकार्याचें सारः**—अठराव्या शतकाच्या अखेरीस मराठेशाहीचें राजयंत्र बिघडून विस्कळीत झाल्यामुळें कोणाचाच पायपोस कोणाच्या पायांत राहिला नाहीं. ' आपुले ते प्राण घेती । तेथें परावे राक्षिती।' अशी स्थिती निर्माण झाली. नव्या प्रागतिक कालानुक्रमें इष्ट अशी नवी रचना राज्ययंत्रांत बापू, नाना सारख्या मुत्सद्यांस करतां आली नाहीं. तिकडे त्यांनीं जाणून बुजून दुर्लक्ष केलें. महादजीसारखे राजकार्यधुरंधर, कुशल असे मुत्सद्दी सेनानायक गत झाले. " उरलेल्यांच्यांत संघशक्ती नाहीशी झाली. व्यक्ति बळानें तिची जागा व्यापणें अशक्य झालें. तेव्हां हा राज्याचा डोलारा कोलमडून पडला." न्या. रानडे यांनीं आपल्या पुस्तकांत सांगितलेल्या या ऐतिहासिक तत्त्वाचा बापूच्या चरित्राच्या द्वारें पुरस्कार आम्हीं केला आहे. तो वाचकांनीं समजून त्यापासून योग्य तो धडा घ्यावा एवढीच विनंति आहे.

ॐ तत्सत्ब्रह्मार्पणमस्तु

# परिशिष्ट

## फौजेकडील सरंजाम [1]निसबत

## सखाराम भगवंत ( १७६४ ).

| रु | आ. | पै | गांवाचें-जिल्ह्यांचें नांव |
|---|---|---|---|
| ६३७४९३ | ११ | ४ | पाचोरा महाल |
| २५१०४९ | ८ | ० | सत्रागांव |
| २०९५० | १५ | ९ | बारडोली |
| १०६७८८ | ७ | ० | फूट गांव |
| ५४४२९३ | ८ | ० | एरंडोल |
| १२१६८२ | ७ | ६ | सेंदुर्णी |
| ११६५८० | ६ | ३ | नेर |
| २३०२१ | ४ | ६ | चोपला |
| १३४१४१ | १ | ० | सेवगांव |
| ६२०६५ | १५ | ० | बेलापूर |
| ५५०० | ० | ० | देहजी शिलेदार (?) |
| २०२३३६७ | ४ | ६ | |
| ५७३२६ | ० | ३ | अंतस्थ यादी |
| रुं. २०८०६९३ | ५ | ० | एकूण |

पे. द. १२३८९.

१ बापूनें आपल्या सरंजामी उत्पन्नापैकी कांहीं वेळेस चौथाई व कांहीं प्रसंगीं सबंध उत्पन्न पेशवे सरकारच्या अडचणीच्या वेळीं त्यांच्या स्वाधीन केलें होतें.

# APPENDIX.

## HASTING'S LETTER TO SAKHARAM BAPU.

Subject:—To Stop All Hostilities.

**To Sakharm Pandit:**—" Understanding that the chief administration of the Maratha state is in your hands, I have judged it expedient to address you upon the subjeet of the transactions which have lately passed between your Government and that of the English company at Bombay. I am informed by letters from the Governor & his Council that they have entered an offensive alliance to the Peshwaship of the Maratha Empire. As this is contrary to the orders of the Company which expressly enjoin the strictest forbearance of every act which may lead their servants to become the aggressors in any wars or disputes with the powers in India, and to the Commands of the king of Great Britain, my master, by which the other Governments and settlements of the Company are prohibited from forming treaties and engaging in hostilites without the previous Concurrence of the Governor General and Council of Bengal, orders have therefore been sent from myself and the Council aforesaid to the Governor and the Council of Bombay to withdraw the forces which they have detached to the assistance of Raghoba, and to desist from all further acts of hostilities with any party of the Maratha nation unless in cases in which they shall be compelled to it in their own defence. And it is my intention to depute

a proper and trustworthy person to Poona, which being the seat of the Maratha Empire, is also contiguous to Bombay, to treat with you concerning the points of difference subsisting between the Government of Poona and that of Bombay and to establish the conditions of future peace and lasting friendship between both."

" I shall wait for your answer to this letter before I give the Deputy his despatches, that I may be first assured it will be agreeable to you to receive him and in the meantime I hope you will give orders for the cessation of all hostilities on your part with the forces of the English Company that no impediment may remain to the proposed pacification."

"I have written this solely with a view to the restoration of peace & friendship with your nation and the preservation of good order and consistency in the affairs of the English Company who are the subject to my charge. **From the report which has been universally made to me of your wisdom & Capacity I have the greatest reliance on your disposition to second with heartiness of my endeavours** that neither you nor I may be to blame if the event should not prove answerable to them."

**—Warren Hastings.**

## परिशिष्ट

निरनिराळ्या सरदार–जागीरदारांकडे बापूंचे दरख असत त्यांची यादी: ( इ. स. १७७५ )

| नांव | पगार | रसद | हक्क |
|---|---|---|---|
| | रु. | रु. | रु. |
| १ काशी रामचंद्र | २५० | ४००० | ३००० |
| १ राघो धोंडदेव | ३०० | १५०० | १५०० |
| | ५५० | ५५०० | ४५०० |
| १ धोंडो मुजुमदार डभई | १००० | ३००० | १००० |
| इनाम कारकुनी | | | |
| ३०० ३०० | | | |
| १ आनंदराव होनाजी फडणीस | ४५० | ५०० | ८५० |
| १ हरि गोविंद ( विजयदुर्ग ) | १०० | ० | १०० |
| १ महादाजी वामन ( बेलापूर ) | १०० | ० | १०० |
| १ त्रिंबक मुजुमदार | १००० | ६००० | १००० |
| पगार कारकुनी | | | |
| रु. ३८३ ६१७ | | | |
| १ वेंकाजी अनंत दिवाण ( नेवासें ) | ८०० | ५००० | ८०० |
| १ गोविंद बाजी मुजुमदार | ३०० | ४००० | ३०० |
| १ नारो बाबूराव मुजुमदार | ३५० | ४००० | ३५० |
| १ पंताजी नारायण फडणवीस ( वडूज ) | ३५० | १००० | ३५० |
| १ मुजुमदार ( सूतोडा ) | ४५० | —— | ४५० |
| ग्वाल्हेर | १००० | —— | १००० |
| विठ्ठल शिवदेव ( दिवाणपद ) | २००० | —— | २००० |
| धोंडो दत्तात्रय ( ,, ) | २००० | —— | २००० |
| | ९९०० | २३५०० | १०३०० |

म. म. द. वा. पोतदार,
ग्रंथ संग्रह

## परिशिष्ट

बापूंची पत्नी काशीबाई व जिऊबाई आणि सून गोदूबाई यांच्यांमध्यें केलेलें वांटप. ( रु. ८००० )[१]

| जिऊबाई | | गोदूबाई | |
|---|---|---|---|
| रु. आ. पै. | | रु. आ. पै. | |
| १६६–९–० | हिवरें | १६६–९–० | हिवरें |
| २००–०–० | कांबरें | २००–०–० | कांबरें |
| ३१–८–० | कोढीत (जमीनी) | ४५–०–० | सासवड (जमीनी) |
| २२–८–० | पिंपळें | १५–०–० | मैनवाडी (जमीनी) |
| १०००–०–० | चांबली | १८–०–० | सोनेरी (जमीनी) |
| १०१३–८–० | खानवाडी नांदूर | १०००–०–० | चांबली |
| ११२५–०–० | सुपें | ३१९–०–० | बोपगांव |
| ३९४२—६–० | | ३८३–५–० | घिवरी |
| | | ६१५–०–० | चौधई |
| | | १२६९-१२-० | सुपें |
| | | ४०५७-१०-० | |

१ छ २२ रबिलाखर १७८४ इ. स.

# सखारामबापूंचीं दोन अप्रकाशित पत्रें.[1]

( १ ) कार्तिक शु॥ ९, १७०० २९ आक्टोबर १७७८

राजश्री लक्ष्मणपंत स्वामीचे सेवेसी......

विनंति उपरी जफरुद्दौला बहादूर यांचा मजकूर तुम्ही दोनतीन वेळां लिहिला त्यास बहादर उमदे सरदार हरयेक कार्यकर्ते व हजरत बंदगानअली यासी इकडील मधेस्त असे जाणून त्यासी पक्का स्नेह जाला त्याप्रमाणें चालत आहे. इकडून दुसरा अर्थ चित्तांत रतिमात्र नाहीं. येक मामलतीचा जाबसाल आहे तो बहादरांनीं फडच्या करून द्यावा मामलतीसी व स्नेहासी व राजकारणासी निसबतही नाहीं हिसेबी काम सर्वांस लागले वास ( ? ) व दोस्तींस तफावत स्नेह व दोस्ती जे......कुराण होऊन राजश्री जिवाजी रघुनाथ यांचे मारफतीने जाली ते इकडून पकी दुसरा भावच नाही प्रथम जिवाजीपंत बाहदराकडे निर्मळेस गेले ते समयी मामलतीचा ऐवज ठरेल त्यांत येक लाख साठ हजार रु॥ रयात करून सूट द्यावी यैसे मााानिले यांणी लिहिलें तेव्हां बहादर मातबर सरदार विशये थोडा जाणून येक लाख साठ हजार सूट मंजूर केली. पुढें निर्मळची चौथ सरदेशमुखी माफ करावी यैसे निघाली आणि येविशी हाजरत बंदगानअलीचे इनायेत नामे आले कीं बाहदराची खातर जरूर निर्मळ स्वराज्याबाबत आठरा हजारांचे आम्ही जामदारखान्यापैकीं दरसाल देत जाऊ यैसे इनायेतनामे आले की बाहदराची व जिवाजी रघुनाथ याणीहि लिहिले तेव्हां बाहदराचे अगत्य त्यांत नबवानीं लिहिले कायेम मजकूर यैसे जाणून निर्मळच स्वराज्याचे माफीचे सनद दिल्ही ते फिरऊन पुन्हां जिवाजीपंत याणी लिहिलें कीं निर्मळ पंचमहाल स्वराज्य सरदेशमुखी सुधा कुल आलतमगा पुस्तदर पुस्त इनाम करून देऊन इनामपत्रे द्यावी ते समई संकट पडले कीं हे काय ! स्वराज्याचा तनखा हिसेबी पाहतां नवदि हाजाराचा होऊ लागला त्यांत इनाम तेव्हां हैदरखान याची मसलत दरपेश मामलतीचे फडचे मधील होतात स्नेहांतले किल्मिष निघते पुडे मामलती सरळ चालतात बाहदर सर्वोपरी पदरी पडून उमदी कामें होतात हें समजोन सर्व कबूल करून निर्मळ पंचमहाल स्वराज्य

---

१ प्रो. के. पी. कुलकर्णी यांजकडून मिळालेलीं.

सरदेशमुखी समेत इनामपत्रें करून दिल्ही इतकियांत हरिपंताकडे बाहदर गेले. मामलतींचे मामूल वैवाटीचे फडचे न जाले सफरांत हरिपंत याजपाशीं पांच लाख रुपये बाहदरांनी सूट घेऊन फडच्या करून घेतला त्याच स्वारींत मामलतींचे मामूल वैवटींचे दप्तर हरिपंतापासीं नव्हते बाहदरांनी जिवाजीपंत यासी यादी दिल्या होत्या त्या यादीवर सूट घेतली यादी आपले मतलबाच्या दिल्ह्या त्यांत पाहतां कमती मनमानेसीं राजश्री हरिपंत यांचे करणे व इकडील कर्णे दोन नाहींत त्याणी पांच लाख सूट दिल्ही तेस मंजूर नाहीं यैसी नाही परंतु जमेसच ठिकाण नाहीं तो सूट कशांत मोजावी. जमेचा प्रकार तरी मामूल ज्या माहाली दाहा तेथील बाहदरानीं पांच लिहिले कमती मनमानेसी येक लोहगांव परगाणा अकरा हाजर मामूल असतां बाहदरांनीं तीनसे लिहिले यास कसे करावे येक साली नव्हे राज्यांतील नुकसानी बाहदरांनीं जागीर तगेरी वाहतीची इनाम नव्हे आणि इकडील तौ धाराच मोडतो हे कसे सोईस पडेल याजकरितां इकडील म्हणे बाहादराचे जागीरीचे पूर्वी जागीरदार होते त्या वैवटीप्राो येकंदर यैवज जमा धरून त्यांत लुटीचा प्रकार जमेस ठिकाण नाहीं तीच सूट कशाची इतका प्रकार वरकड कांहीं नाहीं बाहदरांनीं समजावे मामूलप्राा यैवज धरून आकार होईल तो द्यावा पुढे मामलती सरळ चालाव्या हेंच दोस्तीस त्यासला जम बाहदराचा आमल जाल्या पासोन इकडील आमलास ठिकाण नाही यास कसें करावें हा अर्थ येथील हे कौण्ही न समजोन तिकडील गप्पा इकडे व इकडील तिकडे काये लिहितात आणि काये समजावितात न कले जितकी यैकावी तितकी मनस्वी वर्तमाने उठतात हाजरत बंदगान अलीचेही इनायेत नामे व जिवाजीपंत यास इरशाद व आखबरावरील वर्तमाने यैकूनच जाली याप्राो जिवाजीपंत यासहि तपसिले लिहिले तुम्हासही समजावे म्हणोन लिहिले असे राजश्री दिवाकरपंत यास हे कचे समजोन सांगावे म्हणजे सर्व त्यांचे ध्यानांत येईल स्वराज्याचे मामूल कमी होण्यास कसे हे मर्म व कलकल दिवाकरपंत यास ठाऊक आहे येकवेल पाच रुाो रयात करण्यांत दोष नाही वैवट कमी करणें परम कठिण स्वराज्य म्हणजे मूळ दौलतींचे वतन हे दिवाकरपंत जाणतात दादास तुम्ही पुरवणीच वाचून दाखवावी सर्व विशये त्यांचे चित्तांत समजतांच येथील इकडील गुंता कोणेही गोष्टीचा नाहीं. राजश्री दिवाकरपंत

यास पूर्ते न समजले आणि तुम्हापासी त्याचे उत्तर जाले कीं आम्हास काये गरज असी उदासपणें भाषण केले सबब इतके तरासिले लिहिले आसत मामलतीखेरीज बाहदुराविशी व दोस्तींत बालाग्र दुसरा अर्थ इकडून नाही पुढेंही इकडून अंतर येणेच नाहीं येक वेळ वचन जाले त्यास उगेरण कमतीपण पडावयाची नाहीं विस्तार काये ल्याहावा. राजश्री दिवाकरपंत यानी बहादरासी बोलोन समजोन सांगावे याविशी इकडील दुसरा अर्थ रतिमात्र नाहीं यास्तव उदासपणे नसावे दिवाकरपंत दादानीं मन घालून करावे बाहदरास मार्गाचे रीतीनें सांगावे × आम्हा पेकशा (१) आपण त्याचे प्रकृतीस माहीत फार आहित समजावून सांगून लोभ सोडून निखालस करून देणे कार्यावरी येत ते करावे हे विनंती.

---

(२) पौ। छ ५ शावाल कार्तिक २६ आक्टोबर १७७८.

पु।। राजश्री लक्ष्मणपंत स्वामीचे सेवेसी....

विनंति उपरी इंग्रजासी व फिरसासी बिघाड विलायतेस जाला फुलचरीही लढाई शुरू जाहली फरासिसाची जहाजे जंगी ममइकडे येणार व सरकार तालुकियांत उतरून गलबत पाणी सरंजाम भरावा यैसी नाना प्रकारें वर्तमान चेनापटणाहून व हैदरनाइकाचे तालुकियांतून वगैरे बजाव ऐकतो कागदपत्रीं कांहीं नाहीं ... बाजारू अफवा फार आहेत. त्यास नागपुरी कांहीं वर्तमान येत असालिया वरचेवर लिहित जावे हैदरनाईक मृत्यु पावल्याचें वर्तमान पेशजी लिहिलेच आहे टिपू पटणाकडे फौजेसह गेला कळावे † फरासिसाची दाटी यैकतो तिकडे खबर असेल ती ल्याहावी.

कृष्णो वामन पोतदार.
५८० शनवार पेठ पुणे २


---

× येथून अक्षर सखारामबापूचें. † येथून अक्षर सखाराम बापूचें.

## इ. स. १७७९ मध्यें जप्त झालेला बापूचा सरंजाम

| गांवें | | जप्ती अधिकारी |
|---|---|---|
| १ मौजे अवे–धोंडाजी शिंदे यांची पागा | ... ... | गोविंद सदाशिव |
| १ भोळी–मोकासा<br>१ तोंडल ( पुणें जिल्हा ) | ... ... | पुणें सुभा |
| १ वेळवण ( लोहगडाजवळ ) | | |
| १ विटिनल ( तोफखान्याकरितां )<br>१ आटपाडी महाल<br>१ हिवरें तिजाई<br>१ बोपगांव ”<br>१ चांबळी दरोबस्त<br>१ खानवाडी ” | ... | पुणें सुभा |
| १ कांत्रें तिजाई<br>१ चौधाई (नेरळजवळ) | ... ...<br>... ... | गणेश वामन<br>लक्ष्मण लागू |
| २ घोवरी व नांदूर ( मोकासा व तिजाई ) | ... ... | नरहर लक्ष्मणराव |
| १ तळवंड | ... ... | लक्ष्मण हरी लागू |
| मौजे खुटे–माणकोजी निंबाळकराची पागा | | |
| २ गांवें महादजी शिंद्याकडील | | |
| १ मौजे धाणेर सरंजाम व मोकासा | | |
| १ डोंगरगांव | | |
| १ मौजें निंबगांव | ... ... | पाबळ |
| १ ” सुपे (चौथ व कामविसी) | ... | गणेश वामन् |
| १ मौजे माळशिरस (मोकासा) | | |
| १ ” दुधडी | ... ... ... | गोपाळराव भगवंत |
| १ लोणंद | ... ... ... | निळकंठराव थोरात |
| १ वेळके ( मोकासबाब ) | | |
| १ बागलाण | ... ... ... | सनादास |
| १ गुजराथ प्रांत | | |
| १ खानदेश प्रांत | | |

# बोकील घराणें ( वंशवृक्ष ).



# सूची.

अंताजी माणकेश्वर २०; २७; ३८; ४०.
अष्टन, कर्नल १५५–९; १६२
अप्पाजीराम; ७८; ८३–४
अबदाली २०;२७–८;३०;३३–५;४१
आनंदराव धुळप १४४–
राम (साष्टीचा किल्लेदार) १४३; १४ ५
आनंदीबाई–कैद १०३; १७०; बापूस पत्र १७१–७३
आबा पुरंदरे ४३; ५७; ६२;७५ सरंजाम जप्त ९४
कार्नाक २०६
कीटींग, कर्नल १४७; १५७
कोनेरराम ५९
गणेश संभाजी; २४; ३८–९
गमाजी यमाजी ५७; निजामास मिळतो ५९–६१; ६२–५
गंगाधर यशवंत २०; २२; २४; ३३; ६२; कैद ९४.
गंगाबाई ११४–५; २२९.
गॉडर्ड कर्नल; २००; २०३
गाजीउद्दीन ( वजीर ) २१; २६–७; ३०–३.
गोपाळ गणेश ३२; ३४. नाईक १८९
गोपाळराव पटवर्धन २९; ४४; बापूबद्दल मत ५०–१; ५७; ८५; निजामाकडे जातो ६१–७; ७४; कर्नाटकांत ८२–८५; भोसल्यावरील स्वारी ९४.
गोपिकाबाई ४७–५०; ६०; ६७; ९२; १०२;
गोविंदपंत बुंदेले २४; ३८–९.
गोविंदराव गायकवाड १४९.
गोविंद शिवराम खाजगीवाले ८१; मध्यस्थी ९१–२.
गोविंद हरी–बापूबद्दल मत ४९; ५०; ५६;। मिरजेचा वेढा ६४; ६७–८; ७५; ९१.
ग्रँटडफ ४४; ४६; पेशवाईचा नाश २२९–२३०
चिंतो विठ्ठल २०; फडणीस ५५; ७६; ९३; १०९–१०
जानोजी भोंसले ५९; महत्त्वाकांक्षा ६०; ६३; ६५; ८९; राघोबास मदत ९२; कनकापूरचा तह ९४;
जिवाजीपंत काळे १४९–५१
डॉम जोसे ड कामारा २०६
तुकोजी होळकर १२५; १३४; मोरोबास मदत १९०–२.
त्रिंबकराव २८; २९; ३२; बापूबद्दल मत ४८–५० बारामतीस प्रयाण ५६; ८६; ११३–४; बापूस सर्वाधिकार देतात. १२०–७– कासेगांवची लढाई.१२९–मृत्यु १३०
धोंडो दत्तात्रय ३१.
दमाजी १९–२०; ६७; १२४

दिवाकर पंडित ५८–९; कारस्थान ६७; ७१; १२४; कैद ९४; इंग्रजांशीं संबंध २०२.

नजीबखान २१.

नाना ४०; ६३; ७४–५; ८८; नऊ कलमीयाद ९६; कारभारी १०२–३; पुरंदरचा तह १५५;इंग्रज १६८ –९ मोरोबाचें कारस्थान १८४–६.

नानासाहेब ११; १४–८; २५–६; ३४; ३६; ४१–३; ५८; ६७; कोंकणस्थांचा अभिमान २३१.

नारायणराव ९५; प्रभु प्रकरण १०४; खून ११४–५.

नारो अप्पाजी ६३;–केशव ३१–३३. –गणेश १३७; २०६; –शंकर ४५; ५३; ५६; ७०

निजामअल्ली ४३–४; ५८.

परशुरामभाऊ १९६.

पहाडसिंग २८–२९.

पुरंदरे नीलकंठ महादेव ५५–५७ –महादजी ११–१७.

पुरुषोत्तम दाजी १२३

फार्मर ( इंग्रज वकील ) २०७–८

फत्तेसिंग १२४–५

बाजीपंत बर्वे १८३

बाजीराव ( १ ला ) ११–१३.

बाबूजी नाईक ८१–८२.

बाबूराव फडणवीस(कारभारी)४९;५६; ६९

बोकील १–निंबाजी ९; १०; २२४–पंताजी गोपिनाथ ३; अफझुलखानाचा वध ४–६; ९ ९–बाजपिंत ९–१०;–भगवंतराव ९;–महादाजी ६–१२–रंगोपंत २; ३.–सखाराम-बापू ( ‘ सखारामबापू ’ पहा )

ब्रोम चार्लस ८९

भगवंतराव ११०

भवानराव १०९–१०; ११८–९ अटक ११९; १३३ मृत्यू २४९.

भास्करराव ( राघोबाचा पुत्र ) ५६; ६९.

भिवराव पानशे १७०; १९०

मल्हारराव १६–२४; ५३; ६०–६

महमद यूसफ १०५–८; ११२

महमदअल्ली नबाब –८३; ११२; १६३

महादजी शिंदे ८८; ९३; १२५ राघोबाशीं वाटाघाट· १३५–९; १७०; १७३; इंग्रज–मराठे युद्ध २०६–८ २११

माधवराव ६९–७१; ८१–७ कारभार ४७–५२ श्रीगोंदें तह ४४–५ घोडनदीची लढाई ५३–४ पुरंदर प्रकरण ७५–७६ राघोबाशीं बेबनाव ८८–९१ कर्नाटकांतील स्वाऱ्या –७२ ८०–मतें ८६; ९५ योग्यता ९६–७.

मॉस्टिन ११२ नारायणरावाचा खून १०६–७.धोरण १४६;१४९–५०; १६९; १८८; १९७–८; २०३–५
मीर रेझा–८२
मुधोजी भोसले ५९; १०४; ११२; १३५
मुरारराव ४३; ७७–८; ८२
मुसाछौलिया २०१
मेघफराज १६७.
मोरोबा ८५;९० हक्क ९४ कट १७५–६;१८१–३ कैद १९३ कारस्थानाचें महत्त्व १९५–६
रघुनाथराव ( राघोबा ). १७; गुजराथेत स्वारी १९–२१; कुंभेरीचा वेढा २१–२३; उत्तर हिंदच्या स्वाऱ्या २७–२९; ३४–५; निजामाशीं युद्ध ४३–८;५२ घोडनदी ५३; मिरज काबीज ५६–७; ६१ राक्षसभुवन ६८–९ कर्नाटकांत सेनापती ७२; ७६,–९; ८४ असंतुष्ट ८६;८८,–९२; कैद ( घोडप) ९३. रीजंट १०१–२; पुनः कैद १०३–५; नारायणरावाचा खून १०६–११२ पेशवाईपद ११२, कर्नाटकांत स्वारी ११४–११८–९ पदच्युत ११४. कासेगांवची लढाई १२८–३० समेटाचे प्रयत्न १३१–२ उत्तरेकडे प्रयाण १३३–४; १३९–४० सुरतेचा तह–१४७ पेशवाई मिळविण्याचे प्रयत्न १४८–५३. मोरोबाचें कारस्थान १८७–९राज्यत्याग २०८ बापूचें चिठ्याचें प्रकरण २११; बापूशीं संबंध २३५–९.
रघूजी आंग्रे १४४.
राघो लक्ष्मण ३१–२.
राजवाडे.–बापूवर टीका ३८–४०; ९९
रामचंद्र गणेश ८१; १४७
रुकनुद्दौला १२४; १३३; मृत्यु १४८
लक्ष्मण रावजी –बापूचें पत्र २००–१.
वामनराव पटवर्धन ११८; १२०; १४७
विठ्ठल शिवदेव २४–५; ३८; ५२;५५ ६०; ६३; ७७
विठ्ठलसुंदर ( मुत्सद्दी ) ५७–९; कारस्थानें ६६–७; मृत्यु ६८; ७१
विल्यम पिट ( चॅथॅम ) ९८
विसाजी कृष्ण–उत्तर हिंद ९५; साष्टीचा वेढा १४३–५. शंकराजी रघुनाथ ( सचिव ) –२१२
विसाजीपंत ( वसईचे सुभेदार ) १०३–४; १४२
शाहू ३; ६–९; ५९
शिवाजी ( छत्रपती ) ३–६.
सखारामबापू ( मुत्सद्दी ) –कुलवृत्तांत १–९जन्म,तारुण्याचा प्रारंभ१०–७ कामगिरी १५–६; १८–४२; कारभारी ४३–८; ५५; ६७–९; ७३; ९४–५; १०१–समालोचन ९८–१०१ माधवरावाशीं उपदेश ५३–५४;९७ नारायणरावाचा खून१०४ ११०,–बारभाईचें कारस्थान११२–२० धोरण १२३–२८ सर्वाधिकारी

१३८–७५ १३८–४१; २३५–९.
इंग्रज मुत्सद्दी १४३–५३; १६२-३;
इंग्रजांशीं युद्ध १९६–२०८;२४४–८;पुरंदर तह १५६–७.नाना १७६–८०; १९१--३महादजी१६९·७० मोरोबा १७५–९५ आख्यायिका ९५–६; २२५–९ आक्षेप २४०–३ कौटुंबिक १९०; २२१–४ कैद २०९-१४ खाजगी १९७; २१९–२२१. दिनचर्या २१८–९ देशस्थ कोकणस्थवाद २३२–४, द्रव्य संग्रह व जप्ती २१४–५;२४९–५० नेमणुका २६; ८० प्रतिनिधी घराणें २४८–९ मृत्यु २१६ राजकारण २०३–४. स्वभावचित्र २५०–५२-जीवनकार्य २५२
सखाराम हरी ६९; ११०; १३७
सदाशिवराव भाऊ ११; १५; १७, १९; ३७;–४५; ७३.
सवाई माधवराव १३३; १४८
साबाजी भोसले १४९
सिद्धेश्वरभट ( बोकिलांचे पूर्वज ) १,२
सुखनिधान ( तोतया १६५–६)
सुजा उद्दोला२४; ३०–३३
सुमेरसिंग १०४–६
सुरजमल्ल २१–२
सेंट ल्यूबीन १६९
स्प्रिंजेल ( जर्मन इतिहास लेखक ) १२
स्मिथ व्हिन्सेंट ३५
हरीपंत फडके १३०; दादाचा पाठलाग १३३–४१; इंग्रजांशी युद्ध १४७
हाफीज रहमत ३०–१.
हॉर्नबी १८९–९०
हेस्टिंग्स १६३–४कारभाऱ्यासंबंधी मत १७४; एक साहस १९७–९
हैदर ४३; ४६; ७४–९ योग्यता ७२-७३; माधवरावाची स्वारी ८०–४; ११२.

—

# अभिप्राय

श्री. कानेटकर यांनीं लिहिलेलें सखारामबापूचें चरित्र वाचून पाहिलें. साडेतीन शाहण्यांतला एक सबंध शहाणा अशी ज्याची पेशवाईत सर्वत्र प्रसिद्धी होती अशा कर्तबगार मुत्सद्याचें चरित्र सुसंगत रीतीनें आजवर कोणीच लिहून काढण्याचा प्रयत्न केला नव्हता. ती एक उणीवशीच भासत होती. ती इतिहासाचे तरुण अभ्यासक श्री. कानेटकर यांनीं भरून काढली हें फार चांगलें झालें. सखारामबापूविषयींची सर्व तऱ्हेची माहिती या चरित्रांत एकत्रित झाल्यामुळें सामान्य वाचकांची व इतिहासाभ्यासकांचीही चांगली सोय होणार आहे. बापूचें चरित्र लिहिण्याला, केवळ अव्वल दर्जाची म्हणजे समकालीन कागदपत्रांचीं साधनें, पेशवे दप्तर प्रसिद्ध होऊनहि अद्याप फारच थोडीं उपलब्ध आहेत. यामुळें चरित्र सजवतांना आख्यायिका दंतकथादिकांचाही लेखकानें उपयोग केलेला दिसतो. बापूसंबंधीं अनेक अप्रसिद्ध साधनें मिळवून प्रथमच त्यांचा उपयोग केलेला या पुस्तकांत आढळून येतो. लेखकानें वेळोवेळीं प्रकट केलेलीं मतें, दिलेले निर्णय किंवा मारलेले शेरे यासंबंधीं कित्येकांचा मतभेद होण्यासारखा आहे. तथापि चरित्र-लेखन पूर्वग्रहरहित, व निःपक्षपातबुद्धीनें करण्यांत आलें आहे हें त्यांनाही कबूल करावें लागेल. श्री. पुरंदरे यांची पुरंदरे दप्तर भाग ३ ची विस्तृत प्रस्तावना वाचलेल्यांना हें विशेषच पटेल. असो. बापूचें साग्र लिहिलेलें असें चरित्र प्रथमच वाचावयास मिळाल्यामुळें आनंद झाला. तपशिलासंबंधी चुका वगैरे असल्यास त्या पाहण्याचें काम खास इतिहाससंशोधकांचें आहे.

पुणें ८।१०।३५ न. चिं. केळकर